# हेन्री फोर्ड




म. ग्रं. सं. ठाणे
REFBK-0009500

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८८८२ वि:
क्रमांक ८२६ नों: दि: ३०/११/५०.

यंत्र रसिक

# हेन्री फोर्ड

▲

लेखक

लुई आल्ब्राइट नेहार्ट

▲

अनुवादक

अमरेन्द्र

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों. दि. ............
ग्रंथ संग्रहालय ठाणे
७५००
REFBK-0009500

कुमार साहित्य माला

व्होरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

कुमार साहित्य माला : २
हेन्री फोर्ड..........चरित्र

▲

आवृत्ति पहिली
जून, १९५७

▲

Copyright–1950
By Louise Albright Neyhart

▲

किंमत दोन रुपये

▲

प्रकाशक :
एम्. के. वोरा,
वोरा ॲन्ड कं. पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी
मुंबई २.

▲

मुद्रक :
अ. चिं. रायरीकर,
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनवार पेठ,
पुणें २.

कुमार साहित्य माला

१. हद्दपार...... ......कादंबरी
२. हेन्री फोर्ड...... ......चरित्र
३. ओंजळ............कथासंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... नों: दि: .....

# एका मुलाची गोष्ट

ही एका अशा मुलाची गोष्ट आहे–ज्याला यंत्रें जिवाहून प्यार होतीं. या त्याच्या यंत्रप्रेमानेंच मोठेपणीं त्याला जगावर थोर उपकार करतां आले.

हेन्री फोर्डचा जन्म झाला तेव्हां अमेरिकेत घरगुती कामासाठीं यंत्राचा वापर करण्याची कल्पनाहि नव्हती. बहुतेक वस्ती खेडोपाडींच विखुरलेली होती. प्राचीन वसाहतवाल्यांप्रमाणें त्यावेळच्या कुटुंबांतील साऱ्याच माणसांना कसून मेहनत करावी लागे आणि शक्यतों स्वावलंबी बनावें लागे.

हेन्रीचे वडील वुइल्यम फोर्ड हे आयर्लंडमध्यें जन्मलेले. पण वयाच्या विसाव्या वर्षींच, १८४७ सालीं, त्यांनीं आपल्या भावाच्या सांगातीं ( याचें नांव होतें हेन्री ) अमेरिका गांठली. रोग नदीच्या वळणावर वसलेल्या डीअरबोर्न गांवीं त्यांनीं वसती केली. हें डीअरबोर्न येतें मिचिगान या अमेरिकेंतील संस्थानांत. त्यांची तिथल्या जीवनाची सुरुवात झाली शेतमजूर म्हणून. पण पुढें त्यांनीं आपल्या कर्तबगारीवर वीस एकर जमीन विकत घेतली. मग त्यानीं आपल्या जुन्या मालकाच्या सुंदर दत्तक मुलीशींच लग्न केलें आणि आपल्या शेतावरच एक दुमजली इमला उठवून संसार थाटला.

त्यांच्या कारभारणीचें नांव मेरी फोर्ड. हिचे आईवडील डच व स्कॅंडिनेव्हियन. अंगचा उत्साह ओसंडत असलेल्या या तरुण गृहिणीची घरकामांतील टीपटाप डोळ्यांत भरण्यासारखी होती. डच बायकांना आपल्या सुगरणपणाचा केवढा अभिमान ! तिचें घरदार कसें स्वच्छ झाडून पुसून लख्ख असायचें सदा. अर्थातच असें घर ठेवायचें तर हातांना उसंत नसायचीच. आणि इतका वावर सांभाळूनहि बाई कशी सदा हंसतमुख. कोणाच्याहि अडल्यापडल्याला उभी राह्यला नेहमीं तत्पर. साहजिकच शेजाऱ्यापाजाऱ्यांना ती हवीहवीशी वाटायची.

या कामसू व सुखी दांपत्याला ३० जुलै १८६३ या दिवशीं पहिलें मूल झालें. " कसा छान आहे बाळ ! भावोजींचेंच नांव ठेवूं या याला–हेन्री." मेरीची ही सूचना वुइल्यमला मानवली. मुलाचें नांव 'हेन्री' ठेवण्यांत आलें.

तो महिना मोठा क्रांतिकारक होता. याच महिन्यांत सेनापति ली यानें गेटिसबर्गला महत्त्वाचा विजय मिळविला होता आणि प्रतिपक्षाच्या–कॉन्फेडरेट–सेनेला दातीं तृण धरून शरण यावयास लाविलें होतें. अमेरिकेतील यादवी युद्ध यानंतर संपलें. संयुक्त अमेरिकन राष्ट्रानें अति वेगानें घडणाऱ्या घडामोडींच्या काळांत प्रवेश केला. तोंवर शेती हाच मुख्य व्यवसाय होता; परंतु प्रचंड उलथापालथी क्षितिजावर दिसूं लागल्या होत्या. हळुहळु व्यापार व उद्योगधंदे यांनीं आघाडी मारली; आणि राक्षसी प्रमाणावरील कारखान्यांनीं औद्योगिक युगाची इमारत उभी केली.

हेन्‌री फोर्ड दोन वर्षांचा होता तेव्हांच अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन मारेकऱ्याच्या गोळीला बळी पडला. अब्राहम लिंकनला औद्योगिक सुखसोयी लाभल्या नव्हत्या. तथापि तो हाहा:कार माजला त्यावेळीं वरील औद्योगिक युगाची पहांट झालेली होती यांत कांहीं शंका नाहीं. अमेरिकेच्या प्रचंड औद्योगिक प्रगतीचा पायरव तेव्हांच–विशेषत: पूर्वप्रदेशांत–ऐकूं येऊं लागला होता. शक्ति-युगाच्या शुभागमनासाठीं बलाढ्य सामर्थ्यें सामोरीं जात होती. जेम्स वॅटच्या वाष्पयंत्रानें ( स्टीम एंजिन ) अमेरिकेचें या शक्ति-युगांत अधिकृत पदार्पण झालें असें म्हणतां येईल.

पोलाद-उद्योगसुद्धां नुकताच पावलें टाकूं लागला होता. पोलादाच्या स्वस्त, द्रुत व प्रचंड प्रमाणावरील निर्मितीसाठीं माणसांची धडपड चालू होती. नंतर तेल-उद्यमाचा जन्म झाला. १८६९ सालीं रेल्वेचीं दोन वाफेवर चालणारीं एंजिनें उताह् या ठिकाणीं एकमेकांना भेटण्यासाठीं फुसफुसत, धांपा टाकीत निघालीं. त्यावेळीं अमेरिकेंत लोहमार्ग तयार झालेला होता आणि त्यावरून उतारूंची व मालाची वाहतूक होऊं शकत होती.

त्या थोर औद्योगिक देशाच्या प्रारंभींच्या काळांत ‘ हेन्‌री फोर्ड ’ या छोट्या मुलानें आपल्या फावल्या वेळांत एक चाळा सुरू केला. त्याला यंत्रविज्ञानाची आवड निसर्गत:च होती. तें कुतूहल शमविण्यासाठीं म्हणूनच त्याचा हा चाळा होता. शालेय पुस्तकांचें वाचन, लेखन किंवा गणिताचा काथ्याकूट यापेक्षां या चाळ्यांतूनच फार अधिक शिकण्यासारखें आहे याविषयीं हेन्‌रीची खात्री कधींच होऊन चुकली होती. या मुलाची ही ज्ञानलालसाच अखेर आपसुख यंत्रयुगाकडे येऊन पोहोंचली.



मेरी फोर्डचें निर्मळ स्वयंपाकघर उघड्या शेगडींतील धगधगत्या विस्तवाच्या प्रकाशांत नुसतें चकाकत होतें.लांबच लांब पसरलेल्या ओट्याच्या टोंकाला रात्रीचा स्वयंपाक वेगवेगळ्या भांड्यांतून शिजत होता आणि कसल्या तरी स्वादिष्ट सागुतीचा मोठा छान वास सर्वत्र दरवळला होता. फोर्डबाई ताक घुसळीत होत्या त्याचा चुर्रचुर्र आवाजहि कानांवर पडत होता. मार्गारेट ही त्यांची थोरली मुलगी. वुइल्यम बाळ पाळण्यांत झोंपला होता त्याला ती पायानें आंदुळीत होती आणि हातांनीं घरच्या मोज्यांना रफू करीत होती. हीं दोन्ही कामें चालू असतांनाच तोंडानें ती कांहीं तरी गुणगुणत पण होती. जॉन व जेन यांचा चेंडूचा खेळ चालला होता. एक तागाचा चेंडू तीं जमिनीवर इकडून तिकडे फेंकीत बसलीं होतीं.

---

## पहिलें प्रकरण

## २ ।।।।।

हेन्री पांचव्या इयत्तेंत शिकत होता. तो आपला धडा वाचीत होता : " जुगार म्हणजे साऱ्या दुर्व्यसनांचें भलें थोरलें आगर; सगळ्या दुर्गुणांची जननी. "—पण त्याचे डोळे पुस्तकावर कोठले ठरायला ! वाचतां वाचतांच ते पुस्तकांतल्या धड्यावरून ओटयावर थडथडणाऱ्या चहाच्या किटलीकडे वळले. ' या मॅक्-गफीच्या पुस्तकांतल्या धड्यांतून माझ्यासारख्या दहा वर्षांच्या मुलाला आवडतील अशा गोष्टी कां नाहीं सांगत बुवा ! '—कसले तरी तुकडे एकत्र जोडले म्हणजे एखादी छान उपयुक्त वस्तू कशी बनते याची, नाहींतर लोहाराच्या ठाकठोक करणाऱ्या दुकानाची किंवा मोठ्या थोरल्या, उंच चाकांच्या भग-भग भग-भग करीत जाणाऱ्या आगगाड्यांची, अशा गोष्टी सांगितल्या असत्या या पुस्तकांत तर किती मजा झाली असती ! ' असें मनांत येऊन गेलें हेन्रीच्या.

किटलीच्या चिंचोळ्या तोटींतून वाफ सारखी बाहेर पळत होती. छोटा हेन्री तिकडे लक्षपूर्वक पाहात होता; आपल्या धड्याचा त्याला साफ विसर पडला. चाकें वाफेनें फिरतात हें त्याला माहीत होतें, पण तीं कां हें त्याला ठाऊक नव्हतें. वाफेच्या इंजिनाचा शोध शंभर वर्षांमागेंच लावणाऱ्या जेम्स वॅटप्रमाणें हेन्रीलाहि चहाच्या उकळत्या किटलीवरचें झांकण पुन्हां पुन्हां काढून जाग्यावर ठेवायला फार आवडत असे. मग, तो एक पेला त्या बाहेर पडणाऱ्या वाफेवर धरी आणि वाफ जेव्हां तोटींतून गरगरत येऊन कढत पाण्याच्या थेंबांत रूपांतरित होई तेव्हां ती गंमत तो न्याहाळीत बसे.

हेन्री एकदम आपल्या आईकडे वळला, " काय ग मा, चहाच्या किटलीला तोटीच नसली आणि वाफेचा मोठा थोरला ढग तिच्या तोंडाशीं जमलाच नाहीं तर काय होईल ग ? "

" मग चहासाठीं पाणी उकळायला लागलें कीं नाहीं हें मला कसें रे कळेल ! "

" पण, आपली नुसती कल्पना ग आई. " हेन्री तेंच धरून बसला.

" त्यांत नको डोकें शिणवूंस तूं आपलें, हेन्री. अभ्यासाचें पुस्तक घेऊन बस कसा. "

इतक्यांत दरवाज़ा उघडला आणि फोर्डमहाशय पडवींतून आंत आले

" हं ऽऽ " हुंगल्यासारखें करीत फोर्ड म्हणाले, " आयरिश सागुती. साऱ्या देशांत आमच्या ' हि'च्यासारखी खरोखर सुग्रण नाहीं ! "

फोर्ड आपल्या त्या थोरल्या खुर्चींत येऊन स्थानापन्न झाले व त्यांनीं पाय चांगले लांब पसरले.

हेन्री हळूच उठून वडिलांजवळ सरकला. " पपा, वाफ जर किटलीं-तून बाहेरच पडूं शकली नाहीं तर काय होईल हो ? "

" तुझ्या पुस्तकांत काय सांगितलें आहे ? "

" वाफेबद्दल तर कांहींच नाहीं सांगितलेलें पुस्तकांत, पपा. "

" मग तूं या नसत्या उचापती कशाला करतो आहेस, आपला अभ्यास सोडून ? तुझ्या पुस्तकांत जें असेल तेंच तूं शिकत जा. तें सगळें शिकून झालें आणि तरीहि तुला आणखी शिकायचें असलें तर, पुढल्या वर्षीं एका एकरांत किती बुशेल ओट पिकेल तें काढूं आपण. "

हेन्रीनें पुन्हां आपलें डोकें पुस्तकांत खुपसलें आणि मग तो अधीर-पणानें जेवणाची वाट पाहात बसला.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं हेन्री स्वयंपाकघरांत एकटाच होता. फडताळा-वरच्या घड्याळाचें टिक्‌टॉक् हळुहळु मोठमोठ्यानें ऐकूं येऊं लागलें. " शोधून काढ, शोधून काढ " प्रत्येक टिक्‌टॉक जणूं हेन्रीला म्हणत होतें. हेन्रीला धीर निघेना.

हेन्री कपाटाच्या सर्वांत वरच्या फळीवर चढला आणि त्यानें तिथून एक मातीचें जुनें चहाचें भांडें हुडकून काढलें. त्यानें त्या मातीच्या चहादाणींत बरेंसचें पाणी ओतलें, एका तारेच्या तुकड्यानें चहादाणीचें झांकण घट्ट बांधून टाकलें आणि वुइल्यम बाळाचा एक लोकरी बूट हातीं लागला तोच कोंबून चहादाणीचें तोंड जाम करून टाकलें.

" आतां ये कशी बाहेर येत्येस ती ! " सगळ्या बाजूंनीं बंद करून टाकलेली ती चहादाणी पेटलेल्या शेगडीवर ठेवतां ठेवतांच तो धमका-वून म्हणाला.

हेन्री पांचव्या इयत्तेंत शिकत होता. तो आपला धडा वाचीत होता : " जुगार म्हणजे साऱ्या दुर्व्यसनांचें भलें थोरलें आगर; सगळ्या दुर्गुणांची जननी. "—पण त्याचे डोळे पुस्तकावर कोठले ठरायला ! वाचतां वाचतांच ते पुस्तकांतल्या धड्यावरून ओटचावर थडथडणाऱ्या चहाच्या किटलीकडे वळले. ' या मॅक्-गफीच्या पुस्तकांतल्या धड्यांतून माझ्यासारख्या दहा वर्षांच्या मुलाला आवडतील अशा गोष्टी कां नाहीं सांगत बुवा ! '—कसले तरी तुकडे एकत्र जोडले म्हणजे एखादी छान उपयुक्त वस्तू कशी बनते याची, नाहींतर लोहाराच्या ठाकठोक करणाऱ्या दुकानाची किंवा मोठ्या थोरल्या, उंच चाकांच्या भग-भग भग-भग करीत जाणाऱ्या आगगाड्यांची, अशा गोष्टी सांगितल्या असत्या या पुस्तकांत तर किती मजा झाली असती ! ' असें मनांत येऊन गेलें हेन्रीच्या.

किटलीच्या चिंचोळ्या तोटींतून वाफ सारखी बाहेर पळत होती. छोटा हेन्री तिकडे लक्षपूर्वक पाहात होता; आपल्या धड्याचा त्याला साफ विसर पडला. चाकें वाफेनें फिरतात हें त्याला माहीत होतें, पण तीं कां हें त्याला ठाऊक नव्हतें. वाफेच्या इंजिनाचा शोध शंभर वर्षांमागेंच लावणाऱ्या जेम्स वॅटप्रमाणें हेन्रीलाहि चहाच्या उकळत्या किटलीवरचें झांकण पुन्हां पुन्हां काढून जाग्यावर ठेवायला फार आवडत असे. मग, तो एक पेला त्या बाहेर पडणाऱ्या वाफेवर धरी आणि वाफ जेव्हां तोटींतून गरगरत येऊन कढत पाण्याच्या थेंबांत रूपांतरित होई तेव्हां ती गंमत तो न्याहाळीत बसे.

हेन्री एकदम आपल्या आईकडे वळला, " काय ग मा, चहाच्या किटलीला तोटीच नसली आणि वाफेचा मोठा थोरला ढग तिच्या तोंडाशीं जमलाच नाहीं तर काय होईल ग ? "

" मग चहासाठीं पाणी उकळायला लागलें कीं नाहीं हें मला कसें रे कळेल ! "

" पण, आपली नुसती कल्पना ग आई. " हेन्री तेंच धरून बसला.

" त्यांत नको डोकें शिणवूस तूं आपलें, हेन्री. अभ्यासाचें पुस्तक घेऊन बस कसा. "

इतक्यांत दरवाजा उघडला आणि फोर्डमहाशय पडवींतून आंत आले

" हंऽऽ " हुंगल्यासारखें करीत फोर्ड म्हणाले, " आयरिश सागुती. साऱ्या देशांत आमच्या ' हि'च्यासारखी खरोखर सुग्रण नाहीं ! "

फोर्ड आपल्या त्या थोरल्या खुर्चींत येऊन स्थानापन्न झाले व त्यांनीं पाय चांगले लांब पसरले.

हेन्री हळूच उठून वडिलांजवळ सरकला. " पपा, वाफ जर किटलीं-तून बाहेरच पडूं शकली नाहीं तर काय होईल हो ? "

" तुझ्या पुस्तकांत काय सांगितलें आहे ? "

" वाफेबद्दल तर कांहींच नाहीं सांगितलेलें पुस्तकांत, पपा. "


" मग तूं या नसत्या उचापती कशाला करतो आहेस, आपला अभ्यास सोडून ? तुझ्या पुस्तकांत जें असेल तेंच तूं शिकत जा. तें सगळें शिकून झालें आणि तरीहि तुला आणखी शिकायचें असलें तर, पुढल्या वर्षीं एका एकरांत किती बुशेल ओट पिकेल तें काढूं आपण. "

हेन्रीनें पुन्हां आपलें डोकें पुस्तकांत खुपसलें आणि मग तो अधीर-पणानें जेवणाची वाट पाहात बसला.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं हेन्री स्वयंपाकघरांत एकटाच होता. फडताळा-वरच्या घड्याळाचें टिक्टॉक् हळुहळु मोठमोठ्यानें ऐकूं येऊं लागलें. " शोधून काढ, शोधून काढ " प्रत्येक टिक्टॉक जणूं हेन्रीला म्हणत होतें. हेन्रीला धीर निघेना.

हेन्री कपाटाच्या सर्वांत वरच्या फळीवर चढला आणि त्यानें तिथून एक मातीचें जुनें चहाचें भांडें हुडकून काढलें. त्यानें त्या मातीच्या चहादाणींत बरेंसचें पाणी ओतलें, एका तारेच्या तुकड्यानें चहादाणीचें झांकण घट्ट बांधून टाकलें आणि वुइल्यम बाळाचा एक लोकरी बूट हातीं लागला तोच कोंबून चहादाणीचें तोंड जाम करून टाकलें.

" आतां ये कशी बाहेर येत्येस ती ! " सगळ्या बाजूंनीं बंद करून टाकलेली ती चहादाणी पेटलेल्या शेगडीवर ठेवतां ठेवतांच तो धमका-वून म्हणाला.



हेन्री जमिनीवर बसून पाहात राहिला आतां काय होतें तें.

अखेर, एक लहानसा बुडबुड असा आवाज झाला; नंतर मोठी थोरली रटमट; आणि मग फाड्, फाड्, फाड् ! चहादाणीचे तुकडे तुकडे होऊन ते सगळीकडे पसरले. एका तुकड्यानें एक खिडकीचें तावदान फाडलें; दुसऱ्यानें मेजावर ठेवलेल्या फळांच्या बशीचा निकाल लावला आणि तिसऱ्या एकानें तर हेन्रीच्या कपाळाशीच लगट करून तिथे चांगली खोल जखम केली.

हेन्रीची आई बागेंत होती. तिच्या कानावर हा आवाज जातांच ती धांवतच आंत आली.

" हेन्री, तुला तर कांहींतरी लागलेलें दिसतें, आणि रक्तहि येतें आहे वाटतें. काय करून घेतलेंस बाबा ? "

" वाफेला चहादाणीच्या बाहेर यायला मिळालें नाहीं तर ती काय करत्ये तें मी शोधून काढलें." हेन्रीच्या चेहऱ्यावर पूर्ण समाधान दिसत होतें.

" मला हें खरोखरी अगोदरच लक्षांत यायला हवें होतें. एखाद वेळीं भलतेंच कांहीं तरी होऊन बसलें असतें ! बरें, हेन्री, खिडकीचें हें फुटलेलें तावदान मात्र तुझ्या वडिलांच्या लक्षांत यायच्यापूर्वींच तुला बसवून टाकायला हवें. तुझ्या या चौकसबुद्धीचें कौतुक नाहीं करणार हं ते. " फोर्डबाईंनीं मुलाला बजावलें.

पण, हेन्रीचे विचार मात्र त्या क्षणीं आपल्या वडिलांबद्दल चाललेले नव्हते. " मा, मा, मला वाटलें होतें त्यापेक्षां वाफेची शक्ति दांडगी आहे बरें का ! " तो डोळे विस्फारीत उद्गारला.

" मग, आतां पुढें लक्षांत ठेव तिची शक्ति किती मोठी आहे ती. " हातांनीं हेन्रीच्या जखमा बांधतां बांधतांच फोर्डबाई म्हणाल्या.

इतस्तत: पसरलेले कांचेचे व किटलीच्या मातीचे तुकडे हेन्री आणि त्याची आई गोळा करीत होतीं तेवढ्यांत मार्गारेट धांवत धांवत आंत आली. धापा टाकीतच ती म्हणाली, " पपा कांहींतरी जम्मत घेऊन आले आहेत ना तुझ्यासाठीं. आतां एवढ्यांतच गाडी आली. पण ते कांहीं सांगायला तयार नाहींत ती गम्मत. चल, चल लवकर हेन्री, पपांनीं तुला ती पेटी आंत आणण्याकरितां मदतीला बोलावलें आहे. " पण एवढ्यांत तिचें लक्ष हेन्रीच्या पट्टी बांधलेल्या कपाळाकडे गेल्यामुळें ती बोलायची थबकली. " हेन्री, लागलें आहे तुला ! " ती उद्गारली.

हेन्रीला झालेला अपघात तसा मोठा होता, तरीपण तसें कांहीं विशेष घडलेलें नाहीं असें दाखविणेंच फोर्डबाईंना इष्ट वाटलें. त्याची फारशी वाच्यताहि त्यांना व्हावयाला नको होती. " कांहीं नाहीं ग, जरासें खरचटलें आहे." फोर्डबाई निश्चयी स्वरांत पुढें म्हणाल्या, "आतां हें एवढ्यावरच पुरे. चल, तुझ्या वडिलांनीं काय आणलें आहे तें तर पाहूं. " असें म्हणून आनंदी मुद्रेनें त्या बाहेर जावयाला निघाल्या.

एक भली मोठी लांकडी पेटी अंगणांत दिसत होती. जॉन व जेन यापूर्वीच वडिलांजवळ येऊन ठेपलीं होतीं आणि त्या रहस्यमय पेटींत काय गुपीत असेल यासबंधीं आपलीं इवलालीं डोकीं लढवीत होतीं.

" काय बरें असलें पाहिजे ? " फोर्डबाई विचार करीत म्हणाल्या.

" आणखीं शंभर वर्षें विचार करीत बसलीस म्हणून काय ओळखतां येणार आहे कीं काय तुला तें ? " फोर्डमहाशय डोळे मिचकावीत म्हणाले. " जगांतल्या सात आश्चर्यांतलें एक——इकडे ये हेन्री, जरा हात लाव पाहूं याला. "

" जगांतल्या सात आश्चर्यांपैकी एक ! " मार्गारेट, हेन्री, जॉन व जेन एकदमच पुटपुटलीं.

इतक्यांत फोर्डमहाशयांचें लक्ष हेन्रीच्या डोक्याकडे गेलें. " कुठे धडपडलास— "

" कांहीं नाहीं हो, कांहीं विशेष नाहीं. " फोर्डबाईनीं–हेन्रीच्या आईनें मध्यें पडून सांगितलें. " एक सावें चहाचें भांडें होतें, तें फुटलें. हेन्रीला कांहीं विशेष झालें नाहीं. आज आपण आणलेल्या या भेटीनें मात्र चांगलीच बुच-कळयांत पडल्यें आहें मी. " या बोलण्यानें मात्र त्यांच्या पतीची मुखचर्या पुन्हां पूर्वीसारखी खुलली.

हेन्रीला हायसें वाटलें. त्याची आई म्हणजे प्रेममूर्ति होती. त्याच्या वडिलांचा राग भडकला म्हणजे त्यांना शांत करण्याची तिची एक मृदुमधुर अशी ठराविक रीत होती. आत्तांहि त्याच्या वडिलांचें लक्ष पुन्हां त्या पेटीकडे लागलें आणि चहादाणी-प्रकरणावर, आणखी कांहीं चर्चा न होतांच, पडदा पडला.

हेन्रीची त्या पेटीशीं झटापट चालली होती. " बापरे, ही तर लोखंडा-पेक्षां जड आहे, मा. "

" तुझ्या हातांतली बाजू सांभाळ बरें का बाळ, " फोर्डनीं इषारा दिला. " चांगलीच किंमत मोजली आहे याला. "

अखेर ती पेटी मोठ्या काळजीपूर्वक स्वयंपाकघरांत आणण्यांत आली; आणि तिची एकेक फळी उकलण्यास सुरवात झाली.

काळ्या रंगानें रंगवलेल्या लोखंडाचे तुकडे आणि वॉर्निश केलेलें कांहीं लांकडी सामान त्या पेटींतून चकाकतांना दिसूं लागलें. सारीं जणें अगदीं चकीत होऊन त्या पेटीकडे पहात होतीं. हळुहळु तींतून एक मोठें चाकहि डोकावूं लागलें.

पण, तरीसुद्धां ती काय भानगड आहे हें कांहीं फोर्डबाईच्या डोक्यांत येईना. " माझ्या तरी बाई कांहीं डोक्यांत नाहीं येत. " त्यांनीं आपलें सरळपणानें सांगून टाकलें. " हेन्री, तूं बघ बघूं तुला कांहीं उमगतें का. तुझें डोकें असल्या गोष्टींत चांगलें चालतें. "

हेन्री कोठें स्वस्थ बसला होता! त्या पेटींतलें गुपीत हुडकून काढण्या-साठीं त्याची धडपड चाललेलीच होती. "यंत्र, अग मा, शिवायचें यंत्र आहे." हेन्रीच्या तोंडून धड शब्दहि निघत नव्हता.

मग फोर्डनीं आपल्या त्या 'खूप मोठ्या' भेट-वस्तुसंबंधींची सगळी हकीगत सांगून टाकली. जुन्या शिवण्याच्या यंत्रांना हातानें फिरवायचें चाक असे. पण फोर्डनीं आणलेल्या या यंत्रांत त्या ऐवजीं पायानें चाक फिरवण्याची नवी योजना होती. आतां घरांतलें शिवण, टिपण करण्या-साठीं फोर्डबाईंना तासन्तास सुई दोरा घेऊन बसण्याची गरज नव्हती.

"पण हें असलें यंत्र चालवायचें म्हणजे त्याला एखादा पटाईत माणूसच हवा." फोर्डबाईंनीं आपली भीति बोलून दाखविली.

"खरंय् बुवा! ॲबे रीसरनें तें चालवून दाखवलें तेव्हां मला तें किती सोपें वाटलें! हातानें तासन् तास शिवीत बसलें तरी जें काम पुरें व्हायचें नाहीं तें या यंत्रावर किती झटपट उरकतें. पण त्यानें जें कांहीं करून दाखवलें तें आठवायचें म्हणजे...माझी फजितीच व्हायची!" फोर्डनीं आपलें डोकें खाजवीत पत्नीच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

"पपा, मला जरा तें पाहूं द्या ना–नुसतें पाहूं द्या" हेन्री अधीरपणें म्हणाला.

अखेर त्यानें सुई आणि बॉबीन कोठें आहे तें शोधून काढलेंच. त्या बारीक नेढ्यांत दोरा ओवायचा होता. हेन्रीनें पांढऱ्या दोऱ्याचा एक गुंडा घेऊन तो त्या बॉबीनमध्यें बसवला आणि त्या दोऱ्याचें एक टोंक घेऊन तें त्या यंत्राला असलेल्या हुकांतून व खुंट्यावरून अडकवून दिलें. ते हूक नि खुंट्या कशा चकाकत होत्या नुसत्या! मग त्यानें एक कापडाचा तुकडा कोठून तरी हुडकून आणला. चाकाला आपल्या उजव्या बाजूनें एक लहानशी गिरकी दिली. चाक फिरायला लागलें. हेन्रीचे पाय यंत्राच्या लोखंडी पावठीवर खालींवर व्हावयाला लागले. आणि चाकाच्या पलीकडेच जोडलेली सुई वर-खालीं उड्या मारतांना दिसूं लागली.

"टांके!" फोर्डबाई उद्गारल्या. "काय बाई नवल तरी!"

"टांके!" मार्गरिट, जेन व जॉन साऱ्यांचा आवाज एकदम घुमला. तीं मुलें तर 'आ' वासून पाहातच राहिलीं.

"मी म्हटलें नव्हतें!" फोर्ड विजयी स्वरांत उद्गारले.

हेन्रीचे टांके त्या कापडाच्या तुकड्यावर नागमोडी पडत होते. आतां फोर्डबाईंनी यंत्र हातीं घेतलें.

"मला थोडा सराव व्हायला हवा–बाकी आतां माझी अर्धी भीति गेली." आपल्या अर्धवट पडणाऱ्या टांक्यांमुळें ओशाळून फोर्डबाई म्हणाल्या. "यामुळें हातशिवणींत जाणारे तासन् तास वांचतील. मार्गारेट, तुला या नव्या यंत्रानें काम करायला कांहीं हरकत नाहीं; आणि हेन्री आहेच त्याची दुरुस्ती बघायला. यंत्राला तेल कोठें कसें द्यायचें तें त्याला बरोबर समजेल. पण, दुसऱ्या कोणी मात्र त्याला हात लावायचा नाहीं हो." चकाकणारें लांकडी झांकण यंत्रावर काळजीपूर्वक ठेवीत फोर्डबाईंनीं दरडावलें.

यंत्राचा वरचा भाग झांकणाखालीं दडला आणि हेन्रीच्या डोक्यांत विचार सुरू झाला कीं, हें चाक आणि ही कप्पी यांवरून हा पट्टा कसा फिरतो बरें? त्याच्या वयाच्या सर्वसाधारण मुलाच्या डोक्यांत येणार नाहींत अशा गोष्टी हेन्रीच्या डोक्यांत भिरभिरत असायच्या. चाकामधलें जास्तींत जास्त अंतर व कप्पीमधलें जास्तींत जास्त अंतर हीं जर आपल्याला समजलीं तर चाकाच्या एका फिरकीबरोबर कप्पीच्या किती फिरक्या होतात तें आपण काढूं शकूं असें त्याच्या लक्षांत आलें. तसेंच कप्पी काळजीपूर्वक फिरवून तिची एक फिरकी पुरी झाली की त्या तेवढ्या एका फिरकींत यंत्र किती टांके मारतें तें समजेल आणि तेवढ्या वेळांत यंत्राकडून एकूण किती उपयुक्त काम मिळू शकतें हें आपल्याला शोधून काढतां येईल. ही गोष्टहि हेन्रीच्या ध्यानांत आली.



एडसल रुडिमन हेन्रीच्या शेजारींच बाकावर बसलेला होता. आपल्या सोबत्याला हळूच कोपरखळी मारून हेन्री त्याच्या कानाशीं लागत म्हणाला, "शाळा सुटल्यावर जमायला सांग सगळ्यांना. एक मोठ्ठी कल्पना सुचली आहे मला. खूप खूप गम्मत आहे म्हणावें." एडसल केवळ शिक्षकांची पाठ फिरायचीच वाट पहात होता. विल बेनेट, जॉन हॅगर्टी, रेनी फील्ड आणि जॉन रुडिमन अशा सगळ्यांना बातमी मिळाली.

शाळेची इमारत म्हणजे सारा एक खोलीचा कारभार. भिंतींना चुना काढलेला होता. वर्गांत मांडलेलीं बांकें व उतरतीं मेजें दोन–दोन मुलांना बसतां येण्याजोगीं होतीं. आणि एका कोपऱ्यांत 'खोडकर विद्यार्थ्यां'साठीं ठेवलेली खास जागा पण दिसत होती.

"काय हेन्री, कसली नवी शक्कल काढली आहेस?" रेनीनें विचारलें.

शाळा सुटतांच रस्त्याच्या पलीकडच्या टोंकाशीं असलेल्या भल्या मोठ्या ओकच्या झाडाखालीं मुलें जमलीं.

"तुला ठाऊकच आहे, आपल्या इतरांच्या कोणाच्या कधीं डोक्यांत येत नाहीं असल्या गोष्टींतच ही स्वारी नेहमीं गढलेली असते–म्हणजे

## दुसरें प्रकरण

एखादी चालती वस्तू बनवायची. तेव्हां, तुला जर गम्मत गमवायची नसली तर तूं आपला आमच्याबरोबर राहा. काय समजलें ?" एडसलनें त्याला सूचना दिली.

मग ही सारी बाळगोपाळांची टोळी एका ओढ्याकडे निघाली. तो ओढा 'रोग' नदीला जाऊन मिळत होता.

"एक चांगलें भक्कम धरण बांधायचें आहे आपल्याला," हेन्री आपल्या सोबत्यांना म्हणाला. "अगदीं खरेंखुरें धरण बरें का–अर्थात् आपण जितकें चांगलें बांधूं तितकें. याच्या शक्तीवर एक चाक फिरेल आणि तें एक चक्की चालवील."

हेन्री जवळच्या झुडपांपाशीं गेला आणि त्यानें तेथून एकेक वस्तु बाहेर काढायला सुरुवात केली. मोठ्या खुरप्याचा एक लांब दांडा, फेंकून दिलेलें एक कॉफी दळण्याचें यंत्र आणि त्यानें स्वतः बनविलेलें एक लांकडी चाक. मुलें मोठ्या कुतूहलानें त्या वस्तूंकडे पाहात होतीं.

"हें कॉफी दळण्याचें यंत्र बघितलेंत ना ?" हेन्री म्हणाला, "ही आपली चक्की. धरणांतल्या पाण्याच्या शक्तीवर ही चालेल."

"म्हणजे हें कॉफी दळण्याचें यंत्र आपण त्याचा दांडा न फिरवतांच आपोआप फिरायला लागेल कीं काय ?" एडसलनें आश्चर्यचकित होऊन विचारलें.

"खरेंच" हेन्री आपल्या योजनेसंबंधींच्या दांडग्या विश्वासानें म्हणाला, 'अरे, तें सगळें मी केव्हांच योजून ठेवलेलें आहे. एडसल, आतां तूं, रेनी आणि विल मिळून सांपडतील तेवढे मोठाले दगड गोळा करा. आणि तुम्ही बाकीच्या दोघांनीं वाळू नि गारा तयार करा बघूं."

ओढ्याला एक भक्कम दगडी, पाणी झिरपूनसुद्धां न जाण्यासारखें धरण बांधण्यांत हीं मुलें गुंतलीं होतीं. दगड-वाळूचे ढिगावर ढीग घालीत व ओल्या हरळीच्या थरांनीं ते पक्के करीत मुलांचें धरण उभें होत होतें. आणि हेन्री तें चाक, तो खुरप्याचा लांब दांडा आणि तें कॉफी दळण्याचें यंत्र यांची एकमेकांशीं सांगड घालून तें साडगें उभें करण्याच्या उद्योगांत दंग होता.

पाणी भराभर चढूं लागलें. मुलें हेन्रीच्या करामतीकडे–त्या साडग्याकडे लक्षपूर्वक बघत होतीं. खुरप्याचा दांडा धरणांतल्या लांकडी चाकांतून कॉफी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 22402 वि: ...
क्रमांक 208 नों: दि: 30/7/70



दळण्याचा यंत्रापर्यंत जोडलेला होता. तो आंसाप्रमाणें काम करींत होता. तें यंत्र चालायला लागायचें म्हणजे पहिल्यानें हे चाक फिरलें पाहिजे–पण चाक जागचें हाललेंसुद्धां नव्हतें. मुलांचे प्रश्नार्थक डोळे एकमेकांकडे वळले. त्यांना शंका आली कीं, आपण काय करतों आहोंत हें स्वत: हेन्रीच्याच लक्षांत आलें नसेल. हेन्री घुम्यासारखा उभाच होता. आपल्या योजनेची तो पुन्हां उजळणी करीत होता, त्यांतली प्रत्येक पायरी पुन्हां तपासून पाहात होता. चाक कां फिरत नाहीं, हें त्याला समजेना.

इतक्यांत जादूची कांडी फिरावी तसें तें थोडें हाललें.–अगदीं तसूभर. बाराहि डोळे त्या चाकावर खिळले होते. पाण्याची खळखळ सुरू झाली आणि शांतता भंग पावली. तें चाक आतां आणखी थोडें हाललें, हळुहळु लचकत–मुरकत. मग त्यानें एक पूर्ण वेढा घेतला. गति वाढली, चाक अधिक जोरानें फिरायला लागलें. आणि अखेर तें संथपणें फेऱ्या मारूं लागलें.

त्या कॉफी दळण्याच्या यंत्रांत हेन्रीनें वाळलेल्या कडक गवताचे तुकडेताकडे भरले आणि सुटी, बारिक भुकटी त्यांतून बाहेर भिरकावली जाऊं लागली. चक्कींत मातीचीं ढेंकळें टाकून पाहण्याची गम्मत प्रत्येक मुलानें पाळीपाळीनें करून पाहिली. जॉन रुडिमननेंसुद्धां कबूल केलें की, ‘ मम्बलटी पेग ’ च्या मजेदार खेळापेक्षांहि यांत जास्त गम्मत आहे.

आपली ही चक्की निर्दोष होण्यासंबंधींचे व तिचा विस्तार करण्याचेहि विचार हेन्रीच्या डोक्यांत यापूर्वींच घोळूं लागले होते. “ अरे ए ” हेन्री म्हणाला, “ मला वाटतें मी एक मोठी चक्की उभारूं शकेन, मोठें चाक तयार करूं शकेन. मग त्यांत सगळें कांहीं दळतां येईल. ती चक्की खऱ्याखुऱ्या उपयोगाची होईल, तिच्यावर कामहि करून घेतां येईल. ”

“ मग, तशी मोठी चक्की करायला किती वेळ लागेल रे ?” विलनें उत्सुकतेनें विचारलें.

“ आज रात्रींसुद्धां होईल एखाद वेळीं. ”

आपल्या नव्या शक्त्युत्पादक योजनेचे मोठमोठे आराखडे करीतच मुलें ओढ्यावरून परत फिरलीं.



## दुसरें प्रकरण

शेजारींच राहणारा जॉन मिलर दुसरे दिवशीं शाळेंत न येता तर सारें कांहीं सुरळीत झालें असतें. सात्त्विक संतापानें तापलेला तो शेजारी शाळेंत शिरला तो अगदीं भडकूनच. ब्रश-गुरुजींच्या मेजावर जोरानें मूठ आपटीत तो गरजला, "ह्या तुमच्या पोरांनीं रौलो ओढा बांध घालून अडवला आणि पाणी शिरलें आहे माझ्या तळघरांत. तिथे माझे बटाटे सांठवून ठेवलेले आहेत."

ब्रश-गुरुजींना बरोबर माहीत अशा वेळीं म्होरक्या म्हणून कोणाचा कान पकडायचा तो. "काय हेन्री ? काय आहे ही भानगड ?"

हेन्रीची प्रांजळ कबुली किंवा त्यानें केलेली यशस्वी करामत यांपैकीं कशाचाच प्रभाव मिलरवर पडेना. त्या दुखावलेल्या शेतकऱ्याचें कांहींतरी समाधान तर करावयाला हवें होतें. तेव्हां ब्रशनीं दुसऱ्याच्या हक्कांसंबंधीं आवेशानें एक छोटेसें भाषण करून अखेर मुलांना तें धरण फोडून टाकायला फर्मावलें.

"पण, सर" हेन्री समर्थन करायला लागला, "तें पाण-चाक खरोखरीच काम देत होतें.–आणि आम्हांला पाहायचें होतें कीं एखादी मोठी चक्की चालवायला पुरेशी पाण-शक्ति मिळते कीं नाहीं तें. आपल्या स्नायूंनीं जें काम आपल्याला करायला लागतें असें पुष्कळसें काम या पाण-शक्तीनें करतां येऊन आपली शारीरिक शक्ति वांचवितां येईल. आणि ओढ्याचें पाणी बाहेर पसरूं नये म्हणून त्याला वाट काढून देणेंहि आम्हांला कांहीं अशक्य नाहीं. तेंहि करतां येईल आम्हांला."

मिलर हेन्रीकडे बोट नाचवीत रागानें ओरडला, "तो पोरगा कधींच वळणावर यायचा नाहीं. खोडचाळपणानें तर त्याचें माथें फिरलेलेंच आहे!"

त्या तापलेल्या शेतकऱ्याचें शाळेच्या संचालकांपाशीं मोठें वजन होतें. ब्रशना त्याचें समाधान करतां येईना आणि त्याचबरोबर हेन्रीबद्दल त्यांना सहानुभूतीहि दाखवितां येईना. ते अगदीं अस्वस्थ होऊन गेलेले दिसत होते. "धरण बिरण कांहीं व्हायचें नाहीं यापुढें" इतकेच शब्द त्यांनीं उच्चारले.

हेन्रीची मान खालीं झाली. "पण, मी अशी प्रतिज्ञा करतों कीं, मोठेपणीं अशा कोणा म्हातारड्या मिलरकडून मी अशी कधीं हार खाणार नाहीं." तो स्वत:शींच ताठरपणानें म्हणाला. त्याच्या योजना धुळीला मिळाल्या होत्या. मिलरच्या तळघरांतल्या नुकसानीबद्दल त्याला वाईट वाटलें, पण पाणी काबूंत ठेवण्यासाठीं प्रयत्न करायला आपल्याला संधी द्यायला हवी होती असेंहि त्याला वाटत होतें. ब्रश-गुरुजींच्या बाबतींतहि त्याची निराशाच झाली. ब्रश-गुरुजींना तर हें नक्कीच माहीत होतें कीं, वाहत्या पाण्याला शक्ति असते आणि वस्तूंचें चलनवलन करण्यासाठीं शक्ती[illegible] करायला मुलांनीं शिकलें पाहिजे, हेंहि त्यांना कळत न[illegible]त असें नाहीं.



वसंत ऋतु म्हणजे शेतकऱ्यांना आव्हान. मग तें डीअरबोर्न असो, नाहींतर आणखी कोठली शेतकऱ्यांची वस्ती असो. या दिवसांत शेतकऱ्यांना अगदीं कसून काम करावें लागतें. पेरणीच्या हंगामासाठीं जमिनीची मशागत करावी लागते. नांगरणी, कुळवणी आणि नंतर पेरणी. अलीकडे फोर्डनीं आपल्या जुन्या चाळीस एकरांत आणखी पुष्कळच जमिनीची भर घातली होती. दोन शेतमजूर त्यांनीं कामावर ठेवले होतेच, परंतु तरीहि हेन्री व जॉन या दोघां सर्वांत मोठ्या मुलांची मदत घेतल्याशिवाय फोर्डचें चालतच नव्हतें.

हेन्रीला गवत कापायची सर्वांत मोठी आवड. पूर्वी माणसांच्या हातांत यासाठीं मोठमोठे कोयते किंवा विळे दिसायचे, पण आतां त्याच्या वडिलांनीं गवत कापणारें नवीन यंत्र आणलें होतें. त्याला पुढें घोडे जोडलेले असत ते तें ओढीत. गोड गोड वासाचें गवत हें यंत्र सपासप कापीत जाई. हेन्रीच्या

## तिसरें प्रकरण

नाकपुड्यांत घुसणारा हा सुवास तेथें नेहमींच दरवळत असायचा आणि हेन्‍रीहि एखाद्या चविष्ट सुग्रास अन्नासारखा त्याच्यावर खूप असायचा.

हेन्‍रीचे वडील जातिवंत शेतकरी होते. त्या हाडाच्या शेतकऱ्याचें आपल्या जमिनीवर अलोट प्रेम होतें; व तशीच तिचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याचीहि त्याची जबरदस्त धडपड होती. फोर्ड कांहीं तसे यांत्रिक मनोवृत्तीचे नव्हते, तरीपण त्यांच्या मनांत हें येऊन गेलें होतें कीं, शेतकीचीं यंत्रें माणसांचा वेळ, श्रम व पैसा वांचवितात. त्यांच्या त्या वस्तींत स्वतःचें गवत कापण्याचें यंत्र असणारे फोर्डच पहिले होते. तीच गोष्ट शेत कापण्याच्या यंत्राबद्दलचीहि. हेन्‍री तर हीं नवीं यंत्रें पाहून नुसता उड्या मारायला लागला आणि हां हां म्हणतां त्यानें त्यांची इत्थंभूत माहिती करून घेतली. नुसत्या स्वतःच्या वडिलांनींच आणलेल्या यंत्रांविषयीं तो माहिती घेत होता असें नव्हे तर वस्तीवर कोणाकडेहि एखादें नवीन यंत्र आलें कीं हेन्‍रीची स्वारी तिथें डोकावलीच म्हणून समजावें.

आतां दोन वर्षें होऊन गेलीं होतीं त्या गोष्टीला. हेन्‍रीच्या त्या प्रयोगांत चहादाणीचा स्फोट झाला होता. आणि त्याला वाफेच्या शक्तीकडून काम कसें करून घ्यावें, तिला नियंत्रणांत कशी ठेवावी यासंबंधीं अधिकाधिक शिकण्याची तीव्र जिज्ञासा उत्पन्न झालेली होती. फोर्डच्या शेतापासून जवळच एक जुनाट, वापरांत नसलेली करवत-कामाची गिरणी होती. हेन्‍री तिकडून कधीहि जायला लागला कीं त्यासंबंधींच्या कुतूहलानें तो अगदीं बेचैन होऊन जायचा. एके दिवशीं दुपारीं हेन्‍रीनें थोडीशीं हत्यारें काखोटीला मारलीं आणि निघाला त्या जुनाट गिरणीकडे. माणसांचीं कामें करवतीकडून करून घेण्याकरितां वाफ नियमित कशी केली जाते तें त्याला पाहायचें होतें.

लांकडाच्या भुशांत खालीं जमिनीवर यंत्रसामुग्री लोळत पडलेली होती. एंजिनाच्या सिलेंडरचा माथाच कोणीतरी पळविला होता आणि एंजिन तेथें तसेंच टाकून दिलेलें होतें.

हेन्‍रीनें आपल्या बाह्या वर सारल्या आणि वाफवाहक कोठें आहेत तें पाहाण्यासाठीं आंत हात घातला. मागेंपुढें सरकणाऱ्या झडपेमुळें वाफेचें नियंत्रण कसें होतें हेंहि त्याला समजून घ्यायचें होतें.

# ।।।।।। १७   तिसरें प्रकरण

एखादी तरफ किंवा वाफ बाहेर पडण्यासारखी एखादी वाट कोठें आहे का तें हातानें चांचपडून पाहात असतांनाच एकाएकीं तो लांकडाचा भुसा कोसळला. भलेंथोरलें सिलेंडर त्याच्या वरच्या बाजूला घरंगळत आलें. आणि ही स्वारी बसली अडकून त्या सांपळ्यांत. सिलेंडर पलीकडे लोटून दिल्याशिवाय आपला हात काढून घेणें हेन्रीला अशक्य होतें; आणि त्या-साठींहि कोणाच्या तरी मदतीची गरज होती, एकटचाला तें झेपण्यासारखें नव्हतें. तरीपण तो अगदीं निवांत राहिला. आपली सुटका नक्की कशी करून घ्यावी याचा तो विचार करीत होता–' काय बरें युक्ति करावी ? '

तें अवजड सिलेंडर उचलून पलीकडे सारणें तर शक्यच नव्हतें; पण तें उतरणीवरून घरंगळवितां मात्र येण्यासारखें होतें. डावा हात पलीकडे वेंघून हेन्रीनें तेथील लांकूड-भुसा उपसायला सुरुवात केली. तो भुसा उपसून काढल्यावर तेथें जो खंदक तयार होईल त्यांत तें सिलेंडर घरंगळत जावें हा त्याचा उद्देश होता. त्याचा हा भुसा उपसण्याचा कार्यक्रम कितीतरी वेळ चालला होता. अगदीं सावकाशीचा व कंटाळवाणाच उद्योग तो. पण अखेर सिलेंडरनें घरंगळत जाऊन खंदकांत उडी घेतली. आणि हेन्रीचा हात मोकळा झाला. त्यानें जरा बेतानेंच तो हालवून बघितला. सुदैवानें हात मोडला बिडला नव्हता कीं पिरगळलाहि पण नव्हता.

पुन्हां आपलें त्याचें संशोधनाचें काम चालू झालें. वाफ आंत घेऊन सांठविणाऱ्या पेटींत एक मागेंपुढें सरकणारी झडप त्याच्या हाताला लागली. एका चाकाच्या दांड्याला जोडलेली ही झडप वाफ दट्टयाकडे जाऊं देणाऱ्या व तेथून बाहेर सोडणाऱ्या भोकावर सरके आणि अशा रीतीनें वाफेची वाट आलटून पालटून एकदां बंद करी व एकदां मोकळी ठेवी. या चलनवलन करणाऱ्या भागानें हेन्रीच्या डोक्यांत एक कल्पना आली.

घाईघाईनें तो आपल्या घराकडील वर्कशॉपकडे निघाला. तेथें त्यानें खूपशीं हत्यारें गुप्तपणानें सांठवून ठेवलीं होतीं. एक लोहारी भट्टी व भाता डीअरबोर्नमधील लोहाराच्या दुकानांत पाहिलेल्याप्रमाणेंच या वस्तु तयार केलेल्या होत्या; तापलेल्या धातूला ठाकून ठोकून वाटेल तो आकार जिच्या-वर देतां येईल अशी एक ऐरण, एक व्हाइस म्हणजे कानसण्यासाठीं एका

बैठकीवरच बसविलेली मोठी पकड आणि धनुष्याच्या दोरीनें चालविला जाणारा एक लेथ म्हणजे एक प्रकारची यांत्रिक कानस. त्यानें जमविलेल्या तुकड्यातालकड्यांचें भांडार अफाटच होतें.——धातूचे निकामी तुकडे, शेतकीच्या यंत्रांचे मोडकेतोडके भाग, खिळी, त्यांच्या अटका म्हणजे बोल्ट व नट आणि लांकडाचे तुकडे. या लहानशा झोपडींत हेन्री मोडलेलीं हत्यारें व शेतकीचीं यंत्रें दुरुस्त करीत असे. कांहींतरी उपयुक्त वस्तु बनविणें किंवा एखादी मोडकी वस्तु काम देण्यासारखी दुरुस्त करणें म्हणजे हेन्रीला कोण हर्ष वाटायचा.

त्या दिवशीं, गोठ्याचें फाटक गाडींतून खालीं उतरल्याशिवाय उघडतां व बंद करतां येण्यासाठीं कांहींतरी शक्कल शोधून काढण्याच्या उद्योगांत तो होता. एका स्थिर कप्पीच्या साहाय्यानें त्यानें यासाठीं प्रयोग करून पाहिला परंतु तें कांहीं जमेना. त्यान पूर्वी पाहिलेल्या सरकत्या झडपेवरून त्याला कल्पना आली कीं, असल्या विचित्र साधनाला फिरत्या कप्पीची गरज असावी. स्थिर कप्पीनें शक्तीची दिशा बदलतां येईल परंतु फिरत्या कप्पीच्या योगानें शक्तीची वाढ होऊं शकेल; आणि जितक्या अधिक फिरत्या कप्प्या वापराव्यात तितकें एखादें वजन ओढून नेण्यासाठीं अधिक सोपें पडेल.

हेन्रीनें कामघरा (वर्कशॉप) मधून फळ्या आणल्या; त्यांतली एक त्यानें फाटकाला उभी बसविली. त्या फळीलाच माथ्याच्या बाजूला कांहीं आडव्या फळ्या जोडून त्या उभ्या फाटकाच्या दोहों बाजूंना बग्गीच्या बैठकीच्या उंचीपर्यंत आणून ठेवल्या. कप्पी व तींतून टाकलेले दोर यांनीं फाटकाची कडी आडव्या फळ्यांशीं जोडली गेली. कोणाला फाटक उघडायचें असलें म्हणजे त्यानें आडव्या फळीवर लोंबत असलेला दोर ओढावा कीं फाटक उघडलें.

हेन्री आपली ही नवी शक्कल कशी काय उपयोगी पडते हें पाहात असतांनाच त्याचे वडील गाडींतून येतांना दिसले. दोन घोडे जोडलेली गाडी ते हांकीत होते. त्यांनीं तेथूनच हेन्रीला म्हटलें, " हेन्री, फाटक उघड. "

" फाटकापर्यंत गाडी आणा पपा. फाटकावरचा दोर ओढून पाहा काय होतें तें. " हेन्रीनें सूचना दिली.

" हें काय चालवलें आहेस रे तूं ? " फोर्डनीं थोडेंसें चिडूनच विचारलें. पण त्याच वेळीं त्यांनीं तो दोरहि कुतूहलानें ओढून पाहिला. फाटक आपोआप उघडतांना पाहून फोर्डना नवल वाटलें आणि लगेच त्यांचा चेहराहि हंसरा झाला. " आज एकदां का होईना, तूं कांहींतरी कामाची गोष्ट केलेली दिसते आहे. "

" आतां फाटकांतून जा ना, पपा. मग पलीकडच्या बाजूचा दोर ओढा कीं फाटक लागेल. "

फोर्ड गोंधळलेले दिसले. त्यांनीं डोकें हालवलें. " असल्या बाबतींत जर तूं इतका हुषार आहेस तर तुझ्या शाळेंतल्या पुस्तकांत जें कांहीं सांगितलेलें आहे त्यांत तूं अधिक लक्ष कां घालीत नाहींस, मला समजत नाहीं. बरें, चटकन् गाडींत चढ बघूं. माझ्याबरोबर शहरांत चल. "

हेन्री पडत्या फळाची आज्ञा घेऊन टुणदिशीं उडी मारून गाडींत चढला. शहरांत जावयाचें म्हणजे लोहाराच्या दुकानांत फेरी व्हावयाची हें ठरलेलेंच. त्याच्या नुसत्या आठवणीनेंच हेन्रीला कढत धातूचा वास आला. कातडी 'अॅप्रन' घालून लोहार तेथें काम करीत असावयाचा. तो हेन्रीला आपले मोठे थोरले भाते हालवूं देई. त्या भात्यांनीं भट्टींतून पांढऱ्या ज्वाळा निघत. त्यांत तापून लाललाल झालेला धातूचा तुकडा बघावयाला आणि नंतर तो ऐरणीवर ठेवून त्याला हवा तो आकार देतांना पाहावयाला किती मौज वाटायची !

हेन्रीच्या गाडीनें रस्त्यावरचें एक मोठें वळण घेतलें. आणि तो व त्याचे वडील यांच्यासमोर एक प्रचंड, काळें लोखंडी वाहन दिसलें. तें आपल्या स्वतःच्याच शक्तीनें पुढें सरकत होतें. अर्धवट जळलेल्या कोळशाच्या काळ्याकुट्ट धुराचे लोटच्या लोट एंजिनाच्या धुराड्यांतून बाहेर धांवत होते. एखादा लोखंडी राक्षस खडकाळ रस्त्यावरून ठेचकाळत, धडपडत चाललेला असावा आणि त्याच्या तोंडानें सारखा हळुहळु आवाज चाललेला असावा तसें तें दिसत होतें. त्या वाहनाचीं मागचीं चाकें कांहींशीं दुचाकीच्या चाकासारखींच एका सांखळीनें फिरविलीं जात होतीं.

" पपा, थांबा ! " गाडींत उभा राहून हेन्री ओरडला. " हें तर मला केव्हांपासून पाहायचें होतें. घोड्याशिवाय चालणारें वाफेचें एंजिन आहे तें ! " हेन्रीनें गाडींतून खाली उडी ठोकली आणि रस्ता ओलांडून तो पलीकडे गेलासुद्धां.

"अहो, ऐका," एंजिनाचा केवढा तरी आवाज होत होता त्यातूनहि ऐकूं जावें म्हणून हेन्री घसा खरवडून मोठ्यानें म्हणाला, "मला तुमचें यंत्र दाखवतां का?"

तो मनुष्य थांबला.

"तें कशामुळें पुढें सरकतें? तें कसें चालतें? त्यानें काय काम करतां यतें?" एका दमांतच हेन्रीनें उत्कंठेनें प्रश्न विचारले.

"थांब, थांब, बाबा!" यंत्रहांक्या हंसला "एका वेळेला एक!"

"यानें काय करतां आहांत तुम्ही?" त्या भल्या मोठ्या राक्षसाच्या भोंवतीं फिरून पाहात त्याचा प्रत्येक तपशील मनांत टिपून घेत हेन्रीनें विचारलें.

"आम्ही हें यंत्र इथें डीअरबोर्नला आणलें आहे तें कुळव फिरवण्यासाठीं, लांकूड कापण्याच्या गिरण्या चालविण्यासाठीं–असल्या कामाकरितां." त्या माणसानें सांगितलें. आणि मग तो यंत्रांतील एक एक गोष्ट हेन्रीला दाखवूं लागला व समजावूनहि देऊं लागला. बॉयलरच्या पाठीमागील फलाटावर उभे राहून आपण एंजिनांत कोळसा कसा फेंकतों आणि यंत्र आपल्या स्वतःच्या शक्तीनेंच रस्त्यावरून हेलकावत पुढें जात असतांना आपण तें कसें वळवितों तें त्यानें हेन्रीला दाखविलें.

एंजिन पुढें सरकण्यासाठीं सांखळीचा उपयोग केला जातो; त्याऐवजीं ती सांखळी काढून तेथें पट्टा बसविला म्हणजे इतर यंत्रें चालविण्यासाठीं त्याचा कसा उपयोग होतो तेंहि त्यानें हेन्रीला समजावून सांगितलें. सांखळीची जागा बदलली कीं गाडी पुढें चालायची थांबते पण एंजिन मात्र कसें चालूच राहातें तेंहि त्यानें हेन्रीला दाखविलें.

"हेन्री, चल," वडिलांनीं त्याला बोलाविलें. "आपल्याला निघायलाच हवें आतां."

"एक मिनिटभर, पपा!" हेन्री काकुळतीनें म्हणाला. "वाफ कशी तयार होते तें दाखवलेंच नाहीं मला यांनीं अजून."

"कमाल आहे बुवा या पोराची!–मला वाटलें नव्हतें, एवढ्याशा लहान मुलाला ती कशी तयार होते तें कळायला हवें असेल. बहुतेक मुलांना चाकें गोल कशीं फिरतात एवढें पाहण्यांतच गंमत वाटते. बरें, आपल्यापाशीं हे दोन भाग आहेत–एक मुख्य एंजिन व दुसरा बॉयलर. या एंजिनांत हें

नळकांडें. त्या नळकांड्यांत एक दट्ट्या बॉयलरमधील वाफेमुळें खाली–वर हालत असतो. या नळकांड्यांत जी वाफ येते ती वाफेच्या नळ्यांतून. हें छोटेंसें काय आहे, पाहिलेंस ? याला म्हणतात ' थ्रॉटल व्हाल्व '–एक तऱ्हेची झडप. नळकांड्यांत जाणाऱ्या वाफेचें प्रमाण ही झडप फिरवून मला हवें तसें कमी अधिक करून घेतां येतें."

"सरकती झडप (स्लायडिंग व्हाल्व) व वाफ-झरोके ( स्टीम-पोर्ट ) कसें काम करतात तें पाहायचें आहे मला." हेन्री हट्टच धरून बसला.

"ठीक आहे. एवढासा मुलगा आणि स्लायडिंग व्हाल्व व स्टीम-पोर्ट यांची माहिती आहे ?. फारच हुषार आहेस हां तूं तुझ्या वयाच्या मानानें. इथें–इथे आहेत ते–नळकांड्याच्या अगदीं टोंकाजवळ."

"एंजिन किती वेगानें चालतें ?" हेन्रीनें विचारलें.

"अंदाजें मिनिटाला २०० फेरे. ती तिथे ' थ्रॉटल ' आहे ना तिनें मी त्याचा वेग ताब्यांत ठेवतों. पण, तुझे प्रश्न संपले का ? मोहोळावरून उठलेल्या माश्यांसारखी तुझी ही प्रश्नांची सरबत्ती ऐकून आपण तर सर्दच झालों बुवा ! पैजेवर सांगतों, केव्हांतरी असलें यंत्र स्वत: चालविण्यांत तूं तरबेज होशील. काय, खरें ना ?" यंत्रहांक्यानें विचारलें.

पण हेन्रीला उत्तर द्यायला वेळ कोठें होता ? वडील केव्हांच पुढें निघाले होते, तेव्हां त्यांना धांवत जाऊन गांठणें हेन्रीला आवश्यकच होतें.

त्या रात्रीं हेन्रीनें तसल्या रस्ता-एंजिनाचें एक ' मॉडेल ' तयार करण्याचा प्रयत्न केला; पण पुढें त्यानें उत्तम प्रकारें चालणारें जे एंजिन तयार केलें त्यापूर्वी कित्येक वर्षांची ही गोष्ट होती. आतां तो हें शिकला होता कीं, वाफेला शक्ति असते याचें कारण पाण्याचें वाफेंत रूपान्तर होतें तेव्हां तें जास्त जागा व्यापतें. शेतावरच्या पवनचक्कीची त्यानें काळजीपूर्वक माहिती घेतली होती; त्यानें ती दुरुस्तहि केली होती. आणि त्यांतून तो शिकला होता कीं, वाहत्या पाण्यांतहि शक्ति असते. ह्या मोठ्या शक्ति वस्तु जागच्या हालवूं शकतील, त्यांच्यांत चलनवलन उत्पन्न करूं शकतील आणि स्नायूंना करतां न येण्यासारख्या अशा अनेक गोष्टी त्या करूं शकतील, असें अनुमान हेन्रीनें काढलें.



आज रविवार असल्यामुळें सकाळच्या न्याहारीला फोर्ड कुटुंबांतील मंडळी जरा आरामांतच बसली होती. बकव्हीटचे केक आणि तोंडीं लावायला मेपलपाक. किती रुचकर बेत होता न्याहारीला. स्वयंपाकघरांतहि कांहीं नवीन सोय केलेली दिसत होती. जुनाट शेगडी जाऊन त्या जागीं तव्याचा नवा स्टोव्ह फोर्डबाईंच्या हाताशीं आला होता. त्यामुळें कुटुंबांतील मंडळी जितक्या जलदीनें केक खाऊन संपवीत तितक्याच जलद तसले ताजे सोनेरी करड्या रंगाचे केक भाजून त्यांना वाढणें फोर्डबाईंना आतां जमत होतें.

हेन्री मात्र उदासवाणा बसला होता. आज रविवार. तेव्हां सकाळीं चर्चमध्यें प्रार्थनेला हें जायलाच हवें.

"झाली सगळयांची तयारी ?" फोर्डबाईंनीं मोहॉगनी चौकटीच्या आरशांत आपला चेहेरा न्याहाळीत उल्हसितपणें म्हटलें.

---

## चवथें प्रकरण

IIIIII २३ चवथें प्रकरण

फोर्ड पतिपत्नी आपल्या टपाच्या नव्या गाडींत जाऊन बसली. मुलें पटापट मागच्या बाजूला चढलीं. वुइल्यम आणि धाकटें बाळ मात्र घरीं राहिलीं होतीं. त्यांना सांभाळायला 'डॉक' नांवाचा नोकर होताच.

"कशाला बुवा जायचें दर रविवारीं चर्चला!" हेन्री चडफडला.

"हेन्री, तुला लाज वाटायला हवी!" फोर्डबाई तीव्र स्वरांत उद्‌गारल्या. "मोठ्यानें केलेलें प्रवचन आत्म्याला चांगलें म्हणून ऐकायचें असतें."

फोर्ड मंडळी चर्चपाशीं जाऊन पोहोंचली आणि हेन्री घोडे खुंटयांना बांधूं लागला तेवढ्यांत बेनेट कुटुंब आपल्या गाडींतून येऊन थडकलें.

"ए हेन्री," विलनें हांक मारली. "तुला एक गोष्ट दाखवायची आहे."

चर्चच्या बाहेरच्या बाजूला सकाळच्या प्रहरीं प्रार्थनेला आलेली मंडळी एकमेकांशीं बोलत उभी होती. तेवढ्यांत हेन्री आणि विल तेथून थोडे आडबाजूला गेले.

"हें माझें स्वतःचें आहे, बरें का. माझ्या आजोबांनीं दिलें आहे तें मला." आपलें चकाकतें घड्याळ मोठ्या अभिमानानें वर धरीत विलनें सांगितलें. त्या काळीं आजच्यासारखीं नाजुक, लहान घड्याळें नसत; मोठें जवळजवळ भिंतीवरच्या घड्याळासारखें तें एक प्रकरण असे. आणि त्यांना मोठ्या घड्याळाप्रमाणें चावीनें किल्ली द्यावी लागत असे.

"विल्या लेका, मला बघूं दे तरी." घड्याळाकडे आशाळभूतपणें पाहात हेन्री उद्‌गारला, "मी खरेंच तुझें परत देईन लगेच."

विलनें आपलें घड्याळ हलक्या हातानें हेन्रीच्या हातीं दिलें.

"अरे, हें चालतें कुठे आहे?" हेन्रीनें तें कानाशीं धरून पाहिलें व त्याला किल्ली देण्याचा प्रयत्न करीत असतांनाच विलला सांगून टाकलें.

"पण कांहीं झालें तरी घड्याळ आहे ना–नाहीं तर नाहीं चाललें. मुळींच नसण्यापेक्षां चांगलेंच कीं नाहीं!" विलनें बढाई मारली.

हेन्रीला ही एक मोठीच संधी चालून आली होती. घड्याळाच्या आंत काय काय असतें हें पाहण्यासाठीं किती तरी दिवसांपासून त्याची कोण तळमळ चालली होती! "विल, यांत काय बिघडलें आहे तें मला शोधून

काढतां येईल आणि मग घड्याळ चालूहि करतां येईल, असें मला वाटतें." हेन्रीनें औत्सुक्यानें सुचविलें.

"छे रे बुवा!" विल काळजीच्या स्वरांत उत्तरला, "हें आपलें आहे तसेंच ठीक आहे."

"पण यानें तुला जर खरीखुरी वेळ सांगतां आली तर—आपणां साऱ्या जणांत तुझा केवढा मान वाढेल माहीत आहे?"

आपला मान वाढण्याची कल्पना मात्र विलला चांगलीच मानवली. आणि हेन्रीनें तें ओढ्यांतलें चाक कसें चालू केलें होतें व तो शेतकीचीं यंत्रें कशीं जोडीत असे तेंहि त्याला या वेळीं आठवलें.

ते दोघेहि चर्चवीर्च चटसारें विसरून गेले आणि त्यांनीं बेनेटच्या गोठ्यां-तील शेतीच्या अवजारांच्या जागेकडे धूम ठोकली.

हेन्रीनें आपली कडकडीत कॉलर व घट्ट बूट काढून ठेवले. अर्थात या नाजुक कामाला लागणारीं बारीक हत्यारें तेथें नव्हतींच. पण हेन्रीनें एक खिळा घेऊन तोच चांगला घांसून घांसून योग्य मापाचा व आकाराचा बन-वला; हाच घड्याळजी हेन्रीचा छोटा स्क्रू-ड्रायव्हर. विल हेन्री जवळच बसून राहिला होता; पण त्याचे डोळे मात्र आपल्या मौल्यवान घड्याळा-पासून क्षणभरसुद्धां ढळत नव्हते.

हेन्रीनें ते लहानलहान तुकडे मेजावर काळजीपूर्वक मांडून ठेवले. तेवढ्या वेळांत त्यानें जें कांहीं पाहिलें त्यावरून त्याला त्याची आई वापरीत असलेल्या 'रिंगर'ची–पिळकाची–आठवण झाली. त्यांतलें प्रत्येक चाक एक-मेकांत गुंतलेल्या दात्यांच्या योगानें दुसऱ्या चाकाला फिरवीत होतें. 'रिंगर'-मध्यें हें काम 'रिंगर'ची मूठ फिरवून होत असे. घड्याळामध्यें चक्रें फिरविण्यासाठीं लागणारी शक्ति मुख्य स्प्रिंगपासून मिळत होती; आणि समतोल-चक्रामुळें वेगाची संगति सांभाळली जात होती. तसेंच मुख्य स्प्रिंगपासून उत्पन्न होणाऱ्या शक्तीमुळें समतोल-चक्राची गति अखंड राहात होती. तें पाहून हेन्री अगदीं चकीत होऊन गेला.

एवढ्या वेळांत हेन्रीच्या आईच्या हें लक्षांत येऊन चुकलें होतें कीं, चिरंजीव कोठें दिसत नाहींत. प्रार्थनेच्या शेवटींहि जेव्हां हेन्रीचा कोठें पत्ता लागेना तेव्हां तर तिची खात्रीच होऊन चुकली कीं, स्वारी कोठें तरी भर-कटली असली पाहिजे.

अर्थात् विलीहि जाग्यावर नव्हताच. मुलांची शोधाशोध सुरू झाली बेनेट व फोर्ड मंडळींनीं खूप धांवाधांव केल्यावर शेवटीं त्या खोपटांत दोघेहि त्यांना सांपडले. आतां मात्र हेन्रीच्या आईच्या काळजीचें रूपान्तर रागांत झालें. तथापि या प्रसंगाच्या अनुभवानें हेन्रीच्या मनावर जो एक खोल ठसा उमटला तो कोणत्याहि शिक्षेनें पुसला गेला नाहीं.

" हें चालतें आहे. मी जोडलें आहे तें ! " तें घड्याळ तपासून पाहाण्यासाठीं हातीं घेत हेन्री उद्गारला. " याला थोडी साफसफाई हवी होती. हें उलगडणें जितकें सोपें तितकेंच जोडणेंहि सोपें होतें." हेन्रीनें त्या मंडळींना विजयोत्साहानें सांगितलें.

लवकरच आसपास बातमी पसरली कीं, अवघ्या पंधरा वयाचा हेन्री घड्याळें दुरुस्त करण्यांत मोठा पटाईत झाला आहे. नाजुक व बारीक कामांत त्यानें मोठी हातोटी संपादन केली आणि त्यांत तो रमूनहि जाऊं लागला.

त्याचीं पहिलीं हत्यारें म्हणजे एक खिळा, चिमटा आणि विणकामाच्या सुयांची एक जोडी. लवकरच त्यानें एक 'लेथ' आणून आपल्या खोलींत बसविला व तेथेंच त्याचें घड्याळ-दुरुस्तीचें काम सुरू झालें. त्याच्या पायाशीं उबेसाठीं एक रॉकेलचा दिवा असायचा, त्याची थोडीशी ऊब मिळायची. हातांतल्या कामांत डोकें घालून त्यानें समतोल-चक्राला नाजुकसा धक्का दिला कीं त्या छोट्या घड्याळांत चैतन्य उत्पन्न व्हावयाचें. त्याला जीवन मिळावयाचें व गतीहि यावयाची. घड्याळें उलगडून पुन्हां जोडायचीं हें कांहीं हेन्रीला काम वाटत नसे; ती तर त्याची मौज होती. त्यानें दुरुस्त केलेलें प्रत्येक घड्याळ म्हणजे नव्या नवलाईचा हृदय पुलकित करणारा एकेक अनुभव होता.

त्या दिवसांत हेन्रीनें आपलें लक्ष तीव्रतेनें घड्याळांच्या कामांत गुंतविलें होतें हें एकपरीनें बरेंच होतें. कारण तो काळ फोर्ड कुटुंबाला मोठा दुःखाचाच होता. फोर्डबाई वारल्या होत्या. हेन्रीचें त्याच्या आईशीं चांगलें सूत जमत असे. हेन्रीच्या उद्योगाकडे ती सहानुभूतीनें पाही. त्या प्रेमळ सहानुभूतीला हेन्री आतां मुकला होता. फोर्डबाई गेल्यापासून ह्या सगळ्याच कुटुंबाची स्थिति मुख्य स्प्रिंग गमावलेल्या घड्याळाप्रमाणें झाली होती.

हे न्री फ

'ळींची एक नातेवाईक फ्लॅहर्टी म्हणून होती. ती फोर्डच्या फोर्ड म॑ळी व मुलांची काळजी घेऊं लागली. मार्गारेट ही जबाबदारी घरीं येऊन .वर घेण्याइतकी मोठी होईपर्यंत ही व्यवस्था चालू राहिली. आपल्या.‌ि आपल्या स्वत:च्या खोलींत जाऊन बसायला हेन्रीला बरें वाटे; .ापली आई नसतांना कुटुंबीय मंडळींत जाऊन गप्पा मारायचें त्याच्या अगदीं जिवावर येई. दिवस कलायला लागला कीं त्याची आई पियानो हातीं घेऊन बसायची आणि तो वाजवीत असतांना घरांतली इतर मंडळी सभोवतीं जमून गात असायची. त्या गोड संध्याकाळी आतां केवळ मनांत घोळवायच्या आठवणीच राहिल्या होत्या.

शाळा सुटली आणि शेतांतलें काम संपलें कीं घड्याळांचें काम नेहमीं त्याची वाटच पाहात असायचें. एखादे वेळीं घड्याळ-दुरुस्तीच्या कामासाठीं घोड्यावर बसून कित्येक मैलांची रपेट मारायलाहि तो कमी करायचा नाहीं.

एका रात्रीं असाच तो बाहेर गेला होता आणि वादळ सुरू झालें. ओढे-नाले दुथडी भरून वाहूं लागले होते आणि तसल्याच एका ओढ्यावरचा पूल संध्याकाळीं पाण्यानें वाहून गेला. हेन्रीची स्वारी तिकडून परत येत असतांना घोडीसकट त्या ओढ्यांत पडली. पूल तुटला आहे हें त्याच्या ध्यानांत आलें नाहीं. ती घोडी म्हणजे हेन्रीच्या वडिलांजवळील सर्वांत उत्तम घोडी होती. काळोखांत कांहीं आणीबाणीचे क्षण ती घोडी व तीवरील स्वारी दोघेंहि पुरांत धडपडत होतीं. मात्र सुदैवानें दोघांनाहि पाण्याचा भरपूर प्रसाद मिळण्यापलीकडे अधिक कांहीं घडलें नाहीं.



फोर्डमहाशय हेन्रीसाठीं गोठ्याच्या दाराशींच वाट पाहात उभे होते. त्यांना जेव्हां हा प्रकार समजला तेव्हां ते रागानें नुसते लाल होऊन गेले. "हंसण्यासारखी गोष्ट नव्हे ही" ते ओरडले, "तूं केवळ स्वतःचाच जीव धोक्यांत घातलास असें नव्हे, तर माझी सर्वोत्तम घोडीहि बरोबर घेऊन गलास. तिचा पाय बीय मोडला असता म्हणजे मग तिला गोळीच घालावी लागली असती कीं नाहीं!"

"घोडीला कांहींसुद्धां झालेलें नाहीं."

"मग नशीबच म्हणायचें तुझें." फोर्ड जोरानें म्हणाले, "आणि हें बघ हेन्री, आतां तुझे श्रम मोलाचे झाले आहेत. यापुढें तूं कोणाचें फुकट काम करतां कामा नयेस. तूं आतां वाढत्या वयाचा झाला आहेस, तेव्हां तुला विश्रांतिहि हवीच. आणि हेंहि सांगून ठेवतों, यापुढें तबेल्यांतल्या घोड्यांना तुझा हात लागतां कामाचा नाहीं."

वडिलांचें हें बोलणें हेन्रीला कांहीं पटलें नाहीं. आपण शेतीचें काम चोख बजावल्यानंतर आपला उरलेला फुरसतीचा वेळ आपल्या मर्जीप्रमाणें आपल्या आवडत्या कामांत घालवायला वडिलांची हरकत कां असावी, हें त्याच्या लक्षांत येईना.

थोडा विचार करावा म्हणून तो आपल्या खोलींत जाऊन बसला. जोंपर्यंत वडिलांच्या मनांत हेन्रीच्या निरनिराळ्या कल्पना म्हणजे कांहींतरी मूर्खपणाच असा आडाखा बसलेला होता तोंपर्यंत त्या दोघांचें एकमेकांशीं न पटणेंच साहजिक होतें. हेन्रीला हें माहीत होतें कीं, वडिलांच्या इच्छेपुढें आपण कधींच मान तुकवूं शकणार नाहीं आणि शेतीच्या कामांत त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालणें आपल्याला जमण्यासारखें नाहीं. एंजिनें व यंत्रें यांच्याविषयींचें विलक्षण प्रेम ज्याच्या ठिकाणीं सदा स सळत होतें त्या मुलाला, कधीं न संपणारीं पालुपदें ऐकत व शेतकामाचा कंटाळवाणा रगाडा ओढीत दिवस कंठण्यांत कसें सुख वाटणार? त्याच्यापुढें केवळ एकच मार्ग मोकळा होता. आणि जीवनाच्या त्या नव्या मार्गावर तो उद्यांच प्रस्थान ठेवणार होता.



बाहेर अजून अंधारच होता. हेन्री पटदिशी अंथरुणांतून उठला आणि त्यानें आपले थोडेसे कपडे भराभर गुंडाळून काखोटीला मारले. घरांत कोठें कसलीच हालचाल नव्हती. हेन्री अगदीं शांतपणें निघाला. वडिलांच्या खोलीवरून जातांना त्यांचें लयबद्ध घोरणें त्याच्या कानावर पडलें. जिन्यावरून उतरतांना त्यानें करकरणाऱ्या पायऱ्या काळजीपूर्वक टाळल्या.

स्वयंपाकघरांतून कॉफीकेकचा एक भलामोठा तुकडा बरोबर घ्यायला तो विसरला नाहीं. हेन्री घराबाहेर पडला आणि रस्ता चालूंहि लागला. क्षितिजावरून अरुणाचीं सुंदर मंद प्रकाशकिरणें नुकतींच डोकावूं लागलीं होतीं. आकाशावर ब्लॅकबर्डस्‌चे ठिपके ठिकठिकाणीं उठलेले दिसत होते.

हेन्री चांगला उंचापुरा, पण शिडशिडीत होता. हातीं आलेल्या स्वातंत्र्यानें त्याचें मन अगदीं नाचायला लागलें होतें. कित्येक वर्षांपासून त्याच्या मनांत एकच आकांक्षा होती. एंजिनासंबंधीं जें जें म्हणून असेल तें तें शिकून घ्यायचें. याची त्याला स्वत:लाहि चांगली जाणीव होती. त्याची आई त्याच्या खांद्यावर थोपटीत त्याला म्हणायची " हेन्री, तूं तर जन्मजात

## प्रकरण पांचवें

यंत्रज्ञ आहेस." त्या आठवणीनें त्याचें मन आतां भरून आलें. शेतावर त्यानें जें यांत्रिक ज्ञान मिळविलेलें होतें त्यामुळेंहि त्याची यंत्रज्ञानाबद्दलची जिज्ञासा तीव्रतर झाली होती.

डेट्रॉइट हें तसें मोठें शहर होतें. तरीपण आपल्यासारख्या सोळा वर्षांच्या मुलाला तिथे आपलें बस्तान बसवायला कांहीं अडचण पडूं नये, असें हेन्रीला वाटत होतें. अर्थात त्यासाठीं खूप कसून काम करायची तयारी मात्र हवी होती; आणि हेन्रीची ती होतीहि. नव्या नव्या गोष्टी आपण स्वतः बनविणें; निरनिराळें सामान गोळा करून त्यांतून कांहीं हालत्या चालत्या वस्तू तयार करणें किंवा त्यांतून अशीं हत्यारें बनविणें कीं ज्यांच्या योगानें इतर वस्तू घडवितां येतील. असल्या कामाविषयीं आपल्या मनांत उसळत असलेल्या ऊर्मींना पूर्ण वाट काढून दिलीच पाहिजे, हें हेन्रीनें ओळखलें. आणि त्यासाठीं एखाद्या शहरांतच राहायला हवें होतें. शहरांतच त्याला या गोष्टींसंबंधींचें अधिक ज्ञान मिळण्यासारखें होतें.

हेन्रीचीं पावलें डेट्रॉइटकडे पडत होतीं. परंतु त्याच्या डोक्यांत विचार घोळत होते ते नव्या यंत्रांसंबंधींच्या उलाढालींचे आणि रोग नदीवरील गोड आठवणींचे. त्याला मनांत खोलवर मात्र असें वाटत होतें कीं, जुनें जग बदललें आहे हें आतां आपल्या वडिलांनीं ओळखावें; ते स्वतः आयर्लंडमधून आपल्या बालपणीं इकडे आले त्या वेळची स्थिति आतां राहिलेली नाहीं हें त्यांनीं लक्षांत घ्यावें. नव्या नव्या वस्तु तयार करण्याचा व्यवसाय आतां शेतीइतकाच महत्त्वाचा ठरत होता. अर्थात एखादा चांगला यंत्रज्ञ एखाद्या चांगल्या शेतकऱ्याइतकाच देशाला उपयुक्त होता. लोकांचा ओघ सारखा शहराकडे वळत होता. त्याचे शिक्षक सांगत कीं १८१० मध्यें डेट्रॉइटची लोकवस्ती फक्त साडेसोळाशें होती. ती आतां १८७९ सालीं एक लक्ष, दहा हजारांवर गेली होती.

दूर अंतरावर धुराडीं आणि चर्चचीं शिखरें डोकावतांना दिसूं लागलीं. नऊ मैलांचें अंतर तो चालून आला होता पण त्याला त्याचें कांहींच वाटलें नाहीं–कांहीं वाटायला मन रिकामें असेल तर ! तें गुंतलें होतें विचारांच्या चक्रांत. हेन्रीनें कपाळावरचा घाम पुसला. अजून उन्हाळ्याची झांक हवेंत

होतीच. त्यानें हातरुमालानें आपले कपडे झटकले आणि बूट आपल्याकडून होतील तितके चकचकीत केले. नव्या जीवनासाठीं तो आतां सज्ज झाला.

एखादें राक्षसी लोहारी दुकान समोर असावें तसें डेट्रॉइट शहर हेन्रीला दिसलें. जिकडेतिकडे कारखानेच कारखाने. कोठें गाड्या तयार होत होत्या, कोठें स्टोव्ह बनत होते, तर कोठें बायकांच्या लहंग्यांच्या गोल लवचीक कड्या तर कोठें बाजाच्या पेट्या नि मेणबत्त्याहि बनविल्या जात होत्या. मोठमोठ्या रस्त्यांवरून देवदारी पावठण्या टाकलेल्या होत्या पण जरा आडबाजूच्या रस्त्यावर गेलांत कीं चिखल नाहींतर माती—तें ऋतूवर अवलंबून असायचें. तेज घोड्यांच्या गाड्या रस्त्यांवरून धांवत असायच्या. त्यांच्यापासून बचावण्यासाठीं पादचाऱ्यांनीं चालण्यासारखे लांकडी पदपथ तयार केलेले होते.

रस्त्यांवर वाहनांची ही गर्दी. घोड्यांच्या गाड्यांवर बसविलेल्या घंटा अशा भयंकर आवाज करायच्या ! त्यांत कांहीं फॅशनेबल तर कांहीं सामान वाहण्याच्या गाड्या. त्यांतच सायकलींचीहि गर्दी. दुतर्फा चार–चार मजल्यांच्या इमारती उभ्या होत्या त्या आकाशाला भिडूं पाहणाऱ्या.

एका लहानशा इमारतीवर पाटी होती : जेम्स फ्लॉवर अँन्ड कंपनी, जनरल मशीनिस्ट्स. हें एक बऱ्यापैकीं दुकान असल्याचें हेन्रीनें ऐकलेलें होतें. ही कंपनी यंत्रांचें काम करीत असे आणि वाफेचीं एंजिनेंहि बनवीत असे. यंत्रविज्ञानांत पहिलें पाऊल रोवायला ही कंपनी ही एक चांगली जागा आहे असें त्याच्या लक्षांत आलें.

हेन्रीनें आत्मविश्वासपूर्वक दार लोटलें. तरुण अननुभवी अशा एखाद्या मुलाची कंपनीला गरज नसेल किंवा अशा मुलाला ते कामावर ठेवणार नाहींत हा विचारहि त्याच्या मनांत डोकावला नाहीं. त्याच्या डोक्यांत फक्त एवढेंच चाललेलें होतें कीं, आपण शिकायला किती उत्सुक आहोंत आणि आपण आपलें काम किती उत्तम रीतीनें करून दाखवूं. आंतमध्यें आवाज, ग्रीज, क्रेन्स, सटकफटक करणारे पट्टे आणि सोडवून ठेवलेलीं एंजिनें—त्याला जें जें हवें होतें त्यांनीं आंत सगळें भरून गेलें होतें.

खोलीच्या एका कोपऱ्यांत एक माणूस एका उतरत्या मेजापाशीं काम

करीत बसला होता. त्या माणसानें मान वर करून बघेपर्यंत हेन्री तसाच उभा राहिला; आणि मग उद्मेखून म्हणाला, " मी कामाला आलों आहें. "

" काय येतें तुला ? " त्या माणसानें विचारलें.

" यंत्रसामुग्रीशीं काम करण्याकरितां जें जें समजून घ्यावें लागतें तें सगळें शिकण्यासाठीं आलों आहें मी. "

" आत्तांपर्यंत काय काय केलें आहेस ? " दुसरा प्रश्न.

" शेतावरचीं यंत्रें मीं दुरुस्त केलेलीं आहेत आणि मला हत्यारेंहि वापरतां येतात. मीं घड्याळें नीट केलीं आहेत; शिवाय वाफेचें एंजिन कसें चालतें तेंहि शिकलो आहें."

" तर तुला काम हवें आहे, असेंच ना ? "

" नव्हे, नुसतें काम हवें आहे असें नव्हे," हेन्री म्हणाला. " मला कामाची आवड आहे."

या पोरांत कांहीं पाणी आहे आणि निर्धार पण आहे; मुख्य म्हणजे याचा स्वतःच्या कर्तबगारीवर विश्वास आहे, हें त्या माणसाला दिसून आलें. तो म्हणाला, " उद्यां सकाळीं सात वाजतां इथे हजर हो. तुझा पगार आठवड्याला अडीच डॉलर्स."

कंपनींतून बाहेर पडतांना हेन्रीला वाटलें जग सगळें सुरळीत चाललेलें आहे. त्याच्या मनांत होतें कीं, तावडतोब कामाला लागावें; 'उद्यां' म्हणजे त्याच्या दृष्टीनें फारच उशीर होता.

आतां राहायच्या जागेचा प्रश्न. ती कोठेंतरी शोधून काढायला हवी होती. दर आठवड्याला अडीच डॉलर घेऊन त्याची राहण्या-जेवण्याची व्यवस्था करणारा कोणीतरी त्याला हवा होता. त्यानें खूप घरें धुंडाळलीं परंतु खोल्या होत्या त्या अगदींच कोंदट आणि घामट. त्याच्या आईनें त्याला शिकविलेल्या स्वच्छपणाच्या कसोटीला त्या उतरत नव्हत्या.

याला उपाय एकच होता. स्वच्छ राहणीच्या जागांसाठीं अधिक पैसे द्यावयाला हवे होते आणि अर्थात त्याकरितां आणखी एक जादा काम पाहायला हवें होतें. घरांतून निघतांना त्याच्या खिशांत पुरे पांच डॉलर्ससुद्धां नव्हते. स्वच्छ जागेसाठीं यांतले बहुतेक पैसे खर्ची घालूनसुद्धां त्याला आठवड्याला आणखी एक डॉलर जादा काम करून मिळवणें आवश्यक होतें.

घड्याळ-दुरुस्तीचें एक दुकान बाजारांत पाहिल्याचें त्याला आठवलें. त्यानें लगेच जाऊन तें गांठलें. रोज रात्रीं ७ ते ११ पर्यंत काम करण्याच्या अटीवर त्या घड्याळजीनें हेन्रीला आठवड्याला दोन डॉलर्स देऊं केले. यंत्रालयांत अकरा तास राबून अडीच डॉलर्स आणि इथे फक्त चार तासांसाठीं पुरे दोन डॉलर्स. तथापि या राजशाही पगाराचेंहि त्याला कांहीं विशेष वाटलें नाहीं. यंत्राच्या जीवनांतील प्रत्येक महत्त्वाची गोष्ट शिकायची आणि त्यांत प्रभुत्व संपादन करायचें ही तर त्याची मनीषा होती.

इकडे हेन्री रात्रींच्या जेवणाला हजर नाहीं हें लक्षांत आल्यावर त्याची बहीण मार्गारेट अगदीं गडबडून गेली. आपला भाऊ कसल्या तरी भयंकर अपघातांत सांपडला असला पाहिजे अशी तिची खात्री झाली. शेतावरचे मजूर आणि स्वतः फोर्ड गाड्या जुंपून वेगवेगळ्या दिशांना निघाले.

हेन्री त्यांना शाळेंत आढळला नाहीं. परंतु कोणी तरी त्याला डेट्रॉइटकडे चालत जातांना पाहिलें होतें. फोर्डना तें समजलें तेव्हां ते उद्गारले, " पोरगा आपलें पाहील. कांहीं घोर लागायला नको त्याच्याबद्दल. आपल्या वागण्यांतला मूर्खपणा त्याला कळून आला कीं तो आपोआप परत येईल. "

पण दोन दिवस होऊन गेले तरी हेन्रीविषयीं कांहींच समजलें नाहीं. आतां मात्र फोर्डना धीर धरवेना. मुलाच्या शोधासाठीं ते डेट्रॉइटला निघाले. तेथें हेन्रीचा शोध काढणें कांहीं अवघड नव्हतें; कारण त्याची चौकशी करावयाची ती यंत्र-कंपन्यांतून हें सहज लक्षांत येण्यासारखें होतें. हेन्री जेव्हां फ्लॉवर कंपनींत आढळला तेव्हां फोर्डनीं तिथल्या फोरमनला विचारलें कीं, मुलाशीं थोडें बोलायचें आहे तेव्हां त्याला जरा बाहेर पाठवतां का ?

" हेन्री, तूं शाळेंत आहेस, " फोर्ड जोरानें म्हणाले.

" पपा, मला आतां परत शाळेंत जायचें नाहीं. काय त्या जुनाट शाळेंत जाऊन शिकायचें आहे ? वाचन, लेखन आणि गणीत–मला एंजिनांबद्दल शिकायचें आहे. तुम्हांला कसें सांगायचें तें मला समजत नाहीं, पण एखादा माणूस भुकेनें कळवळावा तसें माझें झालें आहे याबाबतींत. "

" पोरा, एंजिनांचें हें एक खूळ माजलेलें आहे. कांहीं वर्षातच लोक एंजिनांसंबंधींचें सगळें विसरून जातील. यापुढें शेतीवरच विसंबणें हिताचें होईल. शेती ही कायमची गोष्ट आहे. "

। " काळ बदलतो आहे, पपा," हेन्‍री समजावूं लागला. " अधिकाधिक गोष्टी यंत्रानें होताहेत आणि त्या अधिक चांगल्याहि होताहेत. "

या निग्रही मुलाला काय करावें तें फोर्डना समजेना. त्यासंबंधींच विचार करीत ते येरझारा घालीत होते आणि हातानें खिशांतले पैसे खुळखुळावीत होते. मुलाचा कान धरावा आणि त्याला घरीं फरफटत न्यावें असें एकदां त्यांना वाटलें. पण दृढनिश्चयी हेन्‍रीच्या बाबतींत त्याचा कांहीं उपयोग नव्हता. या वेळीं त्याला त्यांनीं जबरदस्तीनें घरीं नेलें असतें तरी तो पुन्हां पळूनच गेला असता. अखेर ते म्हणाले, "ठीक आहे, हें यंत्राचें वेड डोक्यांतून उतरलें कीं मगच तूं घरीं ये. " त्यांनीं हेन्‍रीशीं हस्तांदोलन केलें आणि ते घराकडे परतले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थूळमत.
अनुक्रम 22402 दि: [illegible]
क्रमांक 408 नों: दि: 30/12/50



सकाळीं अगदीं लवकर हेन्री कामावर हजर व्हायचा. त्याला सर्वच गोष्टींचें कुतूहल असायचें; माणसांचें कामावर येणें, यंत्रें सुरू होणें. तसेंच कामगारांचें आपापल्या कामाविषयींचें असलेलें ज्ञान हीहि हेन्रीला एक कुतूहलाची गोष्ट होती.

एखाद्या चंडोल पक्षासारखा तो आपल्या नव्या जीवनांत रमून गेला होता. त्याचा सारा दिनक्रम दिवसाच्या चोवीस तासांत असा अगदीं बसून गेला होता कीं, लहान मुलांचे अक्षरांचे ठोकळे त्या खोक्यांत चपखल बसतात ना तसा. तो सकाळीं सहाला उठायचा, सकाळीं सातपासून संध्याकाळीं सहापर्यंत यंत्रालयांत खपायचा आणि रात्रीं सात ते अकरापर्यंत घड्याळांशीं काम करीत राहायचा. त्यानंतर रात्रीं खोलीवर धांवत पळत यायचा आणि तांत्रिक ज्ञानाचीं नियतकालिकें वाचण्यांत गढून जायचा. थोडेसे पैसे शिल्लक उरत त्यांतून या साहित्याची खरेदी व्हायची. वाचन झालें कीं मग अंथरुणाला अंग लागायचें तें फक्त कांहीं तासांपुरतेंच.

---

## सहावें प्रकरण

---

तासन्तास कामानें तो कधींच कंटाळायचा नाहीं; उलट प्रत्येक उजाडता दिवस म्हणजे हेन्रीला उत्साहाच्या भरलेल्या पेल्यासारखा वाटायचा.

यंत्र म्हणजे हेन्रीचा जिवलग मित्र. तो त्याच्याभोंवतीं फिरे, तें साफसूफ करी, त्याला पॉलिश करी आणि तें हळुहळु घुरघुरायला लागलें कीं याचा चेहरा प्रफुल्लित होऊन जाई. हेन्री यंत्रालयांतून बाहेर पडे तो मो च्या समाधानानें–दिवसाभराच्या पगाराची कमाई केली म्हणून नव्हे तर आपल्याला कितीतरी ज्ञानाची प्राप्ति झाली म्हणून. कारण आपल्या कामासंबंधीं त्याला आवड होती.

प्रत्येक नवें काम त्याला आव्हान देई आणि तें आत्मसात् करीपर्यंत हेन्री त्याचा पिच्छा सोडीत नसे. शेतावर असतांना तो कामासंबंधीं विचार करी आणि तें सोपें कसें करतां येईल तें पाहात बसे. आतां यंत्रालयाचा अभ्यासहि तो त्याच दृष्टीनें करीत होता.

हेन्रीचें काम इतकें समाधानकारक होतें कीं लवकरच त्याचा आठवड्याचा पगार अडीचवरून तीन डॉलरपर्यंत चढला. तरीपण त्या यंत्रालयांतील सर्व गोष्टी शिकून पुऱ्या झाल्यावर हेन्री अस्वस्थ होऊन गेला. नऊ महिन्यांतच त्यानें तें काम सोडलें आणि आठवड्याला ५० सेंट्स कमी पगार घेऊनहि त्यानें 'ड्राय डॉक एंजिन कंपनीं'त काम पत्करलें.

'ड्राय डॉक'चा कारखाना हा डेट्रॉइटमधील सर्वांत मोठा कारखाना होता. तेथें फक्त नाविक एंजिनेंच बनत. १८६० पासून १८९० पर्यंत एंजिनांचा हा प्रकार सर्वत्र सारखाच होता. आजहि वेताच्या वेगाच्या आगबोटींसाठीं हींच एंजिनें वापरलीं जातात.

एका लांब शॅफ्टच्या एका टोकाला शक्ति(पॉवर) लावली जाते आणि दुसऱ्या टोकाला तिचा वापर होतो. मोठ्या दाबाच्या सिलेंडरमध्यें एक दट्टयाची झडप बसविलेली असते. याचें कारण अशा प्रकारामुळें कमींत कमी घर्षण होऊन वाफेच्या खूप मोठ्या दाबाखालींहि अगदीं पूर्ण समतोल सांभाळला जातो.

नाविक एंजिनांत जळणाची व पाण्याचीहि काटकसर अत्यावश्यक असल्यामुळें तीं एंजिनें नेहमीं (मिश्र घन) 'कांपाऊंड कंडेन्सिंग' जातीचीं असतात. एंजिनापासून निघालेला वाफेचा जो प्रत्येक कण पकडतां येईल

आणि ज्याचें पाणी बनवितां येईल तो प्रत्येक कण बॉयलरकडे परत पाठविला गेलाच पाहिजे. हवेचे पंप आणि वाफेचें पाणी बनविणारे कन्डेन्सर हे अतिशय उत्तम काम देणारे असावे लागतात. वाफेपासून मिळणाऱ्या शक्तीचा अगदीं शेवटचा कणहि यांमुळें खेंचून घेतां यावा लागतो आणि तसेंच या वाफेपैकीं अधिकांत अधिक वाफ पुन्हां बॉयलरकडे परत पाठवितां यावी लागते.

या नव्या कंपनींत तरुणांचा एक उत्साही कंपूच होता; आणि हेन्रीचा त्यांत तात्रडतोब समावेशहि होऊन गेला. एवढीं तरुण माणसें एकत्र असल्यावर वेळगंमतीला काय तोटा! इतर तरुण मुलेंहि हेन्रीइतकेंच कसून काम करीत; पण त्यांचें तें काम होतें पैसे मिळवायचें व त्यांवर जगायचें नि मजा करायची याकरितांच फक्त. त्यांची उमेदवारी संपली कीं ते पुरे-खरे यंत्रज्ञ –मशीनिस्ट–होणार आणि मग त्यांना मोठे पगार मिळून ते लग्न करून संसार थाटणार; ह्या त्यांच्या कल्पना. हातीं असलेल्या एंजिनांत सुधारणा करण्याचें त्यांच्या स्वप्नींहि नसायचें. त्या बाबतींत चालू असलेल्या स्थितींत ते अगदीं संतुष्ट असायचे.

डेट्रॉइट राहायच्या दृष्टीनें मोठें उत्तेजक शहर होतें. प्रिन्स ऑफ वेल्स या शहरांत आले होते व 'रसेल हाऊस' मध्यें राहूनहि गेले होते आणि एक दिवस थोर सेनापति जनरल ग्रँटहि पोटोमॅकच्या सैन्याचें पुनर्संयुक्तीकरण पाहावयाला येथें येऊन गेला होता. त्याच्या अगोदर तीन वर्षें ॲलेक्झांडर बेलनें येथेंच एक वैयक्तिक प्रदर्शन भरविलें होतें आणि आतां शहरांतील कांहीं लोक 'टेलिफोन' नांवाच्या एका चमत्कारिक साधनानें आपसांत बातचीतहि करूं लागले होते. शहरांत एक मध्यवर्ती 'एक्स्चेंज' कचेरी, बावीस तारा आणि तीनशें खाजगी-वजा फोन होते.

जवाहिऱ्याच्या दुकानांतील रात्रीचें काम हेन्रीनें सोडून दिलें. आतां त्याचें वेतन आठवड्याला पांच डॉलर्स इतकें वाढलें होतें. त्यामुळें इतक्या जखडलेल्या दिनक्रमाची त्याला आतां गरजहि नव्हती. त्या दुकानांतील काम सोडण्यापूर्वी त्यानें तीन डॉलर्स किंमतीचें एक घड्याळहि विकत घेतलें होतें.

त्यानें तें घड्याळ आपल्या खोलीवर आणलें आणि उलगडून टाकलें. त्यानें त्याचे सगळे भाग आपल्यासमोर मेजावर पसरले. अगदीं स्वस्त हलक्या धातूपासून बनविलेल्या अगदीं सामान्य भागांनीं तें तयार केलेलें आहे हें त्याच्या लक्षांत आलें. मग या घड्याळाला इतकी किंमत कां पडावी? एक तर कारखानदार त्यावर भरमसाट फायदा घेत असला पाहिजे, नाहीं तर तीं तयार करतांना सामानाची अवास्तव नासधूस तरी होत असली पाहिजे; हेन्रीनें अनुमान काढलें.

एका रात्रीं ड्राय डॉक कंपनींतलें तें तरुण टोळकें हेन्रीच्या खोलींत जमा झालें होतें. हेन्रीनें त्यांना आपलें घड्याळ दाखविलें आणि पुन्हां एकदां त्याचे सगळे भाग मेजावर पसरले.

"अरे! एका चांगल्या घड्याळाचा असा नास कां करून टाकलास बावा? आहे तरी काय तुझ्या डोक्यांत?" त्यांतला एकजण अधीरपणें म्हणाला. "आतां दे फेकून तें कचऱ्याच्या टोपलींत सारें."

"छट्!" हेन्री हंसला. "एखादी नकाशाची सुरळी उलगडणें आणि पुन्हां व्यवस्थित गुंडाळून ठेवणें इतकेंच हेंहि सोपें आहे." मग तो गंभीरपणें म्हणाला, "आपल्याला एक घड्याळाचा कारखाना काढला पाहिजे."

"घड्याळाचा कारखाना काढायचा!" जमलेले तरुण आश्चर्यानें उद्गारले. "ही कल्पना तरी कशावरून सुचली तुला?"

"या घड्याळाला मीं तीन डॉलर्स दिले." हेन्री म्हणाला, "आपण जर अशीं हजारोंनीं घड्याळें बनविलीं—सर्व अगदीं एकसारखीं आणि त्याचा प्रत्येक भाग एका मापाच्या अगदीं बरोबर 'डाय' नें कापलेला, तसेंच सामान आणि कामगारांची शक्ति या बाबतींत कांहींहि वांया जाणार नाहीं अशी दक्षता घेऊन. तर तें घड्याळ फक्त पन्नास सेंटला पडेल. प्रत्येकाला तें घेतां येईल. प्रत्येकाला घड्याळाची गरज ही असतेच."

हेन्रीनें हलक्या धातूचे ते लहानलहान तुकडे आपल्या सोबत्यांपुढें पाहाण्यासाठीं सारले.

"कामगारांची वांया जाणारी शक्ति वांचवायची म्हणजे रे काय?" एका लाल केंसाच्या तरुणानें विचारलें.

"कामासाठीं उत्तम यंत्रें आणवून त्यांची उभारणी, वांया जाणारी गति व पद्धति टाळतां येईल अशा प्रकारें करणें. तिकडे कारखान्यात पाहा. योग्य हत्यारं हातीं येण्यासाठीं माणसांना कोण मारामार पडते," हेन्रीनें समजावून सांगितलें.

"बरोबर; तूं म्हणतोस तें खरेंच," त्या सगळ्यांनीं कबुली दिली. त्यांनीं पूर्वी याचा कधींच विचार केलेला नव्हता कीं काम करण्याची कांहीं अधिक चांगली पद्धति असूं शकेल म्हणून.

हेन्रीनें एक कागद पुढें ओढला आणि त्यावर पेन्सिलीनें एक आकृति रेघाटायला सुरुवात केली. सगळेजण मोठ्या उत्सुकतेनें पाहात बसले.

"आपल्याला एक चांगलें घड्याळ सदतीस सेंटमध्यें बनवितां येईल आणि तें पन्नास सेंटना विकतां येईल. दररोज दोन हजार घड्याळें आपल्याला तयार करतां येतील. रोजचा फायदा दोनशें साठ डॉलर्स." हेन्रीनें अंदाज केला.

त्या टोळक्यांतले सगळेजण चकीत झाले तें ऐकून—केवळ रेडला कांहीं वेगळेंच वाटलें. तो बोलला, "असें घड्याळ पन्नास सेंटला विकायचें म्हणजे आपण बावळटच म्हणायचे! चांगले घसघशीत दोन डॉलर्स घेऊन भरपूर फायदा घ्यायला काय हरकत आहे त्यावर?"

हेन्री लाल झाला आणि एकदम रागानें उत्तरला, "आपल्या देशाला असला धंदा नको आहे! सेवेच्या अगोदर पैशाचा विचार करणाऱ्या धंद्याशीं संबंध ठेवायला मला मुळींच आवडणार नाहीं. मी जेव्हां धंदा चालू करीन तेव्हां लोकांना उपयोगी असेंच कांहींतरी तयार करीन. चांगलें सामान तर मी वापरीनच पण त्यापासून उत्पादन करायचें तें कमींत कमी खर्चांत जास्तींत जास्त उत्पादन करून तें स्वस्तांत स्वस्त विकीन. धंदा चालविण्याची माझी ही कल्पना आहे; मग पैसाहि प्रामाणिकपणानें येईल, अशी माझी खात्री आहे."

परंतु एकदम पुष्कळ पैसे मिळविण्याची शक्यता दिसल्यामुळें इतर सोबत्यांनीं रेडचीच बाजू घेतली. त्यावर हेन्रीनें सांगितलें कीं, कमी किंमती-मुळें खप वाढेल आणि जादा किंमतीमुळें तो कमीच राहील.

"आपण आपापल्या कामांत मूर्खासारख गुरफटून बसलेले आहोंत. नुसते रेमेडोके आहोंत आपण," त्यांच्यापैकीं एक जॉन नांवाचा होता तो ठांसून म्हणाला. "तुझ्या कल्पनेनें मात्र आपलें नशीब उचकटण्यासारखें होणार आहे, हेन्री. मात्र तूं रेडच्या म्हणण्याप्रमाणें चाललास तर."

"तें कधींहि शक्य नाहीं," हेन्री तितक्याच निर्धारानें म्हणाला." सेवा किंवा लोकोपयोग हीच महत्त्वाची गोष्ट आहे. पैशाची हांव बाळगून यशस्वी धंदा कधींच करतां येणार नाहीं, निदान वर्षानुवर्षें टिकणारा तर नाहींच नाहीं."


"वेडपटच दिसतोस तूं, हेन्री!" जॉननें टोला मारला. "भरपूर पैसे सांठेपर्यंत कसली सेवा नि कसला लोकोपयोग! दोन डॉलर ही घड्याळाची स्वस्तच किंमत आहे."

हेन्रीनें घड्याळाचे पसरलेले सगळे भाग गोळा केले आणि उबगल्या-सारखें डोकें हालवलें. "गिऱ्हाइकाला त्याच्या पैशाचें योग्य मोल मिळालें नाहीं आणि मी त्याच्याशीं योग्य व्यवहार केला नाहीं असें जर वाटत राहिलें तर रात्र रात्र मला झोंपहि येणार नाहीं."

"तुम्ही खुशाल हंसा," हेन्री पुढें म्हणाला, "पण मी एक दिवस कारखाना उघडीन आणि त्यांत हजारोंनीं वस्तू तयार करीन. कारण माझा असा विश्वास आहे कीं, सर्वसाधारण उत्पन्नाच्या माणसासाठी उत्पादन करावयाचें तर तें प्रचंड प्रमाणावर केलें पाहिजे, तरच तें तो अधिकाधिक विकत घेऊं शकेल."

तोंडानें ही बडबड चालली होती तरी हेन्रीचे हात मात्र घड्याळाचे सुटे भाग अचूक एकत्र जुळविण्यांत दंग होते.

जॉननें घड्याळ उचललें आणि आपल्या कानाला लावलें. तें टिक् टिक् करीत होतें. "हेन्री" तो म्हणाला, "तुला डोकें आहे. पण तूं इतका हेकट असावास हें मात्र लाजिरवाणें आहे."



वरीच रात्र झाली होती. हेन्री खोलींत आला तों मेजावर त्याला एक पत्र आढळलें. खूप लांबलचक होतें तें. त्यानें तें पुन्हां पुन्हां वाचलें. मग तो आपल्या बिछान्यावर बसून बराच वेळ विचार करीत होता.

यंत्रविज्ञान शिकण्यांत हेन्रीनें झपाट्यानें प्रगति केली होती. नेहमींच्या तीन वर्षांपेक्षां कितीतरी अगोदर हेन्रीची यंत्रज्ञाची उमेदवारी पुरी झालेली होती. वेस्टिंग हाऊसच्या ने-आण करण्यासारख्या वाफेच्या एंजिनांवर 'मार्ग-प्रवीण' ( रोड एक्स्पर्ट ) म्हणून तो आतां काम करीत होता. या नव्या कामामुळें त्याला आपल्या ज्ञानाची प्रात्यक्षिक बाजू कळून आली. वाफेचीं एंजिनें कशीं उभारावींत, तीं दुरुस्त कशीं करावींत हें तीं कामें स्वतःच करून पाहून तो शिकला. तसेंच तीं कशीं चालवावींत तें त्यानें इतरांना शिकविलें. बंद पडलेल्या एंजिनांइतकें दुसरें त्याला कांहींच आवडत नसे. त्याला त्याचा हात लागायचा अवकाश कीं तें लागलेंच मांजराच्या पिल्लासारखें घुर्‌र्‌ घुर्‌र्‌ करूं लागायचें. आणि प्रत्येक नव्या एंजिनाची दुरुस्ती म्हटली कीं हेन्रीच्या ज्ञानांत कांहींना कांहीं भर पडायचीच.

तें लांबलचक पत्र होतें त्याच्या बहिणीचें-मार्गारेटचें. शेतावरची एकंदर परिस्थिति कांहीं ठीक नव्हती; आणि तिनें हेन्रीला घरीं परत

---

येण्याविषयीं विनवणी केली होती. त्याचा भाऊ आजारी होता आणि वडिलांना कसला तरी अपघात झाला होता. शेतावरचे मजूर तर त्यांच्यावर कोणाची तरी मुकादमी असल्याशिवाय कामाला हात लावतील हें शक्यच नव्हतें.

शेतावर आपली किती तीव्रतेनें गरज आहे हें हेन्रीच्या लक्षांत आलें होतें. परंतु एक गोष्ट तो जन्मांत कधी करायला तयार झाला नसता, ती म्हणजे डेट्रॉइट सोडून जाणें. त्याला आपल्या आईची आठवण झाली. तिच्या परोपकाराबद्दलच्या कल्पनाहि त्याच्या मनांत डोकावून गेल्या. शेतावर तो परत गेलाच तर तिथे एक मात्र चांगली गोष्ट होती त्याच्या दृष्टीनें; आपल्या वर्कशॉपमध्यें एंजिनें तयार करण्याच्या बाबतींत प्रयोग करायला त्याला संधी मिळाली असती.

हेन्री शेतावर परत गेला. आपल्या जुन्या यंत्रालयांत त्यानें डोकावलें आणि त्याला हंसूं आलें. त्याचीं तेथलीं जुनीं हत्यारें म्हणजे लहान मुलांच्या खेळांतील हत्यारांपेक्षां थोडीं बरीं इतकेंच. आतां त्यांच्या जागीं आपल्या ज्ञानाला व तंत्राला शोभण्यासारखीं खरीं यंत्रें आणून बसविणें त्याला शक्य होतें.

" आपल्याला जर एक शेतकी 'लोकोमोटिव्ह' बनवितां आलें तर–" हेन्रीच्या मनांत विचार आला. मग या घोड्यांना रजा देतां येईल. केवळ लावणी-कापणीच्या हंगामांत उपयोगी पडावे म्हणून वर्षभर त्यांची उस्तवारी करीत बसण्याचें मग कारण उरणार नाहीं." नांगरटीसाठीं एखाद्या शक्ति-चालित यंत्राइतकी घोड्याची जोडी व नांगर हीं चांगलीं नाहींत असें कांहीं कोणा शेतकऱ्यानें हेन्रीला येऊन सांगितलें नव्हतें. तरीपण किती तरी कमी वेळांत व कमी श्रमांत होण्यासारख्या कामामध्यें भरमसाट वेळ खर्च करणें हें उघडच मूर्खपणाचें दिसत होतें.

शेतावरचें दिवसभऱ्याचें काम आटोपल्यावर हेन्री आपल्या यंत्रालयांत आला. त्यानें शेतकी ' लोकोमोटिव्ह ' तयार करायला घेतलें. हें यंत्र त्याला काम असेल तेव्हांच फक्त खायला मागणार होतें. एका जुन्या गवत काप-णीच्या यंत्राचीं बिडाचीं चाकें त्यानें त्यासाठीं वापरलीं.


या यंत्राच्या चांचणीच्या दिवशीं मोठी धांदल उडून गेली होती. शेतमजूर, मार्गारेट, तिचे वडील सर्वजण शेतावर तो प्रयोग पाहायला आलीं होतीं. हेन्रीला खात्री होती कीं आपलें शेतकी ' लोकोमोटिव्ह ' एक सबंध शेत अगदीं थोडक्या वेळांत नांगरून टाकील. त्यानें बॉयलरमध्यें चांगली धगधगीत आग पेटविली. पाणी उकळायला लागलें. चूड-चग्-चूड-चग् —दट्टया खालींवर व्हायला लागला. मग तीं मोठालीं चाकें हळुहळु फिरायला लागलीं.

प्रत्येकजण अगदीं उत्कंठेनें पाहात होता. तें खरोखरच चालायला लागलें होतें. कुतूहल अगदीं परमावधीला पोहोंचलें होतें. तें सुमारें चाळीस फूट पुढे गेलें आणि थांबलें. " एंजिन चालू राहण्याइतकी पुरेशी वाफ झटपट तयार झाली नाहीं. " हेन्रीनें आपल्या उत्साहभंग झालेल्या प्रेक्षकांना उद्देशून म्हटलें.

" अगदींच कुचकामी " फोर्डमहाशयांनीं अधीर होऊन डोकें हालविलें. " प्रयोगच फसला. तें फक्त चाळीस फूट चाललें. "

" पण तें चाळीस फूट पुढें सरकलें. मग, ही प्रगतीच आहे ! " हेन्री मोठ्या आत्मविश्वासानें उत्तरला. तो एक क्षणभर सुद्धां हें मानायला तयार नव्हता कीं त्याचें स्वप्न खोटें ठरलें. उलट त्याला तर असें वाटूं लागलें की, जर हें ' शेतकी ' लोकोमोटिव्ह ' चाळीस फूट जाऊं शकतें तर इच्छेला येईल तितक्या दूरवर चालणारें एंजिन बनवितां आलेंच पाहिजे.'

ह्याचा अर्थ एवढाच होता कीं इंजिनें तयार करण्याविषयींची पुष्कळच अधिक माहिती मिळविणें त्याला आवश्यक होतें.



"हेन्री फोर्ड, तुझी आतां अगदीं हद्द झाली ! तुझ्या बाबतींत यापुढें स्वस्थ बसणें मला तरी शक्य नाहीं." मार्गारेट एका रविवारीं सकाळींच चर्चमधून घरीं परत आली आणि तिनें भावाची खरडपट्टी काढायला सुरुवात केली.

"काय बुवा ! असें काय घडलें माझ्या हातून आतां ?"

"तू घरीं परत आल्यानंतर पहिल्याच रविवारीं आमच्याबरोबर चर्चमध्यें आलास. तेव्हांपासून आमच्या या देखण्या बंधूराजांच्या बाबतींत मुलींनीं माझें अगदीं डोकें उठवलें आहे. त्यांतून तू शहरांतून जाऊन आलेला. —पण तूं पाहावें तों कोणाहि मुलीकडे लक्ष द्यायला तयार नाहींस.

"बरें तें जाऊं दे. आतां लवकरच कांहीं आठवड्यांत मी एक सुगीची जंगी मेजवानी देणार आहें. त्यावेळीं तुला व्हायचें आहे यजमान. यजमान कसा खुशींत असला पाहिजे हं. हेन्री, सगळ्या मुलींशीं असा छान वागशील !"

हेन्री कांहींच बोलला नाहीं. तो आपल्या वडिलांकडे निराश नजरेनें पाहात राहिला.

---

## आठवें प्रकरण

---

सरत्या आक्टोबरांत मेजवानीचा दिवस आला. कापणी होऊन गेल्या-नंतर राहिलेल्या खुंटांनीं शेतजमिनी भुरकट दिसत होत्या. त्या जंगी मेज-वानीच्या तयारींत कित्येक तास गेले. भाजलेले 'हॅम', तळलेली कोंबडी, घरगुती चीज, भाजलेले बीन, घरगुती ब्रेड, चॉकोलेट केक, 'अँगल-केक' याशिवाय लेमन-पाय, रेझिन पाय, चेरी पाय, ब्ल्यूबेरी पाय व पीच यांचीं मांस-फळमिश्रित पक्वान्नें. असे कितीतरी पदार्थ त्यांत होते.

त्या लांबोडया मेजापाशीं बसलेल्या एका विशिष्ट मुलीवर हेन्रीची दृष्टि सारखी खिळत होती. मृदु भुऱ्या केसांची नि सुंदर स्निग्ध डोळयांची ती मुलगी म्हणजे क्लारा ब्रायंट. तेथून सुमारें आठ मैलांवर असलेल्या एका श्रीमंत शेतकऱ्याची ती मुलगी होती. तिची हंसण्याची लकेर आणि तिची शांत वागणूक त्याच्या मनांत भरली.

मेजवानी आटोपली. हेन्रीनें आपला सगळा धीर एकवटून क्लाराला विचारलें कीं, बुधवारीं संध्याकाळीं तिच्या भेटीसाठीं त्यानें यावें काय ?

"माफ करा," क्लारानें बेपर्वाइनें सांगून टाकलें—"दुसरें कोणी येणार आहे त्यावेळीं माझ्याकडे."

परतु एखादी गोष्ट एकदा मनानें घेतली म्हणजे ती सहजासहजीं सोडून देणारा हेन्री नव्हता. "मिस् ब्रायंट, मग मी केव्हां येऊं ?" त्यानें थोडें बेभान झाल्यासारखें होऊन विचारलें.

क्लारा मृदुपणें हंसली. या लाजाळू पण चिकाटीच्या तरुणाला एकदम झिडकारून टाकण्याचा कांहीं धीर तिला झाला नाहीं. "तुला वाटलें तर ये पुढल्या रविवारीं," ती म्हणाली.

क्लाराला पुन्हां भेटण्यापूर्वीं तिच्याविषयीं विचार करण्याला हेन्रीला सहा दिवस होते.

भेटायला यायला हरकत नाहीं, असें क्लारानें म्हटलें तरी तिची भेट घ्यायची आणि तिच्याशीं बोलायचें म्हणजे सोपी गोष्ट नव्हती.

बर्फ पडायला सुरुवात झाली आणि हेन्री सुंदर क्लाराला जिंकायला पुढे सरसावला. त्यानें एक बर्फावरची घसरती गाडी तयार केली, तिला तांबडा लाल रंग दिला; आणि वडिलांची सीलसारख्या करडया रंगाची

घोडी वरातीच्या घोड्याप्रमाणें सजवून त्या गाडीला जुंपली. त्या घसर-गाडीला लावलेल्या घंटांचा नाद ऐकून क्लारा अगदीं खूष होऊन गेली. हेन्रीशीं गप्पागोष्टी करायला तिला मग बरीच सवड सांपडली !

बर्फावरून घसरण्याचा खेळ खेळण्यांत लोकांची चुरस लागली होती. टोळ्या-टोळ्यांनीं लोक खेळत होते.आणि हेन्रीनें त्यांतहि प्राविण्य मिळविलें.

आणि त्यानंतर एका दिवशीं क्लारापाशीं हेन्रीचा भाव चांगलाच वाढला. त्यानें दोन तबकड्यांचें व चार कांट्यांचें एक घड्याळ तयार केलें. 'स्टँडर्ड रेल्वे-टाईम ' म्हणून नवी वेळ अंमलांत येत होती. ही वेळ नेहमींच्या सूर्यदर्शी वेळेपेक्षां वेगळी होती. या दोन्ही वेळा एकाच वेळीं सांगणारें तें अजब घड्याळ पाहून क्लारा मोठी प्रसन्न झाली. हेन्रीनें आपण तें घड्याळ कसें बनविलें तें तिला सांगितलें.

त्या रात्रीं घरीं आल्यावर क्लारानें आपल्या आईवडिलांना सांगून टाकलें कीं हेन्री आपल्याला आवडला. " माझ्या ओळखीच्या आत्तांपर्यंतच्या तरुणांपेक्षां हा वेगळाच आहे. तो इतका समजुतदार आहे ! तसेंच तो कोण-तीहि गोष्ट करतो ती अगदीं मनापासून. जगांत तो एक दिवस चमकल्या-शिवाय नाहीं राहायचा, " ती म्हणाली.

" काय, जरा डुलकी लागली होती वाटतें ? " एक दिवस फोर्ड कोचावर पाय लांब करून पडले होते, त्यांच्याकडे पाहून हेन्रीनें विचारलें.

" हं, अगदीं थोडा वेळ. आणि तेवढीहि घेण्याची यापुढें गरज पडणार नाहीं. आतां मी अगदीं खडखडीत बरा झालों आहें. "

मार्गारेट कोपऱ्यांतलें कपाट साफसूफ करीत होती. कपबश्या आणि कांचेचीं भांडीं घांसून पुसून स्वच्छ करण्याचें तिचें काम चालू होतें.

" आतां डेट्रॉइटला परत जायचें नाहीं असें ठरवलें आहे मीं." हेन्रीची ही घोषणा म्हणजे आकाशांतून वीज कोसळावी तशीच होती.

मार्गारेटच्या हातांतली एक सुंदर निळी बशी जवळजवळ गळूनच पडली आणि फोर्ड एकदम उठून कोचावर ताठ बसले.

" मला माहीतच होतें शेवटीं तू माझ्याच मार्गावर येशील, " फोर्ड

आनंदून म्हणाले. "केव्हांहि झालें तरी शेती त्या शहरांतल्या हमालीपेक्षां हजार पटींनीं बरीच."

"तसें नव्हे, पपा. पण माझा लग्न करायचा विचार आहे."

"हेन्री!" मार्गारेट हर्षातिरेकानें उद्गारली, "क्लारा तुला सुंदर बायको शोभेल."

"चांगली दिसते मुलगी," फोर्डनींहि कबूल केलें. "दक्षिणेकडला चाळीस नंबर मी तुला देतों. घर आणि इमारती यांना पुरेसें लांकूड सामान त्या जागेंत मिळेल. इमारती लांकडाचीं झाडें पुष्कळ आहेत तिथे."

हेन्रीनें त्याच दिवसापासून लांकूड सामान कापावयाला सुरुवात केली साऱ्या हिवाळाभर झाडें तोडून त्यांचें सामान बनविण्याचा त्याचा उद्योग चालला होता. त्यानें एक गोल यांत्रिक करवत खरेदी केली आणि १२ अश्वशक्तीचें एक एंजिन आणून त्यावर ती चालू केली. ओक, मॅपल आणि बीच यांचे केवढाले भक्कम वृक्ष, पण या यांत्रिक कुऱ्हाडीच्या फटक्यासरसे खालीं कोसळूं लागले. मग त्या यांत्रिक करवतीवर त्याच्या फळ्या पडल्या. वसंत ऋतूंत त्यानें एक माणूस मजुरीवर ठेवला आणि त्या दोघांनीं क्लारा-साठीं रुंद रुंद देवड्यांचें एक घर उठवलें. जगांतल्या अति विलक्षण तरुणी-साठीं एक सुंदर घर असायलाच हवें असें हेन्रीला साहजिक वाटत होतें.



"मला जें जें हवें होतें तें तें सगळे इथे आहे," क्लारा व हेन्री डेट्रॉइटमधल्या मधुचंद्राहून परतली आणि आपल्या नव्या घरांत राहायला आलीं, त्याच वेळीं क्लारा म्हणाली.

स्वयंपाकघरांत लांकडें जाळण्यासाठीं एक सुंदर नवीन भट्टी बसविलेली होती. तसेंच क्लाराला विहिरीवरून पाणी आणायला लागूं नये म्हणून मोरीवर पंपहि बसवून दिला होता हेन्रीनें.

हेन्रीनें आपली स्वतःची शेतवाडी, वडिलांची सांभाळली होती त्यापेक्षांहि उत्तम तऱ्हेनें सांभाळली होती. त्याच्या व्यवस्थित स्वभावानुसार त्यानें साऱ्या कामाची व्यवस्था अशी कांहीं सुरळीत लावून दिली होती कीं, मजुरांना जादा काम करायला लागूं नये आणि त्याचबरोबर श्रम व वेळ यांचीहि बचत व्हावी.

क्लाराचासुद्धां या सुव्यवस्थेला हात लागलेला होता. तिचें घर म्हणजे टापटिपीचा एक सुंदर नमुना होता. डबाबंद फळें, सांठवणीच्या वस्तु आणि भाजीपाला तळघरांतील फडताळांवर हारीनें लावलेला असायचा. तिची अन्नपूर्णा सदा केक्स, उकडलेले पदार्थ आणि मांस-फळमिश्रित पक्वान्नांनीं

---

## नववें प्रकरण

परिपूर्ण असायची. त्या तरुण जोडप्यानें संसाराला नव्यानेंच प्रारंभ केला होता तरी सारें कांहीं अगदीं अपवादात्मक सुरळीतपणें चाललें होतें. यंदा सुगीहि फार चांगली झाली होती आणि त्यांच्या हातीं चांगला पैसा खुळखुळत होता.

रात्रीं क्लारा जेव्हां टेबलावरील जेवणाचीं ताटें उचलून आंत नेई तेव्हां हेन्री यंत्रज्ञानावरील नियतकालिकें बाहेर काढून त्यांतला शब्दन् शब्द आपल्या डोक्यांत सांठवीत बसे.

अशाच एका संध्याकाळीं हेन्रीनें हातांतलें मासिक गुडघ्यावर सपकावलें आणि तो एकदम ताठ बसला. "क्लारा, ते लोक योग्य मार्गावर आहेत," तो म्हणाला.

"कसला मार्ग ?" क्लारानें शान्तपणें विचारलें.

"घोड्याशिवाय गाडी ! कांहीं फ्रेंच लोकांनीं बिन-घोड्याची गाडी शोधून काढली आहे. क्लारा, मला अशी बिन-घोड्याची गाडी बनवतां आली तर ?" हेन्री म्हणाला. त्याचे स्वच्छ निळे डोळे उत्साहानें चमकले.

क्लारानें हातांतलें विणकाम बाजूला केलें. हेन्री अतिशय गंभीरपणानें कांहीं तरी बोलतो आहे हें तिच्या लक्षांत आलें. "माझी खात्री आहे हेन्री, तुम्ही मनावर घेतलेंत तर नक्की बनवालं. पण मी म्हणत्यें, आपण कशाला त्या भानगडींत पडायचें ? आपल्या गरजेपुरतें सर्व कांहीं आहे आपल्यापाशीं."

"आपल्यासाठी नव्हे हें, क्लारा. यामुळें लोकांना एक नव्या प्रकारचें जीवन लाभणार आहे," हेन्रीनें स्पष्ट केलें. "आपल्याला येथून उठून डेट्रॉइटला जाऊन राहावें लागेल," असें तो म्हणाला, आणि त्यावर क्लाराचें मत काय पडतें तें समजून घेण्यासाठीं उत्कंठापूर्वक थांबला.

डेट्रॉइटला राहायला जायचें ! तो विचार तिच्या सहनशक्तीबाहेरचा होता. नवें सुंदर घर आणि शेतवाडीवरील मोठी प्राप्ति हातची सोडून द्यायची आणि त्याच्या मोबदल्यांत मिळवायचें काय ?–तर शहरांत जाऊन कसेबसे दिवस काढीत राहायचें, तिथे तिच्या यजमानांनीं असल्या कांहीं कल्पना डोक्यांत घेऊन त्यांवर प्रयोग करीत बसायचें आणि लोकांनीं त्याच्याकडे पाहून फिदीफिदी हंसायचें ! आणखी अशा कितीतरी गोष्टी क्लाराच्या

मनांत चमकून गेल्या. तिथे चांगलें चुंगलें कापड घ्यायला हाताशीं पैसे राहणार नाहींत. आणि स्केटिंगसाठीं किंवा नाचासाठीं बरोबर घेऊन जायला हेन्रीला तिथे वेळ तरी कोठून मिळायला !

क्लारा हें समजून चुकली होती कीं, हें कांहीं साधें थंडीवाऱ्याच्या तापाचें प्रकरण नाहीं कीं जें एखादा गंधक-काकवीचा (सुण्ठ-धन्याचा) काढा घेतला म्हणजे बरें होऊन जाईल. अखेर ती म्हणाली, " हेन्री, तुम्ही जेव्हां एखादी गोष्ट करायची ठरवितां तेव्हां मग त्यापासून माघार घ्यायचें तुम्हांला माहीत नाहीं. या ऊर्मीप्रमाणें तुम्ही वागलां नसतात तर तुम्हांला सुखाचे व शांततेचे क्षणहि लाभले नसते—मला तुमचा चळवळ्या स्वभाव चांगला माहीत आहे. तुम्हांला तेवढेंच हवें असेल, तर जाऊं आपण डेट्रॉइटला. मग कराल तुम्ही विनघोड्याची गाडी तिथे. माझी खात्री आहे तुमच्याबद्दल ! " ती मनःपूर्वक बोलली.

हेन्रीच्या डोळ्यांनींच क्लाराला सांगितलें तिला काय समजायला हवें होतें तें. आपली पत्नी इतकी समजुतदार असल्याबद्दल हेन्रीला अर्थातच आनंद वाटत होता. तिचा त्याच्या कर्तृत्वावरील विश्वास, एवढेंच काय तें त्याला हवें होतें.

उरलेला सर्व उन्हाळाभर हेन्रीनें पेरणी केली, जमिनी नांगरल्या आणि गुरांची काळजीहि मनापासून घेतली. तरीपण त्याचें लक्ष लागलेलें होतें गॅसोलिन इंजिनकडे. अखेरीला त्यानें आपली शेतीवाडी आपल्या भावाकडेच भाडेपट्ट्यानें देऊन टाकली.

डेट्रॉइट आतां कितीतरी वाढलें होतें. डेट्रॉइट नदीच्या कडेकडेनें त्यानें जवळजवळ तीस चौरस मैलांचें क्षेत्र व्यापलें होतें. हेन्रीनें इंजिनासंबंधीं कांहींतरी शिकण्यासाठीं या शहरांत प्रथम पाऊल ठेवलें त्याला आतां दहा वर्षें होऊन गेली होतीं. शहराच्या त्यावेळच्या नि आजच्या लोकसंख्येंत

दुपटीनें फरक पडला होता. तेथें आतां अनेक नव्या कारखान्यांची भर पडली होती. वीज वापरण्याकडे लोकांचा अधिकाधिक कल होत होता. 'एडिसन इलेक्ट्रिक कंपनी'चीं शहरांत आतां तीन उपकेंद्रें—सबस्टेशन्स-झालीं होतीं.

हेन्रीच्या मनांत आलें कीं शक्तीच्या या नव्या उगमासंबंधीं आपण कांही शिकलें पाहिजे. वाफेच्या एंजिनासंबंधींच्या त्याच्या ज्ञानामुळें त्याला वरीलपैकीं एका उपकेंद्रांत नोकरी मिळायला मदत झाली. विजेचा प्रवाह या उपकेंद्रांतून वाफेच्या साहाय्यानें निर्माण केला जाई. या एंजिनांत कसलाहि बिघाड उत्पन्न झाला तर तो ठीकठाक करणारा हेन्री हाच योग्य तरुण माणूस होता.

तरुण फोर्ड दांपत्यानें बागले ॲव्हेन्यूवरील एका घरांत आपलें बिऱ्हाड थाटलें. या घराच्या पिछाडीला विटांची एक जुनी झोपडी होती. हेन्रीच्या यंत्रालयासाठीं ही अगदीं योग्य अशीच जागा होती. त्यानें आपल्या यंत्रालयासाठीं चांगली यंत्रसामुग्री खरेदी केली. एक लहान व एक मोठा असे दोन ड्रिल प्रेस, दोन धातूचे लेथ, एक लांकूड कातण्याचा लेथ, एक लहान भाता व ऐरण. शक्त्युत्पादनासाठीं त्यानें एक विजेची मोटारहि तेथें आणून बसविली. हीं त्याचीं लहान लहान हात-हत्यारें बसवून घेण्यासाठीं त्यानें भिंतींना लागून घडवंच्या उभारल्या. प्रत्येक वस्तू पॉलिशनें चकचकीत केलेली होती आणि अगदीं सुव्यवस्थित रीतीनें लावून ठेवलेली होती.

हेन्रीला डेट्रॉइटमध्यें परत यायला मिळाल्यामुळें अर्थातच आनंद वाटला. येथें त्याला एंजिनांचें अगदीं समीप सान्निध्य मिळत होतें. घराच्या पिछाडीलाच स्वतःचें यंत्रालय असल्यानें तेथें त्याला बिनघोड्याची गाडी बनविण्यासाठी प्रयोग करणें शक्य होतें. एडिसन इलेक्ट्रिक कंपनीमधील त्याची नोकरीहि या दृष्टीनें सोयीची होती. ठिणगी उत्पन्न करण्याचा मार्ग शोधून काढण्याची संधी त्याला तेथें मिळण्यासारखी होती. गॅसोलिनवर चालणारें एंजिन जर तयार करायचें असेल तर त्याच्या कांहीं भागांत शक्तिनिर्मितीसाठीं गॅसोलिनचा स्फोट घडवून आणावा लागणार होता. आणि त्याकरितां त्याला ठिणगीचा हळूहळू पुरवठा होत जाईल अशी व्यवस्था करणें आवश्यक होतें.

||||| ५१
२५००

## नववें प्रकरण

'डायनामो' समजावून घेणें मोठें गंमतीचें होतें. त्याचा वरचा भाग म्हणजे एक मोठा 'इलेक्ट्रोमॅग्नेट. त्याचा आकार साधारणपणें घोड्याच्या नालासारखा किंवा उलट्या केलेल्या इंग्रजी यू (U) सारखा.


संध्याकाळच्या वेळांत हेन्री मायकेल फॅरेडेच्या प्रयोगांविषयीं वाचीत बसे. लोकचुंबकाभोंवतीं तारांचें वेटोळें फिरवलें कीं त्या तारांत विजेचा प्रवाह उत्पन्न होतो, हें एका तरुण शास्त्रज्ञाला कसें समजून आलें, ती एक मोठी मन गुंगवून टाकणारी हकीकत होती. मग हेन्रीनें टॉमस एडिसनच्या कामगिरीचा अभ्यास केला. जोंपर्यंत विजेच्या दिव्यांसाठीं लागणारी वीज उत्पन्न करणारी यंत्रसामुग्री आपण शोधून काढणार नाहीं तोंपर्यंत आपला विजेच्या दिव्याचा शोध फारसा उपयोगी ठरणार नाहीं, हें एडिसन समजून होता. फॅरेडेनें पहिला डायनामो शोधून काढला. त्यानंतर अनेक संशोधकांनीं डायनामो तयार केले होते परंतु ते सगळे निरुपयोगी होते. त्यांच्या डायनामोंतून तयार होणाऱ्या विजेच्या शक्तीपैकीं निम्म्यापेक्षां अधिक शक्तीचें उष्णतेंत रूपांतर होई आणि त्यामुळें डायनामो अतिशय तापून जाई व खर्चाच्या दृष्टीनेंहि तो चालविणें परवडत नसे. म्हणून एडिसननें आपल्या डायनामोमध्यें अशी सुधारणा केली कीं, उत्पन्न होणाऱ्या एकूण वीजशक्तीपैकीं दहाव्या भागापेक्षां कमीच शक्ति वाया जावी.

आपल्याला एक चांगला माणूस मिळालेला आहे हें एडिसन इलेक्ट्रिक कंपनीच्या संचालकांच्या लक्षांत आलें. यंत्रविभागाचा व्यवस्थापक म्हणून हेन्रीची नेमणूक झाली. या व्यवस्थापकाच्या जागेवर असतांना त्यानें आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या माणसांसंबंधीं पुष्कळ विचार केला. कामाच्या बारा तासांच्या पाळ्या चालविण्यांत काय शहाणपणा आहे, असा प्रश्न त्यानें उपस्थित केला. आपल्या इतर साधनसाहित्याप्रमाणेंच आपल्या नोकरींत असलेल्या माणसांनाहि त्यांच्या शक्तीच्या कमाल मर्यादेपर्यंत राबवून घेतलें पाहिजे असें कंपनीच्या मालकवर्गाला वाटत असे. कामगारांच्या नित्याच्या यादींत त्यावेळीं चाळीस माणसें होतीं आणि पांच बदलीसाठीं ठेवलेलीं होतीं. हीं बदली माणसें सदाच कामावर असत; कारण नेहमीं कोणी ना कोणी कामगार एकतर आजारी असत किंवा दमले-थकलेले तरी असत.

आपल्या हाताखालील या माणसांची अधिक चांगली काळजी घेणें हें एक सत्कार्य आहे, असें हेन्रीच्या मनांत आलें. त्यांना चांगला पगार देणें आणि त्यांच्या कामासंबंधींच्या परिस्थितींत सुधारणा करणें हा साधा सरळ यवहार आहे; आणि लोक जितक्या लवकर हें लक्षांत घेतील तितक्या लवकर आपल्याला नव्या जगाचा लाभ होईल. हें नवें जग प्रत्येकाच्याच दृष्टीनें इष्ट असेल, अधिक चांगलें असेल. हेन्रीची ही विचारसरणी होती.

परंतु हेन्रीच्या मनावर ठसलेली ही गोष्ट तो आपल्या वरिष्ठांच्या गळीं मात्र उतरवूं शकला नाहीं. माणसांच्या कामाचे तास कमी केले तर तीं अधिक चांगलें काम करतील हें आपलें म्हणणें त्याला वरिष्ठांना पटवितां आलें नाहीं. म्हणून तो आपला 'एडिसन' कारखान्यांत सकाळीं सहा ते संध्याकाळीं सहापर्यंत राबत राहिला आणि तेवढ्यापुरत्या त्याच्या व्यवस्थेविषयींच्या कल्पना त्याच्या स्वतःपुरत्याच राहिल्या.

संध्याकाळीं काम संपतांच तो घाईघाईनें घरीं परतायचा. घरीं मेजावर ऊन ऊन जेवण वाट पाहात असायचें. जेवणानंतर लगेच पुन्हा तो कामाला लागायचा. स्वयंपाकघरांतील मोरीच्या वरच्या बाजूला एक-सिलेंडरवालें एंजिन बसविलेलें होतें, त्याच्यावर हेन्री काम करूं लागायचा. हें सिलेंडर म्हणजे एका जुन्या बॉयलरची नळी होती. या प्रयोगांतूनच गॅसोलिन एंजिन पेटवायला तो शिकला. 'यावेळीं क्लारा त्याच्या शेजारीं उभी राही आणि 'लुब्रिकेटर'मध्यें चमच्या चमच्यानें गॅसोलीन टाकण्याचें काम करी. 'कारब्यूरेटर'ला या 'लुब्रिकेटर'मधूनच ज्वलन मिळे. ठराविक अंतरानें होणाऱ्या स्फोटांची ती मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहात राही. आणि हेन्रीच्या मुखावर हास्य झळकलें कीं तिला आपले सारे श्रम सफळ झाल्यासारखें वाटे.



एका रविवारीं दुपारीं गाडी आकाराला आली. क्लारा व हेन्री बोलत बसलीं होतीं. हेन्रीनें एकदम एक लहानसा कागदाचा तुकडा हातांत घेऊन त्यावर एक आकृति रेखाटली. "क्लारा, हा कागद अगदींच छोटा आहे ग जरा थोडा मोठा कागद हाताशीं असला तर पाहा ना," हेन्री म्हणाला.

क्लारानें एक पाठकोरा कागद त्याच्यापुढें केला. हेन्रीनें त्याच्या पाठीवर आपल्या छोटया मोटार-वाहनाचा आराखडा काढला. या वाहनांत त्याला लागणारी शक्ति निर्माण करण्याची अंतर्व्यवस्था राहणार होती तशीच त्यांत दोन उतारू घेऊन जाण्याचीहि सोय व्हावयाची होती.

अमेरिकेंत आणि इतर देशांतहि कांहीं लोक याच साध्यासाठीं धडपडत होते – बिनघोडयाची गाडी. परंतु इतर लोक या बाबतींत काय करीत होते तें समजायला मात्र हेन्रीला कांहीं मार्ग नव्हता. त्याचें या बाबतींतलें काम अगदीं एकाकी होतें आणि त्यामुळें प्रत्येक गोष्ट त्याला स्वतःलाच मोजून, मापून किंवा गणीत करून स्वतःच्या कल्पनेनें करावी लागत होती.

'यादवी युद्धां'त लेनाँ नांवाच्या एका फ्रेंच माणसानें सतत ठिणगी उत्पन्न करणाऱ्या एका 'स्पार्क प्लग'चा उपयोग करून पाहिला. परंतु

## दहावें प्रकरण

त्यामुळें अतिशय उष्णता वाढून तो निरुपयोगी ठरला. त्यानंतर ऑट्टो नांवाच्या एका जर्मन संशोधकानें आपलें चार फेऱ्यांच्या तत्त्वाचें गॅस-एंजिन बाजारांत आणलें. ईगल्स आयर्न वर्क्समध्यें या जातीच्या एका इंजिनाची दुरुस्ती करण्याची पाळी आली तेव्हां हेन्रीनें तें पाहिलें आणि त्याच्या तें चांगलेंच मनांत भरलें.

या बिनघोड्याच्या गाडीसाठीं विजेचा उपयोग करण्याचा प्रयत्न कांहीं संशोधकांनीं चालविला होता. मात्र या प्रयत्नांत पुष्कळच अडचणी होत्या. त्यासाठीं गाडीबरोबर वाहून न्याव्या लागणाऱ्या बॅटऱ्या अवजड होत होत्या आणि शिवाय त्या वारंवार भरूनहि घ्याव्या लागत असत–'चार्ज करून घ्याव्या लागत असत.

सारी रात्र रात्र आणि उजाडल्यानंतरहि कांहीं वेळपर्यंत हेन्री आपल्या छोट्या मोटार-वाहनासाठीं खपत असायचा. त्याचें काम अगदीं पद्धतशीर चालायचें. अगोदर आराखडा तयार व्हायचा आणि मग त्या आराखड्यांतील प्रत्येक बाबीची प्रगति करीत जायचें; आणि त्यानंतर मग प्रत्यक्ष बांधणीला सुरुवात व्हायची. ठिणगी पाडणें, एंजिनांतील वजन घटविणें आणि योग्य साधनसामुग्री एकत्र करणें हे त्याच्या अति महत्त्वाच्या प्रश्नांपैकीं कांहीं प्रश्न होते.'

लागणारा प्रत्येक भाग त्याला बनवून घ्यावा लागत असे आणि कित्येकदां त्यासाठीं आवश्यक असलेलें सामान मिळणेंहि दुरापास्त होऊन बसे.

अखेर इंजिन तयार झालें; परंतु 'स्टीअरिंग गीअर'बाबत तेवढा बांधा निर्माण झाला होता.

"हेन्री, ती शेजारची बॅक्स्टरबाई माहीत आहे ना तुम्हांला, तिनें आज सकाळीं मी कपडे वाळत घालीत असतांना माझें डोकें उठवलें." क्लारा हेन्रीला दिवा दाखवीत होती आणि त्याला लागणारीं हत्यारें त्याच्या हातीं देत होती. मध्यंतरींच तिनें आपली ही तक्रार त्याच्या कानीं घातली.

निरनिराळे भाग एकत्र जोडण्यांत हेन्री अगदीं गढून गेला होता. "काय बिघडलें बुवा बॅक्स्टरबाईचें ?" हेन्री तिच्याकडे न बघतांच म्हणाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22402 वि: चारिस
क्रमांक 608 नों दि: 5.3.41.1991.8


## दहावें प्रकरण

" तुमचीं हीं हत्यारें, इंजिनाची भग-भग आणि रात्रभर झोपडींत जळणारा दिवा यांची शेजाऱ्या-पाजाऱ्यांना कटकट वाटायला लागली आहे. त्यांतल्या कांहीं जणांची तर तुम्हांला चक्रम म्हणण्यापर्यंत मजल गेली आहे."

हेन्री हंसला. " जाऊं दे ग, एवढ्याशा गोष्टीनें कशाला आपलें डोकें उठवून घ्यावें ! "

" हेन्री, असली बाबतहि तुम्ही हंसण्यावारी कशी नेतां ? असल्या गोष्टी नुसत्या ऐकाव्या लागल्या एवढ्यावरहि बँक्स्टरबाईसंबंधीं माझें मत काय झालें तें मी तिला स्वच्छ सांगून टाकलें. मला फार वाटतें कीं, तुम्ही तें वाहन एकदाचें लवकर पुरें करा म्हणजे आपल्याला इतर चार जणांप्रमाणें राहातां येईल." डोळ्यांतून झरलेले अश्रू क्लारानें पुसून टाकले.

" अग, अग," हेन्रीनें हातांतलें काम तसेंच टाकून दिलें. आणि त्यानें क्लाराचा हात आपल्या हातीं घेतला. " रात्रभरच्या कामानें तूं अगदीं गळून गेली आहेस. हें वाहन तर जवळजवळ तयार झालेंच आहे."

" आपण आपलीं डीअरबोर्नला परत जाऊं या," क्लारा हुंदके देत म्हणाली.

" अरे ! अरे ! तूं तर अगदींच धीर सोडलास. " हेन्री तिला धीर देत म्हणाला, " चल, आपण घरांत जाऊं. थोडा गरम चहा करून देतों तुला. आणि हें इंजिनाबाबतचें सगळें विसरून जा बघूं आतां. "

दोघांनींहि चहा घेतला. क्लाराच्या चेहऱ्यावरचें हास्य पुन्हां फुललें. रात्रीची झोपडी बंद करून घेण्यासाठीं हेन्री बाहेर आला. कितीतरी विचारांची धांवपळ त्याच्या मनांत चालू होती. विनघोड्याची गाडी आपल्याला तयार करतां यावी म्हणून क्लारानें खरोखरीच मोठा स्वार्थत्याग चालविलेला आहे. क्लारासाठीं का होईना, पण त्याला डीअरबोर्नला राहायला जाणें आवश्यक नव्हतें का ? पण त्यांत पुष्कळच अडचणी होत्या; आणि गाडी तर लवकरच रस्त्यावरून धांवण्याइतकी तयार होत आली होती. नक्की काय करावें हें समजत नव्हतें. हेन्री गोंधळांत पडला होता.

त्यानें झोपडीच्या दरवाजाला कुलूप लावलें. मग त्यानें तें पुन्हा उघडलें. त्या स्टीअरिंगवर आणखी थोडीं मिनिटें खर्च केलीं असतीं तर गाडी

चांचणीसाठीं तयारहि झाली असती. तो विचार मनांत येतां क्षणींच त्याचें सारें लक्ष आणि सारा उत्साह 'स्टीअरिंग लीव्हर' वरच केंद्रित झालीं.

तासामागून तास गेले. त्याच्या हाताला कोणीतरी हळूच स्पर्श केला. "हेन्री, आपल्याला इथे राहून ही गाडी पुरी करायलाच हवी. डीअरबोर्नला परत जायची माझी ती वेड्यासारखीच कल्पना होती."

. पण क्लाराचें हें बोलणें ऐकायला हेन्री भानावर कुठे होता! "क्लारा, चला, झाली तयार गाडी–अगदीं चांचणीसाठीं तयार!" हेन्री इतका बेहोष झाला होता कीं त्याच्या आवाजाची फक्त कुजबूजच क्लाराच्या कानावर पडली.

"पण, हेन्री, आत्तां तर पहांटेचे तीन वाजले आहेत. आणि बाहेर पावसाचा धूमधडाका सुरू आहे." क्लाराचें म्हणणें खरेंच होतें. "तुम्हांला नाहीं वाटत, उद्यां सकाळपर्यंत थांबलेलं बरं होईल ?"

"पाऊस असूं दे नाहींतर आणखी कांहीं असूं दे–उद्यां सकाळपर्यंत थांबायचें–बापरे! आपल्याला नाहीं जमायचें इतका वेळ थांबणें!" झोंपडीचीं दारें सताड उघडून टाकीतच हेन्री म्हणाला.

अगदीं मिट्ट काळोख बाहेर पसरला होता आणि पावसानें जमिनीवर पडलेल्या बर्फाचा चिखल तयार होत होता. हेन्रीनें गाडीच्या पुढच्या बाजूला एक दिवा टांगला आणि गाडीवर बसवलेल्या बग्गीच्या बैठकीवर तो जाऊन बसला. सुरुवातीला स्पट्-स्पट्-पट्-पट्-पट् असा आवाज आला. क्लारानें श्वास रोखून धरला होता; एंजिनाची उडती पटपट हळूहळू बंद होऊन तें नेहमींसारखें सग्-असग्-सग्, सग्-असग्-सग् असा संथ आवाज करायला लागलें तेव्हांच तिला जरा हायसें वाटलें.

मग, जणूं काय एखादी जादूची कांडी फिरावी तशी ती मोटार गाडी खरोखरीच जागची हालली. स्टीअरिंग लीव्हरवरची आपली पकड हेन्रीनें पक्की केली आणि बॅक्स्टरबाईंच्या कुंपणाला धक्का न लागेल अशी खबरदारी घेऊन मोठ्या काळजीपूर्वक ती गाडी रस्त्यावर घेतली. तें चमत्कारिक दिसणारें साडगें रस्त्यावरून हडबडत जात होतें. मळलेल्या चाकोऱ्यांतून जातांना त्याची चाल सारखी नागमोडी होत होती.



क्लारानें लोकरीची शाल आपल्या अंगाभोंवतीं लपेटून घेतली होती आणि लांकडी फूटपाथवरून ती त्या मोटार गाडीच्या बरोबर राहण्यासाठीं धांवत होती. वरच्या मजल्यावरील कांहीं खिडक्यांतून दिवे दिसूं लागले आणि कांहीं अधिक चौकस व धडपड्या लोकांना तर एवढा हा कसला खडबडाट चालला आहे म्हणून पाहण्यासाठीं बाहेर आल्याशिवायहि राहवलें नाहीं.

रस्त्याच्या शेवटाला गेल्यावर हेन्रीनें गाडींतून बाहेर उडी मारली, तें साडगें उचलून तोंड फिरवून ठेवलें, आणि तें घराकडे पिटाळून पुन्हा त्या झोपडींत त्याला बंद करून टाकलें.

"तें चालतेंय !" तो विजयानें ओरडला. "आतां मला यांत सुधारणा करायला हवी. आणि तें व्यवहार्य बनवायला हवें. चिखलांतून, गर्दींतून तें चालवितां आलें पाहिजे, इतकेंच नव्हे तर तें डोंगर-पठारावरूनहि चढलें पाहिजे. तसेंच तें पाठीमागेंहि नेतां आलें पाहिजे."

सायकलचीं चाकें लावलेल्या आपल्या चार-चाकी वाहनांत पुष्कळच दोष आहेत हें हेन्रीच्या लक्षांत आलेलें होतें. तथापि, त्यानें दोन सिलेंडर्सचें एंजिन तयार केलें, ही मोठीच गोष्ट होती. त्याच्या या सिलेंडर्सना अडीच इंची छेद (बोअर) असून सहा इंची 'स्ट्रोक' होता. या एंजिनांत चार अश्वशक्ति निर्माण करण्याची व्यवस्था होती. या अश्व-शक्तीच्या दोन गती होत्या; उच्च (हाय) गती ताशीं २० मैलांची आणि निम्न (लो) ताशीं १० मैलांची. चालक-बैठकीच्या (ड्रायव्हिंग सीट) पुढील बाजूला असलेल्या एका चापाच्या तरफेनें हा वेग नियंत्रित केलेला होता. चालक–बैठकीखालील टाकींत तीन गॅलन गॅसोलीन भरून घेतां येत असे. हें गॅसोलीन एक लहानशी नळी आणि एक मिश्रक झडप यांनीं मोटारींत पोहोंचविलें जाई.

# दहावें प्रकरण

१८९३ हें साल फोर्डना फार महत्त्वाचें गेलें. या सालीं बिन-घोड्याच्या गाडीची पहिली यशस्वी चांचणी झाली आणि हेन्री फोर्डला एका पुत्ररत्नाचा लाभ झाला. एडसेल ब्रायंट फोर्ड जन्माला आला. हेन्रीनें आपल्या शाळेंतील जिगरदोस्ताचें–एडसेलचें–नांव त्याला ठेवलें होतें.

डेट्रॉइटच्या रस्त्यांवरून एक विक्षिप्त माणूस एक चमत्कारिक साडगें धावडवीत आहे, अशी बोलवा सर्वत्र पसरली. लोकांना तो एक उपद्रवच वाटायला लागला. रस्त्यावर त्यानें नुसता हलकल्लोळ माजवला. घोडीं बुजूं लागलीं. रहदारी तुंबूं लागली. लोक त्या चमत्कारिक साडग्याभोंवतीं गर्दी करूं लागले. जरा कुठे हेन्री आपली ही विलक्षण गाडी रस्त्यावर सोडून दूर गेला कीं कोणीतरी उपद्व्यापी लोकांनीं येऊन ती चालवायची खटपट केलीच म्हणून समजावें. म्हणून मग हेन्री आपल्यावरोबर एक सांखळी ठेवायला लागला. गाडी रस्त्यावर सोडून कुठे जायचें असलें म्हणजे रस्त्यावरच्या दिव्याच्या खांबाला या सांखळीनें गाडी जखडून ठेवायची आणि मग कुठे तें जायचें, असें त्याला करावें लागे.

तें लहानसें फुंफारणारें यंत्र बनवायला हेन्रीला चार वर्षें खर्चीं घालावीं लागलीं; आणि एवढें करून तें झालें होतें केवढें ?–असेल फार तर सायकलपेक्षां थोडेंसें मोठें. त्यानंतर दुसरी गॅसोलिन-मोटार गाडी तयार करण्याला सुरुवात करण्यापूर्वीं आणखीं दोन वर्षें गेलीं. या अवधींत त्या-विषयीं तो नुसता विचार करीत होता.

या वेळपर्यंत मोटारगाड्या बाजारांत आल्या नव्हत्या असें नाहीं. पण केवळ श्रीमंतांच्या खिशाला परवडतील अशा फार किंमती गाड्या तयार झाल्या होत्या व विक्रीलाहि आल्या होत्या. या गाड्यांचीं एंजिनें मोठीं थोरलीं व गुंतागुंतीचीं असल्यामुळें त्यांसाठीं मोटारीची बॉडीहि चांगली भरभक्कम असावी लागे. तरीपण विन्स्टन, हेनीस आणि ड्यूर्यी यांच्या मोटारी बाजारांत आलेल्या पाहून बहुतेक लोकांच्या दृष्टीनें तरुण हेन्री अद्यापि धुळींत सरपटत होता !



१८९६ मध्यें हेन्रीला तेहतिसावें वर्ष लागलें होतें. या वर्षी त्याच्या आयुष्यांतली एक मोठी घटना घडून आली.

"ए, तुला एक बातमी सांगायची आहे!" घाईघाईनें घरांत शिरतांनाच हेन्री मोठ्यानें म्हणाला.

क्लारा झोंपीं गेलेल्या छोट्या एडसेलला बिछान्यावर ठेवीत होती. ती चटकन शयन-घरांतून बाहेर आली आणि आपल्या मागें तिनें हळू हातांनीं दरवाजा लावून घेतला. "कसली? कसली बातमी?" क्लाराचे ओठ उत्सुकतेनें हालले.

"आमच्या कंपनींतून जीं चार माणसें न्यूयॉर्कला पाठवायचीं आहेत त्यांत माझी निवड झाली आहे. असोसिएशन ऑफ एडिसन इल्यूमिनेटिंग कंपनीजूचें वार्षिक संमेलन न्यूयॉर्क येथें मॅनहॅटन बीचवर व्हायचें आहे डेट्रॉइटच्या कंपनींतून या संमेलनाला हजर राहण्यासाठीं चार जणांची निवड झाली आहे आणि त्यांत मी एक आहें."

"खरंच मोठाच सन्मान म्हणायचा हा!" क्लारा उद्‌गारली.

"टॉमस एडिसनना मला तिथे भेटतां येईल असें वाटतें. ते यायचे आहेत तिथे." हेन्रीच्या बोलण्यांत मोठी आशा दिसत होती.

थोड्याच दिवसांनीं मॅनहॅटन बीचवरील ओरिएंटल हॉटेलच्या आगाशींत एकूणपन्नास वर्षें वयाच्या एडिसननें तरुण हेन्रीशीं हस्तांदोलन केलें. रात्रीं

मेजवानीच्या वेळीं संभाषणाचा मुख्य विषय विजेची गाडी हाच होता. संचालकांपैकीं एकानें हेन्रीकडे बोट दाखवीत एडिसनना उद्देशून म्हटलें " या तरुण गृहस्थांनीं गॅसवर चालणारी गाडी बनविली आहे. "

एडिसनना त्याचें मोठेंच कौतुक वाटलें. लगेच त्यांनीं हेन्रीला विचारलें कीं, ती कशी चालते ?

हेन्री वर्णन करून सांगूं लागला.

" इकडे जवळ या असे, म्हणजे मला चांगलें ऐकूं येईल, " एडिसन म्हणाले.

एडिसनच्या उजव्या हाताला बसलेल्या माणसानें जागा रिकामी केली आणि हेन्री तेथें जाऊन बसला.

मेजापाशीं बसलेल्या मंडळींना उद्देशून एडिसन बोलत होते. " मोठी अश्वशक्ति निर्माण करूं शकणाऱ्या व स्वयंपूर्ण अशा कोणत्याहि हलक्या वजनाच्या एंजिनाला यापुढें मोठा भविष्यकाळ आहे. देशांतील सारीं कामें कोणत्याहि एकाच प्रकारच्या शक्तीकडून करून घेतां येतील, अशी समजूत कोणी करून घेऊं नये. "


तो थोर विद्युद्वेत्ता हेन्रीला प्रश्नामागून प्रश्न विचारीत होता. हेन्री आपलीं उत्तरें समजावून सांगण्याकरितां आकृत्या काढून दाखवीत होता. एडिसनना विशेष औत्सुक्य होतें सिलेंडरमधील वायूचा-गॅसचा-स्फोट घडवून आणण्यासाठीं घर्षण-योजना काय केलेली आहे याबद्दल.

" बरोबर, अगदीं बरोबर. हें तुमचें काम असेंच चालू ठेवा, " मेजावर जोरानें मूठ आपटीत एडिसन म्हणाले. " संग्रह-बॅटरी ( स्टोअरेज बॅटरी ) मात्र फार अवजड झाली आहे. आणि वाफेच्या गाड्याहि कांहीं उपयोगाच्या नाहींत, कारण त्याला ज्वलनाची गरज पडते. तुमच्या या गाडीला ज्वलन नाहीं, धूर नाहीं कीं वाफहि पण नाहीं. तुमचीच कल्पना बरोबर आहे. तिचा पिच्छा सोडूं नका. "

हेन्रीच्या पाठीच्या मणक्यातून मंद शिरशिऱ्या सळसळल्या. जगांतल्या सर्वश्रेष्ठ संशोधकाची ती मेजावर आपटलेली मूठ हेन्रीचा उत्साह

चेतवायला पुरेशी होती. एक वलारा सोडली तर हेन्रीला असा उत्साहाचा शब्द कोणी कधींच ऐकवला नव्हता. आपण योग्य मार्गावरून जात आहोंत अशी त्याला आशा वाटत होती. आपल्या मार्गाविषयीं त्याला खात्री वाटत होती असा एक काळ होता; आणि त्यानंतर आश्चर्यचकित होऊन जाण्याचाहि काळ येऊन गेला होता. आतां मात्र त्याला कळून चुकलें होतें कीं, आपण बरोबरच आहेत.

हेन्री डेट्रॉइटला परतला तो आपल्या दुसऱ्या मोटारीचें काम हातीं घेण्याच्या कडव्या निर्धारानेंच. ही दुसरी गाडी पहिलीपेक्षां दोन फूट अधिक लांब होती. ती मागें पुढें दोन्ही बाजूंना जाऊं शकत असे. त्यानें या नव्या कामांत दट्ट्यांशीं झुंज घेतली, ठिणगींचें कालमान व प्रत्येक मिनिटाला होणारे फेरे यांबाबतींत प्रयोग करून पाहिले. एकाच शक्ति-ऊर्मीबरोबर ( पॉवर–इम्पल्स ) उभ्या दांड्यानें ( क्रँक शॅफ्ट ) एक फेरा पुरा केला. अशा दोन शक्ति-ऊर्मींची जर योग्य योजना केली तर त्यामुळें शक्ति तर वाढेलच पण त्याबरोबरच गाडीच्या चालींत सुरळीतपणाहि अधिक येईल, असें हेन्रीनें अनुमान काढलें. याशिवाय आणखीहि पुष्कळ गोष्टी विचारांत घ्यायला हव्यात, अशा होत्या. कारखाना सुरू करावयाचा म्हणजे त्यासाठीं त्याला पैसा उभारावयाला पाहिजे होता. लोकांना त्यांत कांहीं लक्ष देण्यासारखें वाटायला हवें होतें आणि त्यानंतर त्याच्या बिनघोड्याच्या गाडीवर त्यांचा विश्वास बसायला हवा होता; आणि मग त्या लोकांना ती गाडी विकत घ्यावयाला लावावयाचें होतें. त्याच्या कामाचा आत्ता कुठे श्रीगणेशा झाला होता.



गाडीची शिट्टी वाजली आणि कंडक्टर ओरडला, " चला सर्वजण गाडींत. " हेन्री फलाटावर उभा होता. आणि आपल्या घरांतील मंडळींना निरोप देत होता. क्लारा एडसेलला डिअरबोर्न येथें त्याच्या आजोळीं घेऊन चालली होती.

हेन्री त्यांच्या सोबतीला कांहीं दिवस मुकणार होता. ओक्या ओक्या घरांत त्याला परत यायला कांहीं बरें वाटत नव्हतें. तरीपण मुलाला कृषि-जीवनाची माहिती होणें चांगलेंच. क्लारा व एडसेल आपल्या सहलीचा बेत कितीतरी आठवडे अगोदर ठरविण्यांत रंगून जात. क्लारानें हेन्रीला आपल्या बरोबर येण्याविषयीं किती आग्रह केला; परंतु त्या दिवसांत हेन्रीला कामाच्या गर्दीतून डोकें काढायलाहि फुरसत मिळत नव्हती.

त्यानें आपल्या दुसऱ्या मोटारीसाठीं आठ वर्षे परिश्रम चालविले होते. अजूनहि तो एडिसन कंपनींतच नोकरीला होता. आतां तो चीफ

---

## अकरावें प्रकरण

---

इंजिनिअरच्या हुद्यावर चढला होता. आणि पगाराची रक्कमहि दरमहा १०० डॉलर्सवर जाण्याइतकी फुगली होती. सुरुवातीच्या ४५ डॉलर्सवरून झालेली. ही वाढ चांगलीच मोठी होती म्हणायची !

आपल्या फावल्या वेळांत तेथील मंडळींनीं आपल्या योजनेच्या आर्थिक बाबतींत लक्ष घालावें असा प्रयत्न हेन्रीनें सुरू केला. परंतु त्यांतून कांही हातीं लागेलसें दिसेना.—

" आले ! बडे संशोधक आले ! " कोणाच्या कचेरींत हेन्रीचें पाऊल पडलें कीं तिथून हेटाळणीचा स्वर ऐकूं यायचा.

एकानें म्हटलें, " हें यांत्रिक साडगें तयार करण्यासाठीं मी तुला एक वेळ पैसे दिले तरी तें विकत कोण घेणार, बाबा ? ही सोडत मला झेंपण्या-सारखी नाहीं. "

दुसरा एक म्हणाला, " घबाडच मिळालें म्हणायचें तुला फोर्ड. सोन्याची खाण ! आपण एक मोठी कंपनी उभारूं, तिचे शेअर्स विकूं आणि तीन चार हजार डॉलर्स देऊं शकणाऱ्यांसाठीं एक भली मोठी ' फिटॉं ' ( व्हिक्टोरिआसारखी दिसणारी स्वयंचलित गाडी ) पण बनवूं. प्रत्येक गाडीवर शेंकडा ३००–४०० तर कुठे गेले नाहींत. "

मोटार तयार करणें हा हेन्रीच्या कल्पनेपैकीं फक्त अर्धा भाग होता; आणि बाकीचा अर्धा भाग ती स्वस्त करणें हा होता. श्रीमन्त लोक मोठ्या ' फिटॉं ' विकत घेऊं शकतील. पण त्याच्या मनांत होतें तें आपल्यासारख्या सामान्य माणसांना सुद्धां ती कशी विकत घेतां येईल हें.

विन्स्टन, डूर्थी, ओल्ड्स, हेन्वीस आणि एपरसन यांचीं नांवें मोटारीचे कारखानदार म्हणून सर्वत्र ख्यातनाम झालीं होतीं. पीअरलेस, काडिलॅक, स्टुडबकर आणि मार्मन हे त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून चालले होते.

रेल्वे स्टेशनांतून हेन्री बाहेर पडला तेव्हां त्याच्या डोक्यांत विचार भिरभिरत होते ते, आपली योजना ऐकून घेणारीं पैसेवालीं माणसे शोधून काढण्याबाबत. त्याची छोटीशी गाडी रस्त्यावरून सरसरत गेली. क्लाराची अनुपस्थिती हेन्रीला सारखी जाणवत होती. कारण आपल्या साऱ्या कल्पना

तो प्रथम तिला सांगत असे. जिमच्या हॉटेलांत बसून थोडचा गप्पा माराव्या व कॉफीचा आस्वाद घेऊन पुढें निघावें असा विचार करून तो थांबला.

खिमानें भरलेल्या एका ताटामागें कॉफी जिम एकटाच उभा होता. हेन्रीला पाहून तो एकदम म्हणाला " नमस्कार ! हेन्री ! तुमच्या कारखान्यासाठीं पैसा मिळाल्याची बातमी घेऊन आलांत वाटतें ? "

हेन्रीनें नकारार्थी मान डोलावली आणि खुर्चीवर बसत म्हटलें, "अद्याप कांहीं नाहीं. पण ती कल्पना मी अजून सोडलेली मात्र नाहीं. हें पहा, माझ्यासारख्या केवळ पगारी काम करणाऱ्या व वजनदार मित्र नसलेल्या माणसाला थोडा वेळ हा लागणारच. "

" तुमचें म्हणणें कांहीं आपल्याला समजलें नाहीं बुवा. डेट्रिऑटमध्यें तुमच्यापेक्षां अधिक मेहनती आणि प्रामाणिकपणें काम करणारा कोणी आपण तर पाहिलेला नाहीं ! " कॉफी जिमनें म्हटलें.

" शाबास ! तुम्ही माझे मित्र आहांत. पण खरं सांगूं. जे लोक पैसा द्यायला तयार असतात त्यांना वाटतें मी त्यांच्या हातांतलें बाहुलें बनावें. आणि जर का मी त्यांना आपल्या नाकापुरतेंच न पाहतां माझ्या दृष्टीनें पाहायला लावूं शकलों तर कसें सगळें छान जमेल बघा. "

" आणि तुम्हांला तें डोकें आहेहि. तुम्ही नक्की असें कांहींतरी करालच. बरें पण, आतां काय घेणार ? कॉफी ? "

" माझ्या डोक्यांत कल्पना आहेत. पण ती नेहमींची अडचण आहेच ना ? पैसा ! " कॉफी ढवळीत हेन्री म्हणाला.

" सध्यां काय आहे डोक्यांत तुमच्या ? "

" हल्लीं सगळीकडे शर्यतीचें फार वेड निघालें आहे. सायकलच्या शर्यती, घोड्यांच्या शर्यती, कोठल्याहि का होईनात शर्यती ! या शर्यतीसाठीं जर खास मोटार तयार करतां आली आणि ती पुढील वर्षाच्या शर्यतींत जिंकूं शकली, तर सर्व लोकांचें तिच्याकडे लक्ष वेधलें जाईल. " आपली नवी मोटार शर्यतींत यशस्वी झाली आहे अशा नुसत्या कल्पनेनेंच हेन्रीचें हृदय आनंदित झालें.

" म्हणजे, शर्यतीसाठीं मोटार तयार करणार तुम्ही ? " कॉफी जिम

" नाहीं, नाहीं. तसें नाहीं. जर मी तयार केलेली मोटार शर्यतींत यशस्वी झाली तर लोकांना माझ्या गुणाची खात्री पटेल व मग मला पैसा मिळायला श्रम पडणार नाहींत. " हेन्री म्हणाला.

" तुम्हांला शर्यतीची मोटार तयार करतां येईल ? " कॉफी जिमनें विचारलें.

" नक्कीच ! जर पुरेसा वेळ आणि पैसा मिळाला तर. आणि ती नक्की जमेलहि. पण सामानासाठीं जरी पुरेसा पैसा उभा केला आणि मी जर फक्त संध्याकाळीं काम केलें तर मोटार तयार व्हायला कैक वर्षें लागतील. अजून मला माझी नोकरी सोडतां येत नाहीं. बायकामुलांचें पोट तर भरलें पाहिजे ! "

कॉफी जिम मान वेळावीत म्हणाला, " तुमच्या पत्नी फार सुस्वभावी आहेत; आणि मुलगाहि मोठा तल्लख आहे. तुमचा कारखाना पहायला मी आलों म्हणजे त्या मला चांगले केक्स् वगैरे द्यायला कधीं विसरत नाहींत. "

बराच वेळ स्तब्ध राहून नंतर तो म्हणाला, " मी जे पैसे बँकेंत ठेवतों ना त्याचा विचार करीत होतों मी. पैसा राखून ठेवायला मला ना बायको ना पोर. तुम्ही नोकरी सोडा आणि मोटार तयार करून शर्यतींत भाग घ्या बघूं ! मी देतों पैसा. "

" तुम्ही देणार ? " हेन्रीचा आपल्या कानावर विश्वासच बसेना. तो ताडकन् उठून उभा राहिला आणि कॉफी जिमशीं हस्तांदोलन करीत मोठ्या उत्साहानें म्हणाला, " मी आतां शर्यतीसाठीं अशी मोटार तयार करतों कीं ती तुमच्या डोळ्याचें पारणेंच फेडील ! "

दुसऱ्याच दिवशीं हेन्रीनें आपल्या नोकरीला रामराम ठोकला आणि तो शर्यतीसाठीं मोटार तयार करण्याच्या उद्योगाला लागला. दोन सिलेंडर्सचें एक यंत्र बसवून त्यानें सांगाडा तयार केला. थोड्याशा चांचणींतच ती मोटार वाऱ्यासारखी धांवणार ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली. ' बुलेट ' मोटारच्या हिंमतीवर संयुक्त संस्थानांच्या शर्यतींत विजेता ठरलेला अलेक्झांडर विन्टन याला त्यानें तावडतोब आव्हान दिलें. सबंध देशांत प्रसिद्ध असलेल्या डेट्रॉईट शहराजवळील ग्रॉस पॉइंट मैदानावर शर्यती घ्यावयाचें ठरलें.

मोटारची घडण, वजन आणि वाऱ्याचा प्रतिरोध इत्यादि प्रश्नांवर हेन्रीनें बराच काळ घालविला. आणि १९०२ च्या उन्हाळचांत म्हणजे सुमारें आठ महिन्यांनंतर हेन्रीची शर्यतीची मोटार खऱ्याखुऱ्या चांचणीसाठीं सज्ज झाली.

एके दिवशीं पहांटे चार वाजतांच कॉफी जिम हेन्रीबरोबर ड्राइव्हर-शेंजारच्या पुढील जागेवर येऊन बसला. आणि त्यांनीं गाडी बाहेर घेतली. कारण त्यावेळीं रस्त्यावर शुकशुकाट होता.

आपली हॅट मोठ्या कष्टानें सांवरीत कॉफी जिम म्हणाला, " गरुड विजेच्या गतीनें जातो आहे जसा कांहीं ! " त्याला श्वास घेणेंहि कठीण झालें होतें.

हेन्री हंसला. " प्रत्यक्ष शर्यतीच्या वेळच्या मानानें हा वेग कांहींच नाहीं. आपण खात्रीनें जिंकणार. "

ग्रॉस पाइंट शर्यतींनीं भलतेंच कुतूहल निर्माण केलें होतें. अगदीं तोबा गर्दी उडाली. वर्तमानपत्रांनीं डेट्रिऑटमधून आणि क्लिव्हलँडमधून आलेल्या प्रेक्षकांचें ' सुप्रतिष्ठित लोक ' म्हणून वर्णन केलें होतें. ते सर्व विजेत्या विन्टनला पाहायला जमले होते. आपल्या विक्रम करणाऱ्या मोटारींत तो मोठ्या ऐटीनें व आत्मविश्वासानें वाट पहात बसला होता. लोक त्याचा जयजयकार करीत होते.

नंतर हेन्रीनें आपली ओबडधोबड दिसणारी गाडी शर्यतीच्या मैदानावर आणून उभी केली. थोडचा व्यंजक आरोळ्या उठल्या. लोक त्या मजेशीर मोटारीची टिंगल उडवीत आणि ' हा डेट्रिऑटमधला हेन्री कोण ' म्हणून पृच्छा करीत होते.

कॉफी जिमनें हेन्रीचा खांदा थोपटीत म्हटलें, " त्या दिवशीं पहांटे चार वाजतां काय म्हणाला होतांत तें लक्षांत ठेवा ! " प्रसिद्ध सायकल-विजेता टॉम कूपर हा देखील ती मोठी शर्यत पहाण्यासाठी आला होता. विन्टनशी बोलण्यासाठीं म्हणून तो मैदानावरून चालत गेला. लोकांनीं मोठ्या आवाजानें त्याचाहि जयघोष केला.

"विन्टन, तुझ्याबरोबर सामना करायला फक्त ही हेन्रीची बाबागाडी ! म्हणजे जवळ जवळ कांहीं धडपड न करतांच जिंकणार म्हणायचास तूं !"

"अः, मला नाहीं वाटत ती भाग घेईल म्हणून." विन्टन जरा स्वतःवर खूष होऊन म्हणाला.

क्लारा आणि एडसेल प्रेक्षागारांत उभीं राहून शर्यती सुरू करण्यासाठीं पिस्तुलाचा बार केव्हां होतो याची वाट पाहात होतीं. क्लाराला दोन गोष्टींची संमिश्र काळजी वाटत होती. एक तर कदाचित हेन्रीचा पराभव होईल किंवा एखादे वेळीं ती हेन्रीला गमावून बसेल. या स्वयंचलित वाहनांची शर्यत म्हणजे तिला धोकेबाज खेळ वाटत होता.

विजेता विन्टन आपल्या गाडींत उभा राहिला. आपला जयघोष करणाऱ्या लोकांकडे पाहून त्यानें आपली हॅट हलविली व बुलेटमध्यें तो जाऊन बसला. हेन्री शांतपणें इशाऱ्याची वाट पहात थांबला होता. पिस्तुलाचा बार उडाला आणि शर्यतीला सुरुवात झाली.

'बुलेट' भरधांव निघाली व हेन्रीची मोटार तिच्यामागून धडपडत जाऊं लागली. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्याहि फेरींत विन्टन अगदीं सहजपणें आघाडीवर होता. क्लारानें आपल्या हातांच्या मुठी वळवल्या आणि ओठ चावले. एडसेल शक्य तितक्या मोठ्या आवाजानें ओरडला, "बाबा तिला आणखी गॅस द्या." कॉफी जिम मोठ्यानें म्हणाला, "फोर्ड हेन्री, पुढें व्हाणा."

ती छोटी गाडी हळूहळू वेग वाढवीत विन्टनच्या मोटारीच्या जवळ-जवळ येत होती. आतां दोघांतील अंतर अधिकाधिक कमी होऊं लागलें. आणि अखेर हेन्री तीरासारखा त्या 'विजेत्या'च्या एकदम पुढें घुसला.

हेन्री फोर्ड नांवाच्या माणसानें जगांतील स्वयंचलित वाहनांचा उच्चांक मोडून एक मैलाला १ मिनिट व १$\frac{१}{५}$ सेकंद इतका नवा उच्चांक गांठला आहे आणि संयुक्त संस्थानांच्या शर्यतींत अजिंक्यपद मिळविलें आहे. ही गोष्ट ऐकून प्रेक्षकांना आणि शर्यतीची बातमी ऐकण्यास उत्सुक असणाऱ्या जनतेला धक्काच बसला.

## ।।।।।। ६९  अकरावें प्रकरण

सुप्रसिद्ध सायकल-विजेता टॉम कूपर धांवतच हेन्रीपाशीं आला. हेन्री आपल्या छोटच्या गाडींत बसून तोंडावरची धूळ व घाम पुशीत होता.

"अभिनंदन, फोर्ड ! शर्यत पण शर्यत झाली." कूपरनें यंत्र काळजी-पूर्वक पहात विचारलें, "कोणाचें मशिन वापरलेंत ?"

"मी स्वत:च तयार केलें आहे तें" हेन्री.

"हा राक्षस तुम्ही तयार केलात ? मला तर आश्चर्यच वाटतें. मी एक दिवस येऊन पाहिलें तर ?" कूपर.

"अवश्य, केव्हांहि या. मी आपणाला आनंदानें दाखवीन." हेन्रीनें उत्तर दिलें.

नंतरचे कांहीं दिवस हेन्रीला वार्ताहरांनीं व छायाचित्रकारांनीं फुरसत मिळूं दिली नाहीं. वर्तमानपत्रांनीं पहिल्याच पानावर हेन्री, त्याची मोटार आणि छोटा कारखाना यांचीं चित्रें झळकवलीं. त्यांनीं त्याच्या कामगिरीचा आढावा घेतला. त्याच्या कंपनी स्थापना करण्याच्या इच्छेलाहि प्रसिद्धी दिली.

त्याच्याकडे येणाऱ्या मागण्यांखालीं हेन्री अगदीं बुडून गेला. पण तरी पूर्वींचीच कहाणी कायम होती. 'आम्ही सांगूं तशीच गाडी तयार केली पाहिजे.' ही त्यांतली प्रत्येकाची अट असायचीच. आणि तितकाच हेन्री देखील आपल्या कल्पनेला चिकटून असायचा. कारखानदारानें जनतेची अधिकाधिक सेवा करण्याच्या दृष्टीनें जास्तींत जास्त लोकांना परवडेल अशा गाड्यांचें उत्पादन करावें हा त्याचा आग्रह कायम होता.

टॉम कूपर त्या जुनाट कारखान्यांत अधूनमधून फेऱ्या टाकूं लागला. हेन्री आणि तो आतां अधिक जवळचे मित्र बनूं लागले. कांहीं वेळां पुढील आगाशींत बसून हेन्रीच्या अटीवरच पैसा कसा मिळवतां येईल याचा ते विचार करीत. "काय रे, आणखी एखादी शर्यत जिंकली तर ?" एका रात्रीं कूपरनें विचारलें. "पुन: ह्या हिंवाळ्यांत ग्रॉस पॉइंट मैदानावर शर्यती होतीलच."

"मी पुन्हां तीच मोटार वापरली तर लोकांना त्यांत नाविन्य किंवा आश्चर्य कांहींच वाटणार नाहीं. मग त्यापेक्षां असेंच म्हणेनास कीं नवीनच गाडी तयार करायला हवी म्हणून." हेन्री म्हणाला.

"नक्की तेंच म्हणतोंय मी. पण ह्याच्यापेक्षां अधिक चांगली गाडी तयार करतां येण्यासारखी आहे?" कूपरनें मोठ्या उत्साहानें विचारिलें.

"माझ्या डोक्यांत तर चार सिलेंडरची गाडी तयार करण्याचें आहे."

हें ऐकतांच कूपरनें आनंदानें उसळीच मारली. हेन्रीच्या खांद्यावर थोपटीत तो ओरडला. "चल सुरू कर एकदम. मी आहे तुझ्या पाठीशीं; मग काय वाटेल तें होवो."

असें आश्वासन आतांपावेतों हेन्रीला कधीं कोणाकडून मिळालेंच नव्हतें. त्यामुळें एकदम त्यावर त्याचा विश्वासहि बसेना.

"भल्या गृहस्था, एवढ्या आश्वासनाच्या जोरावर मी काय करूं शकणार नाहीं!" हेन्री कूपरच्या हाताशीं हात मिळवीत म्हणाला. "माझ्या डोक्यांत कल्पना तयार आहेच. ती मी आत्तांच कागदावर उतरवतों म्हणजे झालें." आतां पैशाचा प्रश्नच उरला नव्हता.

हेन्रीनें वेगवान अशा दोन मोटारी तयार केल्या. त्यांत चार सिलेंडर्स असून त्यांतून ऐंशी अश्वशक्तिइतकी शक्ति उत्पन्न करतां येई. स्वयंचलित वाहनांकडून एवढी शक्ति मिळवितां येईल अशी आतांपर्यंत कोणी कल्पना-देखील केली नव्हती. मोटारी तयार होऊन थडथडूं लागल्या तेव्हां तो चिमुकला कारखाना हादरूं लागला. 'एम्पायर स्टेट एक्सप्रेस' हें प्रसिद्ध एंजिन बसविलेल्या आपल्या मोटारला हेन्रीनें '९९९' हें नांव दिलें; आणि दुसरीला दिलें 'ॲरो' (बाण). आगामी हिंवाळ्यांतील ग्रॉस पॉइंटचे शर्यतींत '९९९' नेंच भाग घ्यावयाचें त्यानें ठरविलें. वाफेच्या शक्तिमान रेल्वे-इंजिनाप्रमाणेंच आपली ही शर्यती मोटार देखील प्रसिद्धीला येणार अशी आशा तो बाळगीत होता. त्या दोन्ही मोटारी रस्त्यावर आणल्या तेव्हां कूपर तर दिङ्मूढ होऊन गेला. त्याची घरघर तर किती दूरवर ऐकूं येई. हेन्रीनें त्या मोटारी जेव्हां रस्त्यावरून थोड्या फिरवून आणल्या तेव्हां तर कूपर जीव मुठींत धरूनच त्यांच्याकडे पहात होता.

"हा तर निम्माच वेग आहे. अजून मी तिला पूर्ण वेग दिला नाहीं. पण कशी काय वाटते ही '९९९'?" हेन्रीनें विचारलें. त्या वेळीं त्याच्या डोळ्यांतील चमक स्पष्टपणें दिसून येत होती.

"छान ! म्हणजे ही गाडी मी चालवणार असें समजलास कीं काय तूं ?" कूपर आपलें डोकें जोरजोरानें हालवीत म्हणाला—

"नाहीं रे बाबा ! कुवेराचें धन आणून ओतलेंस माझ्या पायाशीं तरी नाहीं आपण ह्या भानगडींत पडणार !"

"मग मी तरी कुठे चालवणार आहें !" हेन्रीनें उलट टोमणा मारला.

"ड्रायव्हरशिवाय गाडी—काय करायची घेऊन ती ? कोण माणूस आपला जीव फुकट धोक्यांत घालील ! तोहि असल्या गाडीवर ?" आपलीं बोटें चाळवीत कूपर वरळत होता. "एक वेगवेडा माहीत आहे मला. एक बेफाट सायकलस्वार ! त्याला आपण तार करूं. त्याचें नांव आहे 'बार्ने ओल्डफील्ड.' तो आपलाच माणूस आहे."

बार्ने ओल्डफील्ड हा एक धंदेवाईक सायकलस्वार होता. त्यानें आतांपर्यंत स्वयंचलित वाहन चालविलें नव्हतें. पण वेगाच्या वेडानें त्याच्या मनांत धाडस उभें केलें एवढें खरें.

शर्यतीच्या ठरलेल्या तारखेच्या अगोदरच बार्ने येऊन थडकला. त्या आठवड्याभरांत हेन्री आणि कूपर यांनीं बार्नेच्या डोक्यांत त्या मोटारच्या यंत्राची आणि ती चालविण्याची माहिती अगदीं ठांसून भरली. बार्नेनेंहि आपल्याकडून मोटारीसंबंधीं सारी माहिती समजावून घेतली. तिचें तें भलें भक्कम सुकाणूं कसें ताब्यांत ठेवायचें तें तो शिकला. तसेंच वळणें सुरक्षितपणें कशीं घ्यावयाचीं तेंहि त्यानें माहीत करून घेतलें. शर्यतीच्या आदल्या दिवशीं त्यानें ती मोटार शर्यतीच्या मैदानावर आणली व कमी वेगांतच चालवून पाहिली.

बार्ने आपल्या सायकलीइतकाच त्या '९९९' ला आतां सरावला. तो म्हणाला, "आतां मी हिला अगदीं बरोबर चालवतों बघा. उद्यां हिच्या सर्व गुणांचा पुरेपुर उपयोग केल्याशिवाय मी राहात नाहीं."

ग्रॉस पॉइंट मैदानावर तीन मैलांचा मार्ग तयार करण्यांत आला होता. पण त्याच्या वळणावर कठडे मात्र उभारलेले नव्हतें. शर्यतींत भाग घेण्यासाठीं म्हणून सहा मोटारी आल्या होत्या. ओल्डफील्ड पुतळ्याप्रमाणें स्तब्ध होता.

"मेलों तरी बेहत्तर, पण ही मोटार स्कुटुकू जाणार नाहीं एवढें निश्चित !" हेन्री '९९९' ला हँडल् मारीत होता, तेव्हांच बार्नेनें कूपरला आपला निश्चय बोलून दाखविला.


ते भरधांव सुटले. ओल्डफील्ड बाहेरून एखाद्या भोपळ्यासारखा शांत दिसत होता. पण आंत जिवंत ज्वालामुखीप्रमाणें धुमसत होता. '९९९'-नें वेगाची कमाल मर्यादा गांठली; आणि ज्वाळा हवेंत उफाळलेल्या दिसूं लागल्या.

ओल्डफील्डनें कठडा नसलेलें वळण पार केलें, पण मशीन बंद करण्याच्या भानगडींत तो पडला नाहीं. या साहसांत आपला लोळागोळा होईल अशी धास्ती त्याच्या मनांत असलीच तरी अखेरच्या दौडीची मस्ती तो पुरेपुर अनुभवीत होता. '९९९' नें शर्यत जिंकली तेव्हां ती मागच्या मोटारीपासून चांगली अर्धा मैल तरी पुढें होतीच. आतां बार्ने ओल्डफील्ड आणि '९९९' ह्यांचीच चर्चा गांवागांवांतून चालू होती.

आणखी थोड्या दिवसांत ओल्डफील्डनें '९९९' सह न्यूयॉर्क संस्थानांतील यॉंकर गांठलें आणि स्वतःच्या व हेन्रीच्या कीर्तीचा झेंडा उंच फडकविला. आपल्या या नव्या उपक्रमानें तो तर अगदीं भारून गेला होता. सायकल-स्पर्धा म्हणजे त्याला आतां एक खेळणें वाटूं लागलें होतें.

आपल्या स्पर्धक गाडीनें उच्चांक केला याचा आनंद हेन्रीला झालाच. पण खरें म्हणजे मोटारींच्या शर्यतीबाबत त्याला अधिक उत्साह होता म्हणून नव्हे; तर आपल्या योजना सफल करण्यासाठीं एक साधन गवसलें ह्याचा त्याला खरा आनंद होत होता. ह्या दृष्टीनें '९९९' चा बोलबोला चालूं आहे तोंपर्यंत काय तें पदरांत पाडून घेतलें पाहिजे हेंहि तो ओळखून होता.

बिनघोड्याच्या वाहनांच्या भवितव्याबाबत अलेक्झांडर मॉलकाम्सन् यानें जरा विशेष उत्साहानें चवकशी केल्याचें त्याच्या लक्षांत आलें. मॉलकाम्सन् हा एक कोळशाचा व्यापारी होता. एडिसन कंपनींत कामाला असतांना हेन्री त्याचेकडून कोळसा खरेदी करीत असे. मॉलकाम्सन् त्याच्या कारखान्यांत येऊन गेलेला होता; इतकेंच नव्हे तर त्याच्या मोटारींतून त्यानें चक्करहि मारली होती. उद्यां सकाळींच मॉलकम्सन्ची भेट घ्यायची असें हेन्रीनें ठरवून टाकलें.



"नमस्कार अलेक्स," मॉलकाम्सनच्या कचेरींत शिरतां शिरतां हेन्री म्हणाला.

"काय विचार आहे, हेन्री" जवळच्याच उंच टेबलाजवळ वसलेल्या जेम्स कॉझेन्स नांवाच्या कारकुनाशीं हेन्रीचें थोडेंसें बोलणें झाल्यावर मॉलकॉम्सननें हेन्रीला विचारलें.

"अलेक्स, एकदां तुम्ही म्हणाला होतांत कीं, लोकांनीं स्वयंचलित वाहनांच्या बाबतींत विचार करावा असा काळ येतोय म्हणून. मग मोटार-धंद्यांतील आद्य कारखानदार व्हावयाची संधी मिळाली तर तें तुम्हांला आवडेल का ?"

आपल्या तोंडांतील सिगरेट तोंडातल्या तोंडांत दाबून दुसऱ्या बाजूला सरकवीत मॉलकॉम्सन् म्हणाला, "पण तुम्ही तर कांहीं लोकांना एकत्र आणून '९९९' बाबत विचार करायलाहि लावला आहे म्हणे."

मोटार-धंद्यांत पैसे गुंतवण्याचा विचार त्यानें वास्तविक पूर्वींच केला होता. परंतु हेन्री आपल्या कितपत उपयोगाचा आहे याचा त्याला अंदाज आलेला नव्हता. तरीपण शेवटीं त्यानें विचारलें, "बरें पण तुमचें काय म्हणणें आहे तें तर समजूं द्या."

---

## बारावें प्रकरण

---

जेम्स कॉझेन्स आपल्या टेबलापाशीं बसून एखाद्या सशाप्रमाणें कान त्वकारून हें सारें संभाषण ऐकत होता.

कमी किं "त्जनांत हलकी पण चालायला उत्तम अशी सुमारें हजार डॉलरपेक्षां नांवानें हा मॅकची मोटार आपण बाजारांत आणूं या. 'फोर्ड' कंपनीच्या ारणा करून हार व्हावा असें माझ्या मनांत आहे."

सुव्यवस्थापक व प्रॲव्हेन्यूवर एक सुतार-कामाचा कारखाना आहे. त्यांतच आहे. यासाठीं आपल्याला मोटारींचा कारखाना उभा करतां येईल. मुख्य "धंानगर्डीख यंत्रज्ञ म्हणून तेथें स्वत: काम करण्याची माझी तयारी ास्त०० डालर्स मासिक वेतन मला मिळावें."

ा तुरपुर अनुभ मोटारीपासून ात माझा भाग काय राहील?" मॉलकॉम्सननें विचारलें.

आणि '११वर हेन्रीचें उत्तर तयारच होतें. "कंपनीच्या एक लाख डॉलर्सपैकीं ५१ टक्के भांडवलांत आपण दोघे सारखे भागीदार राहूं. साडेपंचवीस टक्के तुमच्या मालकीचे आणि साडेपंचवीस माझ्या." हेन्रीला माहीत होतें कीं मॉलकॉम्सन पैसा उभा करूं शकेल. "कंपनीच्या ३००० डॉलर्सपर्यंतच्या सर्व हुंड्यांची हमी तुमची."

बराच वेळपावेतों मॉलकॉम्सन कांहींच बोलला नाहीं. सबंध आयुष्यभर एखादें घबाड मिळवण्याची संधी तो पाहात होता. तसा त्याचा कोळशाचा व्यापार उत्तम चालला होता. तरी पण त्याची नजर मोठ्या धंद्यावर होती. आणि अशा प्रकारची संधी आयती चालून येत आहे हें त्याला खरेंहि वाटेना.

"हेन्री, करा तुमच्या योजनेप्रमाणें कामाला सुरुवात. मी तुमच्या पाठीशीं आहें."

मॉलकॉम्सननें हें आश्वासन दिलें. आणि नंतर आपला कारकून जेम्स कॉझेन्स याच्याकडे वळून त्यानें विचारलें, "तुझ्याजवळ धंद्यांत गुंतवण्यासारखा कांहीं पैसा आहे ना? मी हेन्रींना पुष्कळ दिवसांपासून ओळखतों. वास्तविक ते एडिसन कंपनींत राहाते तर तिथे ते सर्वांत वरच्या जागेपर्यंत जाऊन पोहोंचले असतें हेंहि मला माहीत आहे. आणि त्यांच्या डोक्यांत

ह्यापेक्षां विशेष असें कांहीं नसतें तर त्यांनीं ती संधी कधींच दवडली नसती, असेंच मला वाटतें."

कॉझेन्सला हेंच हवें होतें. कमी खर्चिक मोटार तयार करण्यासंबंधीं आपली कल्पना त्यानें त्यापूर्वीं हेन्रीला अनेक वेळां बोलून दाखविली होती. हेन्रीचा प्रामाणिकपणा आणि त्याचें यंत्रांच्या बाबतींतलें तरल ज्ञान ह्याबद्दल कॉझेन्सला खात्री होती.

त्यामुळें तो घाईघाईनें उत्तरला, "हो तर, माझ्याजवळ बँकेंत माझे ९०० डॉलर्स आहेत आणि १५०० डॉलर्सचे रोखे आहेत. ही रक्कम गुंतवूं शकतों मी. तसेंच आणखी १००डॉलर्स मिळावयास कांहीं हरकत नाहीं. माझी एक बहीण शाळेंत शिक्षिका आहे, तिचेच आहेत ते. तेहि मिळूं शकतील."

"कॉझेन्स, या उद्योगांत तूं एवढा उत्साह दाखवीत असलास तर मग छानच झालें. हेन्रीची गरज भागविण्यासाठीं जे पैसे मी देणार आहें ते मी तुझ्यापाशींच देतों म्हणजे झालें. तें तूं आपल्या नांवावर ठेवून हेन्रीच्या खर्चाची तरतूद करीत जा." मॉलकॉम्सननें सांगितलें.

"असें कां बरें?" हेन्री आणि कॉझेन्स ह्या दोघांनींहि एकदमच विचारलें.

"त्याचें असें आहे. मोटार-धंद्यासारख्या बिनभरंवशाच्या धंद्यांत मी पैसा गुंतवितों आहें, असें जर बाहेर कळलें तर माझी बँकेंतली पत घसरण्याचा संभव आहे."

मोटार-धंदा हा भांडवल गुंतवण्याच्या दृष्टीनें लोकांना भरंवशाचा वाटत नाहीं ही गोष्ट हेन्रीच्याहि ध्यानांत येऊन चुकली होती.

"छान!" हेन्री हंसत हंसत म्हणाला. "अहो, आत्तांच ऑर्व्हिल आणि विल्बर राइटबद्दल कळलें मला. मग ते तर माझ्यापेक्षां अधिक वेडे म्हटले पाहिजेत. कारण हवेपेक्षां जड असलेल्या यंत्राला आकाशांत एखाद्या पक्ष्याप्रमाणें घिरट्या घालायला लावायचा त्यांचा प्रयत्न चालू आहे."

"मग समजा, तशा योजनेमध्यें जर कोणी पैसा गुंतवूं लागला तर?" आपलें डोकें हालवीत मॉलकॉम्सन म्हणाला.

हेन्री आर्जवपूर्वक बोलूं लागला. "आमच्या ह्या योजनेबद्दल तुम्ही भलताच ग्रह करून घेऊं नका. माझी अशी खात्री आहे कीं अमेरिकन लोकांना मोटार ही एक गरजेची गोष्ट वाटेल. आणि बहुजनसमाजाच्या गरजा पुरवील अशी मोटार तयार करूं शकणारा मीच आहें. मी अशी बग्गी तयार करतों कीं जी घोड्याशिवाय चालेल. आणि ती बग्गी देखील इतकी स्वस्तांत पडेल कीं घोडा व बग्गी ठेवणें ज्याला परवडत नाहीं तो देखील ही विकत घेऊं शकेल."

त्या कोळशाच्या कचेरीतून बाहेर पडतांना हेन्रीचें हृदय एखाद्या पिसाप्रमाणें हलकें झालें होतें. अमेरिकेसाठीं कमी खर्चाची मोटार ही त्याची कल्पना होती. तो ती प्रत्यक्षांत आणीत होता. ही नवीन बातमी क्लाराला कधीं जाऊन सांगेन असें त्याला होऊन गेलें.

आपली कल्पना प्रत्यक्षांत उतरविण्याबाबत आतां तो लक्ष घालीत होता. धंदा व्यवस्थित सुरू होण्यापूर्वी सुरुवातीच्या काळांत थोडी मंदी अपरिहार्यच होती. अजून कितीतरी गोष्टी करावयाच्या बाकी होत्या. हेन्रीच्या आराखड्याप्रमाणें एंजिनें, चाकें, टायर्स व इतर भाग निरनिराळ्या कारखानदारांकडून विकत घेतले जात व मग ते मॅकस्ट्रीटवरील कारखान्यांत जोडले जात. निरनिराळे भाग बाहेरून विकत घेण्याऐवजीं ते तयार करायला लागणारा पैसा आपल्याजवळ असावा असें हेन्रीला वाटे; कारण एकतर त्यामुळें खर्च कमी झाला असता व मालाचें उत्पादनहि सारख्या दर्जाचें मिळालें असतें. पण सध्यां तरी तें शक्य नव्हतें. कारण अद्यापि त्याला थोडा काळ होता.

हेन्री खूप काम करी. त्याच्या ह्या नव्या मोटारीला दोन सिलेंडर्स राहाणार होतीं. त्यांतून आठ अश्वशक्ती निर्माण व्हावयाची होती. तिचा वेग ताशीं तीस मैल अपेक्षित होता. डेट्रिऑटमध्यें डॉज बंधु एक यंत्राचा कारखाना चालवीत असत. त्यांना भेटण्यासाठीं म्हणून तो एक दिवस तेथें गेला. दररोज दहा मोटारी ह्याप्रमाणें ६५० मोटारींचे सुटे भाग त्याला त्यांच्याकडून तयार करून हवे होते. डॉज बंधूंना ह्या कामाच्या मोबदल्यांत कंपनीच्या शेअर्सपैकीं ५० शेअर्स द्यावयाला तो तयार होता. वास्तविक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 22402 वि: ...
क्रमांक 608 नों. दिं. ...

बारावें प्रकरण

आधीच सुस्थितींत चालू असणाऱ्या कंपन्यांकडून त्यांना यापूर्वींच पुष्कळ विचारणा झाल्या होत्या. परंतु ओल्डस् व इतर कंपन्या तयार करीत असलेल्या महाग मोटारींपेक्षां हेन्रीच्या छोट्या मोटारींत कांहींतरी वैशिष्ट्य आहे हे त्यांनीं हेरलें होतें.

अखेर १६ जून १९०३ रोजीं सर्व आवश्यक विधी रीतसर पार पडून तेरा भागीदारांची एक कंपनी प्रस्थापित झाली. मोटारीचे भाग जोडण्यासाठीं म्हणून थोडीशींच माणसें कामावर लावायचीं होतीं. एक यंत्रज्ञ, एक आलेखक व एक वरकामासाठीं माणूस. बस्स ! एवढींच माणसें पुरेशीं होतीं. नेहमींच्या दरापेक्षां म्हणजे ताशीं २५ सेंटपेक्षां त्यांचें वेतनहि कमी होतें. हीं माणसें हेन्रीबरोबर रात्रीपर्यंत सारखें काम करीत. घड्याळाकडे तर त्यांचें लक्षहि नसे. तयार झालेल्या मालामुळें हेन्रीचें मात्र समाधान होत नसे. त्यांत पुष्कळ सुधारणा अजून देखील करतां येण्यासारखी आहे असें त्याला वाटत होतें.

जेम्स कॉझेन्स फोर्ड कंपनीचा चिटणीस व खजिनदार म्हणून काम पाही. ऑगस्टच्या मध्यापर्यंत आठ ते दहा मोटारी जोडून तयार झाल्या पण त्यांतली एकहि बाजारांत पाठविली गेली नव्हती. परंतु तयार मोटारी विक्रीसाठीं रवाना करून पैसे हातीं येणें आवश्यक आहे असें कॉझेन्सनें हेन्रीला बजावलें.

" आपल्याजवळ खेळतें भांडवल अगदींच थोडें आहे व तेंहि घटत चाललेलें आहे " अशी सूचना कॉझेन्सनें हेन्रीला दिली.

हेन्रीच्या मनांत नव्हतें तरीपण त्यानें त्या मोटारी व्यवस्थितपणें मालगाडीवर नेऊन चढविल्या आणि मिनॉपोलिस, सेंटपॉल व इंडियानापोलिस यांकडे रवाना करून दिल्या.

कांहीं थोडीं वर्तमानपत्रें व व्यापारी औद्योगिक नियतकालिकें यांतून ' फोर्ड ' मोटारींविषयीं वर्णन देणारे लेख प्रसिद्ध झाले. त्यांत म्हटलें होतें कीं, हेन्री फोर्ड तयार करीत असलेल्या या मोटारी नित्याच्या धकाधकीला टिकतील अशाच मुद्दाम बनविलेल्या आहेत. तिची किंमतहि बेताचें उत्पन्न

असलेल्या माणसांच्या आवाक्यांत येण्याइतकी कमी ठेवलेली आहे. आणि मोटारीची रचना इतकी साधी आहे कीं यंत्रज्ञ नसलेला सामान्य मनुष्यदेखील ती चालवूं शकेल.

वर्षभरांतच या मोटारीला भरपूर मागण्या आल्या व कॉझेन्सच्या जमाखर्चाच्या वह्या ३६,९५७.६४ डॉलर्स निव्वळ नफा दाखवूं लागल्या. बाल्यावस्थेंतील फोर्ड कंपनीची ती प्रगती अगदींच कांहीं वाईट नव्हती. देशांत सर्व लोक ह्या मोटार-धंद्यांतील पराक्रमाबद्दल बोलत होते.

" तुम्ही नवीन ' फोर्ड ' गाडी पाहिली का ? " हा प्रश्न अमेरिकेच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत ऐकूं येत होता.

' फोर्ड 'ची किंमत ८५० डॉलर्स होती. शिवाय दिवे, भोंगा व दर्शनी कांचा ह्यासाठीं वेगळी किंमत द्यावी लागत असे. इतर मोटारी मात्र ८००० डॉलर्सच्याखालीं मिळत नव्हत्या. त्यामुळें बँकेत बऱ्यापैकीं शिल्लक असलेल्या लोकांना १००० डॉलर्स किंमत ही खरोखर एक आकर्षक बाब होती.

" तुम्हांला असें वाटतें का कीं, लोक आपले चांगले चांगले घोडे आणि सायकली विकून टाकून या खडखडाट करणाऱ्या व जनावरांना बुजगावणाऱ्या वाहनाच्या मागें लागतील ? " असाहि दुसरा प्रश्न विचारला जाई. कोठेंहि लोक एकत्र जमले कीं आपसांत हा प्रश्न विचारीत. रस्त्याच्या कोपऱ्यावरहि याची चर्चा चालतांना दिसे.

ज्या कांहीं थोडया लोकांना मोटार म्हणजे एक मौज वाटत होती त्यांचा काळ मजेंत जाऊं लागला. रावसाहेब आपला. उन्हाचा चष्मा डोळ्यावर चढवीत, धुळीपासून संरक्षण व्हावें म्हणून रुमाल तोंडावर घेत आणि झेंपावत जाणाऱ्या त्या विचित्र वाहनाला वेग देत. बाईसाहेब आपल्या भल्या मोठ्या गवती टोपीवर बुरखा चढवीत, तसेंच रुमाल बांधीत आणि पतीच्या शेजारीं ताठ बसत. मग खेडयांतील ओबडधोबड रस्त्यावरून ताशीं वीस मैलाच्या वेगानें तीं एकाद्या कल्पनावारूप्रमाणें उडत जात. आणि मुलें एकाद्या लहान तोंडाच्या खुराडयामधील पिलांप्रमाणें मोटारच्या मागील भागांत हिसके खात बसून राहात.

ही मंडळी आपल्याबरोबर पुष्कळशा आंतरनळ्या, जादा केसिंग्ज, पुष्कळसे स्पार्क प्लग्स आणि एखाद्या वर्कशॉपला पुरतील इतकीं हत्यारे घेत. एंजिन सुरू करणें ही कांहीं नेहमींची साधी गोष्ट नसे. कांहीं कांहीं वेळां हँडल फिरव फिरव फिरवावें आणि त्याचा उपयोग कांहीं होऊं नये असेंहि घडे. एखादे वेळीं अशा चिकाटीच्या प्रयत्नाचा परिणाम फार तर हात दुखून येण्यांत किंवा फार तर धुराचा लोट बाहेर पडण्यांत व्हायचा, इतकेंच ! जर का रस्त्यांत टेकडी वगैरे आली तर मग चांगलीच कंबक्ती ! गिअर्स सट्कन मोटारवर चढविण्यासाठीं फिरून प्रयत्न करून पाहायाचा धडा अनेकदां गिरवावा लागे. तशांत पावसानें प्रसाद दिला म्हणजे विचारायलाच नको ! मग हे गुलहौशी मोटारवाले कोणता पडदा कोठें आहे हे कोडें सोडविण्यासाठीं मोटारबाहेर यायचे आणि तें सोडवतां सोडवतां बिचारे पावसाच्या माऱ्याखालीं निथळून निघायचे. कारण त्या पडद्यांचे आकार आणि मापें ही वेगवेगळीं असायचीं.

अमेरिकन सरकारनें सार्वजनिक-सडका चौकशी मंडळाच्या अहवालानंतर लगेच सार्वजनिक सडका खातें स्थापना केल्याचें ऐकून हेन्रीला मोठें बरें वाटलें. या नव्या विभागानें देशांतील प्रमुख सडकांची गणना करण्याचा हुकूम दिला. चांगल्या सडकांकडे राष्ट्राचें लक्ष आतां खरोखरीच वेधलें. या नव्या जमान्यामुळें घोडे व सायकली यांची जागा घेण्याला आपल्या मोटारीला वाव मिळेल असें हेन्रीच्या लक्षांत आलें. रस्ता तयार करण्यासाठीं म्हणून कॉंक्रीटवर प्रयोग करण्यांत आला. १९०४ मध्यें सुमारें एक मैलाचा कॉंक्रीटचा रस्ता ठिकठिकाणच्या ४-५ गांवांतून करून पाहण्यांत आला. हेन्रीला माहीत होतें कीं, सडका सुधारल्या तर लोकांचें मोटारीचें आकर्षण वाढेल.

पहिल्या वर्षीं तयार झालेल्या फोर्ड मोटारींची संख्या १७०८ होती. त्या विकत घेणारे लोकहि मोठे साहसी म्हटले पाहिजेत. कारण ही लहरी मोटार एखाद्या जागीं मध्येंच अडून पडली तर तिच्या खालीं सरपटत जाऊन तिची दुरुस्ती करायची तयारी या वीरांना ठेवावी लागे.



एवढ्या प्रवासानंतर फोर्ड मोटार कंपनींतून मोटारी तर बाहेर पडूं लागल्या. हेन्रीचें वय यावेळीं चाळीस वर्षांचें होतें. मॅके स्ट्रीटवरील आपल्या छोट्या कारखान्याचा श्रीगणेशा चांगला झाल्याचें पाहून त्याला आनंद झाला. परंतु, जेव्हां का हवेंत गारठा येऊं लागला, तेव्हां फोर्ड मोटारींचा खपहि गारठूं लागला. इतका कीं जेव्हां प्रत्यक्ष थंडीचे दिवस सुरूं झाले तेव्हां तर विक्रीहि जवळ जवळ थंडावलीच. खराब आणि हिमाच्छादित रस्त्यांवरून मोटारी रेटीत नेण्यांत कोणाला मौज वाटणार? मोटार मालक एवढी दगदग सोसण्यास तयार नव्हते. गाड्यांना बाजूला जें छोटे पडदे लावलेले असत त्यांचा उपयोग फारसा न होऊन आंतील माणसांना थंडीनें कुडकुडावें लागे; रेडियेटरमधील पाणीहि सारखें गोठायचें. त्यामुळें ज्यांच्यापाशीं

## तेरावें प्रकरण

स्वतःच्या मोटारगाड्या होत्या ते आपले थंडीच्या दिवसांत गाड्या निवण्यांवर ( जॅक्स ) ठेवून देऊन वसंत ऋतूची वाट पहात राहणेंच पसंत करीत. परंतु , कारखान्यांतलें काम मात्र या काळांतहि चालू ठेवायलाच हवें होतें. एरव्हीं वसंत ऋतूंत विकायचें काय ?

वसंत ऋतूंतील विक्रीसाठीं जी नवीन धर्तीची गाडी काढली जाणार होती तिला बाजूनें जे पडदे होते ते आंतल्या अंगानें गुंडाळून घेऊन वरती पट्टयानें अडकवून ठेवण्याची सोय करण्यांत येणार होती. वरचें छप्परहि काढतें घालतें ठेवायची व्यवस्था केलेली होती. त्यामुळें हवा चांगली असेल तेव्हां ' टप ' ( छप्पर ) खालीं ओढून घेऊन मजेंत प्रवास करण्याची सोय होणार होती.

परंतु, हेन्रीला हें पक्कें कळून चुकलें होतें कीं ' फोर्ड ' चें नांव मध्यंतरीच्या काळांत कांहींहि करून लोकांच्या समोर ठेवायलाच पाहिजे होतें. मोटारच्या शर्यतींचें आकर्षण फार मोठें असल्यानें प्रसिद्धीच्या दृष्टीनें त्यांचा उपयोग पुन्हां करून घेण्यासारखा होता. मात्र आतां पवित्रा थोडा बदलणें आवश्यक होतें. त्यासाठीं, आपण आपली ' ॲरो ' ( तीर ) गाडी पुन्हां बांधली आणि ती सेंट क्लारा सरोवराच्या गोठलेल्या ' मैदानावर ' दौडवून नवीन उच्चांक प्रस्थापित केला तर कसें ? हा विचार हेन्रीच्या डोक्यांत भिरभिरूं लागला.

आणि आपली ही कल्पना त्यानें जेव्हां क्लाराला बोलून दाखविली तेव्हां तिला ' चर्रच ' झालें !

" केवढा धोका आहे हेन्री, या जोखमेंत ! " ती आर्जवानें पुढें म्हणाली, " पण हट्टच असला तुझा ' ॲरो ' गाडी बर्फावरून चालवून दाखवून नवीन उच्चांक गांठण्याचा, तर मग असं कां नाहीं करीत तूं ? ओल्डफील्डना पत्र लिहून बोलावून घे नी त्यांनाच गाडी चालवूं दे. "

हेन्रीच्या तोंडावर निरागस हास्य खेळूं लागलें. " क्लारा, " तो म्हणाला, " ठाऊक आहे ना तुला कीं मला पटला तरच मी कोणाचा सल्ला घेतों ? ही माझी कल्पना आहे, आणि मी स्वतःच ती प्रत्यक्षांत आणणार आहें. "

क्लारा गप्प झाली. पण तिच्या जिवाला १२ जानेवारीपर्यंत क्षणभरहि चैन पडणार नाहीं हें तो पक्कें ओळखून होता. कारण, शर्यतीचीं प्रात्यक्षिकें त्या दिवशीं व्हावयाचीं होतीं.

शर्यतीचा दिवस उजाडला. खूप थंडी पडली होती; आणि तिच्या जोडीला वादळी वारे. कितीहि जाड कपडे घातले तरी झोंबणाऱ्या थंडगार वाऱ्यापुढें त्यांची कांहीं मात्र चालत नव्हती.

"काकडून तर जाणार नाहीं ना तुम्ही ?" हेन्री आपल्या आस्ट्राखानी बंडीच्या गुंड्या लावीत असतां क्लारानें आपली चिंता व्यक्त केली.

"क्लारा, कांहीं काळजी करूं नको ग तूं !" हेन्री उताविळीनें उद्‌गारला. "दरदरून घाम सुटला आहे माझ्या अंगाला--एखाद्या खाटकासारखा ! अगदीं युनियन सूट घातला तरी.सुद्धां भरपूर ऊबदार वाटेल मला तो आज !" क्लारा, एड्सेल आणि हेन्री कशींतरी धडपडत आपल्या फोर्ड गाडींत जाऊन बसलीं, आणि गाडी सरोवराच्या दिशेनें मार्ग आक्रमूं लागली. शर्यतीचा मार्ग चार मैलांचा होता. पण तेथवर जाऊन पोहोंचायला त्यांना हें दहा मैल अंतर तोडावयाला हवें होतें.

"पपा, मी बसूं का हो 'ॲरो' मध्यें तुमच्याबरोबर ? न्या ना मला" एडसेलनें बापाची मनधरणी आरंभिली.

"अगदीं नाहीं." त्याला क्लारानेंच चटकन् गप्प केलें. "आणि हें बघ, पुन्हां नांव काढलेंस 'ॲरो' मध्यें बसण्याचं तर रात्रीं उपाशी पोटी झोंपावं लागेल. कळलं ना ?"

"पुन्हां केव्हां तरी नेईन हं तुला मी शर्यतीच्या गाडींतनं." हेन्रीनें मुलाला म्हटलें.

"पण आजच्याइतके वेगानं तुम्हीं तेव्हां थोडेच जायला बसलां आहांत." असें म्हणून त्या दहा वर्षाच्या पोरानें त्याची समजूत काढण्याचा बापाचा प्रयत्न फोल ठरविला.

परंतु, शर्यतीच्या 'मैदानावर' जेव्हां मंडळी जाऊन पोहोंचली तेव्हां हेन्रीला आपली 'ॲरो' गाडी कांहीं कुठें दिसेना. दाटीवाटीनें जमलेल्या प्रेक्षकांचीहि अस्वस्थता हेन्रीला जाणवली.

इतक्यांत कारखान्यांतील एक जण त्यांच्याकडे धांवत आला आणि त्यानें सांगितलें कीं, अखेरच्या चांचणींत इंजिनामध्यें कांहींतरी बिघाड झाला असल्याचें आढळून आलें असून तो काढून टाकण्यासाठीं कारखान्यांतले सारे यंत्रविशारद कितीतरी वेळ जिवाचा आटापिटा करीत आहेत. ' ॲरो ' दुरुस्त करून शर्यतीसाठीं सुयोग्य स्थितींत आणण्याची त्यांची धडपड चालली आहे.

इकडे प्रेक्षकांची गडबड सुरू झाली. एवढ्या गारठ्यांतून ते आले होते ते कांहीं तरी सणसणाटी दृश्य पहायला मिळेल या आशेनें. आणि ती तर आतां लोप पावणार असा रंग दिसूं लागला होता. कांहीं जणांनीं पाय आपटून तर कांहींनीं हातांनीं टाळ्या वाजवून त्यांना आलेला बधीरपणा घालवायचा प्रयत्न चालविला होता. कांहीं जण मात्र शिकारीवर नजर खिळलेल्या ससाण्याच्या पवित्र्यांत निश्चल उभे होते.

हेन्री परत कारखान्याकडे जाण्यासाठीं आपल्या फोर्डमध्यें पाय ठेवणार तोंच दुरून त्यांच्या कानावर कसला तरी गडगडाट झाल्याप्रमाणें ' फुर्र फुर्र ' असा आवाज आला. त्याच्या चेहऱ्यावरचीं चिंतेचीं चिन्हें नाहींशीं झालीं. कारण उघड होतें. ' ॲरो ' चा त्याच्या कानावर येणारा आवाज जसा असायला हवा होता तसाच होता. " मालक, आम्हीं गाडी ताळ्यावर आणली ! " हेन्रीकडे मोटारचा मोहरा वळवीत यंत्रविशारदानें अभिमानानें सांगितलें.

जनसमुदायानें टाळ्यांचा कडकडाट केला. जय्यत तयारी झाली. " ठो "–पिस्तुल उडालें आणि हेन्री दौडत निघाला.

क्लारानें आपली दृष्टी क्षणभर खालीं वळविली. तिनें वर बघितलें तेव्हां ' ॲरो ' बेफाम निघालेल्या एखाद्या अवखळ घोड्याप्रमाणें खसपटत नि उड्डाण करीत चाललेली तिच्या दृष्टीस पडली. वरतून बर्फ अगदीं मऊ सपाट दिसत होतें खरें, परंतु आंतून तें चांगलेंच तडकलेलें होतें. अशा प्रत्येक तडेवरून जातांना स्पर्धक हवेंत वांकडातिकडा फेंकला जाई आणि तितक्याच जोरानें खालीं येऊन आदळे. मग तोल सांवरतां सांवरतां त्याची पुरेवाट होई.

प्रेक्षकांनीं आरडून ओरडून नुसता कल्लोळ माजवला होता.

क्लारा कांहींच बोलत नव्हती. तिनें डोळे मिटून देवाची करुणा भाकली. ती परमेश्वराला मनांतल्या मनांत विनवीत होती कीं, 'माझा हेन्री या दिव्यांतून सुखरूप बाहेर पडो; आणि पुन्हां त्याला असल्या शर्यतीचें साहस करण्याची बुद्धि न होवो.'

आणि काय आश्चर्य! हेन्रीची 'ॲरो' गाडी दौडीचा मार्ग पुरा करून ठिकाणावर येऊन पोंचलीसुद्धां होती. "पुन्हां एकदां तुम्हीं आपलें कौशल्य दाखवून दिलेंत!" गाडी थांबतांच लोक हर्षभरानें ओरडले. हेन्रीनें त्यावेळपर्यंतचा जागतिक उच्चांक मोडून त्या ठिकाणीं आपला नवा ताशीं ९२ मैल वेगाचा उच्चांक प्रस्थापित केला होता. त्याच्या 'ॲरो' नें ३९.४ सेकंदांत एक मैलाचें अंतर कापलें होतें. पुन्हां एकदां साऱ्या जगांतील वृत्तपत्रांतून हेन्री आणि त्याची स्पर्धक गाडी (रेसर) ठळकपणें झळकली.

त्या दिवशीं संध्याकाळीं या विक्रमाची चर्चा करीत क्लारा आणि हेन्री बसलीं होतीं. "फारच धोक्याचं नाहीं का हें?" क्लारानें म्हटलें. "आपला जीव असा धोक्यांत घालण्यांत काय हंशील आहे? तुमच्या योजनांना चालना मिळावी म्हणून हें सारं तुम्ही करतां हें खरं. पण, यांत तुमच्या जिवावरच बेतलं तर तुमच्या त्या सर्व मोठ्या मोठ्या कल्पना संपुष्टांतच नाहीं का येणार? मग त्या प्रत्यक्षांत कोण उतरवणार आहे?"

'ॲरो'नें मिळविलेल्या यशानें हेन्रीच्या चित्तांत समाधान होतें. रात्रीं तो प्रसन्न मनानें निद्रेच्या अधीन झाला. पण बिचाऱ्याला काय कल्पना कीं उजाडतांच त्याच्यापुढें दुसराच एक विलक्षण प्रश्न 'दत्त' म्हणून उभा राहाणार होता.

दुसऱ्या दिवशीं कारखान्याच्या दारांतच जिम कझिन्स हेन्रीला भेटला. तो म्हणाला, "हेन्री, मागच्या आठवड्यांत तुम्ही शर्यतीच्या गडबडींत गुंतला होतांत म्हणून बोललों नाहीं; पण खरं सांगायचं म्हणजे कामगारांचा पगार द्यायला आपल्याजवळ आज पैसे नाहींत."

हेन्री चांगलाच खचला. माणसें जर सोडून गेलीं तर आपला निकालच लागला! असें त्याच्या मनांत आलें. भागीदारांकडून आवश्यक तेवढा पैसा

उभारणें शक्य नाहीं हें त्याला कळून चुकलें होतें. आपले स्वतःचे भाग विकण्यास तो तयार नव्हता. कारण तसें तो करता तर कारखान्याचें नियंत्रण त्याच्या हातांतून निसटून मालकम्सनच्या हातांत जाण्याचें भय होतें.


" मग काय करायचं ठरवितां तुम्ही ? " कझिन्सनें विचारलें.

" आपल्याला एकच गोष्ट करतां येण्यासारखी आहे. सर्व परिस्थिति कामगारांना उघड करून सांगणें."

संध्याकाळीं कामगार आपलें वेतन घेण्यासाठीं आले. हेन्री त्यांची वाटच पहात होता. सार्‍यांना नीट ऐकूं जावें म्हणून तो एका खुर्चीवर उभा राहिला. आणि त्यानें प्रामाणिकपणानें आपण कोणत्या परिस्थितींत सांपडलों आहोंत हें कामगारांपुढें स्पष्टपणें मांडलें. " तुम्ही जर आम्हांला धरून राहिलांत तर या थंडींत आपण अपुर्‍या राहिलेल्या सर्व मागण्यांचें काम पुरें करून टाकूं. आपली ती चार सिलिंडरवाली नवी गाडी देशांतल्या सार्‍या लोकांच्या कुतूहलाचा विषय होऊन बसेल. आणि वसंत ऋतूंत आपल्या मालाला प्रचंड मागणी येईल. लोकांना आतां मोटार गाडीची उपयुक्तता पटूं लागलेली आहे. परंतु, जर यावेळीं तुम्ही मला सोडून गेलांत तर–तर आपण सर्वच खड्ड्यांत पडूं. मग, गड्यांनों, काय ठरला तुमचा विचार ? "

जिवाचे कान करून हेन्री कामगारांच्या उत्तराची वाट पहात राहिला.

कामगार गटागटानें आपापसांत खालच्या आवाजांत कुजबुजूं लागले. आणि मग एकदम हेन्रीचा चेहरा प्रसन्न हास्यानें उजळून निघाला. कारण " बेशक, आम्ही इथेच राहणार धनी " हे शब्द त्याच्या कानावर पडले होते. कांहीं कामगारांनीं त्याच्यापाशीं येऊन हस्तांदोलन केलें आणि त्याच्यावरील आपला विश्वास व्यक्त केला. त्यांची ही निष्ठा आणि स्नेह पाहून हेन्री सद्गदित झाला. त्यांच्यासाठीं आपल्याला पुढें मागें कांहीं तरी करतां आलें पाहिजे, अशी खूणगांठ त्यानें मनोमन बांधली.



वसंत ऋतूच्या आगमनाबरोबरच हेन्रीच्या मनांतले सारे आशावादी अंदाज बहरून आले. त्याच्याकडे मागण्या इतक्या भरमसाट येऊं लागल्या कीं त्याच्या छोट्या मॅक स्ट्रीट कारखान्याला त्या पुरवतां पुरवतां नाकीं नऊ येऊं लागले. तो कारखाना या मागण्यांच्या मानानें अगदींच अपुरा पडूं लागला. म्हणून, हेन्रीनें पिकेट आणि बुबियां रस्त्यांवर नवीन कारखाना उभारला. हा कारखाना तीन-मजली असून त्यांतील यंत्रसामग्रीहि अगदीं समाधानकारक होती. आणि यापुढें त्याला या कारखान्यामध्यें कशाचीहि उणीव भासणार नाहीं असें वाटूं लागलें.

आतां हेन्रीला आर्थिक विवंचना उरलेली नव्हती. त्यामुळें कारखान्याच्या एकंदर व्यवस्थेसंबंधीं तसेच उत्पादनासंबंधीं त्याच्या ज्या कल्पना होत्या त्यांतील कांहीं प्रत्यक्षांत उतरविणें त्याला शक्य झालें. नवीन कारखान्याची उभारणी आलेल्या प्राप्तींतूनच झालेली होती. कॉफी जिम आणि टॉम कूपर यांचीं देणीं हेन्रीनें देऊन टाकलीं. फार वर्षांपूर्वी घड्याळाचा कारखाना चालवीत असतांना त्याची अशी कल्पना होती कीं, त्यांतील सारखे भाग अगदी तंतोतंत एकमेकांप्रमाणें करतां आले पाहिजेत; त्यांत तसूभर-सुद्धां अंतर असतां कामा नये. आतां त्याला मोटार-निर्मितींत हें थोडें फार प्रत्यक्षांत आणतां येऊं लागलें. त्याच्या कारखान्यामध्यें प्रथमच मोटारीचे

---

## चवदावें प्रकरण

---

कांहीं भाग बनूं लागले. परंतु, अजूनहि कारखान्याचें स्वरूप वेगवेगळ्या ठिकाणांहून तयार करून आणलेले विविध भाग एकत्र जुळविण्याचेंच ( Assembling : संकृति ) होतें.

कंपनी खोऱ्यानें पैसा ओढीत होती, आणि भागीदार अर्थातच संतुष्ट होते. हेन्रीचें लक्ष सतत जसें प्राप्तीच्या आंकड्यांवर होतें तसेच इतर दृष्टीनें तें उत्पादनाकडेहि लागलेलें होतें. कंपनीला अधिक लाभ होऊं लागलेला होता. कामगारांच्या संख्येंतहि वाढ झालेली होती; तरीहि प्रत्येक नवीन धर्तीच्या गाड्यांचा खप त्या मानानें उतरलेला होता. बहुसंख्याकांचें बहु हित साधण्याच्या त्याच्या कल्पनेंत वरील परिस्थितीस स्थान नव्हतें.

एकंदर परिस्थितीविषयीं मालकम्सन एकदम खूष होता. लाभांशाची ( Dividend ) लठ्ठ रक्कम त्याला संतोष देत होती. कारखान्यांत हेन्रीच्या इतकेच त्याचेहि भाग होते. अर्थात कारखान्याचें धोरण ठरविण्याचा मताधिकार दोघांनाहि सारखाच पोहोंचत होता. हेन्री मनांत म्हणत होता, 'मला जर मालकाम्सनचे भाग विकत घेतां आले तर इतर भागीदार माझ्याशीं निश्चित सहकार्य करतील. पण या मालकाम्सनचा माझ्या गळ्याभोंवतींचा फांस मात्र दूर झाला पाहिजे ! '

पुढच्या वर्षीं कारखान्यांतून झालेल्या मोटारीच्या विक्रीच्या संख्येंत कांहींशी घट झाली. ही संधी साधून मालकम्सन मागेल त्या दरानें त्याचे भाग विकत घेऊन टाकावयाचे असें हेन्रीनें ठरविलें. आपल्या स्वतःच्या मताप्रमाणें कारखान्याचा सर्व कारभार चालवितां आला पाहिजे, आणि त्याला इतर भागीदारांच्या सभेच्या वेळेला कोणी नसते फाटे फोडतां कामा नयेत असें हेन्रीला वाटे. मालकाम्सनचें मुळांतलें भांडवल तीन हजार डॉलर्सचें होतें. त्याचे आतां त्याला पावणे दोन लाख डॉलर्स हवे होते !

कोणाचीहि छाती दडपून गेली असती ! परंतु, मालकाम्सनचे भाग हस्तगत केल्याशिवाय गत्यंतर नाहीं हें हेन्रीहि समजून होता. त्यानें कर्ज काढलें नी ते सारे भाग विकत घेऊन टाकले. आतां त्याच्याकडे कारखान्याच्या एकूण ५१० भागांची ( त्याचे स्वतःचे मूळचे २५५ आणि आतां मालकम्सनकडून विकत घेतलेले २५५ ) मालकी आली होती. याचा

अर्थ कारखान्याच्या एकंदर भागांपैकीं निर्णायक अंश, म्हणजे ५१ टक्के भाग त्याच्या हातांत होते.

लवकरच कारखान्यांतून प्रतिदिवशीं शंभर मोटार गाड्या बाहेर पडूं लागल्या. वृत्तपत्रांनीं ' हा जागतिक विक्रम आहे ' असें म्हटलें. कारण दुसऱ्या कोणत्याहि कारखान्याच्या उत्पादनापेक्षां हा आंकडा चौपटीनें मोठा होता. पण जेव्हां हेन्रीनें आपली मनीषा प्रतिदिवशीं एक हजार गाड्या बनविण्याची आहे असें बोलून दाखविलें तेव्हां मात्र त्याचे सहकारी चिंताग्रस्त होऊन गेले.

इतर भागीदारांना हेन्रीची ही कल्पना वेडगळपणाची वाटली. त्या बिचाऱ्यांना काय ठाऊक कीं हेन्रीच्या डोक्यांत नवीन प्रकारें गाड्यांची जुळणी ( संकृतिः Assembling ) करण्याची एक योजना शिजत होती.

१ आक्टोबर १९०८ या दिवशीं हेन्रीनें अगदीं नवीन धर्तीची (मॉडेल) मोटार गाडी बाजारांत मांडली. या नव्या नवलाईच्या अशा T धर्तीच्या ( मॉडेल ) गाडीनें इतकी खळबळ उडाली कीं हेन्रीला विरोध करण्याचा धीर इतर भागीदारांमधील एकालाहि झाला नाहीं. या गाडीमध्यें अनेक वैशिष्टयें अशा प्रकारचीं होतीं कीं त्यांची कल्पना पूर्वी कोणासहि शिवली-सुद्धां नव्हती. ही गाडी विकत घेण्यासाठीं लोक हमरीतुमरीवर येऊं लागले.

या गाडींतील सुकाणू-चक्र ( स्टीअरिंग व्हील ) इतर गाड्यांप्रमाणें उजव्या हाताला न ठेवतां हेन्रीनें तें डाव्या हाताला बसविलें होतें. त्यायोगें तीं चालविणाराला रस्त्यावरील इतर वाहतुकीकडे अधिक लक्ष ठेवतां येऊं लागलें. तसेंच आतां गाडींत कांहीं बिघाड झाल्यास गाडीखालीं सरपटत जाण्याची गरज उरली नाहीं. वरचें झांकण काढून ठेवतां येण्याची सोय या नव्या मोटारींत होती. हें झांकण बोल्ट काढून उचलून बाजूला करतां येई.

पूर्वींच्या गाड्यांतून एंजिनांतील सर्व ' भांडीं ' ( सिलिंडर्स ) एकाच ठोकळ्यांतून बसविलेलीं असत. हेन्रीनें आतां तीं प्रथम वेगवेगळीं बनवून नंतर एकत्र सांधण्याची युक्ति काढली—ती 'Removable cylinder head' या नांवानें ओळखली जाई. तिच्यामुळें सर्व ' भांड्यां'तून ( सिलिंडर्स ) सारखाच दाब मिळूं लागला.

आपल्या गाड्या टिकावू आहेत अशी त्यांची ख्याती व्हावी असें हेन्रीला वाटे. तसेंच बळकटपणाबरोबरच त्या साध्या परंतु सुबक असल्या पाहिजेत, अशी त्याची इच्छा होती. यासाठी T (टी) वर्तीच्या ( मॉडेल ) बनावटींत व्हॅनॅडियमयुक्त मिश्र धातु असलेलें वज्रायस ( पोलाद ) त्यानें प्रथमच वापरलें. त्यामुळें वजनानें हलकी परंतु अधिक बळकट अशी मोटार तयार करणें शक्य झालें. या महत्त्वाच्या मिश्र धातूचा शोध हेन्रीला जवळ जवळ आकस्मिक रीतीनें लागला. तोंपर्यंत वजनानें हलकी परंतु बळकट गाडी कशी बनवावयाची याचें गूढ त्याला उकललेलें नव्हतें.

१९०५ मध्यें हेन्री मोटारच्या शर्यतीसाठीं पामबिच येथें गेला होता. त्याच्या एका मोटारीनें शर्यतींत भागहि घेतला. या शर्यतींत मोठी टक्कर होऊन एका फ्रेंच गाडीचा चुराडा झाला. हेन्रीनें तेथील परदेशी गाड्यांचें निरीक्षण केलें तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं, या गाड्यांतून अमेरिकन कारखानदार वापरीत असलेल्या भागांपेक्षां बरेच लहान परंतु अधिक चांगल्या प्रकारचे भाग वापरलेले आहेत. टक्कर झालेल्या ठिकाणीं पडलेल्या मोटारीच्या एका कळीच्या पट्टीचा दांडा (Valve strip stem) त्यानें उचलला. परंतु तो अतिशय हलका पण तितकाच मजबूत होता. चवकशी करतां तो कशाचा केलेला आहे याचा कोणासच पत्ता नव्हता. तो दांडा (Stem) त्यानें आपल्या हाताखालच्या एका माणसापाशीं दिला.

" या भागाबद्दलची सर्व माहिती शोधून काढ. आपल्या गाड्यांतून अशा प्रकारचा माल वापरायला हवा आहे." हेन्री आपल्या साहाय्यकाला म्हणाला.

पुढें हेन्रीला अशी माहिती मिळाली कीं, हा भाग फ्रान्समध्यें बनणाऱ्या एका विशिष्ट प्रकारच्या वज्रायसाचा (पोलादाचा) बनविलेला असून त्या मिश्र धातूंत व्हॅनॅडियम नांवाच्या मूलद्रव्याचा उपयोग केलेला आहे. व्हॅनॅडियम् हें एक चांदीप्रमाणें पांढरें असलेलें धात्विक द्रव्य आहे.

हेन्रीनें यानंतर अमेरिकेंतील वज्रायसाच्या ( पोलादाच्या ) प्रत्येक कारखानदाराला यासंबंधीं विचारून पाहिलें. परंतु कोणालाहि व्हॅनॅडियमयुक्त वज्रायस ( पोलाद ) करतां येत नव्हतें. पुढें इंग्लंडमधील एका तज्ज्ञाला

बोलावून घेतलें. या गृहस्थाला व्हॅनॅडियमयुक्त वज्रायस मोठ्या प्रमाणावर करण्याची विद्या अवगत होती. आतां हेन्रीपुढें खरा अवघड प्रश्न उभा राहिला; तो म्हणजे हा मिश्र धातु बनविण्यासाठीं यंत्रसामुग्री उभारण्याचा. व्हॅनॅडियम धातु वितळविण्यासाठीं ३००० अंश फॅहरेन-हाइट इतक्या तापांकाची आवश्यकता असते. सर्वसाधारणपणें त्याकाळीं वापरांत असलेल्या भट्ट्यांतील तापांक २७०० अंशापलीकडे जात नसे. कॅन्टन ( ओहायओ ) या गांवीं हेन्रीला एक लहानसा कारखाना आढळला. या कारखान्याला त्यानें आपल्या उपयोगासाठीं एक भट्टी चालविण्याची विनंति केली आणि तोटा आल्यास तो सोसण्याची हमी दिली. या अटीवर काम पत्करण्यास हा कारखाना सिद्ध झाला. परंतु पहिली भट्टी जी उभारली गेली ती समाधानकारक काम देईना. तिच्यांतून मिळणाऱ्या वज्रायसांत ( पोलादांत ) फारच थोडें व्हॅनॅडियम उरत असे. हेन्रीनें त्याला पुन्हां एकदां प्रयत्न करून पाहण्याची विनवणी केली. यावेळीं मात्र हव्या असलेल्या प्रकारचें वज्रायस बनलें. हेन्रीच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. आतां या नवीन मिश्रधातूमुळें त्याच्या गाड्या पूर्वीच्या तिप्पट बळकट करण्याची शक्यता निर्माण झाली होती.

व्हॅनॅडियम्युक्त वज्रायस ( पोलाद ) हातीं येतांच हेन्रीनें आपली एक ' फोर्ड ' बाजूला काढून तिच्यांतील प्रत्येक भाग बनविण्यासाठीं कोणत्या प्रकारच्या वज्रायसाची आवश्यकता आहे, हें तपासण्यास आरंभ केला. कांहीं भागांच्या बनावटीसाठीं कठीण ( Hard ) वज्रायस वापरावें लागे तर कांहीं भागांसाठीं चिवट ( Tough ) व कांहींसाठीं लवचिक ( Elastic ) वज्रायस वापरणें अधिक योग्य होतें. सर्व तपासणीनंतर हेन्रीनें मोटार गाडींत वापरल्या जाणाऱ्या विविध भागांसाठीं वीस वेगवेगळे वज्रायसाचे (पोलादाचे) प्रकार निवडून काढले. यांतील जवळ जवळ दहा प्रकारांतून व्हॅनॅडियम धातु ( भिन्न भिन्न प्रमाणांत ) असणें आवश्यक होतें. ज्या ज्या ठिकाणीं बळकट परंतु वजनानें हलकें असें वज्रायस वापरावें लागे त्या त्या ठिकाणीं व्हॅनॅडियमयुक्त वज्रायसचा उपयोग होई.

T धर्तीची ( मॉडेल ) गाडी विकत घेणाऱ्या प्रत्येक मालकास एक

सचित्र माहिती-पुस्तक देण्यांत येई. त्यांत गाडीची रचना आणि तिची उर्जा ( Up keep) व दुरुस्ती यासंबंधीं स्पष्ट आणि साध्या शब्दांत सूचना दिलेल्या असत. फोर्ड गाडीची दुरुस्ती करण्यासाठीं माणसानें यांत्रिक प्रवृत्तीचेंच असलें पाहिजे अशी कांहीं आवश्यकता नव्हती. प्रत्येक भागाचें मूल्य इतकें अल्प असे कीं तो बिघडल्यानंतर दुरुस्त करीत बसण्यापेक्षां नवीन भाग विकत घेणें अधिक परवडणारें होतें. फोर्डची टूरिंग गाडी ८५० डॉलरना मिळे तर रोडस्टर गाडीसाठीं फक्त ८२५ डॉलर द्यावे लागत.

अमेरिकन लोकांनीं या गाडीला " Fliver " असे नांव दिलें. केव्हां केव्हां या गाडीचा उल्लेख " Tin Lizzie " या नांवानेंहि होई. कांहीं लोकांची अशी कल्पना होती कीं, ही गाडी इतकी हलकी आणि तकलुपी आहे कीं खडबडीत रस्त्यांवरून जातांना तिचा चक्काचूर झाल्यावांचून राहणार नाहीं ! ही टीका ऐकल्यावर हेन्री नुसता हंसला आणि म्हणाला, 'लोकांची ही कल्पना चुकीची आहे हें पटवून देणें अगदीं साधी गोष्ट आहे.' आणि त्यानें तसें दाखवून दिलेंहि.

१९०९ च्या जूनमधील तो पहिला दिनांक होता. गेले कित्येक आठवडे वर्तमानपत्रांतून लवकरच होणाऱ्या त्या दिवशींच्या एका खळबळजनक घटनेचा गाजावाजा भरपूर झालेला होता. न्यूयॉर्क सिटीहॉलसमोर पांच " बिनघोड्यांच्या " गाड्या एका पाठोपाठ उभ्या होत्या. एक ॲक्मी, एक शामुट, एक इताला आणि दोन T (टी) धर्तीच्या फोर्ड गाड्या. गाड्यांची शेवटची ठीकठाक करण्यांत यंत्रविशारदांची एकच धांदल उडून गेलेली होती. लवकरच 'व्हाइट हाऊस' मधून राष्ट्राध्यक्ष टॅफ्ट यांनीं स्पर्धा सुरू झाल्याचा बार काढला. अमेरिका खंडाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंका-पर्यंतच्या ( पूर्व-पश्चिम ) मार्गावरील पहिली मोटार स्पर्धा चालू झाली होती. सेंट लुईच्या पश्चिमेकडील भागांत सतत आठवडाभर पर्जन्यवृष्टि झाल्यानें ग्रामीण भागांतील रस्ते चिखलमय होऊन गेले होते. प्रेअरी प्रदेशांतून आणि कोलोरॅडो संस्थानांतून मार्गक्रमणा करीत असतांना मोटार गाड्यांचा वेग ताशीं सरासरीनें दहा मैल इतका खालीं आला होता.

चेइन्ने, वायोमिंग या ठिकाणीं त्या मोठ्या इताला गाडीनें शर्यतीमधून अंग काढून घेतलें. इतर गाड्या तशाच पुढें रखडत निघाल्या. मार्गावरील कॅसकेडस्च्या शिखराजवळ त्यांना तेथें उठणाऱ्या हिमवादळांशीं टक्कर द्यावी लागली.

कित्येक दिवसांनीं फोर्डची दोन क्रमांकाची गाडी सीॲट्लच्या अलास्का-युकॉन-पॅसिफिक-दर्शनाच्या ( Seattle's Alaska-Yukon-Pacific Expositon ) प्रवेशद्वारांतून आंत शिरली. हिनें बावीस दिवस आणि पंचावन्न मिनिटांत अमेरिका खंडाच्या पूर्व किनाऱ्यापासून पश्चिम किनाऱ्या-पर्यंतचें अंतर कापलें होतें. आणि अजून तिच्या पुढील दोन चाकांत न्यूयॉर्कचा वारा शिल्लक होता !

पारितोषिक वितरण समारंभ कर्नल एम्. रॉबर्ट गुगेनहाइम यांच्या हस्तें झाला. करंडक देतांना ते म्हणाले, " या शर्यतीनें एक गोष्ट सिद्ध केली आहे. फोर्डच्या सिद्धान्ताप्रमाणें वजनानें हलकी परंतु उच्च शक्तीची (हाय-पॉवर्ड ) मोटारगाडी, ज्या ठिकाणीं वजनी गाड्यांना जातां येत नाहीं, तेथें जाऊं शकते; इतकेंच नव्हे तर तिच्यापेक्षां चौपट, पांचपट महाग असलेल्या गाड्यांनाहि मागें टाकूं शकते. मग रस्ता केवढ्याहि उभ्या चढणीचा असो नाहींतर अगदीं खराब झालेला असो. मला वाटतें, सर्वसामान्य लोकांना सोयिस्कर अशी जी गाडी हवी होती तशी मोटार बनविण्यांत श्री. फोर्ड यांनीं यश मिळविलेलें आहे. "

फोर्डच्या T (टी) धर्तीच्या ( मॉडेल ) गाडीचा ' चक्काचूर ' झाला नव्हता तर ! त्याच दिवशीं हेन्रीनें जाहीर करून टाकलें कीं, इतर सर्व धर्तीच्या गाड्या बंद करून आपण आतां आपल्या कारखान्यांत फक्त T (टी) धर्तीच्या गाड्या बनविण्यावरच सर्वस्वीं भर देणार आहोंत. हेन्रीच्या या T (टी) धर्तीच्या गाडीचें स्वरूप पुढीलप्रमाणें होतें. चार चाकांवर उंच चढविलेली अशी ती गाडी असून तिच्या पुढील अंगाला एक काळी पेटी बसविलेली असे. या पेटीमुळें आंतील बाजूचीं चार भांडीं ( सिलिंडर्स ) असलेली गाडी जरी झांकली गेली तरी तिचा आवाज कांहीं लपत नसे. याच

गाडीनें हेन्रीला कीर्ति आणि संपत्ति मिळवून दिली; आणि सारी अमेरिका चक्रचलित करून टाकली !

शेतकरी आपल्या या T (टी) धर्तीच्या फोर्ड गाडीचें मागील उजवें चाक अधांतरीं अडणीवर (जॅक) ठेवी आणि त्यावर कप्पीच्या साहाय्यानें एक पट्टा चढवून बांड कापण्यासाठीं यांत्रिक करवत चालू करी. हिंवाळ्याच्या वेगमीसाठीं त्याला याचा फार उपयोग होई. दुसऱ्याच दिवशीं या T (टी) गाडीचा उपयोग गोठ्यांतील गाई-घोड्यांच्या अंबोणाला लागणारा मका भरडण्यासाठींहि करतां येई. आणि रविवारच्या दिवशीं आपल्या कारभारणीला घेऊन प्रार्थनामंदिरांत जाण्याकरितांहि त्या शेतकऱ्याला या T धर्तीच्या गाडीमुळें मोठी सोय झाली होती.

या T गाडीसंबंधीं अनेक चुटके लोकांनीं रचले होते. ते ऐकून हेन्रीला मोठी गंमत वाटे. त्यांचा उपयोग प्रसिद्धीच्या दृष्टीनें फार आहे हेंहि हेन्रीनें हेरलें होतेंच.

ही T धर्तीची मोटार चालवायला कांहीं विशेष बुद्धिमत्ता लागत होती असेंहि नाहीं. या गाडीला पुढच्या बाजूला मोटार चालू करण्यासाठीं एक हँडल किंवा दांडा बसविलेला होता. यानें एकतर मोटार चालू तरी होई किंवा ती चालवूं पाहणाराचा हात तरी उखडून निघे ! त्यानें दिलेल्या 'ग्रहमालासदृश' गतीचें नियंत्रण पायांनीं करावें लागे. यासाठीं तीन प्रकारच्या पावठ्या ( Pedals ) आंतील बाजूला बसविलेल्या असत. मोटार पुढें सरकण्याकरितां सुकाणूं-चक्राखालील ( Steering Wheel ) पितळी तरफ उजवीकडे खालीं ओढून घ्यावी लागे. मोटारला वेग आला कीं डावीकडील पावठीवर पाय दाबावा लागे नंतर डोळ्याला न दिसणारीं चक्रें एकमेकांवर घांसूं लागत. मोटार कुरकुरूं लागे, थरथरूं लागे. आणि शेवटीं एकदांची ही T गाडी जागची हाले.

एकदां चालू झाली म्हणजे पावठीवरील पाय उचलून गाडी वरच्या गीअरमध्यें टाकतां येई. मग हें साडगें मधमाशी डसलेल्या एखाद्या घोड्याप्रमाणें एकदम उसळी घेई. गाडी थांबवायची झाली कीं उजवीकडील पावठी अगदीं जीव खाऊन ढकलावी लागे. मधली पावठी गाडी मागें घेण्यासाठीं

—पार्श्वगतीसाठीं असे. यानंतर हात-अडसर ( Handbrake ) खेंचला कीं गाडी अगतिक अवस्थेंत ( Neutral ) येई.

मोटार चालू असेपर्यंतच तिचे दिवे लागत व पोंगाहि तेवढ्यापुरताच काम देई. या गाडीला डावीकडे एकहि दार नव्हतें. त्या बाजूला दर्शनी दारासारखी दिसणारी एक लोखंडी पडदी (Panel) तेवढी असे. एकतर डावीकडून वरच्या बाजूनें टांग टाकून गाडींत चढावें लागे, नाहींतर उजवीकडे बसणाऱ्याच्या आधीं तरी गाडींत शिरून बसावें लागे.

गाडींतील पुढील बैठकीच्या खालीं एक टांकी बसविलेली असे. तिच्यांतील पेट्रोल गुरुत्वाकर्षणानें खालील 'कार्ब्युरेटर'ला पुरविलें जाई.

टांकींत पुन: पेट्रोल भरावयाचें झाल्यास सर्वांनीं खालीं उतरावयाचें आणि बैठकीवरील गादीहि काढून घ्यायची इतका द्राविडी प्राणायाम करावा लागे.

इंजिनामध्यें जमणारी काजळी म्हणजेहि एक मोठा त्रास होता. दट्ट्याच्या किंवा भांड्यांच्या ( सिलिंडर्सच्या ) बाजू झिजल्यामुळें वंगणाचें तेल ज्वलन-कोष्ठांत (Combustion Chamber) शिरूं लागून त्याच्यामुळें काजळीचा थर जमत असे. काजळीचा हा थर एका विशिष्ट मर्यादेपेक्षां अधिक जमला कीं इंजिनाचा दणका एकाद्या घणाघाताप्रमाणें ऐकूं येऊं लागे. अशा परिस्थितींत ज्या मोटार-मालकाला थोडी यांत्रिक माहिती असे तो भांड्याचें ( सिलिंडरचें ) वरचें झांकण उघडून भांड्याच्या आंतील बाजूवर जमलेली काजळी खिशांतल्या चाकूनें खरवडून टाकी व झांकण बसवून गाडी चालू करी आणि पुन्हां आपला रस्ता पकडी.

दट्ट्याच्या जोड-दांड्यावरील ( Connecting Rod ) बेअरिंग्ज झिजून साधारणपणें पाव इंचाची पोकळी उत्पन्न झाली कीं मोटारीचा आवाज एखाद्या बाष्पयंत्रावर चालणाऱ्या कारखान्यांत निघणाऱ्या आवाजाप्रमाणें येऊं लागे. मग मोटारीचा मालक गाडीखालीं खुरडत जाऊन तेलाची तबकडी काढून घेई—आणि बेअरिंगवर हातीं लागेल त्या वस्तूचें अस्तर चढवी. अशावेळीं एखाद्या जुन्या जस्ती डब्याचा तुकडा किंवा फाटक्या जोड्याचें चामडेंहि उपयोगांत येई.

ही नवीन T ( टी ) धर्तीची गाडी बाजारांत प्रथम आल्यापासून सहा महिन्यांच्या आंतच कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या गाड्यांची संख्या मागणीच्या मानानें अपुरी पडूं लागली. आणि त्यासाठीं आणखी नवा कारखाना उभारण्याची वेळ आली.

अगदीं अदूरदृष्टीच्या भागीदारांनाहि आतां स्पष्ट दिसूं लागलें होतें कीं फोर्ड मोटार कंपनीचा पिकेट कारखाना आतां अपुरा पडूं लागला आहे. हेन्रीनें २७६ एकर जमीन हायलंड पार्क विभागाच्या कारखान्यासाठीं खरेदी करून त्यांतील ४७ एकर जमिनीवर पूर्वींपेक्षां कितीतरी मोठ्या अशा कारखान्यासाठीं इमारती बांधण्यास आरंभ केला.

फ्लॉवर मशिन शॉपमध्यें मेस्त्री ( Mechanic ) म्हणून काम करीत असल्यापासून कारखान्यांतील काम करण्याची जागा स्वच्छ ठेवतां येते आणि तशी ती स्वच्छ ठेवलीच पाहिजे, अशी हेन्रीची ठाम कल्पना होती. आतां या नव्या आदर्श कारखान्यांत त्यानें स्वच्छतेकडे प्रथम लक्ष पुरविलें. कारखान्यांतील काम करण्याच्या खोल्यांना कांचेचीं तावदानें बसवून त्यानें भरपूर प्रकाश मिळण्याची व्यवस्था केली. त्याचप्रमाणें कामघरांची रचना हवेशीर व सहज स्वच्छ ठेवतां येतील अशी केली.

त्याच्या जुन्या घडचाळ कारखान्याची कल्पना आतां पुन: जशीच्या तशीच त्याच्या समोर उभी राहिली. त्यांतल्या कारखान्यांत काम करणाऱ्या अठराशें कामगारांच्या कामाची व्यवस्था त्याला अशा प्रकारें लावायची होती कीं कामाचा उरक तर झटपट व्हावा पण कोणतीहि उणीव पडूं नये. कामाची गती कुंठित होऊं नये आणि यायोगें उत्पादनखर्चांत अधिकाअधिक बचत व्हावी. कामांतील टप्पे वांचविणें म्हणजे पैसा वांचविणें, आणि हा पैसा वांचविणें म्हणजे गिऱ्हाइकाच्या पदरांत कमींतकमी किंमतींत माल टाकणें होतें.

---

# पंधरावें प्रकरण

---

या नव्या कारखान्यांत ' फोर्ड ' गाडीचा प्रत्येक भाग एकाच खात्यांत बनविला जाऊन तो गुरुत्वाकर्षणानें चटकन् संकृतिगृहाकडे (Assembling Room ) नेण्याची व्यवस्था केली होती. १९११ मध्यें पहिला अनंतवाहक ( Endless Floor Conveyer ) आणि पहिली अनंतसांखळी ( वाहिनी: Chain ) बनविण्यांत आली. यांतील मूलभूत अशी हेन्रीची नवी कल्पना ही कीं माणसांनीं कामाकडे जाण्यापेक्षां काम माणसांकडे नेणें अधिक लाभदायक ठरतें. ही व्यवस्था आतां संकृतिसूत्र किंवा मार्ग (Assembly Line) या नांवानें ओळखली जाते. या मार्गावरून यंत्रसाहाय्यानें काम पुढें सरकत असतां त्यावर आवश्यक संस्कार करण्यासाठीं कामगार आणि त्यांचीं हत्यारें सज्ज असत. प्रत्येक माणसाला एकच क्रिया करावी लागल्यानें त्याला फारसा विचार करावा न लागतां अनावश्यक हालचाली टळत.

हे ' संकृतिमार्ग ' एखाद्या आगगाडीच्या मार्गांनीं झालेल्या जाळचाप्रमाणें कांहींसे दिसत. प्रत्येक कामगार त्याच्या नेमून दिलेल्या ठिकाणीं नेमून दिलेलें काम करण्यासाठीं सिद्ध असावयाचा. मग तें काम लहानसहान कीलक ( Bolt ) बसविण्याचें असो किंवा मोटारच्या सांगाड्यावर तिचें संबंध शरीर चढविण्याचें असो. धांवता पट्टा जसजसा पुढें सरके तसतशी क्रमाक्रमानें त्यावरील T धर्तीची गाडी अंग धरूं लागे.

प्रत्येक यंत्र शक्य तितक्या अचूकपणें काम करील अशा प्रकारचें असे. वापरण्यापूर्वीं प्रत्येक यंत्राची कसून तपासणी केली जाई. तें निर्धोक असल्याची खात्री करून घेण्यांत येई. यदाकदाचित् एखादा अपघात झालाच तर तशाच प्रकारचा अपघात पुन: होऊं नये यासाठीं हेन्री सर्व प्रकारें चौकशी करी.

या पद्धतीवर असे आक्षेप घेण्यांत आले कीं कामगाराच्या हालचालीमधील तोच-तोचपणा त्याच्या प्रकृतीस अपायकारक ठरेल. कामगारांना शारीरिक ताण पडत आहे किंवा कसें हें तपासण्यासाठीं डॉक्टरांची नेमणूक करण्यांत आली. परंतु आपल्याला एका कामावरून दुसऱ्या कामावर बदलावें अशी इच्छा प्रकट करतांना कामगार क्वचितच आढळत. तथापि त्याप्रमाणें त्यांची नेमणूक शक्य तेवढ्या लगोलग दुसरीकडे करण्यांत येई.

# पंधरावें प्रकरण

हेन्रीनें त्याच्या भरती विभागांतील माणसांना बोलावून घेतलें. त्यांना सांगितलें कीं, एखादें शारीरिक व्यंग असणाऱ्या माणसांना त्याला जर योग्य काम देतां आलें तर त्यायोगें त्याला एक प्रकारें देशाची सेवा करण्याचें श्रेय लाभेल. हीं पंगू आणि आंधळीं माणसें सन्मान्य नागरिक म्हणून जीवन कंठूं लागतील. पैसे देऊन कामावर नेमण्यांत येणाऱ्या माणसांपाशीं प्रशस्तीपत्रें असण्याची आवश्यकता आपल्या दृष्टीनें मुळींच वाटत नाहीं. माणूस कारावासांतून आलेला असला आणि आतां त्याची काम करून पोट भरण्याची इच्छा असली तर जीवनाला नवीन वळण लावण्याची संधी आपण त्यालाहि देऊं.

हेन्रीला आतां एक नवीनच पंचाईत पडली, ती म्हणजे त्याच्याजवळील दामदुपटीनें वाढणाऱ्या संपत्तीची. त्याच्यापाशीं जमलेली लक्षावधि संपत्ति स्वकष्टार्जित होती. यंत्राइतकेंच पैशाच्या व्यवहारांतहि त्याचें डोकें तल्लखपणानें चाले. "जगांत दोन मूर्ख वावरतात" असें तो म्हणे. "या दोघांपैकीं पहिला लक्षाधीश वर्ग असा आहे कीं पैसा सांचवून हातांत खरी सत्ता आणतां येते असें त्याला वाटतें. आणि दुसरा मूर्खांचा वर्ग म्हणजे कफल्लक सुधारकांचा. त्यांना असें वाटतें कीं जगांतील सर्व दुःखें एका वर्गाच्या हातांतील पैसा काढून तो दुसऱ्या वर्गाच्या हातांत दिल्यानें दूर होतील. हे दोन्हीहि मार्ग चुकीचे आहेत."

एकादा शेतकरी आपल्या बीं-बियाण्याच्या राशीकडे ज्या दृष्टीनें पाहातो त्याच दृष्टीनें फोर्ड त्याच्या हातांत सांचलेल्या पैशांकडे पाहात असे. या सांचलेल्या पैशांतून नवीन आणि त्याहिपेक्षां भरघोस पीक कसें काढतां येईल अशी त्याची दृष्टि होती. ज्या बड्या उद्योगधंद्यांतून शेंकडों किंवा हजारों कुटुंबें पोसलीं जातात त्यांच्यावर कांहीं नैतिक भार असतो. या कुटुंबांतून जन्माला येणाऱ्या अर्भकांविषयीं, त्यांतून बाहेर पडणाऱ्या बालबालिकांविषयीं किंवा कारखान्यांतून मिळणाऱ्या वेतनाच्या बळावर जे तरुण विवाहित होऊन नवीन संसार थाटीत त्यांच्याविषयीं किंवा कामगारांच्या वेतनामधून भरल्या जाणाऱ्या हप्त्यांमधून जीं सहस्रावधी घरें उभारलीं जात होतीं त्यांच्याविषयीं हेन्रीच्या डोक्यांत सतत विचार वास करीत असे. फोर्ड मोटार

कंपनी ह्या सर्व गोष्टी घडवून आणण्यास मदत करीत होती. कंपनीची स्थिति आणि प्रगति म्हणजे एक पवित्र विश्वस्त निधि हीच हेन्रीची धारणा होती.

प्रत्येक मळसूत्र व खिळा आपापल्या ठिकाणीं नीट बसलेला असला तरच यंत्र यशस्वीरीत्या काम करूं शकतें हें त्यास पक्कें ठाऊक होतें. तसेंच कारखाना यशस्वी रीतीनें चालावयाचा तर कामगारांची आवश्यकताहि तितकीच होती हें तो जाणून होता. ज्यावेळीं कामगारांचे पगार भागविण्याइतकासुद्धां पैसा त्याच्या खिशांत नव्हता, त्याकाळीं कामगारांना दिलेलें आश्वासन तो विसरला नव्हता. कामगारांच्या कल्याणासंबंधींच्या विचारांनीं हेन्री बरेच दिवसपर्यंत व्यग्र होऊन गेला होता.

कारखान्यांतून बाहेर पडल्यावर ते कामगार राहातात तरी कसे तें जाणून घेण्याची इच्छा त्याच्या मनांत उद्भवली. फोर्ड कारखान्यांतील पंधरा हजार कामगारांच्या राहणीची पाहणी करण्यासाठीं कारखान्यांतलींच दोनशें माणसें त्यानें नेमली. एक वर्षानंतर या लोकांनीं पाहणीचें काम पुरें करून आपलें प्रतिवृत्त जेव्हां फोर्डला सादर केलें तेव्हां हेन्रीला धक्काच बसला. त्याच्या हाताखालील एकचतुर्थांश कामगार आपल्या कुटुंबियांसह अत्यंत दारिद्र्यांत जीवन कंठीत होते आणि दुसरे एकचतुर्थांश जेमतेम बऱ्या स्थितींत राहात होते. आणि स्वतःचीं घरें असलेल्या कामगारांची संख्या केवळ ३६४ इतकी थोडी होती. त्यांच्याकडील कामगारांना कायद्यानें ठरविलेलें प्रमाणभूत वेतन मिळत असे. परंतु चांगल्या राहणीसाठीं आवश्यक इतकें जर तें नसलें तर ती परिस्थिति पालटण्याच्या दृष्टीनें कांहीं तरी उपाययोजना करणें आवश्यक होतें. आपल्याकडील प्रत्येक कामगाराला सुखानें जीवन कंठतां येईल इतकी त्याची वेतनश्रेणी असावी असें हेन्रीला वाटे. म्हणून कामगारांच्या वेतनाचा प्रश्न कसा सोडवावा या विचाराला तो लागला. यानंतरचा दिवस वर्षारंभाचा दिवस होता. परंतु तरीहि त्यानें त्या दिवशीं भागीदारांची सभा बोलावली. सुट्टयांचा अडथळा हेन्रीच्या योजनांआड कधीं येत नसे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22662 दि: 5/1/71
क्रमांक 604 नों: दि: 20/11/80.

नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशीं हेन्रीनें बैठक कशासाठीं बोलावली आहे याचें आश्चर्य करीत सर्व भागीदार आपापल्या जागीं येऊन बसले.

हेन्री म्हणाला, "मी आज तुम्हांला आपल्या कामगारांच्या हित-संवर्धनाचा विचार करण्यासाठीं आमंत्रण दिलें आहे. या बाबतींतले आपले विचार मला समजून घ्यायचे आहेत."

भागीदार मंडळींना हेन्रीच्या म्हणण्याचा अर्थच कळेना. दुसऱ्या कोणत्याहि कारखान्यांतील कामगारांपेक्षां फोर्डच्या कारखान्यांतील कामगारांची स्थिति अगोदरच कितीतरी चांगली होती.

हेन्री पुढें म्हणाला, "प्रथम आपण कामाच्या तासांचा विचार करूं या. आपले कामगार ठराविक ९ तासांचा दिवस याप्रमाणें सध्यां काम करतात. आणि त्यांना देशांतील इतर कामगारांप्रमाणेंच दर दिवशीं २·३४ डॉलर मजूरी मिळते."

गोलमेजाभोंवतीं बसलेल्या सर्व भागीदारांनीं संमतिदर्शक माना डोलावल्या. अजूनहि त्यांना आपला मुख्य पुढें कांय सांगणार याचा पत्ता लागेना.

कामगारांतहि कोणत्याहि प्रकारचें असमाधान दिसून येत नव्हतें. ते सर्व काम मिळतें म्हणूनच संतुष्ट होते.

"कामगारांना जर प्रत्येक दिवशीं नवाच्या ठिकाणीं आठ तास काम दिलें," हेन्री म्हणाला, "तर आपल्याला सध्यांच्या दोन पाळ्यांचे ऐवजीं

---

प्रत्येक दिवशीं तीन पाळ्या चालू करतां येतील. याचा परिणाम असा होईल कीं, आपल्याला सध्यांच्यापेक्षां निदानतरी चार हजार जादा कामगारांना काम देतां येईल."

सर्व भागीदारांनीं या सूचनेला पुष्टी दिली. ही एक नवीन गोष्ट होती. परंतु याची व्यवस्था नीट लावतां येईल असें त्याला वाटलें. हेन्रीनें कारखान्याच्या धोरणांत कोणताहि धक्का देणारा पालट सुचविलेला नव्हता हें पाहून त्यांनीं समाधानाचा सुस्कारा सोडला.

परंतु हेन्रीचें बोलणें अजून संपलें नव्हतें. त्याची योजना यापेक्षां बरीच व्यापक होती.

"ठीक आहे तर," तो म्हणाला, "आपण कामाच्या तासांचा विचार करून टाकला. आतां वेतनाचें काय करावयाचें ? आपण दर दिवसाच्या वेतनांत किती वाढ करूं या ?"

"मला वाटतें दिवसाला २५ सेंट ही वाढ पुष्कळ होईल." एका भागीदारानें सुचविलें.

हेन्रीनें ही सूचना फळ्यावर लिहिली आणि म्हटलें, "आणखी कांहीं सूचना आहेत काय ?"

"माझी सूचना आहे कीं दिवसाला पन्नास सेंट वाढ करावी." हेन्रीचें समाधान पहिल्या सूचनेनें झालेलें नाहीं हें ओळखून दुसऱ्या एका भागीदारानें आपण होऊन सुचविलें.

"यापेक्षां आपणाला अधिक कांहीं चांगलें करतां येईल असें कोणाला वाटत नाहीं काय ?" असे विचारून हेन्री सर्व भागीदारांचीं तोंडें अधीरतेनें न्याहाळूं लागला. मध्यंतरी बराच वेळ गेल्यानंतर एका भागीदारानें भीतभीत एक डॉलरची वाढ सुचविली. प्रत्येकाच्या डोक्यांत अनेक-आंकडी मनःकल्पित रकमा नाचत होत्या. दिवसाला प्रत्येक कामगाराच्या वेतनांत एक डॉलरची वाढ करणें याचा अर्थ वर्षाच्या शेवटीं ४० लाख डॉलर अधिक द्यावे लागणार असा होत होता. अर्थातच ही अगदीं सीमा झाली होती.

तेथें जमलेल्या भागीदारांना आणखी पुढें रेटीत नेऊन प्रत्येक दिवशीच्या वेतनांत अडीच डॉलरची वाढ करण्यासाठीं त्यांची संमती हेन्रीनें मिळविली.

२५००



आतां कारखान्यांतील कोणत्याहि कामगाराला दर दिवसाला पांच डॉलरपेक्षां कमी वेतन मिळणार नव्हतें.

बहुतेक सर्व भागीदारांना आपल्या प्रमुखाचें हें करणें अतिरेकीपणाचें वाटलें. सभेला जमलेल्या भागीदारांतील केवळ दोनच गृहस्थांचा हेन्रीवर विश्वास होता. आणि आपण काय करतों आहोंत याची पुरी कल्पना हेन्रीला आहे असें त्यांना वाटत होतें. इतरांना मात्र मजुरींत दुप्पट वाढ करून पुनः दिवसाच्या तासाचा एक तास कमी केल्यानें कंपनीचें कांहीं भलें होईल असे वाटत नव्हतें.

या बदललेल्या सर्व परिस्थितीचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न भागीदार करीत होते, तोंच हेन्रीनें कामगारांना त्याशिवाय एक कोटी डॉलर ' बोनस ' म्हणून वांटावेत अशी सूचना केली.

भागीदारांचें धाबेंच दणाणलें !

" कामगारांना आपण चांगलें वेतन दिलें तर ते नऊ तासांइतकेंच काम आठ तासांत देतील असा विश्वास मला वाटतो." हेन्री म्हणाला, "पुनः असें आहे कीं राबणाराला नफ्यांत थोडाबहुत वांटा देण्याचा काळ आतां आलेला आहे. जी संपत्ति उत्पन्न करण्यासाठीं हे कामगार हातभार लावतात तिच्यांतील कांहीं अंश त्यांना मिळणें रास्तच आहे."

नफ्यांतील वांटा मिळण्याची फोर्डची ही अभिनव योजना जेव्हां वृत्तपत्रांपर्यंत जाऊन पोहोंचली, तेव्हां साऱ्या देशभर खळबळ माजून गेली. हेन्रीच्या ह्या योजनेची चर्चा साऱ्या देशभर, घराघरांतून, कोंपऱ्या-कोपऱ्यावर आणि प्रत्येक सभा-संमेलनांतून होऊं लागली. हेन्री फोर्डला एकदम विभूतिमत्व आलें ! श्रम करणाऱ्यांचा तो खराखुरा सखा बनला होता.

इतर मोटार-कारखानदारांनीं ही बातमी वाचतांच आपल्या हातांतील वृत्तपत्राचा रागानें चोळामोळा करून टाकला. हेन्री सर्व औद्योगिक क्षेत्रांत चुथडा करून टाकणार असें भाकित त्यांनीं वर्तविलें. आपल्या औद्योगिक जगांत हा एक बॉम्बच टाकला गेला असेंच त्यांना वाटलें. एक कारखानदार तर म्हणाला, " कामगारांना अगदीं आरशासारखे लख्ख राजवाडे काम करण्यासाठीं देऊनच या फोर्डचें समाधान होत नाहीं असें दिसतें. आतां त्यांनीं

कामावर यावें म्हणून तो त्यांच्यावर पैसे उधळीत आहे. पण या मार्गानें धंदा नाहीं चालवतां येणार. याच्या ह्या नव्या नव्या खुळांनीं धंदा कसा होणार ? याच्याशीं टक्कर देत बसलों तर आपलें दिवाळें निघायला उशीर नको !"

हेन्रीनें खरोखरच ह्या सर्वांना डोकेदुखी उत्पन्न केली होती. खरोखरीच दिवसाला ५ डॉलर वेतन कामगारांना मिळणें ही महनीय गोष्ट होती. इतर कारखान्यांतून त्यामुळें गडबड-गोंधळ होणें अपरिहार्य होतें.

फोर्ड कचेरीसमोर रीघ लावून उभ्या असलेल्या रांगांत घुसण्यासाठीं कामगारांची धांवपळ सुरू झाली. प्रत्येकाला फोर्ड मोटार कंपनीमध्यें काम हवें होतें.

इतरत्र कामावर असलेल्या कोणालाहि तें काम सोडून आपल्याकडे कामावर येण्यासाठीं हेन्रीनें उत्तेजन दिलें नाहीं. बेकार विवाहितांना तर प्रथम काम दिलें जावें असा त्याचा कटाक्ष असे. सुखस्वास्थ्याच्या अभावीं माणसाला कसून व मनापासून काम करणें कसें शक्य आहे ? पुरेशा पगाराच्या अभावीं सुखस्वास्थ्य तरी कोठून लाभणार ? अशा अनिष्ट परिस्थितींत एखाद्याला माघारें घालवून देणें खरोखरी हेन्रीच्या अगदीं जिवावर येई.


कामगाराला सुखसोयी प्राप्त करून घेण्याइतका पुरेसा पैसा मिळूं लागेल तर समाजांतील प्रत्येकाच्या दृष्टीनें ती फार चांगली गोष्ट होईल, असें आपल्या व्यवसायबंधूंना दाखवून देतां येण्यासाठीं तर आपली ही योजना प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविलीच पाहिजे, हें हेन्रीनें ओळखलें होतें. कामांतली गोडी आणि सद्‌भावना या दोन्ही गोष्टी उद्योगपतींच्या दृष्टीनें अव्यवहार्य या सदरांत मोडत. परंतु या दोन्ही गोष्टींना फार मोठा अर्थ आहे हें हेन्रीला त्यांना पटवून द्यावयाचें होतें. सर्वांच्या कल्याणाचें असेल तें करा, म्हणजे अखेर तें तुमचेंहि कल्याण केल्याशिवाय राहणार नाहीं, हें हेन्रीचें ब्रीद होतें.

हेन्रीला त्याच्या शत्रूंनीं 'भावनेच्या आहारीं गेलेला–नादिष्ट' असलीं शेलकीं विशेषणें बहाल केलीं. इतकेंच नव्हे तर त्याच्या या सर्व योजना म्हणजे स्वतःची टिमकी वाजवण्यासाठीं चाललेला उपद्‌व्याप आहे असा शेरा मारायलाहि त्यांनीं कमी केलें नाहीं.

नव्या योजनेप्रमाणें कित्येक महिने काम चालल्यानंतर हेन्रीनें या झालेल्या कामाचा आढावा घेण्यासाठीं आपले दोनशें 'संशोधक' पाहणीच्या कामावर नेमले. त्या पाहणीवरून असें आढळून आलें कीं मोटार गाड्यांच्या उत्पादनांत वीस टक्क्यांनीं वाढ झालेली होती आणि फोर्ड कारखान्यांतील कामगारांच्या कामाच्या अदलाबदलींतहि चांगलीच घट झालेली होती. तसेंच प्रत्येक माणसाकडून तासागणिक होणाऱ्या उत्पादनांतहि वाढ झालेली होती. मोटारींचे सुटे भाग तयार करणाऱ्या एका इटालियन कामकऱ्यानें आपल्या कामांत तर दुप्पट वाढ करून दाखविली. आपल्या मोडक्या तोडक्या इंग्रजींत हा कामगार त्याबद्दल बोलतांना म्हणाला, "फोर्ड मला दिवसाचे अडीच डॉलर्स देत तेव्हां त्यांना मी अडीचशें भाग तयार करून देई. आतां फोर्ड मला दिवसाचे पांच डॉलर्स देतात, तेव्हां मी त्यांच्या पदरांत पांचशें भाग टाकतों. त्यांनीं दिलेल्या जादा पगाराची भरपाई अशा रीतीनें मी करतों."

कामगारांच्या राहणींतहि भरीव सुधारणा झालेली दिसून आली. अकराशें कामगार आतां पूर्वीपेक्षां अधिक चांगल्या घरांतून राहावयाला गेले होते असें या प्रतिवृत्तावरून दिसून आलें. बँकेंतील त्यांच्या खात्यावर जमा असलेल्या शिलकींतहि दोनशें पांच टक्के वाढ झालेली दिसून आली. याव्यतिरिक्त पंचवीस लक्षांहून अधिक डॉलर इतक्या किंमतीची स्थावर मिळकत डेट्रॉइटमधल्या पूर्वींच्या मालकांकडून फोर्डमधील सेवकवर्गाच्या हातीं आलेली होती. या घरांसाठीं लागणारी रक्कम ते हप्त्याहप्त्यानें दर महिन्याला भरीत असत.

हें प्रतिवृत्त वाचून हेन्रीचें मन प्रसन्न झालें. आतां इतर उद्योगपतींनीं त्याच्यावर दगडमार केली असती तरी त्याची त्याला पर्वा नव्हती. कारण कांहीं झालें तरी आपलाच कित्ता त्यांना गिरवावा लागेल आणि त्यांना कामगारांकडून कमी तास काम घेऊन त्यांच्या हातांत अधिक वेतन टाकावेंच लागेल असें त्याचें मन त्याला सांगत होतें.



" हेन्री, आजच्या दिवसांत काय विशष आहे, कांहीं कल्पना आहे का तुम्हांला ? " क्लारानें न्याहरीच्या वेळीं हेन्रीला विचारलें. न्याहरीचा बेत साधाच होता. पावाचे शेकलेले तुकडे ( टोस्ट ) आणि थोडीं उकड-अंडी.

" आज जुलैचा ३० वा दिनांक आहे. कां आज कांहीं विशेष आहे वाटतं ? "

" म्हणजे काय ? आहेच मुळीं विशेष. आज तुमचा वाढदिवस नाहीं का ? आज तुमच्या वयाला बावन्न वर्षे पुरी झालीं. आणि खरं सांगूं तुमच्या अंगांत एवढी शक्ति या वयांत संचारते तरी कोठून, याचं मला राहून राहून आश्चर्य वाटतं. तुमचा देह म्हणजे खरोखरी वीज निर्माण करणाऱ्या एखाद्या जनित्रासारखा ( डायनॅमो ) आहे ! "

हेन्रीच्या डोक्यावरील केंस आतां पिकूं लागलेले होते. एवढी गोष्ट सोडली तर तो चाळीशीच्या घरांत असतांना जसा उंच सडपातळ दिसे

## स त रा वें प्र क र ण

तसाच आजहि दिसत होता. जीवनाची व कर्तृत्वाची उमेद आजहि त्याच्या पाणीदार डोळ्यांत चमकत होती.

" बावन्न ! –हात्तीच्या, याच वयाला कुठं माणसाला अक्कल फुटायला लागते. माझ्यापुरतं म्हणशील तर वीस वर्षांपूर्वी मी जसा टुणटुणीत होतों तसाच आज आहें असं मला वाटतं. "

" पण किनई, मी काय म्हणतें कीं आतां जरा धांवपळ कमी करून जिवाला जरा आराम होईल असं नको का वागायला ? आजवर थोडे का कष्ट उपसलेत ? "

" धांवपळ कमी करूं ? काय म्हणतेस काय, क्लारा ? आतां तर कुठं मी कामाला आरंभ केलाय् ! "

हेन्रीनें एकादा निश्चय केला कीं तो त्याला बदलायला लावण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें तिला फार दिवसांच्या अनुभवानें पक्कें कळून चुकलेलें होतें. तिला हेंहि ठाऊक होतें कीं हेन्रीला हात जोडून स्वस्थ बसायला लावणें म्हणजे त्याला दुःखी कष्टी करणें आहे. त्याची कृश मूर्ति आणि त्याचे यंत्रविशारदाचे बळकट हात यांना थकवा कसा तो माहीत नव्हता. समाजांत मिसळणें किंवा रूढ करमणुकीचे प्रकार यांच्याविषयीं तो पूर्णपणें उदास होता. त्याचें काम हीच त्याची करमणूक होती.

" तुम्हांला ठाऊक आहे ना ! " मागील काळांत दूर कोठेंतरी तिचें मन डोकावतें आहे असा भाव तिच्या डोळ्यांत दिसत होता. ती म्हणाली, " हेन्री फोर्ड पुढें मागें जगांत नांव काढल्याशिवाय राहाणार नाहीं, असें माझ्या आईपाशीं मी बोलल्याचें मला आठवतें.. परंतु त्यावेळीं माझ्या मनाला अशी कल्पनासुद्धां नव्हती कीं त्याच्या कर्तृत्वामुळें देशभर १९१५ सालांत लाखों छोट्या बिनघोड्याच्या गाड्या खडखडत असतील. "

" T धर्तीच्या ( मॉडेल ) गाडीसंबंधीं तुला जरा जपूनच बोलायला हवं बरं का क्लारा. ती कांहीं खडखडत जात नाहीं. आतां तर आपल्याला ती चालू करण्यासाठीं दांडाहि फिरवावा लागत नाहीं. " हेन्री गंमतीनें म्हणाला. " आतां तिच्यांत कितीतरी सुधारणा झालेल्या असून विद्युदुत्पादक ( Generator ), स्वयंचालक ( Self-Starter ), वेगमापक

( Speedometer ), विजेरी ( Battery ), बंदिस्त शरीर ( Closed body ) आणि कांचेच्या खिडक्या इत्यादि बसविण्यांत आलेल्या आहेत. एवढेंच नाहीं तर तिच्यांत सतत सुधारणा करण्याचा आमचा यत्न असतो. आणि सांगूं का क्लारा, तुझें पण या फोर्ड गाड्यांवर फार मोठें ऋण आहे. पहिल्या फोर्ड गाडीचा संक्रतिमार्ग तूं आणि मीच होतों."

"तसं मी न करतें तर तुमची सहधर्मचारिणी म्हणून व्हायला मला काय अधिकार होता!" क्लारा सात्विक संतापानें म्हणाली. "आपल्या तरुण जोडीदारावर पूर्ण विश्वास असल्यावांचून कोणतीहि युवति त्याच्याशीं लग्न करीत नाहीं. आतां मला माझ्या स्वतःच्या टोप्या ( Hats ) आपल्या हातानें विणाव्या लागत नाहींत याचें अर्थातच समाधान वाटतें. खरोखरच त्या कशातरीच दिसायच्या. पण तें राहूं दे. अगोदर तुमच्या वाढदिवसा-संबंधीं–आज रात्रीं जेवायला काय करूं ?"

"ती आपली सांजोरी ( Pie ) केली तर कसं ? आहारशास्त्राच्या दृष्टीनं ती चांगली पोषक असते नाहीं ? तीच कर." हेन्री मेजावरून उठला आणि कारखान्यांत जावयाला निघाला.

"हेन्री," क्लारा थोडा विचार करीत म्हणाली, "आतां सर्व जम चांगला बसलेला आहे कारखान्याचा. एडसेलहि कारखान्यांत मनापासून काम करूं लागलेला आहे. तेव्हां आतां आपण थोडीं बाहेर गेलों तर कसें ?"

१९१२ मध्यें शाळेचा अभ्यासक्रम पुरा केल्यावर एडसेल फोर्ड कंपनीमध्यें कामावर जाऊं लागलेला होता. कामगारांनाहि तो आवडता झाला होता. आणि कारखान्याचीं सूत्रें सांभाळण्याला लायक असल्याची ग्वाही तो देऊं लागला होता.


"सहलीला जायचं म्हणतेस ? कुठं जाऊं या आपण ?"

"मला आपलं गांवाकडे जावंसं वाटतं. जुन्या मित्रमंडळींच्या गांठीभेटी होतील. आणि नाचाच्या ( Square Dances ) कार्यक्रमांनाहि जातां येईल." गतकालीन स्मृति क्लाराच्या डोळ्यांत तरळूं लागल्या आणि ते नक्षत्रांप्रमाणें चमकूं लागले.

" छान ! माझ्याहि मनांत तेंच आलें. " हेन्‍री उत्साहानें उद्‍गारला. " नाहींतरी मला आपल्या शेतापासच्या नुकत्याच घेतलेल्या १००० एकर जमिनीवरच्या कामाची कांहींतरी व्यवस्था लवकरच लावायला हवी. तिथे आपल्याला नवीन कारखाना उभारायचा आहे. या नवीन कारखान्याचं नांव योजलं आहे. ' रिव्हर रुज प्लँट ' ( रुज नदीकांठचा कारखाना ). सध्यां जगांत याच्याएवढा मोठा दुसरा कारखाना पहावयास मिळणार नाहीं. आणि त्या जुन्या यंत्र-घरांतहि ( Machine Shop ) कांहीं कामें अपुरींच राहून गेलीं आहेत, तीं एकदां पुरतावून टाकायला हवींत. "

" मला वाटतें, आपण विश्रांतीसाठीं जायचं आहे ना गांवाकडे ! " क्लारानें उसासा टाकला.

" विश्रांति ? छट् ! मागं एकदां मी एक वहित्र (Locomotive) बांधीत होतों आठवतं तुला ? कांहींसं चाळीस एक पावलेंच पळालं तें बेटं. आतां माझ्या मनांत एक हलयंत्र म्हणजे यांत्रिक नांगर ( Tractor ) बनवायचं आलं आहे. तो साऱ्या जगभर फिरेल. त्याचं बारसं मी 'फोर्डसन्' असं करणार आहें."



डिअरबोर्न येथें हेन्री आणि क्लारा यांचा काल फार मजेंत गेला. यांनीं आपल्या जुन्या मित्रांच्या गांठीभेटी घेतल्या आणि अधून मधून नाचाच्या कार्यक्रमांनाहि तीं गेलीं. तिथे असतांनाच त्यांनीं रुज नदीच्या कांठीं एक दगडी घर बांधायचें ठरवून टाकलें. डिअरबोर्न येथें परत राहायला यावें असें क्लाराला राहून राहून वाटायचें. त्यामुळें ही घर बांधायची कल्पना तर तिला फारच आवडली. हेन्रीसाठीं शहरी गजबजाटापासून दूर असें एखादें निवांत घर नाहींतरी आतां हवेंच होतें. हें तिच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. कारण हेन्रीची गणना आतां राष्ट्रीय विभूतींमध्यें होऊं लागलेली होती.

उद्योगधंद्याच्या इतिहासांतील हेन्रीची कामगिरी खरोखरी अद्वितीय होती. आतां त्याच्या कल्पना, त्याचा वेळ नि त्याचा पैसाहि प्रत्येकाला हवाहवासा वाटत होता.

हेन्रीनें रुज नदीच्या कांठचा १००० एकर दलदलीचा पट्टा विकत घेतला. आणि हायलंड पार्कमधील मोठ्यांतल्या मोठ्या मोटार कारखान्यापेक्षां कितीतरी पटीनें मोठा असा कारखाना तेथें उभारावयाचा असा संकल्प मनोमन करून टाकला. ही जागा त्याच्या मनांत भरण्याचीं कारणें अनेक होतीं. येथें त्याला जलमार्गानें वाहतूक करतां येणार होती, कारखान्याच्या

## अठरावें प्रकरण

भावी विस्ताराच्या दृष्टीनें वाव होता आणि कारखान्यांतील कामगारांना स्वत:साठीं घरें बांधायला भरपूर क्षेत्र होतें. कच्चा माल मिळण्याच्या दृष्टीनेंहि हें ठिकाण अगदीं योग्य होतें. उत्तरेकडच्या लोखंडाच्या खाणी आणि दक्षिण-मध्य विभागांतील कोळशाच्या खाणी यांच्या मधोमध हें स्थान होतें. 'ग्रेट लेक ' सरोवरावर वाहतूक करणाच्या फोर्डच्या नावांतून लोहखनिज डिअरबोर्न येथें आणतां येण्यासारखें होतें.

याच मुक्कामांत हेन्रीनें यांत्रिक नांगरासंबंधीं प्रयोग करून पाहिले. आणि थोड्याच दिवसांत शेतकऱ्यांचे कितीतरी काबाडकष्ट वांचविणाऱ्या हलक्या वजनाच्या 'ट्रॅक्टर'चें उत्पादन त्याला करतां येण्याची शक्यता उत्पन्न झाली होती.

मध्यंतरीच्या काळांत युरोपमध्यें उसळलेल्या महायुद्धाच्या डोंबाची झळ अमेरिकनांनाहि लागूं लागली होती. १९१४ मध्यें ऑस्ट्रियाचा आर्च ड्यूक फर्डिनांड आणि त्याची पत्नी यांचा खून झाला. त्यानंतर महिन्या-भरानें जर्मनीनें बेल्जमवर झडप घातली आणि रशियन सैन्य जर्मनीवर चाल करून निघालें. इंग्लंड, फ्रान्स आणि बेल्जम हे देश तर युद्धाच्या प्रत्यक्ष खाईंत लोटले गेले. आणि यानंतर चार वर्षेंपर्यंत खंदकी लढाईची रेंगाळ चालू राहिली.

ब्रिटिश लोक मदतीचीच वाट पाहात होते. जर्मन पाणबुड्यांनीं ब्रिटनची सागरी मार्गानें येणारी रसद मारण्याचा सपाटा लावल्यानें तेथें धान्यटंचाई जाणवूं लागली होती. परंतु धान्य पिकवण्यासाठीं नांगरटीच्या घोड्यांचीहि वाण भासूं लागली होती. ब्रिटिशांच्याजवळ वाफेच्या शक्तीवर चालणारे कांहीं थोडे यांत्रिक नांगर ( ट्रॅक्टर ) होते. तेथील सर्व कारखाने दारूगोळा आणि इतर युद्धसाहित्य बनविण्यांत गुंतलेले होते. तेव्हां इंग्लंडनें हेन्रीकडे धांव घेतली. हेन्रीनें ह्या यंत्राचे आपले आराखडे व आकृत्या आणि तज्ज्ञ मंडळी इंग्लंडकडे लगेच धाडून दिली. त्याबरोबरच निर्मिती-साहाय्यकांची मोठी कुमकहि पाठविली. हेन्रीच्या या पहिल्या यांत्रिक नांगराचें नांव 'फोर्डसन्' होतें. परंतु त्याचें पहिलें उत्पादन मात्र प्रथम अमेरिकेंत न होतां अशा तऱ्हेनें इंग्लंडमध्यें झालें.

युद्धामुळें हेन्री उद्विग्न झाला होता. तो शांततेचा कट्टा पुरस्कर्ता होता. वार्ताहराशीं बोलतांना तो एकदां म्हणाला, "देशोदेशींच्या लोकांनीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं यंत्रामधील वेगवेगळे भाग एकमेकांशीं जसे निगडीत असतात आणि एका ठिकाणीं बिघाड उत्पन्न झाल्यास ज्याप्रमाणें सबंध यंत्र बंद पडतें, त्याचप्रमाणें एका जनसमूहाला किंवा राष्ट्राला धोका उत्पन्न झाल्यास त्याचें दुष्परिणाम जगांतील इतर लोकांनाहि भोगावे लागतातच." हेन्रीच्या मतें युद्धें म्हणजे सर्व दृष्टीनें नासाडी, असें समीकरण होतें.

जगांतील तटस्थ राष्ट्रांचे शांतिदूत हेन्रीच्या भेटीसाठीं येऊं लागले. युद्ध थांबविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांत सहकार्य करण्यास अमेरिकेच्या सरकारानें त्यांस नकार दिल्यानें हेन्रीनें या कामीं पुढाकार घेतल्यास चांगलें होईल असें त्यांना वाटत होतें.

जगामध्यें शांतता नांदावी आणि या कामीं सर्व लोकांना साहाय्य करावें या त्याच्या तळमळीपायीं त्याला बरेच कटु अनुभव आले. त्यानें राष्ट्राध्यक्ष विल्सन यांची गांठ घेऊन मध्यस्थीसाठीं एक तटस्थ समिति नेमावी अशी विनंती केली. शांततेसाठीं धडपडणाऱ्या इतर अनेकांच्याप्रमाणेंच हेन्रीच्या पदरींहि या बाबतींत अपयश आलें. तेव्हां त्यानें दुसराच एक उपाय योजण्याचें ठरविलें. एक स्वतंत्र जलनौका भाड्यानें घेऊन इतर कांहीं अमेरिकन मित्रांसह युरोपमध्यें जावयाचें आणि युद्ध थांबविण्याचा प्रयत्न करावयाचा असा त्याचा बेत होता.

हेन्रीनें वॉशिंग्टनहून दूरबोलीवरून (टेलिफोन) क्लाराला म्हटलें, "आपल्याला युरोपांत जायला निघायचें आहे."

"मला त्यांत ओढूं नका" क्लारानें स्वच्छ सांगितलें.

"आपल्याला एक लेकरूं आहे आणि तुमच्याप्रमाणेंच त्याच्याबद्दलहि माझें कांहीं कर्तव्य आहेच. आपलें कांहीं बरेंवाईट झालें तर एडसेल पोरका होईल."

हेन्रीची मित्रमंडळी क्लाराकडे येऊन हेन्रीचें मन वळविण्याविषयीं विनवूं लागली. परंतु क्लारानें हेन्रीच्या आड न येण्याचें ठरविलें. कारण

तिला हेन्रीचा स्वभाव पुरा कळून चुकलेला होता. त्याला जी गोष्ट करणें योग्य आहे असें वाटत असे ती तो केल्यावांचून कधींहि राहावयाचा नाहीं हें तिला एव्हांना पक्कें कळून चुकलेलें होतें. खरें म्हणजे तिच्या मनांत सुद्धां हेन्रीनें जाऊं नये असेंच होतें. परंतु ती निमूटपणें त्याच्या प्रवासाची तयारी करून देऊं लागली.

आणि डिसेंबर १९१५ मधील पहिल्या पंधरवड्यांतील एका काळोख्या रात्रीं न्यूयॉर्कहून डॅनिश जहाज ' ओस्कार-२', हेन्री आणि त्याचे सहकारी यांना घेऊन युरोपला जावयास निघालें.

हेन्रीच्या मतांना आतां त्याचीं वैयक्तिक मतें इतक्याचपुरतें महत्त्व उरलेलें नव्हतें. वृत्तपत्रवार्ताहर त्याच्या पाठोपाठ सांवलीप्रमाणें उभे असत. आणि हेन्रीच्या सदिच्छा-कार्याचा विपर्यास त्यांनींच आरंभिला. एकीकडे युद्धाचा डोंब उसळलेला असतांना आणि सबंध महासागरामध्यें पाणबुड्यांचा सुळसुळाट झालेला असतांना वृत्तपत्रें म्हणूं लागलीं, कीं " हे मोठे शांतिदूत आतां बोटी भरभरून शांततेचा संदेश युद्धमान राष्ट्रांना द्यावयास निघाले आहेत ! " सनसनाटी वार्तांसाठीं हपापलेले वृत्तपत्र-संपादक आणि वार्ताहर यांना या शांतिनौकेमुळें एक घबाडच मिळाल्यासारखें झालें. त्यावेळच्या वृत्तपत्रांचे कांहीं मथळेच पाहा :

" खंदकांवर योजनांचे हल्ले ! "

" मोटार-राजाच्या सेनापतित्वाखालीं शांतिसेनेचें युरोपकडे कूच ! "

शत्रुराष्ट्रांमध्यें परस्पर विचारविनिमय होण्याच्या दृष्टीनें कांहीं मार्ग काढतां आला तर पाहावा अशी हेन्रीची मनीषा होती. त्याला असेंहि वाटत होतें कीं उभय पक्षांना युद्धाचा आतां उबग आलेला असून दोन्हीकडचे श्रेष्ठी एखाद्या मध्यस्थाकरवीं एकमेकांशीं बोलणीं करण्यास सिद्ध होतील. " सतत मध्यस्थी " प्रयत्न चालू ठेवल्यास हेन्रीच्या मतें उभयपक्षांकडून जगामध्यें शांततेचें वातावरण निर्माण करण्याची इच्छा मूळ धरूं लागण्याचा संभव होता. वृत्तपत्रांनीं या " नवथर मुत्सद्यांच्या " " सतत मध्यस्थी " योजनेची टिंगल करण्याची एकहि संधी वायां जाऊं दिली नाहीं. आणि

त्यांच्यातील एकाहि महाभागानें हेन्रीची मूळ योजना तरी काय आहे हें पाहाण्याचे सुद्धां कष्ट घेतले नाहींत.

हेन्रीची शांतिनौका नॉर्वेच्या आणि इतर युरोपियन किनाऱ्यांना लागण्यापूर्वींच आपलें कार्य तडीस जाणें शक्य' नाहीं याची जाणीव हेन्रीला झाली. शांतता प्रस्थापनेसाठीं कोणत्याहि प्रकारची मध्यस्थी चालूं देण्याच्या मनस्थितींत युरोपांतील एकहि देश नव्हता. हेन्रीची शांतियात्रा असफल ठरली, परंतु त्याच्या या प्रयत्नानें एक गोष्ट मात्र सिद्ध झाली ती अशी कीं जगामध्यें शांततेचा वाली एकतरी उभा आहे. आणि यामुळेंच जगांतील लक्षावधि व्यक्तींनीं हेन्रीची मानसपूजा त्याच्या या प्रयत्नासाठीं आरंभिली.

१९१७ मध्यें जर्मनीनें पाणबुड्यांचा सरसकट वापर करून सागरावरून जाणारी प्रत्येक नौका बुडविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर दोनच दिवसांनीं युनायटेड स्टेट्सनें जर्मनीशीं असलेले राजनैतिक संबंध तोडून टाकले. अमेरिकेंतील प्रत्येक संस्थानांतून सैन्यभरती मोठ्या प्रमाणावर सुरू झाली, आणि या " रंगरूटां "च्या शिक्षणाचें कामहि भरवेगानें चालू करण्यांत आलें. एप्रिलच्या ६ दिनांकाला अमेरिका जर्मनीविरुद्ध युद्धांत उभी ठाकली आणि सहस्रावधी अमेरिकन सैनिक युरोपांत उतरले.

हेन्रीनें आपल्याजवळच्या संघटनेचा उपयोग सरकारला सर्वतोपरी करून दिला आणि असें करतांना त्यानें वैयक्तिक लाभाचीहि दृष्टि ठेवली नाहीं. तो म्हणाला, " **युद्धांत जय मिळावयाचा असेल तर तो ज्या राष्ट्रापाशीं यंत्रें आणि हत्यारें वापरण्याचें ज्ञान असेल त्याच राष्ट्राला मिळेल.** " हेन्रीच्या कारखान्यांतून मालवाहू गाड्या, शुश्रूषा-गाड्या, भुईसुरुंगाची अवजारें, श्रवणयंत्रें, जिरेटोप( Steel Helmets )व विमानासाठीं विमोचक वहित्रें ( Liberty motors ) आणि पाणबुड्यांसाठीं गरुड नौका ( Egal Boats ) भराभर बाहेर पडूं लागल्या.

१९१८ मध्यें शस्त्रसंधी होतांच हेन्रीनें परत आपलें लक्ष मोटारगाड्या, मालवाहू गाड्या आणि यांत्रिक नांगर बनविण्याकडे वळविलें. यांत्रिक नांगराचें स्वागत शेतकऱ्यांनीं हर्षभरानें केलें. घोड्याला जीं जीं म्हणून कामें करतां येत तीं तीं सर्व या यांत्रिक नांगराकडून त्यांना करून घेतां येत. हं! घोड्यांप्रमाणें माश्यांना तेवढें यांत्रिक नांगराचें आकर्षण वाटत नव्हतें! नांगरटीचें काम असो, लावणीचें असो किंवा मशागतीचें असो हे यांत्रिक नांगर प्रत्येक कामाचा फडशा एकतृतीयांश वेळेमध्यें पाडीत. आणि एरव्हीं हाताला जे फोड यावयाचे किंवा जी पाठमोड व्हावयाची तीहि व्हावयाचें आतां कारण उरलें नव्हतें.

शेतकऱ्यांना मोटारींची चटक आधींच लागलेली होती. आतां त्यांचें यांत्रिक नांगरावांचूनहि अडूं लागलें. यांत्रिक शक्तीचा परिचय शेतकऱ्यांना आतां घडलेला होता. आतां त्यांना नवीं हत्यारें नको होतीं तर असलेलीं हत्यारें वापरण्यासाठीं आवश्यक अशा यांत्रिक शक्तीची गरज होती. मोटारगाडी बनवितांना हेन्रीचें जें धोरण होतें तेंच त्यानें यांत्रिक नांगर सिद्ध करतांना अवलंबिलें. यांत्रिक नांगराचा प्रत्येक भाग शक्य तेवढा बळकट करण्यांत आलेला होता. भागांची संख्याहि मर्यादित ठेवण्यांत आली होती. मोटारची आणि यांत्रिक नांगराची रचना करतांना हें ध्यानांत ठेवणें आवश्यक होतें, कीं मोटार वाहतुकीसाठीं असते, तर यांत्रिक नांगर हा खेंचण्यासाठीं आणि चढण चढण्यासाठीं असतो. कार्य-परत्वें या दोन्ही यंत्रांच्या रचनेमध्यें अर्थातच जमीनअस्मानाचें अंतर पडलें.

---

## एकोणिसावें प्रकरण

---

हलयंत्राला पडणाऱ्या भारी खेंचकामांत टिकतील अशीं बेअरिंग (Bearings) कशाचीं करावयाची हा प्रश्न हेन्रीला सर्वांत जड गेला. हेन्रीनें बनविलेल्या यांत्रिक नांगरावर चार 'भांड्यांचें' (सिलिंडर्स) वहित्र (एंजिन) बसविलेलें होतें. तें घासलेटावर चाले. मात्र तें चालू करतांना पेट्रोलचा उपयोग करावा लागे. वजनानें हलक्यांत हलका यांत्रिक नांगर २४२५ पौंडांचा असे. मात्र बळकटीच्या दृष्टीनें त्यांत कोणतेंहि वैगुण्य नव्हतें. याची पकड मांजराच्या पंजाप्रमाणें त्याच्या चालकचक्रांवरील 'कानां'मध्यें होती

फोर्डचें हलयंत्र (ट्रॅक्टर) खेंचकामाव्यतिरिक्त ठाणबंद एंजिनाप्रमाणेंहि काम देई. जेव्हां शेतामध्यें काम चालू नसे तेव्हां पट्टा टाकून इतर यंत्रें त्याच्या एंजिनावर चालवितां येत. नांगरणें, खणणें, बेणणें इत्यादि कामांबरोबरच याचा उपयोग झोडणी करणें, चक्की चालविणें, खुंट उपटून टाकणें किंवा शेतावर पडलेलें बर्फ नांगरून टाकणें इत्यादि कामीं होई.

पहिल्या महायुद्धाच्या काळांत अमेरिकन सरकारनें 'फोर्डसन' हलयंत्र (ट्रॅक्टर) आणि घोडे यांच्यापासून मिळणाऱ्या कामासंबंधीं आणि त्यासाठीं येणाऱ्या खर्चासंबंधीं गोळा केलेले तौलनिक आंकडे पुढीलप्रमाणें होते:

(अ) 'फोर्डसन,' मूल्य ८८० डॉलर्स. उपयुक्त स्थितींत प्रत्येक तासास $\frac{४}{५}$ एकर याप्रमाणें एकूण ४८०० तास काम देऊन एकूण ३८४० एकर भूमि नांगरतो.

| | |
|---|---|
| ३८४० एकरांना ८८० डॉलर; एकरीं घसारा........ | .२२१ |
| ३८४० एकर नांगरटीसाठीं दुरुस्तीचा खर्च १०० डॉलर; एकरीं दुरुस्ती ........................ | .०२६ |
| इंधन-व्यय, गॅलनला १९ सेंट या दरानें घासलेट एकरीं २ गॅलन........................... ... | .३८ |
| चालकाचें पारिश्रमिक दिवसास दोन डॉलर, ८ एकर; एकरी पारिश्रमिक........................ | .२५ |
| ८ एकरांस $\frac{३}{४}$ गॅलन वंगण; एकरीं वंगण-व्यय ........ | .०७५ |
| 'फोर्डसन्'नें नांगरटी करण्यास पडणारा खर्च; एकरीं ........................... डॉलर्स | ०·९५ |

(आ) ८ घोडे, मूल्य १२०० डॉलर. उपयुक्त जीवित तासाला $\frac{4}{5}$ एकर नांगरटी याप्रमाणें ५००० तास, ४००० एकर.

| | |
|---|---|
| ४००० एकरांस १२०० डॉलर; एकरीं घसारा सर्व घोडयांमागें........ .................. | ०·३० |
| प्रत्येक घोडयाची चंदी, ४० सेंट ( १०० दिवस काम ), एकरीं......................... | ०·४० |
| प्रत्येक घोडयाची चंदी, दिवसाला १० सेंट (२६५ खाडयाचे दिवस) एकरीं......................... | ०·२६५ |
| दोन नांगऱ्ये प्रत्येकीं ४ घोडयांचा नांगर चालविणारे, दिवसाला २ डॉलरप्रमाणें, एकरीं........... | ०·५० |

घोडयानें नांगरटी करण्यास येणार व्यय–एकरीं......डॉलर्स १.४६

अशा प्रकारें यांत्रिक नांगरट हा आधुनिक प्रकार रूढ होऊं लागला आणि तो स्वस्तहि होता. वार्ताहरांशीं हलयंत्रा-ट्रॅक्टर-संबंधीं बोलतांना हेन्रीनें सांगितलें कीं, "कोणत्याहि उपयुक्त प्राण्याचें काम त्याच्यापासून आपल्याला हिरावून घेण्याचा अधिकार नसला तरी त्याबरोबर हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं यांत्रिक नांगरटीमुळें शेतकामांतील अकारण कावाडकष्टांचीहि आवश्यकता उरत नाहीं. स्नायु आणि रक्त यांच्यावरील भार यांत्रिक नांगराच्या उपयोगानें पोलादाकडून उचलला जातो."

क्लारा झाली काय किंवा स्वतः हेन्री काय त्यांना श्रीमंती डामडौलाचें आणि ऐषारामाचें आकर्षण असें केव्हांच नव्हतें. कधीं मधीं जुन्या मित्रमंडळींना बोलावून त्यांच्याशीं सुखदु:खाच्या चार गोष्टी करण्यांत अर्थातच त्यांना आनंद वाटे. त्यांच्यापाशीं असलेल्या विस्तीर्ण भूमीविषयीं त्यांना जिव्हाळा वाटे. हेन्रीला अंवतींभोंवतींच्या प्रदेशांतून फेरफटका करून येणें आवडत असे. असा फिरावयास गेला म्हणजे हेन्री कुंपणांबांधांवरून उडया टाकीतहि जात असे. त्यानें त्याच्या विस्तृत क्षेत्रावर पांचशें चिडिया-घरें ( Bird Houses ) ठेवून दिलीं. यांना तो "पक्ष्यांचीं उपाहारगृहें"

असें म्हणे. हॉटेल पाँटचार्ट्रेनचें भवन प्रचंड असें असून त्यांत एकंदर ७६ बिन्हाडांची सोय होती. चिकुर ( Wren ) पक्ष्यांना झुलतीं घरटीं आवडतात, हें ओळखून त्यानें या उपाहारगृहांत कितीतरी पेटचा या पक्ष्यांसाठीं बनवून घेऊन त्या पोलादी कमानीवर ( Springs ) अडकवून दिल्या; वारा आला कीं या पेटचा डौलानें झुलूं लागत. आणि चिकुर आनंदानें झोके घेत असत.

थंडीच्या दिवसांत तो झाडांवरून तारेच्या शिंकाळचांत पक्ष्यांसाठीं चारा टांगून ठेवी. थंडी असली तरी पक्ष्यांना पाणी लागणारच. हिंवाळचांत बाहेरच्या थंडीनें तें गोठूं नये म्हणून पाण्याचें घंगाळ विजेच्या शेगडीवर तापत ठेवलेलें असे. उन्हाळचांत तो त्यांच्यासाठीं झाडांवरचीं उरलीं सुरलीं बोरें ( Cherries ) आणि स्ट्रॉबेरी आणवीत असे.

एके दिवशीं सायंकाळीं हेन्री घरीं परतला. हातांतील एक मासिक क्लाराला देत तो म्हणाला, " याच्यांतला हा लेख वाचशील का जरा ?" हें म्हणत असतां त्याच्या मुखावर मिस्किल हास्य विलसत होतें.

" हा तर जॉन बरोजचा, म्हणजे त्या सुप्रसिद्ध सृष्टिशास्त्रज्ञ लेखकाचा लेख दिसतोय्. " क्लारा हातांतील मासिकाचीं पानें चाळीत उद्गारली.

" आधुनिक सुधारणांविषयीं याला तिटकारा वाटतो, " हेन्रीनें स्पष्टीकरण केलें. " आगगाडचांचा तो खडखडाट आणि कारखान्यांचा गोंगाट त्याला मुळीं आवडत नाहीं. औद्योगिक प्रगतीमुळें माणसाच्या हातांत जी संपत्ति आणि सत्ता येते तिचा दुरुपयोग करून तो अंवतींभोंवतींची सृष्टिशोभा नाहींशी करून टाकतो असें याचें म्हणणें आहे. मोटारगाडीमुळें निसर्गसौंदर्याविषयींची माणसाची आवडच नाहींशी होईल असेंहि म्हणण्याचें धाष्टर्च तो करतो. "

" म्हणजे हें काय बोलणं झालं ?" क्लारा उसळून म्हणाली. " कुणीतरी त्याला नीट ठिकाणावर आणायला हवंय् आणि त्याला हें पटवून द्यायला हवंय् कीं मोटारगाडीमुळें उलट निसर्गाविषयींची आवड वाढीलाच लागेल !"

"तेंच तर मी केलं" हेन्री कांहींशा अभिमानानें क्लारापुढें एक पत्र फडफडवीत म्हणाला. "खरं म्हणजे हा लेख प्रसिद्ध होऊन बरेच महिने झाले. तो वाचल्यानंतर मी बरोज महाशयांना एक फोर्ड गाडी धाडून दिली आणि त्या गाडीबरोबरच एक पत्रहि धाडून दिलं. त्यांत लिहिलं होतं, कीं 'पहा तर खरं या गाडींतून हिंडून तुमच्या निसर्गविषयक ज्ञानांत कांहीं भर टाकतां येते का तें.' आणि आतांच हें उत्तर आलं. त्यांनीं लिहिलंय् कीं स्वत: गाडी हांकतांना त्यांना प्रथम थोडे कष्ट पडले पण नंतर मात्र त्यांचा दृष्टिकोण संपूर्णपणें पालटला. गाडीतनं हिंडून आतां त्यांना पूर्वींच्यापेक्षां कितीतरी जास्ती हिंडतां फिरतां येतं, पहातां येतं. आणि त्यांनीं आतां आपला निश्चय व्यक्त केलाय् कीं यापुढें पक्ष्यांच्या शिकारीला निघतांना ते गाडीच्या सुकाणूं-चाकावर हात ठेवूनच निघतील."

"एवढया म्हातारपणीं त्यांनीं इतकं करणं म्हणजे खरोखरी नवलच आहे, नव्हे का! मग तुम्ही असं कां नाहीं करत–आपल्या घरीं यायचं आमंत्रणच देऊन टाका नं त्यांना!" क्लारानें सुचविलें. बरोज यांची पुस्तकें हेन्रीला किती आवडतात हें तिला ठाऊक होतें.

हेन्रीनें उत्साहित होऊन संमति देत म्हटलें, "खरोखरच, किती छान कल्पना आहे!"

आणि श्री. जॉन बरोज फोर्ड कुटुंबियांकडे पाहुणे म्हणून आलेहि. त्यानंतर फोर्ड आणि बरोज यांच्यांतील मैत्री दिवसानुदिवस वाढतच गेली. उत्तरेकडील संस्थानांतून फोर्डच्या इतके पक्षीसंग्राहक दुसऱ्या कोठेंहि बरोज यांना आढळून आले नाहींत. इतकेंच नव्हे तर येथें आढळून येणारी विविधता अन्यत्र क्वचितच पाहावयास सांपडेल असेंहि त्यांचें मत बनलें.

बरोज यांच्या मतपरिवर्तनाची वार्ता त्यांच्याच मुखानें ऐकल्यावर हेन्रीला साहजिकच खूप आनंद झाला. कारण आधुनिक औद्योगिक संस्कृति-संबंधींचें हें मतपरिवर्तन घडवून आणण्यांत त्याचाहि हातभार लागलेला होता. बरोज म्हणाले होते, "हेन्री, सारं जग कांहीं पक्ष्यांचीं घरटीं धुंडाळण्यावरच जगूं शकणार नाहीं हें आतां मला कळून चुकलंय्."

असेंच एकदां बोलतां बोलतां हेन्री बरोज यांना म्हणाला, " जॉन, माहिती आहे का तुम्हांला, फोर्ड संघटनच्या साहाय्यानें नैर्बंधिक बनाव घडवून आणण्याचा प्रयत्न आयुष्यांत आजवर मी एकदांच केलेला आहे आणि तो केवळ या पक्ष्यांसाठीं. आणि मला वाटतं कीं माझं हें करणं रास्तच होतं. " यावेळीं बरोज यांच्या मुखावर झळकलेलं तें स्मित आणि त्यांची ती शुभ्र दाढी यांच्यामुळें पाहाणाराला सांताक्लॉसच्या बटु मूर्तीचीच आठवण झाली असती.

हेन्रीनें पुढें स्पष्टीकरणार्थ म्हटलें. " वीक्स-मॅक्लीन पक्षी संरक्षक विधेयकासंबंधीं सांगायचंय् मला. तें जेव्हां अमेरिकन काँग्रेसपुढें चर्चेसाठीं आलें तेव्हां तें बारगळणार असा रंग दिसूं लागला होता. वस्तुत: या विधेयकामुळें देशांतर करणाऱ्या पक्ष्यांची सोय लागणार होती. परंतु त्याचे जे प्रत्यक्ष पुरस्कर्ते होते त्यांना त्यासंबंधीं काँग्रेसच्या सदस्यांमध्यें फारसा उत्साह कांहीं निर्माण करतां आला नव्हता. " असें म्हणून हेन्रीनें त्वेषानें आपली मूठ वळवून टेबलावर जोरानें आपटली. " आणि याचं कारण काय–तर पक्ष्यांना मताधिकार नाहीं म्हणून! " हेन्री उपरोधानें पुढें म्हणाला.

बरोज महाशयांनीं हेन्रीचा रागीट आविर्भाव पाहून आपलें हंसूं दाबण्याचा निष्फळ प्रयत्न केला. राजकारणी मंडळींसंबंधीं त्यांचाहि ग्रह कांहीं नेहमींच फारसा अनुकूल नसे. " तेव्हां, " हेन्री पुढें बोलूं लागला, " ही परिस्थिती मला दिसून येतांच आम्हीं हें विधेयक उचलून धरायचं ठरवलं. पहिली गोष्ट आम्हीं जी केली ती अशी कीं आमचे जे सहा सहस्र प्रतिनिधि होते त्यांना काँग्रेसच्या सदस्यांना तारा करण्यास सांगितल्या. पक्ष्यांनाहि मतं असावींत असं आतां या काँग्रेसच्या सदस्यांना हळूहळू वाटायला लागलं. परिणाम—विधेयक संमत झालं ! "

यापुढें हेन्री, टॉमस एडिसन, हार्वे फायरस्टोन ( रबरी धावांचे कारखानदार ) आणि बरोज वारंवर एकत्र सहलींसाठीं जाऊं लागले. हा उपक्रम बरोज यांचा १९२१ त अंत होईपर्यंत चालला. या सहलींतून या मंडळींनीं रांगड्या जीवनाचा अनुभव घेतला. अक्षरश: ' स्वयंपाक ' करून तें अन्न चाखलें. त्यांची हीं स्वैर भटकणीं मोटारगाड्यांच्या काफिल्यांतून चालावयाचीं. रात्रीच्या वेळीं ही सर्व मंडळी राहुट्या ठोकून त्यांत झोंपावयाची. खरोखरीच

मौजेच्या होत्या या सहली. बरोज, एडिसन आणि फायरस्टोन यांना या सहलींतून विरंगुळ्याचे क्षण लाभावयाचे; पण हेन्रीला मात्र तेंहि भाग्य लाभत नसे. झुळझुळ वाहणारा ओढा पाहिला, कीं हेन्री त्याच्या कांठा-कांठानें मागें-पुढें धांवत जायचा, पाणी किती उंचीवरनं पडत आहे, या पडत्या पाण्याच्या पोटांत केवढी शक्ति सांठवलेली आहे, ती आपल्याला कारणीं कशी लावतां येईल हें जाणण्याचें जणूं आवाहनच तो खळखळणारा ओढा त्याला करी. या वांया जाणाऱ्या जलशक्तीचा उपयोग करून घेतां आला तर भोंवतालच्या प्रदेशाचा केवढा लाभ होईल, किती उपयुक्त उद्योगधंदे या शक्तीच्या बळावर काढतां येतील, किती शेतकऱ्यांना आणि नागरिकांना थंडीच्या दिवसांत काम पुरवितां येईल यावरतीं त्याचें प्रवचन नंतर सुरू होई. बहुतांचें बहुत हित हेंच त्याच्या डोळ्यापुढें सदैव असावयाचें. बरोज म्हणत, " हेन्रीची मोटारगाडी आणि त्याचा यांत्रिक नांगर यांच्यांत हेन्रीच्या व्यक्तिमत्वाचा ठसा जेवढा उमटलेला आहे, तेवढा दुसऱ्या कोण-त्याहि कवीचा त्याच्या काव्यकृतींतून आढळून येणें दुष्कर होईल. त्यानं निर्माण केलेलीं हीं यंत्रं म्हणजे त्याच्या व्यक्तिमत्वाचीं मूर्तिमंत प्रतीकंच होत — त्यांच्यांत झळकफळकपणा नाहीं, तसाच किचकटपणाहि नाहीं, गुंतागुंतहि नाहीं. राष्ट्रीय विभूति म्हणून हेन्री ओळखला जातो, परंतु तो गाडींतून जात असतांना त्याच्याभोंवतीं जो जनसमुदाय लोटतो तो यशस्वी मोटार कारखान-दाराला किंवा उद्योगपतीला श्रद्धांजलि अर्पण करण्यासाठीं नसून त्याच्यामध्यें वसत असणाऱ्या जनहितनिष्ठेमुळेंच ! "

आणि जेव्हां हेन्री शेजारच्या एखाद्या ओढ्याचें निरीक्षण करण्यांत गुंतलेला नसे तेव्हां तो शेकोटीसाठीं लांकडें गोळा करण्यांत गढलेला दिसत असावयाचा. त्याच्या मनाचा पिंडच असा होता कीं कांहींतरी काम करण्यांत त्याला खेळाचा आनंद लुटतां येई.



रोग नदीकांठच्या प्रदेशांतील नवीन बांधल्या जाणाऱ्या घरांची संख्या वाढतच होती. या अचाट प्रमाणावरील कारखान्यांत वरकड लाभाचा पैसा गुंतविण्यास भागीदार खळखळ करीत होते. लाभांशाच्या रूपानें (डिव्हिडंड) हा पैसा आपल्या पदरांत पडावा असें त्यांना वाटत होतें. हेन्रीनें त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें आणि आपलीच योजना पुढें रेटली. तेव्हां भागीदारांनीं न्यायालयाचा रस्ता धरला व हेन्रीच्या विरुद्ध काम चालवून लाभांशाच्या पैशाचा ओघ स्वतःकडे वळवून घेतला.

आपण काय करावें, कशा रीतीनें धंदा चालवावा हें भागीदारांनीं त्याला सांगणें किवा त्यानें आंखलेल्या योजनांमध्यें त्यांनी लुडबूड करणें हेन्रीला केव्हांहि मानवणारें नव्हतें. मालकम्सनच्या संबंधांत जो तोडगा हेन्रीनें वापरला होता तेवढा एकच आतां त्याला याहि बाबतींत वापरतां येण्याजोगता होता.

हेन्रीचा मुलगा एडसेल, आतां सव्वीस वर्षांचा झाला होता आणि कंपनीमधील तो एक महत्त्वाचा घटक बनला होता. १९१६त डेट्रॉइटमधील

---

## विसावें प्रकरण

एका विविधवस्तु भांडाराच्या (Department Store) मालकाच्या सुस्वरूप पुतणीशीं, एलिनॉर क्ले, इच्याशीं त्याचा विवाह झाला होता. त्रासदायक भागीदारांच्या कटकटींतून मुक्त होण्यासाठीं एडसेलनें त्यांच्याकडील भाग विकत घेऊन टाकावेत आणि कंपनीचा अध्यक्ष बनावें असें हेन्रीच्या मनांत आलें.

ज्या मूठभर भागीदारांच्या हातांत हे भाग होते त्यांना हें पक्कें माहीत होतें, कीं हेन्रीनें ठरविलेली गोष्ट ही घडणारच ! त्यांनीं त्याला भाग विकण्याचें नाकारलें असतें तर तो दुसरा कारखाना उभारून अधिक चांगल्या आणि स्वस्त मोटारगाड्या बनवायला कमी करणार नाहीं, हेंहि त्यांना कळून चुकलेलें होतें.

सोळा वर्षांपूर्वीं जेम्स कझेन्सच्या बहिणीनें १०० डॉलर देऊन एक भाग विकत घेतलेला होता. तिचा तो भाग आतां २६०००० डॉलर देऊन विकत घेण्यांत आला. जेम्स कझेन्सनें आपले भाग तीन कोटी डॉलर्सना विकले. डॉज बंधूंनीं त्यांचे दहा हजार डॉलरांचे भाग अडीच कोटीला विकले. इतर भागीदारांनीं त्यांच्यापाशीं असलेले भाग एकूण सव्वासहा कोटीला विकले.

आतां हेन्री आणि एडसेल यांच्या हातांत कारखान्याचीं सर्व सूत्रें आलीं. तेव्हां त्यांनीं कंपनीची पुन्हां नोंदणी करून दहा कोटी डॉलर एवढे भाग भांडवल दाखविलें. उद्योगधंद्यासंबंधीं कोणाच्याहि डोक्यांत जेवढी मोठी योजना असेल त्यापेक्षां प्रचंड अशी योजना अंगावर घेण्यास हेन्री नेहमींच सिद्ध असे. रोग नदीवरील कारखान्यांत एकीकडून कच्च्या मालाचा ओघ आंत घेतला जाई आणि दुसरीकडून तयार मोटारगाड्या, मालवाहू गाड्या आणि यांत्रिक नांगर यांचा सतत प्रवाह त्याच्या सत्तेखालीं आतां बाहेर पडे.

कारखान्यांतील प्रत्येक क्रिया हेन्रीच्या देखरेखीखालीं चाले. आपल्या स्वतःच्या मालकीचीं तारवें आणि आगगाड्या राहतील. आपल्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठाहि स्वतःच्या मालकीच्या कोळशाच्या किंवा धातूच्या खाणींतून किंवा जंगलांतून होऊं लागेल. असें घडलें तर हेन्रीच्या मतें कोणत्याहि प्रकारें अपव्यय होण्याचें कारणच उरणारें नव्हतें. वेळेचीहि

बचत घडून येऊन उत्पादन-खर्चांतहि बचत होण्याची शक्यता होती. उदाहरणार्थ, फोर्डच्या कारखान्यास लागणारा एक लवंग कील ( Bolt ) वेस्टर्न ऑटोमॅटिक स्क्रू मशीन कंपनीकडून विकत घेतल्यास हजारीं जे ५० डॉलर पडावयाचे ते स्वतःच्याच कारखान्यांत तो तयार केल्यास ८·७० डॉलर एवढ्या अल्प किमतींत तयार होतात असें हेन्रीला आढळून आलें. एकट्या या लवंग कीलाच्या उत्पादनांत त्या कारखान्यामध्यें पहिल्या वर्षांत त्याला ५८२६३५ डॉलर इतकी बचत करतां आली. त्यामुळें गाड्या घेणाऱ्या गिऱ्हाइकांनाहि याचा फायदा मिळून त्यांना गाड्या कमी भावांत देतां येतील असें त्याला वाटूं लागलें. आणि या सर्व गोष्टी घडवून आणतां येतील हें १९१५ मध्यें तो दलदलीचा प्रदेश विकत घेतांनाच त्यानें हेरलें होतें.

हेन्रीच्या गरुडदृष्टींतून कोणतीहि गोष्ट सुटत नव्हती. एकीकडे रोगवरील कारखान्याचें काम चालूच असतां दुसरीकडे नदीचें पात्र रुंदावण्याची आणि त्याची खोली वाढविण्याची कामगिरी यंत्राच्या साहाय्यानें चाललेली होती. एके दिवशीं नदीकांठीं तो उभा असतांना नदीचें पात्र खोदणाऱ्या यंत्रानें ( Dredge ) एक चक्कर खावून नदीच्या पोटांतला गाळ वर काढला व बाजूला फेंकला. हेन्री तिथून कांहीं पावलांवरच उभा होता—" थांबवा तें यंत्र, " हेन्री तिथूनच ओरडला. त्या गाळामध्यें मस्कॅट जातीचा एक केसाळ उंदीर रुतला होता. आणि त्याची बाहेर येण्यासाठीं धडपड चाललेली होती. कामगारांचें तिकडे लक्ष जातांच ते त्याच्या साहाय्यासाठीं धांवूं लागले, परंतु हेन्रीनें त्यांना तसें करूं दिलें नाहीं. तो म्हणाला, " तुम्ही गप्प बसा. तो आपला आपण यांतून मार्ग काढील. " गाळ उपसणाऱ्या यंत्राचें काम तासभर खोळंबून राहिलें. प्रत्येकजण त्या उंदराला सूर्यकिरणांनी ऊब येऊन बाहेर पडण्यास सामर्थ्य केव्हां प्राप्त होतें याची वाट पाहात बसला. शेवटीं एकदांचा तो उंदीर आपल्या पायांवर उभा राहिला आणि सावकाशपणें तिथून चालता झाला.

हेन्रीनें हात उचलून कामगारांना परत काम चालू करण्याची सूचना दिली.

रोगवरील नवीन शक्त्युत्पादक यंत्रसामुग्रीच्या उभारणीकडे हेन्रीचें

विशेष लक्ष होतें. त्याच्या मनांत अजूनहि बाष्पयंत्रासंबंधीं प्रेम होतें, आणि जेथें जेथें तें वापरणें शक्य होतें तेथें तेथें तो तें वापरीहि. असें असलें तरी या विषयासंबंधीं जी प्रगति दिवसानुदिवस होत होती तिची जाणीव त्याला सदैव असावयाची. सर चार्लस् अल्गरनॉन पार्सन्स याच्या कार्याविषयीं त्यानें बरेंच वाचलें होतें. या ब्रिटिश यंत्र-विशारदानें बाष्पयंत्रासंबंधीं ( Steam turbine ) संशोधन करून सागरी वाहतुकींत क्रांति घडवून आणली होती. १८९७ मध्यें त्याच्या " टर्बायना" ( Turbiana ) (म्हणजे ' वरीवर्ती ' ) या नौकेवर प्रथमतःच वरीवर्त ( Turbine ) बसविण्यांत आलीं होतीं. या नौकेच्या अचाट वेगामुळें तिनें साऱ्या जगाचें लक्ष वेधून घेतलें होतें.

पश्चाग्र बाष्पयंत्र ( Reciprocating steam engine ) अथवा ज्या यंत्रांत दट्टया मागेंपुढें सरकतो त्याला जेथें प्रत्येक अश्वशक्तीस ४० पौंड वाफ साधारणपणें लागेल तेथें या आधुनिक वरीवर्ताला सरासरीनें केवळ आठ एक पौंड वाफ प्रत्येक अश्वशक्तीच्या उत्पादनासाठीं लागेल हें हेन्रीला ठाऊक होतें. अशा रीतीनें, वरीवर्त वापरण्यांत पैशाची बचत होती.

कारखान्यासाठीं लागणारी बाष्प–आणि विद्युत्शक्ति निर्माण करण्यासाठीं चार बाष्पित्रें ( Boilers ) आणि दोन अजस्त्र वरीवर्ती विद्युत् जनित्रें ( Generator ) उभारण्यांत आलीं. कालांतरानें आणखी एक तिसरें राक्षसी वरीवर्ती विद्युत् जनित्रहि बसविण्यांत आलें. हीं बाष्पित्रें ६२५° फारेन-हैट आणि २५० पौंडावर चालविलीं जात. त्यांची बाष्पशक्ति (Steaming) प्रत्येक तासाला प्रत्येकीं २००,००० पौंड इतकी होती. २५० पौंडावर चाल-णारीं दोन १२५०० K. W. ( एकेकाची ) विद्युत्शक्तीचीं 'जनरल इलेक्ट्रिक'नें बनविलेलीं यंत्रें या कामीं वापरण्यांत आलीं होतीं. यांचें उत्सर्जन एक पौंड ( निरपेक्ष–Absolute ). प्रतिनिपीडाविरुद्ध होई. या-वेळीं लागणारी वीज दोहोंपैकीं एका यंत्राकडून सहज मिळवितां येत असे. वरीवर्ती–जनित्रांची संघनका ( Condensers ) सहित उंची दुमजली घराइतकी जवळपास होती. पवनचक्की ज्याप्रमाणें वाऱ्याच्या झोतामुळें फिरूं लागते त्याप्रमाणें वरीवर्ताचीं पातीं वाफेच्या झोतामुळें फिरूं लागत.

या वाफ्पित्रांच्या कार्याकडे साऱ्या देशांतील यंत्रविशारदांचें लक्ष लागून राहिलेलें होतें. याचें कारण असें होतें कीं, संगजिऱ्यापेक्षांहि अतिशय सूक्ष्म अशा कोळशाच्या बुकणीचा उपयोग एवढ्या मोठ्या यंत्रांत प्रथमच केला गेला होता.

शीतनासाठीं आणि उत्पादनासाठीं लागणारें पाणी रोग नदींतून घेतलें जाई. परंतु तसें करणें योग्य नसल्याचें लवकरच आढळून आलें. कारण वर्षांतील कांहीं काळ असा जाई कीं त्यावेळीं पाण्याला प्रवाहित्व असें फारसें नसेच. केव्हां केव्हां पाण्याचा तापांक ( Temperature ) वर्षभरांतील सरासरीच्या ६५° फारनहैटवर जाऊन ८७° पर्यंतहि चढावयाचा.

रोगवरील कारखान्याची जशीजशी वाढ होत गेली तसतशी अधिकाधिक स्वच्छ आणि अधिक थंड पाण्याची आवश्यकता पडूं लागली. हें पाणी रोग नदींतून मिळण्याची शक्यता नसल्यानें हेन्रीच्या पदरीं असलेल्या यंत्रविशारदांनीं एक बोगदा खणून डेट्रॉईट नदीचें पाणी रोगवरील कारखान्यास मिळण्याची सोय करून हा प्रश्न सोडविला. हा बोगदा बारासहस्र फूट लांबीचा असून त्यांतून प्रत्येक २४ तासांत ९१३,०००००० गॅलन पाण्याचा पुरवठा होई.

हेन्रीचा कांचेचा कारखानाहि होता. दुसरीकडून कांच विकत घेण्यापेक्षां त्याला लागणारी कांच स्वत:च्या कारखान्यांत बनवून घेणें दोन दृष्टीनें अधिक लाभदायक होतें. एकतर ती स्वस्त पडे आणि इतरत्र मिळणाऱ्या कांचेपेक्षां ती श्रेष्ठ दर्जाची असे. कारखान्याला लांकूड हवें. त्यासाठीं त्यानें 'कूपें'च ( रानें ) विकत घेऊन टाकलीं. तीच गोष्ट दगडी कोळशाची; कारखान्याला लागणारा दगडी कोळसा त्याच्या मालकीच्या केंटुकी खाणींतून तो काढी. लोखंडाचा पुरवठाहि त्याच्या स्वामित्वाखालीं असलेल्या भूमींतून आणि स्वत:च्या जलनौकांतून केला जाई. हेन्रीनें १०५ मैल लांबीचा लोहमार्ग विकत घेतला. वहित्रांचें ( Locomotives ) आकर्पण अजूनहि हेन्रीला विशेष होतें. यांना शक्तीचा पुरवठा करणाऱ्या वाफेचें कौतुक त्याला सदैव वाटे. त्यानें डी. टी. अॅन्ड आय. ( डेट्रॉइट टोलेडो आणि आयर्नटन् ) लोहमार्ग जो विकत घेतला तो फोर्ड गाड्या बनविण्यासाठींच्या

त्याच्या नडी भागविण्याकरितांच. तीस वर्षांहून अधिक काळपर्यंत कित्येक इतर कंपन्यांनीं हा लोहमार्ग चालविला, त्यांत त्यांना खोट वसलेली होती. हा लोहमार्ग विकत घेतांना हेन्रीची दृष्टि त्यापासून होणाऱ्या आर्थिक लाभापेक्षां रोग नदीवरील त्याच्या कारखान्याच्या कार्यामध्यें त्यायोगें जी प्रचंड बचत होण्याची शक्यता होती तीवरच मुख्यतः होती. हेन्रीच्या कारखान्यांतील प्रत्येक वस्तु जशी चकचकीत आणि स्वच्छ असावयाची त्याचप्रमाणें डी. टी. आय्. चीं हीं वहित्रेंहि नेहमीं घांसून पुसून चक्क ठेवलेलीं असावयाचीं.

या छोटया परंतु आदर्श लोहमार्गावर काम करणाऱ्या फाटकावरील पहारेकऱ्यांनासुद्धां महत्त्वाचें स्थान होतें. फाटकांच्या आंवतींभोंवतींची जागा ते स्वच्छ ठेवीत. एवढेंच नव्हे तर 'सेक्शनमन'वांचूनहि ते आपलीं कामें करीत. त्यांना वेतनहि तसेंच मिळावयाचें. हेन्रीनें हा लोहमार्ग घेण्यापूर्वीं त्यांच्या पदरांत केवळ ५८ डॉलर पडत त्या ठिकाणीं हेन्रीनें नवी वेतनश्रेणी लागू केल्यानंतर तो त्यांना महिन्याकांठीं १५६ डॉलर देऊं लागला. साहजिकच हीं कामें आपल्याला मिळावींत म्हणून अनेकांची धडपड असे आणि मिळाल्यावर तीं टिकवूं न धरण्यासाठींहि ते फार जागरूक असत. याचप्रमाणें लोहमार्गावरील इतर सेवकांचींहि वेतनें वाढविण्यांत आलीं.

लोहमार्गावरील सर्व जुनी खडी काढून टाकून त्या ठिकाणीं नवीन खडी अंथरण्यांत आली. मार्गावरील रूळ, जोडपट्ट्या आणि इतर सामानसुमान अधिक वळकट असें नवें वसविण्यांस आलें. या मार्गावरील खड्डयाखड्ड्यांसाठीं सुधारलेली पद्धति हेन्रीनें अवलंबिली. नवीन वहित्रें ( Locomotives ) बांधलीं, समास ( Banks ) वाढविले, वहिवाटीच्या अधिकारासंबंधीं असलेले घाटाळे दूर केले आणि मार्गावरील गलिच्छ आणि जुनाट बांधकामें पाडून टाकलीं. याचा परिणाम असा झाला, कीं या छोटयाशा जुन्या लोहमार्गापासून जरी पूर्वींच्या धन्यांना कांहींहि लाभ होत नव्हता तरी हेन्रीचें मात्र फार मोठें काम यानें साधलें आणि तेंहि उत्तम प्रकारें. 'जगाचें यंत्रघर ' ( 'Machine Shop of the world' ) म्हणून हेन्रीचा कारखाना गाजलेला होता. त्याचीं सर्व कामें बिनबोभाट आणि वेळच्या वेळीं या लोहमार्गामुळें होऊं लागलीं.

नव्या कारखान्यांतील पहिल्या दोन राक्षसी 'ब्लास्ट'–भट्ट्यांपैकीं एका भट्टीची उभारणी पुरी झाल्यावर तिचें बारसें करण्याचें हेन्रीनें योजून तिचें 'हेन्री २' असें नामकरण त्याच्या पहिल्या नातवाच्या नांवें केलें. अशा या अद्वितीय बारशाची परिपूर्ति करण्यासाठीं नामकरण समारंभाला त्या छोटचा फोर्डलाहि आणण्याचें त्यानें ठरविलें.


"म्हणजे काय ? हेन्री," क्लारा रागानें म्हणाली, "तुम्ही काय त्या लहानग्याला कारखान्यांत नेणार कीं काय ? मी तरी तुम्हांला हें कधींहि करूं देणार नाहीं. काय भलतंच आपलं! दोन वर्षांच्या पोराला भट्टींत कोळसा मारायला कुणी नेलंय् का कधीं ?"

"हें पहा क्लारा, कांहींसुद्धां व्हायचें नाहीं त्याला." आपला हट्ट पुढें चालवीत हेन्री म्हणाला, "आणि पुन्हां असं, कीं पुढं मागं केव्हां तरी या गोष्टी शिकायलाच हव्यात त्याला. पुरे झाल्यात त्या तुझ्या रडकथा; मी सांगतों, फोर्ड मोटर कंपनीचा तो भावी अध्यक्ष आहे."

"काय म्हणावं या वेडगळपणाला," क्लारा पुटपुटली. "एलिनॉरनें त्याला जाऊं दिले नाहीं तर त्यांत तिची कांहीं चूक होतेय् असं मी तरी बाई नाहीं म्हणायची." हें ती म्हणाली खरी पण हेन्रीपुढें आपल्याला हार खावी लागलेली आहे याची जाणीव तिला पूर्णपणें झालेली होती.

आणि, दोन वर्षांचा, कुरळचा केंसांचा, गुबगुबीत गालांचा छोटा हेन्री नामकरण समारंभाला "उपस्थित राहिला." बावरलेल्या डोळ्यांनीं आश्चर्यचकित होऊन हा सर्व सोहळा पाहात असतांना त्या अजाण बालकाला काय कल्पना कीं रोग नदीवरील भावी पोलादाच्या कारखान्याचा हा केवळ अल्पारंभ होता; किंवा त्याला काय कल्पना कीं प्रौढ वयांत या प्रचंड औद्योगिक साहसाच्या अध्यक्षपदाचा मान त्याला मिळावयाचा होता.

मात्र हें सर्व चालू असतांना क्लाराचा जीव कुठे थाऱ्यावर होता ! आपल्या आजोबांच्या कडेवरती जरी छोटा हेन्री बसलेला होता तरी क्लाराचा जीव मात्र एकसारखा खालींवर होत होता. आणि जेव्हां त्याला परत ग्रॉसपॉइंट भवनामध्यें एड्सेल आणि एलिनॉर यांच्याकडे नेऊन देण्यांत आलें तेव्हां कुठें तिचा जीव भांड्यांत पडला आणि तिला हायसें वाटलें.



जग भराभर बदलत होतें. खेड्यांना जोडणाऱ्या काँक्रीटच्या रस्त्यांची लांबी T मॉडेल जेव्हां निघालें, तेव्हां अवघी ५ मैल होती ती आतां ३१००० मैलापर्यंत वाढली. जगांतील वार्ता आतां नभोवाणीवरून प्रसृत होऊं लागल्या होत्या आणि कानावर कर्णोपाय ( Earphones ) बसवून श्रोते ऐकूं लागलेले होते.

१९२३ मध्यें हेन्री साठ वर्षांचा झाला. त्याचा उत्साह मात्र दुर्दम्य होता. केवढींहि मोठीं कामें असोत तीं अंगावर घेतांना तो पूर्वीच्याच धडाडीनें पुढें सरसावे. १९२२ मध्यें त्यानें लिंकन मोटार कंपनी विकत घेतली होती. ' लिंकन ' गाडी जरी छोटीशीच असली तरी तिचें मूल्य भारी होतें आणि सबंध जगामध्यें या गाडीनें नांव कमाविलेलें होतें. हेन्रीच्या डोक्यांत अजूनहि ' सर्वोपयोगी मोटारगाडी ' घर करून होती. त्याच्या विक्रय-कौशल्याचाच हा परिपाक होता. हेन्रीच्या T धर्तीच्या गाडीची थट्टा जी सर्वत्र होई तिला उत्तर देण्याच्या दृष्टीनें ' लिंकन ' गाडी हेन्रीला उपयुक्त वाटली यांत आश्चर्य नाहीं.

लंडनमध्यें हेन्रीनें ३०६ एकर जमिन घेऊन त्यावर त्याचा डागेनहाम कारखाना उभारला होता. जगामध्यें या कारखान्याचा क्रमांक दुसरा लागत असे. पहिला क्रमांक त्याच्याच मालकीच्या रोग नदीवरील कारखान्याचा होता. लंडनमधील या कारखान्याच्या समोरूनच टेम्स नदी वहात असल्या-कारणानें कारखान्याला पाण्याचा मुबलक पुरवठा होई; त्याचप्रमाणें लोहमार्ग

आणि मोटारवहातूक या सोयीहि उपलब्ध होत्या. या डागेनहाम कारखान्यांत मोटरगाड्या बनत, जुळविल्या जात आणि तेथून इतरत्र धाडल्याहि जात. हा सर्व माल ग्रेट ब्रिटन, आयर्लंड आणि इतर कांहीं ब्रिटीश वसाहतींतून खपत असे.

दक्षिण अमेरिकेंतील शाखांचा संबंध डिअरबोर्न आणि रोग कारखान्यांशीं प्रत्यक्षपणें होता. जर्मनी, फ्रान्स, हॉलंड आणि बेल्जम या देशांतून मात्र इंग्लंडांत जें धोरण आंखलेले होतें त्याचप्रमाणें आंखण्यांत आलेलें होतें. या देशांतून कांहीं भाग भांडवल त्या त्या देशांतील लोकांच्या हातीं होतें.

हेन्रीनें आतां आपलें लक्ष रबरी मालाच्या उत्पादनाकडे वळविलें आणि त्यासाठीं त्यानें ब्राझीलमधील ४० लक्ष एकर जंगलें खंडानें घेतलीं. कोणतीहि गोष्ट हातीं घेतांना त्यांत कोणताहि अवघडपणा असा त्याला कधींच वाटत नसे.

तो म्हणे, " धंदा जेवढा मोठा तेवढा तो चालविणें सोपें असतें. "

मोटारधंद्याशीं प्रत्यक्षपणें निगडित नसलेले असे इतर धंदेहि हेन्रीनें हातीं घेतले होते. हे धंदे मानवी हितास पोषक असल्याचें त्याचें मत होतें.

डेट्रॉइटमध्यें त्यानें फोर्ड रुग्णालय काढलें आणि त्याचा लाभ कोणाहि गरजू माणसास मिळण्याची सोय करून दिली. या रुग्णालयांत काम करून तेथेंच राहणाऱ्या डॉक्टरांना खाजगी धंदा करण्यास मनाई होती. रोगाचें निदान अचूक व्हावें यासाठीं रुग्णांची अनेक तज्ज्ञांकडून तपासणी करून घेण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. या रुग्णालयाच्या उभारणीसाठीं हेन्रीनें अपरंपार पैसा वेचला; पण त्यांत प्रत्यक्ष आर्थिक लाभाची दृष्टि मात्र त्यानें ठेविली नाहीं.

शिक्षणप्रसारासाठीं हेन्रीनें लक्षावधि डॉलर वेचले. लहान बालकें आणि तरुण विद्यार्थी यांचें महत्त्व हेन्रीनें ओळखलें होतें. त्यांच्या हिताच्या गोष्टी करणें त्यास फार आवडे. नवीन ज्ञानप्राप्तीचीं साधनें त्यांच्या हातीं देण्यास तो नेहमींच उत्सुक असे. या शिक्षणाच्या शिदोरीचा त्यांना आपल्या भावी आयुष्यांत उपयोग करून घेतां यावा अशी त्याची दृष्टि असे. व्यावसायिक शिक्षणासाठीं त्यानें 'हेन्री फोर्ड ट्रेड स्कूल' नांवाची शाळाहि काढली.

यांत विद्यार्थ्यांना औद्योगिक शिक्षण देण्याची सोय होती. यांतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना उद्योगधंद्यांतून अधिकाराच्या जागा मिळण्याची शक्यता होती. दैनंदिन शिक्षणांत विद्यार्थ्यांना वर्गांतील नेहमींच्या शिक्षणा-व्यतिरिक्त कामघरांत ( वर्कशॉप ) प्रत्यक्ष अनुभव मिळण्याचीहि त्या सोय केली.

१९२३ च्या शरद ऋतूमध्यें हेन्‍री आणि डॉ. ह्यूगो एकनर हेन्‍रीच्या नुकत्याच पुऱ्या होत आलेल्या हवाई तळावर उभे होते. डॉ. एकनर यांनीं अमेरिकन सरकारला नुकताच ZR–३ वायुगोल दिलेला होता. त्यांची कीर्ति " वायूहून हलका " विद्यार्थी म्हणून पसरली होती. मोठीं दणकट हवाई जहाजें ( वायुनौका ) कशीं बांधतां येतील याची चर्चा हे दोघे करीत होते.

" पुढच्या खेपेस तुम्हीं डेट्रॉइटला याल तेव्हां आपली वायुनौका ( हवाई जहाज ) बरोबर घेऊन या. " हेन्‍री म्हणाला.

डॉ. एकनर यांनी खेद प्रदर्शित करीत मान हालविली. " आणली असती मी " ते पुढें म्हणाले, " परंतु तुमच्या इथे विमान उतरवण्याचा स्तंभ ( Mooring mast ) कुठें आहे ? "

हेन्‍रीनें स्मित केलें आणि म्हटलें, " त्यांत काय मोठेंसें ! मी उभारीन एक. " हेन्‍रीला अशक्य असें कांहींच नव्हतें.

पुढच्याच वसंत ऋतूंत हेन्‍रीनें पांच लक्ष डॉलर्स खर्च करून वायु-नौका उतरवण्यासाठीं लागणारा स्तंभ ( Mooring mast ) उभारला-सुद्धां. त्यावर एक कोटी घनफूट इतक्या घनफळापर्यंतच्या वायुनौकांची सोय होती. अमेरिकेंत बांधण्यांत आलेला शेनानदोआह वायुगोल ( Dirigible ) येथें प्रथम उतरण्याचा मान पटकविणार होता. परंतु, दुर्दैवानें डेट्रॉइटच्या मार्गावर असतांनाच हा वायुगोल ओहिओ संस्थानांत एका वादळांत सांपडून त्याचा चक्काचूर झाला. या अपघातांत बरींच माणसें प्राणालाहि मुकलीं.

१९२६ मध्यें ZR–३ फोर्ड हवाई तळावर प्रत्यक्ष उतरलें. ही घटना त्यानें अटलांटिक महासागर प्रथम ओलांडल्याच्या दुसऱ्या वाढदिवशीं घडली

हा एक योगायोगच. आतां अमेरिकन नौदलानें ZR–३चें पुन्हां बारसें करून त्याला ' लॉस अँजेलीस ' असें नवें नांव दिलें.

अमेरिकन नौदलानें ' अॅक्रान ' आणि ' मॅकॉन ' नांवाचे दोन प्रचंड वायुगोल बांधले. परंतु, दुर्दैवानें बांधणींतील कांहीं दोषांमुळें त्या दोघांचाहि अंत शोकपर्यवसायी झाला.

याचा परिणाम असा झाला कीं फोर्डच्या नव्या वायुनौका-अवतरण-स्तंभाला एरव्हीं जें मध्य-पश्चिमेकडील मार्गावरील महत्त्वाचें स्थान मिळावयाचें आणि त्यावर नौदलाच्या वायुहून हलक्या नौका आश्रय घ्यावयाच्या तो योग कांहीं येऊं शकला नाहीं. अशा रीतीनें जरी हेन्रीचा वायुनौका-अवतरण-स्तंभ निरुपयोगी ठरला तरीहि वायवी नौकानयनाला साह्य करण्याच्या दृष्टीनें त्याची सिद्धता पूर्वींइतकीच अद्यापहि टिकून होती.

डेट्रॉइटमधील वायवी यंत्रविशारद ( Aeronautical Engineer ) विल्यम बी. स्टाऊट यांनीं माल आणि उतारू यांच्या वाहतुकीसाठीं धातूच्या वायवी नौका ' लिबर्टी ' इंजिनें बसवून बांधण्याच्या एकमेव उद्देशानें एक कंपनी काढण्याची योजना आंखली होती. या योजनेंत १९२४ च्या आरंभीं हेन्री आणि एडसेल यांनीं लक्ष घातलें. " आम्ही डिअरबोर्न येथील आमच्या विमानतळावर काम चालू केलें आहे. तेथें एक ' हँगर ' आणि कारखाना यांचीहि सोय आहे. ' हेन्री स्टाऊटला म्हणाला, " तुम्हांला हवं तर या सगळ्यांचा उपयोग करून घ्या. "

कारखाना उभारून पुरा झाला तेव्हां ' स्टाऊट मेटल एअर प्लेन कंपनी ' त्यांत हलविण्यांत येऊन तिचें नवें नांव ' फोर्ड मोटार कंपनीचा विमान विभाग ' असें ठेवण्यांत आलें. याच वर्षी पहिलें फोर्ड विमान ( Tri-moter ) बांधून पुरें झालें. या विमानाची वाखाणणी विमान-हांके फार करूं लागले.

हें विमान त्या काळच्या इतर कोणत्याहि विमानांपेक्षां रचनेच्या दृष्टीनें सरस होतें. त्याकाळचीं व्यापारी विमानें जुन्या, सैन्यानें टाकून दिलेल्या विमानांमध्यें थोडे फेरफार करून कशींतरी वेडवांकडीं बनविलेलीं असत. यांच्या बनावटींत लाकूड-सामानाचा आणि सणाचा उपयोग केलेला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................



असे. यांची कार्यक्षमता फार खालच्या प्रतीची असे. आणि तीं चालविण्यास खर्च मात्र बराच पडे. याउलट फोर्डचीं 'ट्राय-मोटर' विमानें पूर्णतः धातूचीं बनविलेलीं असत आणि बळकटीच्या दृष्टीनेंहि तीं चांगल्या दर्जाचीं असत. अशा प्रकारच्या उतारू विमानांत आठ उतारू बसूं शकत किंवा एक टन माल मावत असे. याचा कमाल वेग ताशीं ११६ मैल; चालू किंवा सरासरी उड्डाण-वेग ( Cruising Speed ) १०० मैल आणि अवतरण-वेग ५५ मैल असे.

यावेळपर्यंत म्हणजे विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या मध्यास हवाई वाहतूक बाल्यावस्थेच्या कांठावर होती. त्यामुळें फोर्ड 'ट्राय-मोटर' अगदीं योग्य वेळीं बाजारांत आली. सुखसोयींनीं युक्त, भरंवशाचीं आणि बेताच्या खर्चांत चालणारीं परंतु पुरेसें आणि परवडण्याइतपत ओझें वाहून नेणारीं विमानें आतां लोकांना हवींच होतीं.

मात्र फोर्डचीं 'ट्राय-मोटर' विमानें ही कांहीं संपूर्णतः धातूचीं बनविलेलीं अशीं पहिलींच नव्हतीं. याच सुमारास जर्मनीमधील डॉ. युंकर्स ( Junwkers ) यांनीं सबंध धातूचीं विमानें बनविण्याचे प्रयोग चालविले होते. एवढें मात्र खरें कीं प्रत्यक्ष व्यावहारिक उत्पादनाच्या दृष्टीनें फोर्डचीं 'ट्राय-मोटर' विमानें पहिलींच होतीं.

चांदीप्रमाणें चकाकणाऱ्या या फोर्डच्या विमानांना सर्व विमान-हांके ( पायलट ) मंडळी "जस्ती हंसी" ( Tin-goose ) या नांवानें ओळखीत. हेंच विमान ( फोर्ड ट्राय-मोटर ) घेऊन कमांडर रिचर्ड ई.बायर्ड ( Byrd ) यांनीं लिट्ल अमेरिकेपासून दक्षिण ध्रुवप्रदेशाच्या कडेनें दक्षिण ध्रुव ओलांडून परत लिट्ल अमेरिकेपर्यंतचें उड्डाण पुरें केलें.

बायर्डनें आपलें विमान दक्षिण ध्रुवावर एक वर्षपर्यंत पडूं दिलें. परत आल्यावर त्याला तें संपूर्णपणें बर्फाच्छादित झालेलें आढळलें. बर्फ उकरून काढून, विमानाचा कार्ब्युरेटर ( इंजिनाला नियमित तेल-पुरवठा करणारा भाग ) स्वच्छ करून त्यावर नवीन विजेरी बसवितांच तें व्यवस्थित चालूं लागलें.

वाहतुकीच्या प्रत्येक अंगोपांगाकडे हेन्रीचें लक्ष असल्यानें त्यानें अशी

अटकळ बांधली कीं या पुढची विमान-प्रगतीची अवस्था म्हणजे सामान्य नागरिकाला व्यक्तिशः परवडणारें आणि सुरक्षित असें विमान होय. म्हणून त्यानें आपल्या दोन यंत्रविशारदांना बोलावून घेऊन एक प्रायोगिक विमान बनविण्याची सूचना दिली. त्यांना केवळ खालील गोष्टीकडे लक्ष पुरविण्यास त्यानें सांगितलें; त्या म्हणजे "सुरक्षितपणा, मितव्ययित्व आणि भरंवसा" या तीन होत.

१९२६ मध्यें हेन्रीच्या वाढदिवशीं पहिलें पिटुकलें फोर्ड विमान फोर्ड विमानतळावर संथपणें परंतु डौलानें अवतरलें. या एक-माणशी विमानाचे पंख छोटे २५ फूट लांबीचे आणि कमी उंचीवर बसविलेले असून मधली जागा (Fuselage) १६॥ फूट होती. याची उंची अवघी ५ फूट असून भार ५५० पौंड होता. परंतु आकाशांत तें जेव्हां भराऱ्या मारी तेव्हां त्याचा डौल कांहीं वेगळाच दिसे! या पहिल्या विमानावर बसविलेलें इंजिन ४५ अश्वशक्तीचें, फ्रेंच बनावटीचें 'अन्झानी' इंजिन होतें. त्याला तीन भांडीं (सिलिंडर्स) होतीं. या विमानाचा चालक (पायलट) हॅरी ब्रूक्स बर्मिंगहॅममधील त्याच्या घरापासून प्रत्यहीं फोर्ड विमानतळापर्यंत या पिटुकल्या विमानांतून यायचा. विमान वर चढवितांना किंवा खालीं उतरवितांना त्याला एखादें छोटें शेत किंवा आडरस्ते सुद्धां पुरतात हें पाहून त्याचे शेजारी पाजारी आश्चर्यचकित होत. विमान पक्कें असून चालवितांना त्याचें नियंत्रण करणें सोपें होतें. आपल्या एकमेव उतारूला घेऊन हें पिटुकलें तासाला ७५ मैल वेगानें मार्गक्रमणा करी.

यापुढें जें एक-माणशीं विमान बनविण्यांत आलें त्यांत 'ॲन्झानी' इंजिनांचे ठिकाणीं दोन भांड्यांचें (सिलिंडर्स), आडवें, हवेनें गार केलें जाणारें इंजिन बसविण्यांत आलें. पूर्वीच्या विमानांतून केवळ १२ गॅलन पेट्रोलचा सांठा बरोबर वाहून नेतां येई त्या ठिकाणीं आतां ५० गॅलन सांठा नेतां येऊं लागला.


चालू शतकाच्या दुसऱ्या तिसऱ्या दशकांतील एके दिवशीं बराच वारा सुटलेला असतांना हेन्रीला आपलें 'ट्राय-मोटर' विमानतळावर उतरतांना

दिसलें. विमान खालीं सरकत असतां त्याचीं तिन्ही इंजिनें बंद होतीं आणि त्याचे पंख वाऱ्यामुळें हादरत होते. शेजारींच असलेल्या एका मित्राला हेन्री म्हणाला "विमान खालीं उतरत असतांना त्याच्या शक्तीचा उपयोग त्याला करून घेतां येईल अशी कांहीं युक्ति काढली पाहिजे. याच ठिकाणीं बरेचसे घातक अपघात घडतात. विमान उतरूं लागलें कीं त्याला होणारा यांत्रिक शक्तीचा पुरवठा बंद होतो, त्यामुळें तें निसर्गशक्तींच्या अधीन होऊन बसतें."

यानंतर बऱ्याच वर्षांनीं डग्लस DC-3 चे चालक (पायलट) त्याच तळावर विमान खालीं उतरवीत होते. परंतु यावेळीं इंजिनें चालू ठेवलेलीं होतीं आणि विमानाचा वेग उतरविण्यासाठीं त्याचीं पाखीं पसरलेलीं होतीं.

हेन्रीनें विमान वाहतुकींतील इंजिनांच्या संबंधांत पुढें आणलेल्या आणखी कांहीं कल्पनांमधील एक कल्पना अशी होती कीं जर प्रत्येक दीड पौंड भारासाठीं एक अश्वशक्ति उत्पन्न केली तर जवळपास १००० अश्वशक्ति विमान चालू करण्यास पुरी पडेल. एका तज्ज्ञानें यावर म्हटलें कीं, १।। पौंडास एक अश्वशक्तीची कल्पना फार क्रांतिकारक आहे. परंतु, हेन्रीला त्यामुळें ती अशक्य कोटींतील वाटली नाहीं. त्याच्या कोशांत 'अशक्य' हा शब्दच मुळीं नव्हता–मग त्याचें कार्य कोणत्याहि क्षेत्रांत चाललेलें असो.

आणखी आठ वर्षांनीं डिअरबोर्न विमानतळावरून जीं विमानें निघालीं त्यांच्यावर प्रत्येकीं १००० अश्वशक्ति निर्माण करणारीं इंजिनें बसविलेलीं होतीं. आणि त्यांच्या अश्वशक्तीचें भाराशीं प्रमाण एका अश्वशक्तीला १·०७ पौंड भार इतकें पडत होतें. प्रत्यक्ष प्रगतीच्या मानानें नेहमींच हेन्रीच्या कल्पनेच्या भराऱ्या कितीतरी पुढें असत.




१९२५ त हेन्रीच्या कंपनीनें T–टी धर्तीच्या मोटारगाड्यांचा दर-दिवशीं १०००० इतका उत्पादनाचा उच्चांक गांठला. अमेरिकेंतील एकूण उत्पादनाच्या शेंकडा ४१ टक्के इतका हिस्सा हेन्रीच्या या मोटारींचा होता. १९२७ मध्यें त्यानें आपल्या या T–टी धर्तीची एक कोटि–पन्नास लक्षावी मोटारगाडी कारखान्याबाहेर लोटली.

त्यानें एक विलक्षण गोष्ट जगाला दाखवून दिली—कारखानदार वेतन-वाढ करूं शकतात, किंमती उतरवूं शकतात, आणि प्रचंड प्रमाणावर उत्पादन करूं शकतात; आणि इतकें करूनहि कोट्यवधि रुपयांचा नफा मिळवूं शकतात. कमींत कमी मानवी कष्ट व श्रम घेऊन मालाची सुकाळाची निर्मिती करायला त्यानें जगाला शिकविलें. त्यानें जगाला हाहि धडा दिला कीं, औद्योगिक निर्मितीमुळें कामकऱ्याची औद्योगिक उत्पादित वस्तू विकत घेण्याची शक्ति वाढूं शकते आणि त्याचें जीवनमानहि सुधारतें. हेन्रीच्या क्रांतिकारक-५ डॉलर्सच्या कमींतकमी रोजमुऱ्याचा अर्थ हाच होता. तथापि, हेन्रीच्या तत्त्वाप्रमाणें हें तरच शक्य होतें कीं जर कामगार या आपल्या रोजमुऱ्याचा पुरा मोबदला दिवसभर कसून काम करून द्यायला मनापासून तयार असेल. पुरुष किंवा बाई कोणीहि असो, जो आपली रोजी कमावणार नाहीं त्याला फोर्ड कंपनींतील चाकरीहि गमवावी लागणार हें ठरल्या-सारखेंच होतें.

---

## बा वि सा वें प्र क र ण

---

## ।।।।।। १३५ बाविसावें प्रकरण

वर्षभर पांच दिवसाच्या आठवड्याचा प्रयोग करून पाहिल्यानंतर हेन्री या निष्कर्षावर येऊन ठेपला कीं, कामाच्या कमी तासांनीं आपल्या कारखान्यांतील काम मात्र वाढलेलें आहे. कमी काम नव्हे, तर कमी वेळांत अधिक चांगल्या पद्धतीनें व अधिक चांगल्या हत्यारांनीं केलेलें अधिक चांगलें व अधिक जास्त काम हें हेन्रीचें धोरण होतें.

सतत एकोणीस वर्षें अमेरिकेंतील गरीब माणसाला खडखडत्या T (टी) धर्तीच्या मोटारीनें विश्वासू व स्वतंत्र असें वाहतुकीचें साधन पुरविलेलें होतें. दरवर्षी घडणाऱ्या या बनावटींत सूतभरहि फरक नव्हता. गिऱ्हाइकाला फारतर रंगांत आवडनिवड करतां येई इतकेंच.

परंतु आतां काळ पालटला होता. मोटारींच्या बनावटींत अधिक सुबकपणा असण्याची गरज भासूं लागली होती. एकंदर राहणींत ज्या मानानें सुखसौकर्याची वाढ होत होती त्या मानानें वाहतुकींतहि सौकर्य वाढत्या प्रमाणावर मिळालें पाहिजे असें वाटणें हें अगदीं तर्कशुद्धच होतें. कमखर्चिक मोटारगाडीची अमेरिकन लोकांची कल्पनाहि याप्रमाणें बदलली होती.त्यांना कांहींतरी अधिक ढंगदार व डोळ्यांत भरण्यासारखें असें कांहींतरी हवें होतें. आणि ही त्यांची अपेक्षा, तेवढ्याच किंमतीच्या कोष्टकांत 'शेवरोलेट' गाडी पुरवूं शकत होती. शक्ति, आराम व देखणेपणा अशा सर्वच दृष्टींनीं ती गाडी निश्चित उजवी होती. अर्थातच गिऱ्हाईक या गाडीकडे वळलें. गेल्या कित्येक वर्षांत हेन्रीच्या T–टी धर्तीच्या गाडीनें राखलेली खपांतली आघाडी आतां या ' शेवरोलेट 'नें पटकावली.

हेन्रीची मात्र ठाम समजूत होती कीं उपयुक्ततेच्या दृष्टीनें बनविल्या जाणाऱ्या गाडीला ऐट व आराम यांची मुळींच गरज नाहीं. पण एडसेल मात्र कांहीं जुनें खोड नव्हतें ! त्याचे त्याच्या वडिलांशीं अनेकदां मतभेद होत. एडसेलचें म्हणणें हेन्री ऐकून घेई; परंतु त्यानें एकदां बनविलेलें आपलें मत तो कांहीं केल्या बदलायला तयार नव्हता.

" पपा, " एडसेल आग्रहानें म्हणूं लागला, " फोर्ड 'ला साजशृंगार चढवल्याशिवाय आतां गत्यंतरच नाहीं. ' शेवरोलेट ' शीं टक्कर द्यायची तर T–टी बनावट बाजूला सारणें आपल्याला भागच आहे. तरच आपला निभाव लागेल. "

" तें एक वेड आहे," हेन्री खुत्कारून उत्तर देई. " लोक पुन्हां 'उपयोगी '–( युटिलिटी ) गाडीकडे माघारे वळतात कीं नाहीं पाहा ! "

हेन्रीनें आपल्या T–टी बनावटीच्या पंधरा लक्ष गाड्यांचें उत्पादन केलें. त्यानें त्याला श्रीमंतीच्या शिखरावर नेऊन ठेवलें. मोटारधंद्यांतली ती सर्वांत बडी आसामी होऊन बसली. स्वयंचलित गाडीविषयीं लोकांच्या मनांत त्यानें गोडी उत्पन्न केली. परंतु लोकांना जेव्हां मोटार ही एक चांगली वस्तु आहे असें पटलें त्या मागोमागच त्यांना त्यांत सुबकपणा व सुखकरताहि हवीशी वाटूं लागली. काड्यामोड्याच्या गाड्या कितीहि टिकाऊ व उपयुक्त असल्या तरी लोकांना त्यांची आतां ओढ राहिली नाहीं. घरोब्याची वाटणारी काळी T–बनावटीची फोर्ड मोटार आतां लोकांच्या मनांतून उतरली होती.

जेव्हां खप व नफा यांची घसरगुंडी थांबेनाशी झाली तेव्हां मात्र हेन्रीला एडसेलच्या म्हणण्याला रुकार देण्याखेरीज गत्यंतरच उरलें नाहीं. १९२७ च्या ' शेवरोलेट ' बरोबर स्पर्धा करण्यासाठीं नवीन बनावटीची गाडी हेन्रीच्या कारखान्यांत बनूं लागली. हेन्री, एडसेल व यंत्रविशारद त्यासाठीं अविश्रांत खपत होते. हेन्रीनें त्यावर १०००००००० डॉलर्स खर्च केले, ३०००० हत्यारें मोडीत टाकलीं आणि पुनश्च ' हरि ओम् ' म्हणून सगळें कांहीं नवीन सुरू केलें. कमी किंमतीच्या गाड्यांचें क्षेत्र तर त्याला सोडवायाचें नव्हतें. त्यासाठीं त्यानें ' जनरल मोटर्स 'च्या पावलावर पाऊल टाकून आराम व ऐट असलेली पण स्वस्त गाडी बनविण्याकडे लक्ष पुरविलें. हेन्रीची धारणाच अशी नव्हती कीं, कमखर्चिक गाड्यांना सुबकतेची जरूरी आहे. त्यामुळें अशा गाडीची कल्पना प्रत्यक्षांत उतरविणें हेन्रीला फारच जड गेलें.

नव्या ढंगाची बनावट म्हणज साऱ्या कारखान्याची त्या उत्पादनाच्या दृष्टीनें पुनर्रचना करणें आलेंच. मात्र या योजना अगदीं गुलदस्तांत ठेवलेल्या होत्या. नव्या बनावटीचा कोणताहि तपशील किंवा त्याचीं नवीं अंगप्रत्यंगें याचा लोकांना अजिबात पत्ता लागूं देण्यांत आला नव्हता.

१९२७ मध्यें A–ए धर्तीची नवी गाडी 'फोर्ड'च्या दर्शनगृहांतून ( शोरूम्स ) देशांत सर्वत्र दिसूं लागली. ' फोर्ड'च्या विक्रेत्यांना बरें वाटलें. ' शेवरोलेट 'च्या विक्रेत्यांशीं जोरदार चढाओढ करायला त्यांच्या हातीं

कांहींतरी आलें होतें. ही नवी गाडी T–टी धर्तीच्या गाडीपेक्षां अगदींच वेगळी होती. ‘ टिन–पाट ’ गाडीचे दिवस आतां मागें पडले होते. त्या ‘ टिन–पाट ’चे मृत्युलेख वृत्तपत्रांनीं व्यंगचित्रांनीं व्यक्त केले. आपल्या काळांत ती एक चांगली गाडी होती एवढें खरें.

A–ए बनावटीची गाडी नव्या नव्या सुधारणांनीं नुसती सजली होती. एकच एक काळा रंग जाऊन त्या जागीं रंगांची विविधता आली होती. अधिक वेग, चार चाकांचे ब्रेक्स, उत्तम गीअरशिफ्ट, सुरक्षाकांच, चाकांमधील अंतराची वाढ, कमी उंचीवर खालच्या बाजूला घेतलेला सांगाडा, धक्का-शोषकाची सोय अशा अनेक व्यवस्था या नव्या बनावटींत होत्या. लोकांना या सर्वांपेक्षांहि कोणती गोष्ट विशेष आवडली असेल तर ती म्हणजे नव्या ‘ फोर्ड ’ची जाहीर झालेली किंमत. याचीहि किंमत जुन्या T –टी धर्तीच्या गाडीइतकीच जवळजवळ होती.

या नव्या A–ए बनावटीची जाहिरात हेन्रीनें “ रेडिएटरच्या झांकणापासून मागील आंसापर्यंत सर्वस्वीं नवी गाडी ” अशी केली. ताशीं ५५ ते ६० मैल वेगानें नेणाऱ्या ४० अश्वशक्तीच्या एंजिनाची जाहिरात त्यानें केली. तसेंच यांत्रिक चौचाकी ब्रेक्सचीहि जाहिरात हेन्रीनें केली.

या मोटारीला तेलपाणी देण्याची सोय हेन्रीच्या यंत्रविशारदांनीं विशिष्ट पद्धतीनें केली होती. पंप, फवारा व गुरुत्वाकर्षण या तिन्ही बाबींचा संयोग त्यांत साधलेला होता.

नफ्याच्या मोठ्या प्रमाणानें कमी मोटारी विकण्यापेक्षां नफ्याच्या थोड्या प्रमाणावर जास्तींत जास्त संख्येनें मोटारींची विक्री करण्याच्या धोरणालाच हेन्री अद्यापिहि धरून होता. तरीपण त्याला हेंहि माहीत झालेलें होतें कीं, जर बनावट ( डिझाइन ) चांगली असेल तर त्याच्या बळावर वर्षानुवर्ष उत्पादन करीत राहून उत्पादित वस्तु जगाला स्वस्तांत स्वस्त देतां येईल.

T–( टी ) धर्तीच्या गाडीच्या यशस्वी दीर्घजीवनाच्या इतिहासाचें A –‘ ए ’ बनावटीची गाडी पुन्हां आवर्तन करील अशी आशा हेन्रीला होती; पण ती फोल ठरली. अनेक लोकांना वाटलें कीं ही गाडी ‘शेवरोलेट’-बरोबर टिकाव धरूं शकणार नाहीं. ‘ शेवरोलेट ’ फार वेगानें प्रगत होत होती आणि लोकांना अद्ययावत् पद्धतीच्या सुखसोयी पुरवीत होती. त्यामुळें ही A–‘ ए ’ बनावटीची गाडी पांच वर्षांहून अधिक काळ टिकाव धरूं शकली नाहीं.



सुप्रसिद्ध एडिसन इन्स्टिटयूट आणि ग्रीनफील्ड-ग्राम पाहण्यासाठीं जगाच्या कानाकोपऱ्यांतून लोक येत. लोकांना त्यांच्या भूतकाळाची आठवण करून देणारें हें चिरस्थायी स्मारकहि हेन्रीच्या 'सर्वांसाठीं गाडी' च्या देणगीइतकीच मोलाची कामगिरी होती. ज्ञानलालसेनें येणारे प्रेक्षक त्यांच्या तेथें होणाऱ्या स्नेहपूर्ण स्वागतामुळें भारून जात तर केवळ गमतीखातर किंवा कुतूहलानें जमणाऱ्या पाहुण्यांना आपल्या ज्ञानांत विनासायास भर पडल्याचा अनुभव यई.

१७६० मधील एका एंजिनापासून यंत्रयुगांतील बाष्पशक्तीचा प्रत्येक कक्षेतील विकास प्रेक्षकाच्या नजरेसमोर प्रत्यक्ष उभा राही. (बाष्प–) शक्तीच्या आगमनाबरोबर निर्मितीची सारी पद्धत आणि राहणीचें तानमान कसें पार पालटून गेलें आहे हें या प्रदर्शनीय वस्तूच बोलक्या होऊन सांगूं लागत. बाष्पशक्तीची कहाणी पहिल्या व्यापारी इंग्लिश बाष्पयंत्राच्या श्रीगणेशापासून सुरू झाली. या एंजिनाला हवामानाच्या दाबाचें 'न्यूकॉमन' असें म्हणत. त्यानंतर१७९५ सालांत वॅटच्या पंपाच्या एंजिनानें 'न्यूकॉमन'-च्या पुढची पायरी गांठली.

ज्या मुलांना यंत्रविद्येची आवड आहे अशांसाठीं डिअरवोर्न येथें जगांतील सर्वांत मोठा यंत्रांचा संग्रह होणार आहे याचें हेन्रीला फार बरें वाटलें.

---

## ते वि सा वें प्र क र ण

---

संग्रहांतील वस्तूंची मांडणी पांच प्रमुख विभागांतून करण्यांत आली होती:——कलात्मक, शेतीविषयक, घरगुती कला, कारखानदारी आणि शक्ति-उत्पादनाचीं साधनें. प्रत्येक विभाग बाष्पयंत्र विभागाएवढाच मोठा होता.

ग्रीनफील्ड-ग्रामाचे हें दर्शन म्हणजे खरोखरीच एक वेगळें संग्रहालय असून त्यांत अनेक छोटीं घरें जुन्या धर्तीच्या कुरणाभोंवतीं मांडलेलीं होतीं. या खेड्यांत मोटारींना प्रवेश करण्यास बंदी होती. प्रेक्षकांना एका घरापासून दुसऱ्या घराकडे घोड्यावरून किंवा घोड्याचा गाड्यांतून नेण्यांत येई. अशाप्रकारें येथें पंचाहत्तर वर्षांपूर्वींच्या अमेरिकेंतील वातावरण निर्माण करण्यांत आलें होतें.

टॉमस अल्वा एडिसन ज्या मेनलोपार्क वाडींत १८७६ ते १८८६ पर्यंतच्या काळांत कष्ट उपशीत होता. त्याचा कांहीं भाग आणि कांहीं प्रतिकृती नव्यानें उभारून या ठिकाणीं एका चौरस क्षेत्रांत पांढरें कुंपण घालून मांडण्यांत आलेली होती. या ठिकाणीं उत्तापदीप (इन्कँडिसंट लाइट), पहिली ध्वनि-मंजुषा ( फोनोग्राफ ), पहिला दूर-बोलीचा कोळशाचा प्रक्षेपक ( कार्बन टेलिफोन ट्रान्समिटर ) आणि पहिला प्रतिलेख ( मिमिओग्राफ ) या वस्तु ठेवलेल्या होत्या.

हेन्रीला ज्या ऐतिहासिक गोष्टींविषयीं व्यक्तिश: प्रेम वाटत होतें–उदाहरणार्थ तो ज्या ठिकाणीं जन्मला तें छोटें घर, त्याचें छोटें बिटेरी यंत्रालय ( ५८, बॅगली अॅव्हेन्यु, डेट्रॉइट ), ज्या ठिकाणीं त्यानें पेट्रोलवर चालणारें पहिलें वाहन बनविले ती जुनी स्कॉटिश वसाहतींतील शाळेची तांबडी इमारत, जेथें तो आपले खिसे शिक्षकाच्या मेजावर रिकामे करी आणि शाळेच्या बांकांवर स्वत:च्या नांवाचीं आद्याक्षरें कोरून ठेवी–अशा अनेक गोष्टींहि मांडलेल्या होत्या.

विल्यम होलमस् मॅक्-गफी नांवाच्या अमेरिकन शिक्षणतज्ज्ञानें लिहिलेलीं क्रमिक पुस्तकें त्या काळीं हेन्री आणि इतर सहस्रावधि अमेरिकन मुलें-मुलीं अभ्यासीत. याचें जन्मस्थान असलेलें लांकडी घरसुद्धां हेन्रीनें पुन्हां बांधून घेऊन या ठिकाणीं मांडलें.

हेन्रीचा एक आवडता कवि स्टीफन कालिन्स फॉस्टर नांवाचा होता. त्याचा जन्म ज्या झोंपडींत झाला होता ती झोंपडी हेन्रीनें पेनसिल्व्हानीयाहून येथें आणून मांडली. त्याचप्रमाणें लोगन काऊंटी ( इलिनॉय ) येथून लिंकनचा दोन मजली आक्रोडाच्या लाकडाचा वाडा उचलून आणून तोहि येथें मांडण्यांत आला. अशाच प्रकारें इतर अनेक ऐतिहासिक महत्त्वाच्या इमारती डिअरबोर्नला आणविण्यांत आल्या.

याव्यतिरिक्त हेन्रीनें कांहीं जुने ऐतिहासिक वाडे डिअरबोर्न येथें उचलून न आणतां त्या त्या ठिकाणींच पुनर्नवीत करून सुरक्षित राहण्याची व्यवस्था केली.

"हातानें काम करतां करतां शिक्षण घेणें" श्रेयस्कर असतें अशी हेन्रीची श्रद्धा होती. त्याच्या मनांत ही श्रद्धा अगदीं लहान वयांत तो जेव्हां त्याच्या यंत्रालयांत काम करायचा तेव्हांपासून उद्भवलेली होती. याच कल्पनेला धरून त्यानें ग्रीनफील्ड-ग्राम शिक्षण संस्था आरंभीं तीस मुलांपासून सुरू केली. हीच पुढें बालोद्यान अवस्थेंतून विकसित होत जाऊन तिचें अवस्थांतर सन्मान्य अशा महाशाळेंत झालें.

शाळेंत येणाऱ्या प्रत्येक मुलाला भावी आयुष्यांत उपयोगी पडेल अशा प्रकारचें शिक्षण देणें हाहि एक तिचा उद्देश होता. आठवड्यांतील एका दिवशीं मुलांना "काम करतां करतां शिकण्याचें" शिक्षण घ्यावें लागे. भावी आयुष्यांत उपयोगी पडेल अशा कला आणि विद्या मुलें आपल्या आपण निवडीत. अगदीं खेड्यांतील शिक्षकास साहाय्य करण्यापासून तों थेट नभोवाणीविषयक तांत्रिक शिक्षणापर्यंतचीं कामें मुलें करीत, तर शाळेंतील मुली एकाद्या मोठ्या कारखान्यांतील कार्यालयांत करावीं लागणारी कामें शिकत. कांहीं मुलें यांत्रिक कामें शिकत. हें सर्व शिकतांना मुलें प्रत्यक्ष कामगारांच्या जोडीनें उभीं राहून त्यांच्या खांद्याला खांदा लावून कामें करीत.

मार्था मेरी प्रार्थना मंदिरांत मुलांच्याबरोबर प्रार्थनेसाठीं जायला हेन्री एकहि दिवस चुकत नसे. केव्हां केव्हां हेन्री आपले विचार मुलांसमोर मांडीत असे. या वेळीं तो मुलांना धार्मिक वृत्तीचें महत्त्व पटवून देई.

"कोणतेंहि काम श्रद्धापूर्वक करूं लागल्यास त्यांत आपली किती प्रगति होते हें पाहून तुम्हांस अचंबा वाटेल," हेन्री म्हणे. "स्वतःवरतीं विश्वास असला कीं दुसऱ्याविषयीं विश्वास वाटूं लागतो. दुसऱ्याविषयीं विश्वास वाटूं लागला कीं, एकंदर राष्ट्रासंबंधीं विश्वास वाटूं लागतो. अशाप्रकारें जगांतील सर्व व्यवहार सुरळीत चालविणारी एखादी अदृश्य शक्ति आहे असा विश्वास माणसाला वाटूं लागतो. असा विश्वास वाटूं लागला कीं मग आपलें कार्यक्षेत्र कितीतरी वाढतें.

"श्रद्धेमुळें कामें होतात असा माझा विश्वास आहे. शुद्ध मनानें, श्रद्धायुक्त अंतःकरणानें काम करण्यास माणसानें आरंभ केला म्हणजेच इतरांच्या सुखासाठीं खपण्याची माणसाची सिद्धता असली म्हणजे सर्व कामें पार पाडण्याचें सामर्थ्य त्यास प्राप्त होतें.

"स्वतःला काय करतां येतें याची जाणीव माणसाला एकदां झाली कीं एखादा मोठा शोध लागल्याप्रमाणें त्याला आश्चर्याचा धक्का बसतो आणि आपण कित्येक गोष्टी करण्यास पूर्वीं उगीचच घाबरत होतों असें त्याला आढळून येतें."

एके दिवशीं हेन्री आणि एडसेल, एड्गर गेस्ट या कवीला मुलांसमोर प्रार्थना मंदिरांत बोलण्यासाठीं घेऊन आले. ते दिवस थंडीचे होते आणि बाहेर हिमवर्षाव होत होता. गेस्ट यांनीं आपल्या कांहीं कविता म्हणून दाखविल्या. मुलांना "When Father Shook the Stove" ही कविता विशेष आवडली. मुलांचीं उल्हसित मुखें पाहून हेन्री आणि एडसेल यांना आणि तितकाच गेस्टनांहि आनंद झाला. अशाप्रकारें हेन्री मुलांसाठीं वेगवेगळ्या सुप्रसिद्ध आणि आवडत्या वक्त्यांना बोलावी. यांत बेस्बॉल खेळणाऱ्यांपासून तों मोठमोठ्या शास्त्रज्ञांपर्यंतचे सर्व लोक असत.

लव्हेट सभागृहामध्यें हेन्री मुलांसाठीं जुन्या धर्तीचे नाचाचे कार्यक्रमहि योजी. तें नृत्यगृह अमेरिकेंतील अत्यंत भव्य अशा नृत्यगृहांत गणलें जात असे. याच्या रंगभूमीवर हिंदुस्थानांतील सागवानी लांकडाच्या फळ्यांचें आच्छादन होतें. नृत्यगृहांतील सुंदर झुंबरें स्फटिकाप्रमाणें चकाकत; आणि

यामुळें तीं सर्वांच्या कौतुकाला पात्र झालीं होतीं. याची कांच चेकोस्लाव्हाकियांतून आणविलेली होती. आणि इतर लांकडी सजावट सामान अठराव्या शतकांतील धर्तीचें असून कपाटांतील चिनी मातीचीं भांडीं संग्रहालयांतून निवडलेलीं होतीं.

नृत्यगृहाचा उपयोग प्राचीन अमेरिकन नृत्याचे पाठ शाळेंतील मुलांना देण्यासाठीं होत असे. एखाद्या मोठ्या नृत्य समारंभप्रसंगीं क्लारा आणि हेन्रीहि उपस्थित राहात. अशाप्रसंगीं हेन्री क्लारा, शिक्षिका किंवा इतर प्रौढ स्त्रियांसमवेत नाचत असे. अशा संमेलनांतून मुलांना नृत्यांचे प्राचीन प्रकार तर अवगत होतच आणि शिवाय त्यांना शिष्टाचार आणि समतोलपणा यांचीहि शिकवण मिळे.

संग्रहालय आणि ग्रीनफील्ड-ग्राम यांची स्थापना करतांना हेन्रीनें त्याचे उद्देश पुढील शब्दांत सांगितले होते : " ही योजना पूर्ण झाली म्हणजे प्राचीन अमेरिकन इतिहास आणि परंपरा टिकविण्याचें, तसेंच प्राचीन अमेरिकन जीवन कशा प्रकारचें होतें याचें ज्ञान नवीन पिढीस करून देण्याचें काम केल्यासारखें होईल. "

## चोविसावें प्रकरण

ऑक्टोबर १९३० पर्यंत 'ए' धर्तीची फोर्ड गाडी खपाच्या दृष्टीनें अग्रेसर होती. परंतु शेवरोलेट गाडीचें नवें रूप फारच सुबक, तऱ्हतऱ्हेच्या रंगाचें शक्तिशाली आणि आरामशीर असल्याकारणानें 'फोर्ड' गाडी त्याच्यापुढें फिक्की पडली. 'शेवरोलेट'ची सहा सिलिंडरवाली गुबगुबीत गाडी हेन्रीच्या 'ए' धर्तीच्या गाडीपेक्षां अधिक आकर्षक असल्याकारणानें जनरल मोटर्सनें स्पर्धेमध्यें 'फोर्ड'ला मागें टाकलें. त्याचप्रमाणें स्वस्त गाड्यांच्या क्षेत्रांतहि क्रायस्लर 'कॉर्पोरेशनच्या 'प्लिमथ' गाडीनें हेन्रीच्या गाड्यांशीं चांगलीच टक्कर दिली.

फोर्ड गाड्यांचा उतरता खप आणि आधुनिक आवडीला अनुरूप अशा गाड्या काढण्याची एडसेलची टोचणी यांच्यामुळें १९३१ मध्यें हेन्रीला आपला पवित्रा बदलणें भाग पडलें. 'शेवरोलेट'ला मागें टाकण्यासाठीं त्यानें आठ सिलिंडरयुक्त 'फोर्ड' गाडी बनविण्याचें ठरविलें. यासंबंधीं वार्ताहरांशीं बोलतांना हेन्री म्हणाला, " आम्हीं पूर्वीप्रमाणें चार सिलिंडरयुक्त गाड्या यापुढें काढणारच आहोंत. आठ सिलिंडरवाली गाडी याचा अर्थ दोन चार-चार सिलिंडरवाल्या गाड्या आम्हीं एकत्र आणल्या इतकेंच, हें तुम्हांला सहज समजून येईल. "

हेन्री, एडसेल आणि कारखान्यांतील यंत्रविशारद कित्येक महिनेपर्यंत या नव्या धर्तीच्या गाडीवर काम करीत होते. एडसेलच्या मतें या नव्या धर्तीच्या गाडीवर जलारोध ( Hydraulic Brakes ) बसवावेत असें होतें. सर्वसाधारण ग्राहकांची इच्छा अशाच प्रकारची होती. परंतु

हेन्रीच्या मतें सुरक्षिततेच्या दृष्टीनें यांत्रिक आरोध ( मेकॅनिकल ब्रेक्स ) बसविणेंच अधिक युक्त होतें. आणि, हेन्रीच्या मनांत जें येई त्याचप्रमाणें घडे. त्याचीं मतें जिब्राल्टरच्या खडकाप्रमाणें अढळ असत !

" बाबा ", एडसेल म्हणे " सर्वसाधारण ग्राहक मोटारींच्या अंतर्गत रचनेपेक्षां बाह्य रूपालाच जास्त महत्त्व देतो. गाडीचा रंग, तिची ढब, रपेटींतील आराम, गॅलनगणिक तोडले जाणारे मैल, आरोधांची कार्यक्षमता यांचेंच महत्त्व त्याला अधिक वाटत असतें. "

" कार्यक्षम आरोध हवेत म्हणतोस ना ? यासाठींच तर मी जलारोध नकोत असें म्हणतों. त्यांचा कांहीं भरंवसा देतां येत नाहीं ! " हेन्री निग्रहपूर्वक उत्तरला.

नवीन धर्तीच्या गाडीचें नांव V-8 ( व्ही–८ ) असें ठेवण्यांत आलें दोन वर्षांत या गाडीच्या निर्मितीसाठीं हेन्रीला एकंदर १२८४४७६६४ इतके डॉलर वेचावे लागलेले होते.

१९२७ ते १९३२ या काळांतील फोर्ड मोटर कंपनीचे ताळेबंद आणि एडसेलचा सतत आग्रह यांच्यामुळें हेन्रीला शेवटीं हें कळून चुकलें कीं अमेरिकन जनतेला ज्या मोटारगाड्या हव्या असतात त्या स्वस्त तर असल्याच पाहिजेत. वेग आणि कार्यक्षमता यांच्या जोडीला त्यांच्या रचनेमध्यें सौंदर्यदृष्टिहि असावयास हवी. वरील सहा वर्षांच्या काळांत जगांतील अग्रगण्य आणि अत्यंत यशस्वी अशा या मोटार कारखानदाराला ११७१९७१८६ डॉलर इतका तोटा सोसावा लागलेला होता. या सहा वर्षांत T धर्तीची गाडी रद्द झालेली होती, A धर्तीची गाडी आली आणि गेली आणि शेवटीं V–8 गाडी प्रगतिपथावर राहिलेली होती.

दोन हजार डॉलरपेक्षां कमी किंमतीच्या सर्व गाड्यांत फोर्डचें V ( व्ही ) धर्तीचें एंजिन वैशिष्ट्यपूर्ण होतें. १९१८ मध्यें जगांतील पहिलें आठ सिलिंडरयुक्त एंजिन ' काडिलाक ' गाडीवर बसविण्यांत आलेलें होतें.

आरंभींच्या काळांतील वेड्याविद्र्या, काळ्या, कामचलाऊ फोर्ड गाड्यांपेक्षां नवीन धर्तीच्या फोर्ड गाड्या कितीतरी सुबक होत्या. मात्र फोर्डच्या मूळच्या कल्पनेप्रमाणें या नवीन गाड्यांतहि त्याचीं मोटाररचनेसंबंधींचीं

मूलतत्त्वें, अर्थात साधी रचना, बळकटी, हलकें वजन, उत्तम मालाचा वापर आणि बनावटींतील कांटेकोरपणा आणि कौशल्य, यांना मुळींच फांटा देण्यांत आलेला नव्हता. हेन्रीला या मूलभूत तत्त्वांपासून ढळणें कधींहि मानवणारें नव्हतें.

खपांतील आपला वरचष्मा कायम राखून 'शेवरोलेट' आणि 'प्लिमथ' या गाड्यांना पुन्हां दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आणून बसवूं अशी उमेद त्याला होती. परंतु १९३२ मध्यें जेव्हां V-8 धर्तीची गाडी बाजारांत आली तेव्हां अमेरिका आर्थिक व राजकीय अडचणींनीं संत्रस्त झालेली होती.

देशभर अतिशय मंदीची लाट पसरली होती आणि त्याचवेळीं राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचेहि नगारे वाजूं लागले होते. राष्ट्राध्यक्ष हूव्हर यांच्या माथीं या मंदीचें खापर जनतेनें फोडलें होतें. फँकलिन डी. रूझवेल्ट यांच्या नेतृत्वाखालीं डेमॉक्रॅटिक पक्षानें निवडणुका जिंकल्या. गरीब बेकार कामगारांची बेकारीच्या चिखलांतून सोडवणूक करण्याचें आश्वासन या पक्षानें जनतेला दिलें होतें. या बांक्या प्रसंगांतून देशाला बाहेर काढण्याच्या ईर्षेनें कट्टे रिपब्लिकनसुद्धां डेमॉक्रॅटिक पक्षाच्या आसऱ्याकडे वळले होते.

राष्ट्रीय औद्योगिक स्वास्थ्य कायदा ( National Industrial Recovery Act-N. R.A. ) जनरल ह्यूज एस्. जॉनसन यांच्या प्रशासकत्वाखालीं अमलांत आला. या व्यवस्थेमुळें कामगारांच्या वेतनावर व किंमतीवर सरकारी नियंत्रण आलें. मोटार-व्यवसाय, पोलाद, तेल, कापड-गिरण्या, लोहमार्ग अशा मोठ्या उद्योगधंद्यांपासून सुरुवात होऊन या संहतीकरणाचें लोण अगदीं सामान्य धंद्यांपर्यंत येऊन पोहोंचलें.

मोटार कारखानदारांनीं एक कायदा संमत केला; परंतु त्यांत हेन्री सहभागी नव्हता. त्याची विचारसरणी नेहमींच स्वतंत्र प्रज्ञेची असे आणि तो बारभाईच्या उत्साहाच्या लोंढ्यांत वाहून जाणारा नव्हता. "मला कांहींहि जाहीर निवेदन करावयाचें नाहीं" असें त्यानें वार्ताहरांना सांगून टाकलें. याचा अर्थ राष्ट्राध्यक्षांच्या या बाबतींतल्या मताशीं आपला विरोध बोलून न दाखवितां स्वत:च्या बुद्धीला जें रास्त वाटलें तें आपण करीत राहावें असा होता.

" गेलीं तीस वर्षें अधिक वेतन व कामाचे कमी तास या धोरणाला मी आग्रहपूर्वक चिकटून राहिलों; आणि आतां काय मी राष्ट्राध्यक्षांना याच बाबतींत विरोध करीन ! " हेन्री क्लाराला म्हणाला.

" तुम्हांला जें योग्य वाटतें तें करीत राहण्याचें तुमचें धैर्य पाहून मला खरोखरीच बरें वाटतें. परंतु देशभर तुमच्याबद्दल जेव्हां वाईटसाईट कंड्या उठविल्या जातात तेव्हां मात्र माथें भडकून गेल्याशिवाय राहात नाहीं. असे प्रसंग म्हणजे तुमच्या शत्रूंना तुमच्या नांवाला आणखी काळोखी फांसण्याची एक सुसंधीच असते. "

" धत् " खांदे उडवीत हेटाळणीच्या स्वरांत हेन्री उद्गारला, " असल्या कुटाळ गांवगप्पांना मी मुळींच किंमत देत नाहीं. अशा चोंबड्यांची बालिश बडबड तूं तरी एवढी मनावर कां घेतेस मला कांहीं समजत नाहीं! "

आणि पुन्हां एकदां हेन्रीनें लोकमताच्या लोंढ्याकडे पाठ फिरविली. कांहीं काळ लोटला आणि राष्ट्रीय औद्योगिक स्वास्थ्याचा कायदा सर्वोच्च न्यायालयानें-सुप्रीम कोर्टानें-घटनाविरोधी ठरविला. हेन्रीचा दुःस्वास करणारी मंडळी आतां मुखस्तंभ झाली ! हेन्री कधींहि झाला तरी बरोबरच असतो हें पुन्हां एकदां सिद्ध झालें.



पुष्कळ वर्षें लोटलीं. १९४१ च्या डिसेंबरांतल्या एका रविवारची दुपार. उदास उदास वाटत होतें. नभोवाणीवरील कांहीं मनोरंजक कार्यक्रम ऐकत हेन्री व क्लारा बसलीं होतीं. हेन्री त्यावेळीं ७८ च्या घरांत होता. त्याची चाल मंदावली होती व पावलेंहि अडखळूं लागली होतीं कृतान्तकटकामलध्वज त्याच्या माथ्यावर फडकतांना दिसूं लागली होती. क्लाराचे केंस अजून मऊ भुरे होते पण एकादाच पांढरा त्यांतून डोकावत होता. तिनें ठाकठिकीनें घातलेल्या काळ्या रेशमी पोषाखावर सुरेख मुक्तामाला झळकत होती आणि डुलणारीं कर्णभूषणेंहि त्याला शोभून दिसण्यासारखींच होतीं. कांहीं म्हणा, हें जोडपें चारचौघांत सहज उठून दिसत होतें, यांत कांहींच शंका नाहीं.

एकाएकीं नभोवाणीवरील चालू कार्यक्रम बंद करण्यांत आला. "नभोवाणीवरील चालू कार्यक्रमांत व्यत्यय येत आहे. जपान्यांनीं पर्ल हार्बरवर केलेल्या भयंकर बॉम्बवर्षावाचा हा परिणाम आहे." क्लारा व हेन्री यांनीं एकमेकांकडे कष्टी नजरेनें बघितलें. आपल्या खुर्च्या आकाशवाणी यंत्राच्या अधिक जवळ सरकवल्या. अमेरिका दुसऱ्या महायुद्धांत ओढली

## पंचविसावें प्रकरण

जाण्याच्या दृष्टीनें हा म्हणजे अगदीं कळस होता. हेन्री व क्लारा समजून चुकलीं.

"याहून भयानक युद्धाची ही केवळ नांदी आहे. राष्ट्राराष्ट्रांनीं आपला राक्षसी लोभ सोडला नाहीं आणि या आपल्या लहानशा जगांत सुखासमाधानानें नांदायला तीं शिकलीं नाहींत तर भावी अनर्थ कांहीं टळत नाहीं." हेन्री क्लारापाशीं म्हणाला.

हेन्रीला लढाईचा मूळचाच तिटकारा. परंतु सद्यःस्थितींत त्वरित शांतता-स्थापनेसाठीं विजय प्राप्त करून घ्यावयाचा तर उत्पादनाची गरज किती तीव्र आहे हेंहि त्याच्या ध्यानीं येऊन चुकलें होतें. दांडग्या बॉम्ब फेंक्या विमानांच्या उत्पादनाला हेन्रीनें आपलें सांधिक उत्पादनाचें (Mass Production) तत्त्व लागू केलें. त्याचा हा विमानोत्पादक कारखाना म्हणजे बनावटीसाठीं लागणाऱ्या हत्यारांची अत्यंत सूक्ष्म रीतीनें तपशीलवार सुव्यवस्था असलेला जगांतील एक अप्रतिम कारखाना होता. या विमानांचें एक विख्यात बी–२४ यंत्र बनविण्याकरितां ३०,००० वेगवेगळ्या प्रकारचे भाग बनवावे लागत. हे सारे भाग एका कारखान्यांत जोडावयाचे म्हणजे ५४५० फूट संक्रुतिमार्गाची उभारणी अपरिहार्यच होती.

'विलो रन' विमानतळानें १४३४ एकर क्षेत्रफळ व्यापलें होतें. याचा उपयोग 'विलो रन' विमानांना चांचणी-क्षेत्र म्हणून उपयोगी पडे; व तसेंच सैनिकी बॉम्बफेंक्या दलांसाठीं शिक्षणतळ म्हणूनहि तो उपयोगांत येई. हीं बॉम्बफेंकीं विमानें तेथून दरदिवशीं दशदिशांना रवाना होत.

हेन्री शांततेचा कट्टा कैवारी होता. तरी त्याच्या या राक्षसी युद्ध–प्रयत्नांबाबत त्याच्यावर टीकाकारांचे कडवे व कडाडून हल्ले होऊं लागले परंतु युद्धांत विजय मिळविण्यासाठीं हेन्रीनें जरी आपलीं हीं राक्षसी उत्पादन-साधनें सरकारच्या दिमतीला दिलीं नसतीं तरीहि लोक त्याच्यावर टीका करायचे थोडेच थांबले असते! हेन्रीची संपत्ति आणि शक्ति आतां अशा एका मर्यादेपर्यंत जाऊन पोहोंचली होती कीं त्यानें कांहींहि केलें तरी स्तुति-निंदेच्या माऱ्याखालीं तो सारखाच सडकून निघत होता. पण

आपल्याविषयीं लोक काय म्हणतात आणि त्यांना काय वाटतें याची फिकीर हेन्रीनें फारशी कधींच केली नाहीं.

इकडे ही युद्धसाहाय्याची धामधूम चालू होती. त्यांतच कामगारांच्या संबंधांतहि मोठमोठ्या समस्यांनीं डोकें वर काढलेलें होतें. आपण आपल्या माणसांना चांगले पगार देतों आणि काम करण्याच्या दृष्टीनें खूप सोयीसवलती देतों त्यानें तीं समाधानांत असतील अशा समजुतींत हेन्री होता. परंतु तो काळच श्रमिकसंघर्षांचा होता. फोर्ड कारखानेहि त्याला अपवाद ठरले नाहींत. कामगारांच्या मागण्या महापुरासारख्या फुगत होत्या. हंगामी बेकारी व नोकरींतील अशाश्वती त्यांना मंजूर नव्हती. १९३८ च्या अखेरीपर्यंत फोर्डखेरीजकरून बाकी सर्व मोटार कारखान्यांतील कामगारवर्ग चांगलाच संघटित झाला होता. हेन्री मात्र अजूनहि आपल्या कामगारांना मर्जीनुसार कमी पगार देणें किंवा त्यांना कसलेंहि कारण न देतां कामावरून काढून टाकणें या बाबतींत स्वतंत्र होता.

१९४१ मध्यें हेन्रीच्या माणसांनींहि औद्योगिक संघटना कॉंग्रेसला (C.I.O.) मिळण्याचें ठरविलें. हेन्रीला या घटनेनें जबरदस्त धक्का दिला. आपण कामगारांना देत असलेलें वेतन कोणतीहि समजूतदार कामगार संघटना मागणी करण्याची कल्पना करील त्यापेक्षां अधिक आहे आणि कामाचे तासहि त्यापेक्षां कमी आहेत, अशा भ्रमांत हेन्री होता. परंतु कामगारवर्गाच्या मागणीचें स्वरूप याहून वेगळें असल्याचें दिसूं लागलें. आपल्या देशाचा राज्यकारभार चालविण्यांत आपल्या म्हणण्याला किंमत असली पाहिजे हें जसें त्यांना वाटत होतें त्याप्रमाणेंच औद्योगिक क्षेत्रांतील आपले प्रश्न आपल्याला सोयिस्कर वाटतील तसेच सोडवून घेण्याची त्यांची प्रवृत्ति दिसत होती. थोडक्यांत म्हणजे कामगारांना उद्योगधंद्यांतहि लोकशाही हवी होती; आपल्या संघटनांना ( Unions ) मान्यता मिळाली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

" होऊं देत कामगार-संघटना. त्यांत कांहींच वाईट नाहीं, " हेन्री म्हणाला. " परंतु त्या संघटनेचे म्होरके त्या संघटनेंतील सर्वसामान्य सभासद-कामगारांइतकेच दिलाचे प्रामाणिक असून तितकेच सरळ, सभ्य व शहाणे

असायला हवेत. नाहींतर यांपैकीं कांहींचा उद्देश तर दुहीसाठीं धडपड असाच असतो ! जेव्हां तुमचा रोजमुरा १२ डॉलर्स असेल तेव्हां ते तुम्हांला सांगतील, ' इथे थांबूं नका; १४ डॉलर्ससाठीं भांडत राहा.' जेव्हां तुमच्या कामाचे तास दिवसाला आठ असतील तेव्हां ते तुम्हांला म्हणतील, ' मूर्ख आहांत कीं काय, एवढ्यावर संतोप मानायला ! सहा तासांच्या दिवसासाठीं झगडा करा.' ' कांहींतरी खुसपट काढा; सदा कसलेंतरी खुसपट काढीत राहा ' हाच त्यांचा मंत्र असेल. "

उलट आंधळ्या, हट्टाग्रही ' शेठ ' लोकांना वठणीवर आणायला कामगार-संघटना हा तोडगा योग्यच आहे असेंच हेन्रीचेंहि मत होतें. अशा संघटनांनीं नाक दाबल्याशिवाय कामगारांचें कांहीं भलें करायला त्यांचें तोंडच उघडत नाहीं, हेंहि तो ओळखून होता. या कारखानदारांत असेहि कांहीं हरीचे लाल होते कीं जे म्हणायचे, " या मजुरांना दडपून टाकण्याची हीच वेळ आहे; चांगले तावडींत सांपडले आहेत लेकाचे ! "

संघटित कामगारवर्गानें मिळविलेला प्रचंड विजय म्हणजे १९३५ मध्यें पसार झालेला वॅग्नर श्रम-संबंध कायदा ( Wagner Labour Relations Act ) या कायद्यानें कामगार–मालकांनीं एकत्र बैठकीला बसून आपापले मतभेद एकमेकांसमोर मांडावेत व त्यानुसार होणाऱ्या चर्चेतून जो निर्णय ठरेल तो स्वीकारला जावा असें बंधन मालक-वर्गावर पडत होतें. या गोष्टीला पुष्कळ मालकांप्रमाणेंच कांहीं कामगारांचाहि विरोध होता. परंतु वरील कायद्याची अंमलबजावणी करून घेण्यासाठीं राष्ट्रीय श्रम-संबंध मंडळ ( National Labour Relations Board ) स्थापन करण्यांत आलें.

अखेर १९४१ मध्यें हेन्रीनें औद्योगिक संघटना काँग्रेसच्या संयुक्त मोटार-कामगार संघटनेशीं करार करण्याचें मान्य केलें. हा करार कामगारांच्या दृष्टीनें इतर अनेक मोटार-कारखानदार-कंपन्यांपेक्षां कितीतरी पटींनीं अधिक लाभदायक होता. तेव्हां निदान आतां या फायदेशीर करारामुळें तरी औद्योगिक क्षेत्रांत शांतता नांदूं लागेल अशी हेन्रीची अपेक्षा होती; परंतु ती फोल ठरली. १९४१ ते १९४५ पर्यंतच्या काळांत फोर्ड

मोटार कंपनीमध्यें ७७३ बेकायदा संप घडून आले. ते हेन्रीनें केलेल्या कराराचा व सरकारी कायद्याचाहि भंग करणारे होते.

हेन्रीनें केलेल्या करारांमुळें कामगार संघटनेला मात्र फार फायदा झाला. या करारामुळें मिळणाऱ्या सोयीसवलतींनीं संघटना (Union) सभासदबळाच्या दृष्टीनें चांगली बळकट होऊन तिला आर्थिक सुस्थितिहि लाभली. परंतु याच सुस्थितीचा व बळाचा दुष्परिणाम असा झाला कीं, संघटनेच्या अधिकारपदांचा अनेकांना लोभ सुटला. आणि तीं प्राप्त करून घेण्यासाठीं झगडणाऱ्या सभासदांत सर्वच कांहीं 'उत्तम नेते' म्हणण्याच्या पात्रतेचे नसल्यामुळें या महत्त्वाकांक्षेपायीं संघटनांतर्गत झगड्याला निमंत्रण दिल्यासारखें झालें.



राव असो नाहींतर रंक असो, घोर दुःखाच्या तडाख्यांतून कोणी क्वचितच सुटतो. हेन्रीहि त्यांतून वगळला गेला नव्हता. एडसेलला २६ मे, १९४३ या दिवशीं काळानें ओढून नेला. हेन्रीचा हा तरुण मुलगा त्यावेळीं ४९ वर्षें वयाचा होता. सोळा महिन्यांपूर्वींच त्याच्या पोटावर एक शस्त्रक्रिया करण्यांत आली होती आणि त्यांतून तो कधींच पूर्ण बरा झाला नाहीं. साऱ्या डेट्रॉइटवर एडसेलच्या मृत्यूनें दुःखाची अवकळा आणली. कारण त्या ठिकाणच्या जीवनांत तो म्हणजे एक प्रमुख व्यक्ति होऊन बसलेला होता.

T–( टी ) धर्तीच्या गाड्यांच्या मागोमाग फोर्ड कंपनींत तयार होणाऱ्या सर्व नवनव्या धर्तीच्या मोटारी बनविण्यांत एडसेलचा मोठा हात होता. 'लिंकन' धर्तीच्या गाड्यांचा आराखडा व बनावट बव्हंशीं त्याच्याच मार्गदर्शनाखालीं झालेली होती. मोटार व्यवसायांत फार प्रचंड उलथापालथी त्याच्या दृष्टीसमोर घडलेल्या होत्या. कामगारवर्गाच्या अडचणींशीं मिळतें-जुळतें घेण्याचा यत्न त्यानें केलेला होता. कामगारांनाहि त्याच्यावांचून चुकल्याचुकल्यासारखें वाटत होतें.

## सव्विसावें प्रकरण

हेन्रीनें पुन्हां कंपनीचें अध्यक्षपद स्वतःकडे घेतलें. ऐंशीचा उंबरा ओलांडणाऱ्या या वृद्धावर पडलेला दैनंदिन कामाचा ताण फारच मोठा होता. त्याच्या निम्म्या वयाच्या माणसाचीहि त्या कामाच्या ओझ्याखालीं दमछाक झाली असती. सकाळी साडेपांचला तो उठे. आपल्या शेतवाडी-भोंवतीं त्याची एक चक्कर होई आणि नंतर थोडी न्याहारी. त्यानंतर तो 'विलो-रन' कडे जावयाला निघे. याचठिकाणीं 'लिबरेटर' बॉम्बफेंक्या विमानांचें संकृतिकरण चालू असे. बैठकांना उपस्थित राहणें आणि नवे सुचविले जाणारे फेरफार इष्टानिष्टतेप्रमाणें स्वीकारणें वा नाकारणें हें त्यालाच करावें लागे. साऱ्या खात्यांतून चालू असलेलें काम आपल्या नजरे-खालीं घालण्यासाठीं मैलोमैल पसरलेलीं कामघरें ( Woskshops ) तो जातीनें पायीं हिंडून पाही. नंतर रोग नदीवरील शक्त्युत्पादन केंद्राची पाहणी होई; आणि पुढें उरलेल्या दिवसाच्या वेळांत कारखान्याच्या इतर भागांची तपासणी होई. स्वतःच्या खाजगी कार्यालयांत एका वेळीं कांहीं थोड्या मिनिटांपेक्षां अधिक काळ बसून राहण्याचीं त्याला संवयच नव्हती दीर्घोद्योग, अचल धैर्य आणि सात्त्विक जीवन याची हेन्री म्हणजे जिवंत प्रतिमा होती.

युद्ध संपलें आणि मग हेन्रीला जरा सुटकेचा श्वास सोडतां आला लढाईचीं बडींबडीं कंत्राटें रद्द झालीं व त्याचे कारखाने परत शांतता-शाळांतील नेहमींच्या कामाला लागले. हेन्रीच्या दृष्टीनें तरी मध्यंतरीच्या काळांतील प्रचंड युद्धसाहित्याचें उत्पादन म्हणजे केवळ वायफळ कष्ट होते. केवळ विध्वंस हाच त्याचा उपयोग होता.

आतां कंपनीनें पुनश्च मोटारी, ट्रक, आणि हलयंत्रें तयार करण्याचें काम हातीं घेतलें. त्याचवेळीं हेन्रीनें एक फार मोठा निर्णय ठरविला. या जगांत आपलीं आतां फार वर्षें राहिलेलीं नाहींत, तेव्हां फोर्ड मोटार कंपनीला आपल्या डोळ्यांदेखत नव्या नेतृत्वाखालीं द्यावी असें त्याच्या मनांत आलें. त्यानें आपला अठ्ठावीस वर्षें वयाचा सर्वांत थोरला नातू दुसरा हेन्री यांला कंपनीच्या अध्यक्षपदावर आणून बसविलें.

तरुण हेन्रीच्या हातीं कंपनीचीं सूत्रें देत असतांनाच हेन्रीच्या ध्यानांत आलेलें होतें कीं, प्रत्येक नव्या पिढीला औद्योगिक क्षेत्रांत आपले स्वतःचे असे कांहीं नवनवीन प्रश्न सोडवावे लागणारच. त्याला हेंहि समजून चुकलें होतें कीं, तरुण हेन्रीला नवीं धोरणें आंखावीं लागतील; तसेंच देशभर सतावणाऱ्या श्रम-संबंधांच्या प्रश्नांतील वाढत्या अडचणींना तोंड देण्याचीहि तयारी ठेवावी लागेल.

तरुण हेन्री आपल्या पावलावर पाऊल टाकीत असतांना हेन्री मोठ्या कुतूहलानें पाहात होता. लहानपणीं एंजिनें तयार करण्याकडे यानें दुर्लक्ष केलेलें असलें तरी आपला हा तरुण नातू कर्तबगार आहे, याविषयी हेन्रीला खात्री होती. 'फोर्ड'चें नांव जगांत दुसऱ्या कशाहिपेक्षां मोटार उत्पादनाच्या बाबतींत अग्रभागीं झळकत असावें हीच त्याची मनीषा होती.

१९२६ सालीं 'फोर्ड'चा खप अमेरिकेंतील एकुण उत्पादनाच्या शेंकडा ४१ टक्के इतका होता. १९४१ च्या सुमाराला हें प्रमाण शें. १६ टक्केपर्यंत खालीं घसरलें होतें. तरुण हेन्रीनें हेंच प्रमाण १९४६ सालांत पुन्हां शें. २२ पर्यंत वरतीं खेंचून आणलेलें हेन्रीनें पाहिलें. त्याला अत्यानंद झाला. "छोकरा बरोबर काम करणार!" त्यानें अभिमानानें क्लाराला म्हटलें.

"पण नातवाला कांहीं आजोबाच्या चलाखीनें नाहीं वागतां येत." क्लारानें स्पष्टच सांगितलें.

"हं!" हेन्री उत्तरला, "अग, हा नवा औद्योगिक जमाना आहे, क्लारा. तरीपण माझ्या एकदोन कल्पना त्यानें उचलल्या आहेत; आणि म्हणूनच त्याचें पाऊल चुकीच्या मार्गावर पडणार नाहीं. बहुसंख्यांकांना कमींत कमी किमतींत खरीदतां येतील अशा उत्तम बनावटीच्या गाड्या आपल्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षां कमी खर्चांत तयार कराव्यात, हें त्याच्याहि डोक्यांत आहे. जनतेची सेवा हेंच आपलें ब्रीद तोहि मानतो. आतां थोडा धीर धर. तो बाजारांत आणीत असलेली नव्या धर्तीची गाडी एकदां लोकांना पाहूं दे तर खरी. आणि मी आहेंच कीं अजून अडल्या पडल्याला."

ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थूळमत.
क्रम... २२५०२ ... विः ... चरित्र ...
क्र ... १०४ ... नों: दिः ३०।९।५४



परंतु फोर्डचे यंत्रविशारद बनवीत असलेली नव्या धर्तीची गाडी पाहावयाला हेन्री जगला नाहीं.

१९४७च्या एप्रिलचा पहिला आठवडा होता. हेन्री व क्लारा जॉर्जियाहून घरीं परतलीं तों रोग नदीला तुफान पूर आलेला दिसला. वासंतिक महापुराचें पाणी पिसाटासारखें दोन्ही कांठ वेंगून आसमंतांत पसरलें होतें. हेन्रीनें आपल्या शेतवाडीभोंवतीं चांगल्या उंच व भक्कम कुंपणाचें कडें उभारलेलें होतें. परंतु गरगरणाऱ्या पाण्यानें त्यालाहि दाद दिली नाहीं. विजेच्या दिव्यांचे उंचच उंच खांब कोसळून भुईसपाट झाले आणि तारा पाण्यांत बुडून विद्युत्प्रवाहहि तुटून गेला. हेन्रीच्या दगडी घरांत वावरणाऱ्या नोकर-चाकरांनीं उबेसाठीं मोठाल्या शेकोटयांतून ओंडक्यावर ओंडके रचले. रॉकेलचे दिवे व मेणबत्या लावून उजेडाची लुकलुक उत्पन्न करण्याचा प्रयत्न केली. परंतु निसर्ग आपलें रौद्ररूप दाखवीत होता.

सात तारखेची सकाळ उजाडली आणि हेन्री आपल्या मोटारहांक्याला घेऊन पुरानें केलेल्या अनर्थाची पाहणी करण्यासाठीं रोग-कारखान्याकडे मोटारींतून निघाला. रोग नदीच्या या पिसाट सामर्थ्याला कह्यांत आणण्याचें हें एक तऱ्हेचें आव्हानच त्याला मिळालें होतें. म्हाताऱ्याचे भुरे, मिस्किल डोळे ईर्पेनें वटारले. आतां हा माणूस त्र्यायशीं वर्षांचा झाला होता; तरीपण त्याला चांगलें छान वाटत होतें आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपली पाहणी पुढें चालू करण्याची हिंमतहि त्यानें धरली होती.

नेहमींप्रमाणें रात्रीं नऊ वाजतां तो झोंपायला गेला. लगेच निद्राधीनहि झाला. दोन तास झाले असतील नसतील तोंच त्याला जाग आली. "क्लारा", त्यानें हांक मारली आणि त्याचक्षणीं क्लारा त्याच्यापाशीं येऊन उभी राहिली. गेलीं एकूणपन्नास वर्षें ती अशाच तत्परतेनें हेन्रीच्या हांकेला ओ देऊन धांवलेली होती; त्याच्या खांद्याला खांदा लावून उभी राहिलेली होती.

आपल्या दीर्घकालीन विवाहित जीवनांत क्लारा सतत हेन्रीच्या बाजूनें उभी राहात आली होती. ती आपल्या डोळ्याआड झालेलीहि त्याला कधीं खपत नसे. साऱ्या जीवनभर तीं दोघें तरुण नवपरिणत जोडप्याच्या

गाढ प्रीतीनें व सात्त्विकपणानें नांदलीं; परस्परांच्या संगतींत सुखासमाधानाची प्राप्ति करून वागत राहिलीं.

" मला बरं वाटत नाहीं, क्लारा. डोकं भयंकर दुखतं आहे, " हेन्रीनें तिला सांगितलें. " थोडं पाणी प्यायला दे. "

क्लारानें पाण्याचा पेला पुढें केला. पुरामुळें घरांतले टेलिफोन बंद पडलेले होते. त्यामुळें क्लारानें मोटारहांक्याला फोर्ड यंत्रविज्ञान-प्रयोगशाळेंत पाठवून तेथून अर्ध्या मैलावर असणाऱ्या डेट्रॉइटमधील डॉक्टरांना टेलिफोन करून बोलावण्यास सांगितलें.

डॉक्टर आले तेव्हां हेन्रीचे प्राण निघून गेलेले होते. क्लाराच्या हातीं आपला हात देऊन हेन्री शांतपणानें मृत्यूच्या आधीन झाला होता.

ग्रंथालय
९५००
REFBK-0009500